# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

सत्र ३

# पर्यटन भूगोलमधील संकल्पना

**(Concept in Tourism Geography)**

सत्र ४

# पर्यटन विकास आणि नियोजन

**(Development and Planning of Tourism)**

**बी. ए. भाग-२**

**भूगोलशास्त्र : IDS (आंतर विद्याशाखीय विषय)**

(शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२१
बी. ए. (पर्यटन भूगोलमधील संकल्पना/पर्यटन विकास आणि नियोजन) भाग-२ IDS
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-81-951367-1-1

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. सरवदे** (सदस्य सचिव)
I/c संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यासमंडळ : भूगोलशास्त्र व भूगर्भशास्त्र

अध्यक्ष : **प्रा. (डॉ.) संभाजी ज्ञा. शिंदे**

विभागप्रमुख, भूगोलशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. (डॉ.) संभाजी ज्ञा. शिंदे**
  प्रमुख, भूगोलशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- **डॉ. बी. एस. जाधव**
  श्री विजयसिंह यादव कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड सायन्स,
  पेठवडगांव, जि. कोल्हापूर
- **प्रा. (डॉ.) एस. बी. गायकवाड**
  मिरज महाविद्यालय, मिरज, जि. सांगली
- **डॉ. व्ही. आर. वीर**
  किसन वीर महाविद्यालय, वाई, जि. सातारा
- **प्रा. (डॉ.) ए. बी. पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. बी. एन. गोफणे**
  संचालक, वाय. बी. चव्हाण कॉम्पीटेटीव्ह एक्झामिनेशन सेंटर, द्वारा सौ. वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड, जि. सातारा
- **प्रा. (डॉ.) ए. एस. जाधव**
  प्राचार्य, श्रीमती देवकीबाई मोहनसिंहजी चौहाण कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स, सिल्व्हासा-३९६२३०
- **डॉ. आर. एस. माने-देशमुख**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. एन. एस. मासाळ**
  आर. बी. माडखोलकर महाविद्यालय, चंदगड,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. टी. पी. शिंदे**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **डॉ. तात्यासो ए. कुंभार**
  पी. व्ही. पी. महाविद्यालय, कवठेमहांकाळ,
  जि. सांगली
- **डॉ. एन. व्ही. तेलोरे**
  राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय,
  औंध, जि. सातारा
- **प्रा. (डॉ.) एस. जे. देवरे**
  एस. एन. डी. टी वुमेन्स युनिव्हर्सिटी, पुणे कॅम्पस,
  पुणे-४११०३८
- **डॉ. पी. ए. सायमोते**
  मिठ्ठीबाई कॉलेज, वीलेपार्ले (वेस्ट), मुंबई-५६.

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू मा. माणिकराव साळुंखे यांनी २००७-२००८ सालापासून विद्यापीठामध्ये दूरशिक्षण संकल्पना राबवून बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी स्वयं अध्ययन साहित्य उपलब्ध करून देण्याचा अत्यंत स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. नियमित प्रवेश घेवून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्याची संधी समाजातील सर्व घटकांना समानपणे उपलब्ध होईलच असे नसते. शिक्षणासाठीच्या पायाभूत सोयींचा अभाव, आर्थिक आणि सामाजिक अडथळे असतानाही अनेकांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती असते. त्यांच्या इच्छाशक्तीला फलद्रूप करण्याचे काम सध्या शिवाजी विद्यापीठाचे दूर शिक्षण केंद्र करत आहे.

'पर्यटन भूगोलमधील संकल्पना' या सेमिस्टर-३ साठीच्या अभ्यासक्रमात पर्यटन भूगोलाची ओळख, पर्यटनाचे घटक, पर्यटनाचे वर्गीकरण आणि आधुनिक कल, पर्यटनाचे परिणाम या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच 'पर्यटन विकास आणि नियोजन' या सत्र ४ साठी तयार केलेल्या अभ्यासक्रमात भारतातील पर्यटन विकास व नियोजन, भारतातील पर्यटन स्थळे, महाराष्ट्रातील पर्यटन विकास आणि नियोजन, महाराष्ट्रातील पर्यटन केंद्रे या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या पुस्तकाची एकूण ८ घटकांमध्ये विभागणी करून मांडणी केली आहे. सर्व विद्यार्थी व शिक्षकांना सदरचे पुस्तक मार्गदर्शक ठरेल, असा आम्हास विश्वास वाटतो.

सदरहू पुस्तकाच्या लिखानाचे काम शिवाजी विद्यापीठ कक्षेतील विविध मान्यवर प्राध्यापकांनी वेळेत पूर्ण केल्याबद्दल, संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाचे प्रकाशन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ व दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे मनापासून आभार मानत आहे.

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) ए. बी. पाटील**
श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील
कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

**डॉ. सी. यु. माने**
बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण,
ता. पाटण, जि. सातारा

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–३ : पर्यटन भूगोलमधील संकल्पना** | |
| **प्रा. (डॉ.) ए. बी. पाटील**<br>श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर | १ |
| **प्रा. (डॉ.) एस. डी. शिंदे**<br>प्रमुख, भूगोलशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **डॉ. व्ही. आर. वीर**<br>किसनवीर महाविद्यालय, वाई, ता. वाई, जि. सातारा | ३ |
| **डॉ. टी. जी. घाटगे**<br>प्लॉट नं. ३०, विकास कॉलनी, लक्ष्मी रोड १४ वी गल्ली,<br>जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | ४ |
| **सत्र–४ : पर्यटन विकास आणि नियोजन** | |
| **डॉ. सी. यु. माने**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा | १ |
| **डॉ. डी. जे. भंडारे**<br>श्री विजयसिंह यादव कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड सायन्स, पेठवडगांव | २ |
| **डॉ. मिना पोतदार**<br>भूगोलशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **प्रा. (डॉ.) एस. डी. शिंदे**<br>प्रमुख, भूगोल अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**


**प्रा. (डॉ.) ए. बी. पाटील**
श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील
कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

**डॉ. सी. यु. माने**
बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण,
ता. पाटण, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–३** | |
| | **पर्यटन भूगोलमधील संकल्पना** | |
| १. | पर्यटन भूगोलाची ओळख | १ |
| २. | पर्यटनाचे घटक | १५ |
| ३. | पर्यटनाचे वर्गीकरण व आधुनिक कल | ३१ |
| ४. | पर्यटनाचे परिणाम | ४८ |
| | **सेमिस्टर–४** | |
| | **पर्यटन विकास आणि नियोजन** | |
| १. | भारतातील पर्यटन विकास व नियोजन | ६७ |
| २. | भारतातील पर्यटन स्थळे | ९६ |
| ३. | महाराष्ट्रातील पर्यटन विकास आणि नियोजन | १३० |
| ४. | महाराष्ट्रातील पर्यटन केंद्रे | १४६ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१९-२० पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र-३ : घटक-१

# पर्यटन भूगोलाची ओळख

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ व्याख्या-पर्यटन आणि पर्यटक

१.२.२ पर्यटन भूगोलाचे स्वरूप

१.२.३ पर्यटन भूगोलाची व्याप्ती

१.२.४ पर्यटन भूगोलाचा ऐतिहासिक विकास

१.२.५ पर्यटन भूगोलाचे महत्त्व

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ क्षेत्रीय कार्य

१.८ संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यावर पुढील बाबींचे ज्ञान होईल.

१. पर्यटनामध्ये भौगोलिक घटकांचे महत्त्व समजून येईल.

२. पर्यटक व पर्यटन या दोन्ही बाबींचा अर्थ व त्यांच्यामधील फरक स्पष्ट होईल.

३. पर्यटन भूगोलाचे स्वरूप समजून विविध बाबींची माहिती घेता येईल.

४. पर्यटनाची व्याप्ती किती खोल आहे याचा उलगडा होईल.

५. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत पर्यटनाचा विकास कसा होत गेला याचे ज्ञान होईल.

६. मानवी जीवनाच्या दृष्टीने पर्यटन कसे महत्त्वाचे आहे व त्याचे फायदे कसे आहेत हे समजावून घेता येईल.

७. पर्यटन कसे व केव्हा करावे याची माहिती मिळेल.

## १.१ प्रास्ताविक

२१ व्या शतकात पर्यटन हा व्यवसाय सर्वात जलद गतीने विकसीत होत आहे. यामध्ये भांडवल गुंतवणूक कमी व फायदा जास्त असल्याने विकसीत व अविकसित देश यांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटन हा व्यवसाय ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक व भौगोलिक घटकांच्या आधारावर चालतो. या बाबींमध्ये जितकी जास्त विविधता तेवढा या व्यवसायाचा विकास जास्त होतो. भौगोलिक पर्यटनामध्ये पर्वत, पठार, मैदान, नद्या, झरे, धबधबे असा विविध प्राकृतिक घटकांचा समावेश होतो. तसेच मानवी घटकामध्ये लोकसंख्या, समाज, संस्कृती, शेती व आर्थिक प्रगती यांचा समावेश होतो. पर्यटन भूगोलात प्राकृतिक व मानवी अशा दोन्ही बाबींचा समावेश होतो. त्याच्या आधारावर या भाषेचा विकास झाला आहे. पर्यटन भूगोलामध्ये त्याचे स्वरूप, अर्थ, व्याख्या, व्याप्ती व महत्त्व या घटकांचा अभ्यास होणे महत्त्वाचे आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ व्याख्या-पर्यटन आणि पर्यटक

❑ **पर्यटनाच्या व्याख्या (Defination of Tourisim) :-**

पर्यटन शब्द हा लॅटिन भाषेतील Tornus या शब्दापासून आला आहे. Tournus या शब्दाचा अर्थ प्रवास किंवा भटकंती करणे असा होतो. Tour म्हणजे प्रवास त्यापासून Tourism म्हणजेच प्रवासासाठी बाहरे पडणे होय. असा अर्थ होतो. पर्यटनाचा अर्थ समजून घ्यावयाचा असेल तर त्याच्या विविध व्याख्याद्वारे अभ्यास करता येईल त्या पुढीलप्रमाणे :-

१. 'एखादी व्यक्ती आपल्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दुसऱ्या स्थळी कायमस्वरूपी वास्तव्य न करता एक वर्षाच्या आत उद्योग किंवा इतर कामासाठी सतत प्रवास करून पुन्हा परत येतो.' *(जागतिक पर्यटन संघटना.)*

२. ‘पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील स्थानी अल्पकालीन केलेले स्थलांतर होय. हे स्थलांतर संशोधन, व्यवसाय, मनोरंजन, ऐषआराम यासाठी केलेले असते.’ *(ब्रिटन पर्यटन संस्था, १९७६.)*

३. ‘एखाद्या अपरिचीत देशात किंवा शहरात विदेशी व्यक्तीचे आगमन, मुक्काम व आजूबाजूच्या स्थळांना भेटी देवून पुन्हा स्वगृही परत जाणे म्हणजे पर्यटन होय.’ *(हर्मन, १९१०.)*

४. ‘कायम स्वरूपाची वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेल्या अपरिचित व्यक्तींच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली संपूर्ण घटना व संबंध म्हणजे पर्यटन होय.’ *(हूंझीकेर व फ्रॅंक, १९४८.)*

५. ‘पर्यटन म्हणजे पर्यटकाने त्याच्या दैनंदिन जीवनातील व्यस्त कार्यक्रमातून मनोरंजन, अभ्यास, आराम व आरोग्य मिळविण्यासाठी केलेला प्रवास होय.’

६. ‘प्रवासासाठी बाहेर पडणे, भटकंती करणे, ज्ञानार्जन मिळवणे व मूळ ठिकाणी परत येणे या संपूर्ण प्रक्रियेला पर्यटन करणे असे म्हणतात.’

## ❑ पर्यटक व्याख्या (Defination of Tourist) :-

Tourist हा शब्द लॅटिन भाषेतील Tourn या शब्दापासून आला आहे. पर्यटनामध्ये जी व्यक्ती प्रत्यक्षात पर्यटन करते त्या व्यक्तीस पर्यटक (Tourist) असे संबोधले जाते. Tourist या घटकाचा अभ्यास विविध अंगानी करण्यासाठी त्याच्या व्याख्या अभ्यासणे गरजेचे आहे, त्या पुढीलप्रमाणे :-

१. ‘एखाद्या देशात चोवीस तासांपेक्षा जास्त आणि कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने सहा महिन्यापेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय.’ *(संयुक्त राष्ट्र संघटना, १९४५.)*

२. ‘उत्कंठेपायी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी प्रवास करणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय.’ *(ऑक्सफर्ड, शब्दकोश.)*

३. ‘एखाद्या देशाला भेट देणारी व कमीत-कमी १४ तास वास्तव्य करणारी व्यक्ती म्हणजे परदेशी पर्यटक होय.’ *(लीग ऑफ नेशन, १९१७.)*

४. ‘जी व्यक्ती करमणूक, आनंद व निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी भ्रमंती करते ती व्यक्ती म्हणजे पर्यटक होय.’

५. ‘आपल्या दैनंदिन जीवनातून मोकळा वेळ काढून बाहेरच्या निसर्गाचा आनंद घेवून राहत्या ठिकाणी परत जाणाऱ्या व्यक्तीस पर्यटक असे म्हणतात.’

'पर्यटन' ही एक प्रक्रिया आहे, तर 'पर्यटक' हा त्यातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. पर्यटकांशिवाय पर्यटन होऊच शकत नाही. या सृष्टीसौंदर्याचा आनंद घेतो तो पर्यटक तर त्याची आनंद घेण्याची क्रिया व त्याचे मानसिक समाधान म्हणजे पर्यटन होय.

## १.२.२ पर्यटन भूगोलाचे स्वरूप (Nature of Tourism Geography) :-

पर्यटनाचा मुख्य उद्देश मानवी जीवन आनंददायी बनविणे आहे. पर्यटन हे अनादिकाळापासून चालत आले आहे, त्यापासून त्यामध्ये बदल होत आहे. सुरुवातीला पर्यटन हे प्राथमिक स्वरूपात होते, पण आता पर्यटनाचे स्वरूप हे व्यावसायिक झाले आहे. भूगोल विषयाचे स्वरूपसुद्धा याच पद्धतीने बदललेले दिसते. भौगोलिक घटकांची व स्थळांची माहिती घेणे, धार्मिक ठिकाणांना भेटी देणे असे पर्यटनाचे मूळ स्वरूप होते. सध्या मनोरंजन, अर्थार्जन व उद्योग म्हणून पर्यटनाकडे पाहिले जाते. अलिकडे पर्यटनामध्ये नाविन्यपूर्ण बदल होत चालला आहे. पर्यटन विविध बाबींना स्पर्श करते त्यामुळे त्याचा अभ्यास विविध स्वरूपात पहावयास मिळतो. ते पुढीलप्रमाणे :-

### १. पर्यटनाचे ऐतिहासिक व धार्मिक स्वरूप :-

इतिहासामध्ये घडून गेलेल्या घटना व ठिकाणे यांची माहिती घेण्यासाठी त्या ठिकाणांना भेटी देणे. उदा. किल्ले, स्मारके, राजवाडे, युद्धभूमी, राजधानीची ठिकाणे इत्यादी. तसेच प्रत्येक धर्माचे महत्त्वाचे असे धार्मिक पर्यटन स्थळ असते. उदा. हिंदूचे-काशी, प्रयाग; मुस्लिमांचे-मक्का, मदिना; ख्रिश्चनांचे-जेरूसलेम, शिखांचे-अमृतसर. या ठिकाणांना त्या-त्या धर्माचे लोक भेटी देण्यासाठी जातात.

### २. पर्यटनाचे सामाजिक व सांस्कृतिक स्वरूप :-

समाजशास्त्रामध्ये समाज, संस्कृति व मानवी समूह या घटकांचा अभ्यास केला जातो. समाजाचा विकास होण्यासाठी मानवाला आपला प्रदेश सोडून इतरत्र काय चालले आहे हे पहावयास लागते. पर्यटनातून या गोष्टी साध्य झालेल्या दिसून येतात. पर्यटक वेगवेगळ्या प्रदेशांना भेटी देतो. त्यातून तेथील समाज जीवन, चालीरिती, संस्कृती यांचा अभ्यास करतो. त्यातून पर्यटनाचा व मानवी जीवनाचा विकास झालेला दिसून येतो.

### ३. पर्यटनाचे भौगोलिक स्वरूप :-

पर्यटन व भूगोल याचा जवळचा सहसंबंध आहे. पर्यटन हे भौगोलिक घटकांवर अवलंबून असते. भौगोलिक विविधता जेवढी जास्त तितका पर्यटनाचा विकास जास्त झालेला आढळून येतो. प्राकृतिक घटक-पर्वत, पठारे, मैदाने, नद्या, सरोवरे, जंगले इत्यादी बाबी व त्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना पाहण्यासाठी पर्यटक या ठिकाणांना भेटी देतो. त्यातून मानवाचे अर्थाजन, मनोरंजन व व्यवसाय या बाबी पूर्ण होतात.

## ४. पर्यटनाचे कालिक व हंगामी स्वरूप :-

पर्यटन हे काल व स्थल परत्वे बदलते. भूरचना, हवामान व मानवी घटक संरचनेत बदल होतो तसे पर्यटनसुद्धा बदलत राहते. प्रत्येक हंगाम हा ठराविक ठिकाणी पर्यटनासाठी अनुकूल असतो. उदा. समुद्र किनारे हिवाळ्यात, पर्वत शिखरे-उन्हाळ्यात व ज्या ठिकाणी धबधबे आहेत ते ठिकाण पावसाळा ऋतूसाठी अनुकूल असते. एखाद्या ठिकाणी यात्रा, जत्रा व ऊरुस असल्यास त्या कालावधीत पर्यटकांची संख्या जास्त असते, म्हणजेच पर्यटनाचे स्वरूप हे कालिक व हंगामी स्वरूपाचे दिसून येते.

## ५. पर्यटनाचे गतिशील व स्थिर स्वरूप :-

पर्यटन हे स्थिर व गतिशील या दोन्ही आधारांवर चालते. पर्यटनात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे. हा गुण गतिमानतेचा आहे. तसेच यातील आर्थिक व्यवहार हे सुद्धा गतिमान असतात. पर्यटन करणाऱ्या पर्यटकाला हॉटेल, लॉजिंग, मोटेल्स, रेस्टॉरंट या ठिकाणी जेवण व राहण्याची सुविधा असते, त्याठिकाणी स्थिरतेचा नियम प्राप्त होतो.

## ६. पर्यटनाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप :-

पर्यटन हा उद्योग वैशिष्ट्यपूर्ण आहे. हा एकमेव असा उद्योग आहे की, ज्यामध्ये आनंद मिळविण्यासाठी पर्यटक बाहेर जातात. पर्यटनाचा मुख्य हेतू मनोरंजन करणे व आनंद मिळविणे हाच आहे. परंतु आनंद मिळविण्यासाठी उद्योग करणे हे या उद्योगाचे इतर उद्योगांपेक्षा वैशिष्ट्य आहे. जीवन जगताना आनंद कसा मिळवला पाहिजे हे या उद्योगातून शिकता येते.

## ७. पर्यटनाचे अनुउत्पादक स्वरूप :-

जगातील हा एकमेव असा उद्योग आहे की, ज्यामध्ये कोणत्याही गोष्टी खर्च होत नाहीत व त्यापासून कोणतेही उत्पादन निघत नाही. म्हणून या उद्योगाला अनुउत्पादक असे म्हणतात. या व्यवसायातील गुंतवणूक म्हणजे लोकांना सेवा देणे होय, तर पर्यटकाला मिळणारा आनंद हेच या व्यवसायातील उत्पादन होय. म्हणजेच या उद्योगात कोणताही कच्चा माल वापरला जात नाही व पक्का माल उत्पादनासाठी तयार होत नाही. तरीही या उद्योगात जगातील सात टक्के लोक प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या काम करतात व आपली उपजिविका चालवतात.

## ८. पर्यटनाचे मनोरंजनात्मक स्वरूप :-

पर्यटन म्हटले की, त्याचा दुसरा अर्थ मनोरंजन असाच होतो. सहलीला बाहेर जायचं अशी कल्पना केली तर लगेच त्यामध्ये मिळणारा आनंद, धम्माल, गप्पा, गाणी या सर्व गोष्टी मनाच्या पटलांवर येतात. पर्यटनाला बाहेर पडल्यानंतर आपण स्वच्छंद मनाने आनंद उपभोगतो. समुद्रात पोहणे,

बर्फावर घसरणे, धबधब्यात भिजणे, पर्वत चढाई करणे, जंगल सफरी करणे व प्राणी-पक्षी पाहणे या सर्व बाबींतून आपल्याला आनंद मिळतो. पर्यटनाचा मुख्य उद्देश हाच आहे की, पर्यटनातून आनंद मिळाला पाहिजे व पर्यटकाचे मनोरंजन झाले पाहिजे.

### ९. पर्यटनाचे अनेकाविध स्वरूप :-

पर्यटन हे एका घटकाशी बांधिल नसून त्याच्या अनेक छटा पहावयास मिळतात. पर्यटन हे सुरुवातीला वैयक्तिक होते. परंतु आता त्याचे स्वरूप सार्वजनिक झाले आहे. पर्यटनामध्ये प्रवास, निवास, वस्तू विक्री या व इतर अनेक बाबींचा समावेश होतो. पर्यटकाला लागणाऱ्या सर्व सुविधा पुरवणाऱ्या घटकांचा समावेश पर्यटनामध्ये होतो. म्हणून पर्यटनाचे स्वरूप हे विविध प्रकारचे पहावयास मिळते.

## १.२.३ पर्यटन भूगोलाची व्याप्ती (Scope of Tourism Geography) :-

पर्यटनाची व्याप्ती काळानुरूप बदलत आहे. प्राचीन काळी पर्यटन, देवधर्म, यात्रा, जत्रा यांना पायी किंवा बैलगाडीने प्रवास केला जात होता. मध्ययुगात धार्मिकतेकडून पर्यटन ज्ञानार्जन, शोधमोहिम, नवीन खंडाचा शोध लावणे अशा बाबींकडे वळले. पण आधुनिक कालखंडात पर्यटनाची व्याप्ती पूर्णपणे बदलली दिसते. मनोरंजनासाठी फिरायला जाणे, आनंद मिळविणे, मौज-मजा करणे अशा पध्दतीने पर्यटन केले जाते. सध्याच्या पर्यटनाला आधुनिकतेची आर्थिक विकासाची व सुबत्तेची जोड मिळाली आहे.

### १. पर्यटनाचे आधुनिकीकरण :-

पूर्वी पर्यटन हे पायी, बैलगाडी, घोडागाडी अशा स्वरूपाचे होते. मुक्काम हा ठराविक गावात किंवा धर्मशाळेत असायचा, राहण्याची व जेवणाची पर्यटक जास्त चिंता करत नव्हते. परंतु अलिकडे पर्यटनाची व्याप्ती बदलली आहे. मोटारगाडी, रेल्वे, विमान या वाहतूक साधनाने प्रवास करतात. तर हॉटेल्स, लॉज, मोटेल्स, रेस्टॉरंट या ठिकाणी जेवणाची व राहण्याची सोय करतात. या सर्व गोष्टींचे घरबसल्या बुकींग करतात व मगच प्रवासासाठी बाहेर पडतात. अशा पद्धतीने पर्यटनामध्ये आधुनिकीकरण आले आहे.

### २. पर्यटनातून रोजगारनिर्मिती :-

पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकाला सेवा पुरविण्यासाठी विविध टप्प्यावर रोजगार उपलब्ध होतात. वस्तू विक्री, दुकानदार, भाजीपाला, दूध, विक्रेता, हॉटेल कामगार, गाईड व इतर असे हजारो प्रकारची कामे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या लोक करतात. या सर्व सोयी सुविधा पर्यटकाला देण्यासाठी हे लोक पर्यटनस्थळी असतात. त्यातूनच त्यांना रोजगार उपलब्ध होतो.

## ३. पर्यटनातील व्यक्तीसमूह :-

पर्यटनामध्ये दोन प्रकारचे व्यक्तीसमूह आहेत. एक पर्यटकांचा व्यक्तीसमूह व दुसरा त्यांना सोयी-सुविधा देणाऱ्या व्यक्तींचा समूह आहे. पहिल्या गटात पर्यटन हे वैयक्तिक किंवा सामूहिक असू शकते. यामध्ये कुटुंब, शाळेच्या सहली, मित्र-मैत्रिणींचा प्रवास व वृद्ध व्यक्तींचा प्रवास अशा पध्दतीने कार्यरत आहे. तर दुसरा गट हॉटेल चालक-मालक, किरकोळ व होलसेल दुकानदार, ट्रान्सपोर्ट, मार्गदर्शक या दुसऱ्या गटाचा सहभाग पर्यटन व्यक्ती समुहामध्ये महत्त्वाचा आहे.

## ४. पर्यटकांची वाढती लोकसंख्या :-

मानवाला त्याच्या दैनंदिन जीवनातून विरंगुळा मिळावा म्हणून तो पर्यटनासाठी बाहेर पडतो. सध्या पर्यटन व्यवसायात आधुनिक सोयी-सुविधा आल्या आहेत. प्रवास व राहण्याच्या उत्तम सोयी, घरबसल्या बुकिंग, पर्यटन स्थळांची माहिती, माहितीपूर्व मार्गदर्शक या सर्व बाबींच्यामुळे पर्यटनामध्ये दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत चालली आहे. जेवढी लोकसंख्या या व्यवसायात वाढेल तेवढा या उद्योगाचा विकास होणार आहे.

## ५. पर्यटनाचा सर्वांगीण अभ्यास :-

पर्यटन स्थळे, पर्यटनाचे वर्गीकरण, पर्यटनाचे व्यवस्थापन व नियोजन, पर्यटनाचे महत्त्व व पर्यटनाच्या समस्या या व इतर सर्व अंगांनी पर्यटनाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. पर्यटनाचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर फक्त आर्थिक घटक डोळ्यासमोर ठेवून चालणार नाही, तर पर्यटनातून सामाजिक व सांस्कृतिक विकास कसा होईल. या बाबींचा पक्का विचार होणे गरजेचे आहे. तरच पर्यटनाचा सर्वांगीण विकास होईल. त्यासाठी पर्यटनाचा विविध दृष्टीकोणातून अभ्यास करणे गरजेचे आहे.

## ६. पर्यटनातून नाविन्यतेचा शोध घेणे :-

मानवाला जीवन जगताना नवीन-नवीन गोष्टी आत्मसात करायला आवडतात. पर्यटनामध्येसुद्धा असेच आहे. मानव पर्यटन करताना नेहमी नाविन्यतेचा ध्यास घेतो. नवीन पर्यटन स्थळे, नवीन प्रदेश, विविध वस्तू, खाण्याचे वेगवेगळे पदार्थ या सर्व गोष्टी ज्यावेळेस तो पहिल्यांदाच अनुभवतो. त्यावेळेस त्याला त्यामध्ये नाविन्यपूर्णत: वाटते. पर्यटक एखाद्या पर्यटन स्थळाला दुसऱ्यांदा भेट देण्यासाठी येतो, त्यावेळेस तो तेवढा खुष नसतो, जेवढा तो पहिल्यांदा भेट देताना असतो. यातून नाविन्यता ही प्रत्येक मानवाला आनंद देणारी असते.

## ७. पर्यटनातील समस्या :-

पर्यटनाची व्याप्ती अभ्यासताना त्याच्या समस्याही अभ्यासणे खूप गरजेचे आहे. पर्यटकांना

असणाऱ्या समस्या, पर्यटन केंद्राच्या ठिकाणी असणारे प्रश्न, पर्यटनातून निर्माण होणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक समस्या, पर्यावरणाची हानी या सर्व प्रश्नांचा अभ्यास पर्यटनाच्या व्याप्तीमध्ये केला जातो. समस्या अभ्यासून त्यावर उपाययोजना करणे व सर्व प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे. तरच पर्यटनाचा विकास होईल व देशाच्या अर्थव्यवस्थेला पर्यटनाची मदत होईल.

## १.२.४ पर्यटन भूगोलाचा ऐतिहासिक विकास (Historical Development of Tourism Geography) :-

पर्यटनाचा उगम व विकास कधी झाला यामध्ये संशोधक व तज्ञांची वेगवेगळी मते आहेत. इतिहासकारांच्या मते, पर्यटनाचा उगम हा मानवी जन्मापासूनच आहे. तर भूगोलकारांच्या मते वाहतूकीच्या सुविधा जस-जशा होत गेल्या त्याप्रमाणे पर्यटन विकसीत होत गेले.

### १. प्राचीन काळातील पर्यटन :-

ज्यावेळेस जगभरात संस्कृतींचा उगम होवू लागला त्याचबरोबर पर्यटनास सुरूवात झाली. इ.स. २०००-५००० पूर्वी इजिप्तशीयन, बार्बिलोनियन, मेसोपोटेमियम, सिंधू, चिनी या संस्कृती विकसित होत होत्या. त्याचवेळेस पर्यटनासाठी व्यापारी दृष्टीकोणातून लोक एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशाकडे ये-जा करू लागले. याच वेळेस रस्तेमार्गाचा विकास झाला व युरोपमधून लोक खुष्कीच्या मार्गाने आफ्रिका व आशिया खंडात मार्गक्रमण करू लागले, यातूनच पर्यटनाला चालना मिळाली. प्राचीन काळी लोक प्रवास करताना बैलगाडी, घोडागाडी यांचा वापर करत. ज्या प्रदेशात प्रवास करत तेथील बियाणे, स्थळे, नद्या, हवामान या गोष्टींच्या नोंदी करून ठेवत.

❑ **वैशिष्ट्ये :-**

१. प्राचीन काळातील पर्यटन हे प्राथमिक स्वरूपाचे होते.

२. या पर्यटनात वाहतूकीसाठी प्राण्यांचा वापर केला जात होता. उदा. बैल, घोडा, खेचर इ.

३. या पर्यटनात व्यापार हा प्रमुख उद्देश तर पर्यटनाला दुय्यम स्थान होते.

४. धर्मशाळा व मंदिरे ही त्यांची राहण्याची व्यवस्था असणारी ठिकाणे होती.

५. प्राचीन काळात पर्यटन हे ग्रीस, रोम व इंग्लंड या देशात मोठ्या प्रमाणात विकसीत झाले.

### २. मध्ययुगीन काळातील पर्यटन :-

इ.स.च्या पहिल्या शतकापासून ते १७ व्या शतकापर्यंतचा कालावधी हा पर्यटनाचा मध्ययुगीन कालखंड संबोधला जातो. या कालावधीमध्ये मुस्लिम राजवटीचा विकास झाला. तसेच युरोपमधून

जलमार्गे आशिया, आफ्रिका, उत्तर व दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया या खंडात प्रवासासाठी लोक जावू लागले. नवीन खंडाचा शोध घेणे व तेथे वास्तव्य करणे. या पर्यटनाला पूरक बाबी या कालावधीमध्ये घडू लागल्या. मुस्लिम व ख्रिश्चन धर्माचा विकास याच कालावधीमध्ये झाला. त्यामुळे धार्मिक कारणांसाठी मोठ्या प्रमाणावर लोक पर्यटन करू लागले. मक्का, मदिना, जेरूसलेम ही पर्यटनाची महत्त्वाची केंद्रे बनली.

❑ **वैशिष्ट्ये :-**

१. मध्ययुगीन काळात पर्यटनाला अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.

२. धार्मिक पर्यटन हा या कालावधीत पर्यटनाचा केंद्रबिंदू होता.

३. पर्यटनासाठी जलमार्गाचा सर्वप्रथम वापर केला, त्यामुळे नवीन जगाचा शोध लागला.

४. मध्य आशिया, युरोप व उत्तर आफ्रिका ही पर्यटनाची मुख्य ठिकाणे होती.

५. या कालावधीत पर्यटक नोंदी, पुरावे, नकाशे या गोष्टींचा पर्यटनासाठी वापर करू लागला.

## ३. आधुनिक काळातील पर्यटन :-

अठराव्या व एकोणिसाव्या शतकामध्ये पर्यटनाच्या विकासाला एक व्यवसाय म्हणून खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. विज्ञानामध्ये आधुनिक क्रांती झाली, त्यामुळे रेल्वे, मोटारगाडी व विमान या साधनांचा वापर पर्यटनामध्ये होवू लागला. त्यामुळे राज्य, देश व परदेशाच्या सिमा पार करून सहज प्रवासाला जाता येवू लागले. मनोरंजन व आनंद घेण्यासाठी प्रवास करणे ही संकल्पना आधुनिक कालखंडात विकसीत झाले. त्यामुळे दैनंदिन जीवनातील व्यस्त वेळ बाजूला सारून लोक पर्यटनासाठी बाहेर पडू लागले.

❑ **वैशिष्ट्ये :-**

१. पर्यटनाकडे एक व्यवसाय या दृष्टीकोनातून पाहू लागले.

२. हवाईमार्ग, जलमार्ग, रेल्वेमार्ग व रस्तेमार्ग या सर्वांचा वापर पर्यटनासाठी होवू लागला.

३. जगातील सात टक्के लोक या व्यवसायात गुंतले आहेत.

४. पर्यटनामुळे हॉटेल व्यवसाय व बाजारपेठांचा विकास झाला.

५. आनंद घेणे, मनोरंजन करणे, अभ्यासासाठी सहल करणे असे विविध उद्देश पर्यटनासाठी निवडले गेले.

६. कृषी पर्यटन, साहसी पर्यटन, पर्यावरणीय पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन या विविध संकल्पना निर्माण झाल्या.

पर्यटनाचा विकास हा टप्प्याटप्प्याने होत गेला. प्राचीनकाळी पर्यटन हे व्यापारी स्वरूपाचे होते. मध्ययुगीन कालखंडात धार्मिकतेला महत्त्व आले. त्याचबरोबर नवीन जगाचा शोध लागला, त्यामुळे पर्यटन विकासाला चालना मिळाली. तर आधुनिक युगात पर्यटन हा व्यवसाय बनला. सध्या मनोरंजनासाठी पर्यटन हा एवढाच उद्देश बनला आहे.

## १.२.५ पर्यटन भूगोलाचे महत्त्व (Significance of Tourism Geography) :-

पर्यटन हा व्यवसाय मनोरंजन व आनंद पर्यटकांना देतो. परंतु पर्यटकांकडून मिळणारा पैसा हा त्याठिकाणची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे पर्यटनाचे महत्व हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय दृष्टीकोणातून पाहिले पाहिजे. पर्यटनाचे महत्त्व देशाच्या अर्थव्यवस्थेत दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे या व्यवसायाचे महत्त्वही वाढत आहे.

### १. परकीय चलन मिळते :-

आंतरदेशीय पर्यटनामध्ये पर्यटक बाहेरच्या देशातून येताना त्यांचे चलन घेवून येतात. आपल्या देशात आल्यानंतर चलन बदल करून घेतात. उदा. अमेरिकेतील पर्यटक डॉलर घेऊन येतो व त्याचे रुपयामध्ये चलन बदल करून घेतो. या ठिकाणी आल्यानंतर विविध टप्प्यांवर तो चलन खर्च करतो. त्यामुळे साहजिक त्याच्या देशाच्या चलनातील पैसे आपल्या देशाला मिळतात. त्यामुळे परकीय चलनाची स्थिती सुधारण्यास मदत होते.

### २. जागतिक सामंजस्य निर्माण होण्यास मदत :-

दोन देशांमध्ये असणारे भांडण-तंटे यामुळे त्या देशात संघर्ष निर्माण होतो. त्या देशांमधील व्यक्तीच्या मनात गैरसमज निर्माण होतात. परंतु या दोन्ही देशातील पर्यटक जर त्यांच्या देशात पर्यटनासाठी गेले तर सत्य परिस्थिती समजते. उदा. भारत व पाकिस्तानातील पर्यटक एकमेकांशी सौहार्दपूर्ण वातावरणात पर्यटनासाठी गेले तर सामंजस्य निर्माण होण्यास मदत होईल.

### ३. देशाच्या अर्थव्यवस्थेला मदत :-

देशी व विदेशी पर्यटकांकडून मिळणारा पैसा हा कोणत्या-ना-कोणत्या स्वरूपात देशाच्या अर्थव्यवस्थेला मिळत असतो. रोजगार निर्मिती, पर्यटन केंद्रे, वाहतूक व्यवस्था, हॉटेल व निवास व्यवस्था या सर्व ठिकाणी पर्यटक पैसा खर्च करत असतो. या सर्व क्षेत्रातून कर स्वरूपात हा पैसा काही प्रमाणात देशाच्या तिजोरीत भर घालत असतो. यातूनच देशाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

### ४. प्रादेशिक समतोल राखण्यास मदत :-

मोठ्या खंडप्राय देशात काही भाग विकसीत तर काही प्रदेश अविकसित अशा पध्दतीचे स्वरूप पहावयास मिळते. यामध्ये असे दिसून येते की, अप्रगत प्रदेशात पर्यटनाच्या संधी जास्त असतात. उदा. भारतातील ईशान्य भारत पर्यटनासाठी अनुकूल आहे. त्याठिकाणी पर्यटन व्यवसायाचा विकास केल्यास ईशान्य भारत सुद्धा विकसीत झाल्यास जो प्रादेशिक असमतोल आहे तो कमी होईल.

### ५. रोजगार निर्मिती :-

पर्यटकाला सेवा पुरविणाऱ्या सर्वच घटकांतील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या पर्यटनातून रोजगार मिळतो. वस्तू खरेदी-विक्री केंद्र, हॉटेल व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, पर्यटन व्यवस्था या ठिकाणी काम करणाऱ्या कुशल व अकुशल व्यक्तींना रोजगार मिळतो. जगातील सात टक्के लोकांना पर्यटनातून रोजगार मिळत आहेत.

### ६. बाजारपेठांची निर्मिती :-

पर्यटन स्थळाला भेट देवून झाल्यानंतर तेथील वस्तू खरेदी करणे, आठवण म्हणून घेणे, प्रसाद म्हणून घेणे किंवा आपल्या जवळच्या नातलगासाठी-मित्रांसाठी वस्तू खरेदी करणे हा पर्यटकाचा आवडता छंद असतो. त्यातूनच पर्यटन स्थळाच्या ठिकाणी खेळणी, कपडे, पूजा साहित्य, प्रसाद, ऐतिहासिक वस्तू, प्रादेशिक वैशिष्ट्यपूर्ण वस्तू इ. खरेदी करण्यासाठी पर्यटक गर्दी करतात. यातूनच तेथील बाजारपेठांचे विस्तारीकरण व विकास होतो.

### ७. संस्कृतिचे जतन :-

पर्यटक पर्यटनासाठी ज्या प्रदेशात जातो तेथील संस्कृती ही त्यांच्यासाठी भिन्न असते. त्यातील तो चांगल्या गोष्टी आत्मसात करतो. तसेच त्यांची जी संस्कृती आहे त्याचा ठसासुध्दा त्यांची भाषा, वेशभूषा, आवड-निवड, भोजन यातून त्या प्रदेशातील लोकांना एकप्रकारे सांगत असतो. थोडक्यात भिन्न संस्कृतीच्या व्यक्ती पर्यटनासाठी वेगवेगळ्या ठिकाणी गेल्या तर संस्कृतीची देवाण-घेवाण होते. तसेच संस्कृतीचे जतनही होते.

## १.३ सारांश

पर्यटन हा घटक मानवी जीवनाला आनंद व प्रेरणा देणारा आहे. मानव जातीच्या उगमापासून आजपर्यंत पर्यटनाचे स्वरूप हे बदलत गेले आहे. धार्मिक, व्यापारी, भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक बाबींच्या अनुषंगाने पर्यटनाचे स्वरूप अभ्यासले जाते. पर्यटनाची व्याप्ती प्रचंड आहे. यातून

रोजगार निर्मिती होते, त्याचबरोबर मानवाला मनोरंजन करण्यासाठी सर्वात सोयीस्कर मार्ग म्हणजे पर्यटन होय. पर्यटनाचा ऐतिहासिक विकास हा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अशा तिन्ही कालखंडात टप्प्याटप्प्याने होत गेला आहे. पर्यटनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. परकीय चलन, अर्थव्यवस्था सुधारणे, बाजारपेठांचा विकास व आंतरराष्ट्रीय सामंजस्य या सर्व घटकांचा विकास पर्यटनातून होतो.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **टूरिस्ट** : पर्यटक.
- **टूरिझम** : पर्यटन.
- **टूर** : सहल किंवा प्रवास.
- **गाईड** : मार्गदर्शक.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

### खालीलपैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

१. प्रवासासाठी बाहेर पडणे, भटकंती करणे, ज्ञानार्जन मिळवणे व मूळ ठिकाणी परत येणे म्हणजे काय?

*अ) पर्यटक ब) स्थलांतर क) पर्यटन ड) ज्ञानार्जन.*

२. खालीलपैकी पर्यटनाचे स्वरूप कोणत्या प्रकारचे नाही?

*अ) धार्मिक स्वरूप ब) आर्थिक स्वरूप*
*क) व्यापारी स्वरूप ड) चंगळवाद स्वरूप.*

३. पर्यटनाचा सर्वात जास्त वाईट परिणाम कोणत्या घटकांवर होतो?

*अ) मानवी ब) पर्यावरणीय क) आर्थिक ड) सामाजिक.*

४. पर्यटनाचा सर्वात जास्त विकास कोणत्या कालखंडात झाला?

*अ) अर्वाचिन ब) प्राचीन क) मध्ययुगीन ड) आधुनिक.*

५. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने पर्यटनाचे सर्वात जास्त महत्त्व कशाला दिले जाते?

*अ) परकीय चलन ब) जागतिक सामंजस्य*
*क) प्रादेशिक समतोल ड) संस्कृतीचे जतन.*

- **उत्तरे :-**

१. *क) पर्यटन.*

२. *ड) चंगळवाद स्वरूप.*

३. *ब) पर्यावरणीय.*

४. *ड) आधुनिक.*

५. *अ) परकीय चलन.*

## १.६ सरावासाठी प्रश्न

- **अ) टिपा लिहा.**

१. पर्यटन भूगोलाचे स्वरूप.

२. पर्यटनाचा आधुनिक कालखंडातील विकास.

३. पर्यटनाचे महत्त्व.

- **ब) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. पर्यटनाची व्याख्या सांगा? पर्यटनाचे स्वरूप थोडक्यात लिहा?

२. पर्यटनाचा अर्थ सांगून पर्यटनाची व्याप्ती लिहा?

३. पर्यटन भूगोलाचा ऐतिहासिक विकास लिहा?

## १.७ क्षेत्रीय कार्य

१. तुमच्या जिल्ह्यातील महत्त्वाच्या धार्मिक स्थळांना भेटी द्या व तेथील वृत्तांत लिहा.

२. पर्यटनाविषयी जनजागृती निर्माण करणारा तक्ता तयार करा?

३. प्रसार माध्यमांच्याद्वारे महाराष्ट्रातील भौगोलिक पर्यटन स्थळांची माहिती गोळा करा?

## १.८ संदर्भ ग्रंथ


१. **खतीब के. ए.** (२००६) : *'पर्यटन भूगोल'*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

२. **शिंदे ए. बी.** (२००६) : *'पर्यटन भूगोल'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. **घारपुरे विठ्ठल** (२००१) : *'पर्यटन भूगोल'*, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

४. **डॉ. शिवाजी पाचारणे** (२०१४) : *'पर्यटन भूगोल'*, अथर्व प्रकाशन, पुणे.

५. **डॉ. नागतोडे आणि प्रा. पारधी** (२००६) : *'पर्यटन भूगोल'*, विद्या प्रकाशन, नागपूर.

६. **डॉ. आहेर आणि डॉ. म्हसके** (२०१४) : *'पर्यटन भूगोल'*, के.एस.पब्लिकेशन, पुणे.

७. **Stephen Willams** (1998) : 'Tourism Geography', Psychology Press, Yorkshire UK.

८. **Velvet Nelson** (2013) : 'An Introduction to Geography of Tourism', New Yourk (UA).

❑❑❑

सत्र-३ : घटक-२

# पर्यटनाचे घटक (संकल्पना)

## (Component in Tourism)

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

 २.२.१ भौगोलिक घटक

 २.२.२ सामाजिक घटक

 २.२.३ सांस्कृतिक घटक

 २.२.४ इतर घटक

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ क्षेत्रीय कार्य

२.७ सरावासाठी प्रश्न

२.८ संदर्भ ग्रंथ सूची/अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांस पुढील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

१. पर्यटनाच्या भौगोलिक घटकांची माहिती होईल.

२. पर्यटनाचे सामाजिक घटक समजण्यास मदत होईल.

३. पर्यटनाचे सांस्कृतिक घटक कोणते हे लक्षात येईल.

४. पर्यटनातील इतर घटकांविषयी माहिती समजण्यास मदत होईल.

## २.१ प्रास्ताविक

मागील घटकामध्ये आपण पर्यटनाची व्याख्या, पर्यटक म्हणजे काय? पर्यटन भूगोलाचे स्वरूप, पर्यटन भूगोलाची व्याप्ती, पर्यटन विकासाचा ऐतिहासिक आढावा आणि पर्यटनाचे महत्त्व याविषयी माहिती घेतलेली आहे.

या घटकामध्ये आपण पर्यटनाच्या विविध घटकांचा अभ्यास करणार आहोत. यामध्ये भौगोलिक घटक, सामाजिक घटक आणि सांस्कृतिक घटक प्रमुख आहेत.

## २.२ विषय विवेचन

पर्यटन हा एक प्रमुख आर्थिक व्यवसाय आहे. पर्यटन व्यवसायातून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन प्राप्त होते व रोजगाराच्या संधी प्राप्त होतात. पर्यटनामुळे प्रादेशिक विकास होण्यास मदत होते.

पर्यटन घटकामध्ये भौगोलिक घटक प्रमुख आहेत. प्रदेशाचे स्थान, सुगमता, विस्तार, विविध सृष्टी सौंदर्य इ. घटकांचा पर्यटनावर परिणाम होतो. पर्यटकांना सामाजिक व सांस्कृतिक घटकांचेही आकर्षण असते. समाजातील सण, उत्सव, परंपरा, कला, संगीत, हस्तकला इ. घटक पर्यटकांना आकर्षित करतात. पर्यटक आपल्या पसंतीनुसार पर्यटन केंद्राची निवड करत असतो, त्यामुळे पर्यटनामध्ये भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकांना विशेष महत्त्व आहे.

### २.२.१ भौगोलिक घटक (Geographical Component)

सर्वसामान्य पर्यटकांना भौगोलिक पर्यटन स्थळांचे जास्त आकर्षण असते. भौगोलिक घटकांमध्ये पुढील चार घटक प्रमुख आहेत.

#### १. स्थान (Location) :-

भौगोलिक घटकांमध्ये हा घटक विशेष महत्त्वाचा आहे. पर्यटन केंद्राचा विकास हा त्याच्या स्थानावर अवलंबून असतो. निसर्गाची उधळण असणाऱ्या पर्यटन स्थळांचे आकर्षण पर्यटकांना असते. पर्यटन केंद्राचे स्थान खंडांतर्गत भागात असेल तर तेथील हवामान ओसाड व निमओसाड स्वरूपाचे असते, पाऊस कमी असतो, लोकवस्ती विरळ असते, आर्थिक व्यवसाय मर्यादित असतात. पर्यटन केंद्र पर्वतीय असेल तर विकासावर मर्यादा पडतात.

पर्यटन केंद्राचे स्थान जर किनारवर्ती प्रदेशात असेल तर तेथे रस्ते, रेल्वे व जलमार्गाचा विकास झालेला असतो. त्यामुळे तेथील पर्यटन स्थळांचा जलद विकास होतो. उदा. गोवा, मुंबई इ.

## २. सुगमता (Accessibility) :-

पर्यटन केंद्रावर जाण्यासाठी वाहतुकीची सुविधा असतील तर त्या पर्यटन केंद्राचा विकास लवकर होतो. वाहतुकीचा अभाव असणारी पर्यटन केंद्रे विकसित होत नाहीत. उदा. ईशान्य भारतातील पर्यटन स्थळे.

अलीकडील काळात वाहतुकीच्या सुविधा झाल्याने डोंगराळ व पर्वतीय भागातील पर्यटन स्थळांचा विकास होत आहे. उदा. कुलू-मनाली, सिमला इ. हवाई वाहतुकीच्या विकासामुळे पर्यटन क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले आहेत. सध्या कमी वेळात व कमी खर्चात हवाई वाहतूक उपलब्ध होत असल्याने अनेक पर्यटन केंद्रे विकसित होत आहेत. उदा. मॉरेशिस, अंदमान-निकोबार, सिंगापूर इ.

## ३. विस्तार (Space) :-

पर्यटन केंद्र कमी जागेत निर्माण झालेले असल्यास त्या पर्यटन केंद्राच्या विकासावर मर्यादा येतात. कमी जागेत पर्यटकांना आवश्यक त्या सोई-सुविधा उपलब्ध होत नाहीत. सृष्टीसौंदर्य जरी कमी असेल तरी त्या पर्यटन केंद्रावर जर आर्ट गॅलरी, वस्तु संग्रहालय, मनोरंजन केंद्र, प्राणी संग्रहालय, हॉटेल, भोजनगृहे इ. विविधता असेल तर ते पर्यटकांना पसंत पडते. म्हणून पर्यटन केंद्राचा विस्तार मोठा असणे गरजेचे आहे.

## ४. सृष्टीसौंदर्य (Scenery) :-

नैसर्गिक सृष्टी-सौंदर्याला पर्यटकांची प्राथमिक पसंती असते. नैसर्गिक सौंदर्य पर्यटकास उत्साह प्रदान करते. निसर्गात सौंदर्याचे अनेक अविष्कार पहायला मिळतात. पर्यटक आपल्या आवडीनुसार या स्थळांची निवड करतात.

भौगोलिक घटकात पुढील महत्त्वपूर्ण घटकांचा समावेश होतो.

### अ) भूरुपे (Landform) :-

भूपृष्ठावर भूरुपांमध्ये कमालीची विविधता आढळते. पर्वतरांगा, नद्यांच्या खोल दऱ्या, घळई, सपाट मैदाने, विस्तृत पठारे, हिमाच्छादित शिखरे इ. पर्यटन स्थळे पर्यटकाला आकर्षित करतात.

### (i) पर्वत व डोंगररांगा (Mountain & Hill) :-

पूर्वी डोंगररांगाचा वापर शेती व चराऊ कुरणासाठी केला जात असे. अलीकडे विकसित देशात पर्यटक मोठ्या प्रमाणात आपला वेळ डोंगररांगात, हिरवाईने नटलेल्या भागात व्यतीत करीत आहेत.

हिमाच्छादित शिखरे, इंद्रधनुषी सूर्यकिरणे, मनमोहक सूर्यास्त पर्यटकांना आकर्षित करतात. समुद्रसपाटीपासून जस-जसे उंच जावे तसतसे हवामान थंड, आल्हाददायक व उत्साहवर्धक असते. उदा. सिमला, मसुरी, उटी, महाबळेश्वर, डेहराडून इ.

### (ii) दऱ्या, घळई (Gorge, Valleys) :-

डोंगररांगाच्या पायथ्याला हिरवाईने नटलेल्या खोल दऱ्या पर्यटकांना आकर्षित करतात. प्रत्येक दरी स्वत:चे वेगळे सौंदर्य प्रतिबिंबित करते, विविध वृक्षाने नटलेल्या दऱ्या या प्राण्यांचे आश्रयस्थान असतात.

मध्य प्रदेश मधील जबलपूर येथे नर्मदा नदीने निर्माण केलेली संगमरवरी घळई पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी असते. अमेरिकेतील कोलोरॅडो, हिमाचल प्रदेशातील व्हॅली ऑफ फ्लॉवर्स, केरळमधील सायलेंट व्हॅली या आपल्या सृष्टीसौंदर्यामुळे पर्यटकांना आकर्षित करतात.

### (iii) ज्वालामुखी (Volcano) :-

भूपृष्ठाच्या अंतर्गत भागातील लाव्हारस एखाद्या भेगेतून किंवा छिद्रातून बाहेर येण्याच्या क्रियेस ज्वालामुखी म्हणतात. ज्वालामुखीच्या लाव्हारसापासून विविध भू-आकारांची निर्मिती होते. ज्वालामुखीच्या मुखाशी पावसाचे पाणी साचून क्रेटरलेकची निर्मिती होते. ज्वालामुखी हा निसर्गाचा रुद्र अवतार असला तरी तो पर्यटकांना आकर्षित करत असतो. उदा. जपानमधील फुजियामा.

### (iv) प्रवाळद्विपे (Coral Reets) :-

समुद्रातील प्रवाळ किटकांच्या अवशिष्ठ भागापासून प्रवाळ खडकांची निर्मिती होते. हे खडक उष्ण कटिबंधातील सागरी भागात आढळतात. प्रवाळ किटकांचे सांगाडे एकत्र येवून प्रवाळ खडकांची निर्मिती होते. हे स्फटीकमय रंगीबेरंगी खडक अतिशय सुंदर दिसतात. ऑस्ट्रेलियाच्या ईशान्येकडील 'ग्रेट बॅरीयर रीफ' ही जगातील सर्वात मोठी प्रवाळ मालिका असून त्याची लांबी १९२० कि.मी. आहे. भारतातील अंदमान-निकोबारजवळही प्रवाळद्वीप आहे.

## ब) हवामान (Climate) :-

आल्हाददायक हवामान असलेल्या भागात पर्यटक नेहमी गर्दी करतात. पृथ्वीवर सर्वत्र हवामान सारखे नाही. काही ठिकाणी हवामान उष्ण व कोरडे तर काही ठिकाणी उष्ण व दमट असते. हवामानावर अक्षांश, उंची, समुद्रसानिध्य, वारे इ. घटकांचा परिणाम होतो. विषुववृत्तीय प्रदेशापेक्षा समशीतोष्ण कटीबंधातील पर्यटन स्थळांचा विकास होतो. प. युरोपीय, भूमध्य सागरी व मोसमी हवामानाच्या प्रदेशात पर्यटनाचा विकास होतो.

### (i) पर्जन्य (Rainfall) :-

पर्जन्याचा परिणाम पर्यटन व्यवसायावर होतो. अतिपर्जन्य किंवा सतत पाऊस पर्यटकांना आवडत नाही. उष्णकटीबंधात पर्जन्य हंगामी असल्याने पाण्याची टंचाई निर्माण होते. याचा परिणाम पर्यटनावर होतो. समशीतोष्ण कटिबंधातील मुबलक पावसामुळे वर्षभर पाणी उपलब्ध असते, म्हणून येथे पर्यटनाचा विकास होतो. पर्यटनामुळे काही भागात धबधबे, झरे निर्माण होतात. अशा ठिकाणी पर्यटक गर्दी करतात.

### (ii) हिम (Snow) :-

हिमवृष्टीचा आविष्कार पाहण्यासाठी अनेक पर्यटक उंच पर्वतीय प्रदेशात गर्दी करतात. पर्वतीय प्रदेशात चालणारे हिवाळी खेळ पर्यटकांना आकर्षित करतात. भारतात जम्मू-काश्मिरमधील सोनमर्ग, गुलमर्ग, हिमाचल प्रदेशातील शिमला, कुलुमनाली इ. ठिकाणी पर्यटकांना हिमवृष्टीचा आनंद घेता येतो. युरोपमधील स्वित्झर्लंड येथे बर्फाच्छादित क्षेत्रात पर्यटकांची गर्दी असते.

हवामानाचे इतर आविष्कारही पर्यटकांना आकर्षित करतात. धुके, दव, गारा, बर्फ इ. घटक नैसर्गिक सौंदर्यात भर घालतात.

## क) जलविभाग (Water bodies) :-

नद्या, तळी, सरोवरे, जलप्रपात, उष्णोदकाचे फवारे व समुद्र हे जलाविष्कार मानवाला आपल्याकडे आकर्षित करीत आहेत. पाणी व मानवी संस्कृतीचा फार जवळचा संबंध आहे. जगातील अनेक संस्कृत्या नदीकाठावर विकसित झाल्या आहेत. उदा. सिंधु नदी, हडप्पा संस्कृती, नाईल नदी-इजिप्शियन संस्कृती, युक्रेटीस नदी-बॅबिलोनियन संस्कृती, हो-हॅग-हो नदी-चिनी संस्कृती इ.

### (i) नद्या (River) :-

जगातील सर्वच नदी प्रदेश वैशिष्ट्यपूर्ण आहेत. नद्यांचे मैदानी प्रदेश, त्रिभुज प्रदेश हे संपन्नतेचे प्रदेश आहेत. जगातील अतिदाट लोकसंख्या याच प्रदेशात आढळते. भारतात नद्यांच्या काठी अनेक धार्मिक व पवित्र स्थळे आहेत. उदा. हरिद्वार, ऋषिकेश, प्रयाग, मधुरा, वृंदावन, शरयु, पंढरपूर, नाशिक इत्यादी.

नद्यांनी आपल्या प्रवाह मार्गात निर्माण केलेली विविध भूरुपे पर्यटकांना आकर्षित करतात. उदा. कुंडल-कासार सरोवर, त्रिभुज प्रदेश, घळई इत्यादी.

### (ii) सरोवरे (Lakes) :-

भूपृष्ठावरील खोलगट भागातील जलसंचय म्हणजे सरोवर होय. सरोवरे ही खाऱ्या पाण्याची व

गोड्या पाण्याची असतात. गोड्या पाण्याची सरोवरे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. निसर्ग सौंदर्याबरोबरच नौकानयन व होड्यांच्या शर्यती पर्यटकांना आकर्षित करतात. भारतातील लोणार (महाराष्ट्र), चिल्का (ओरिसा), सांबर (राजस्थान) ही खाऱ्या पाण्याची सरोवरे आहेत. दाल, वुलर (जम्मु-काश्मिर), कोलेरू (आंध्र प्रदेश) इ. गोड्या पाण्याची सरोवरे आहेत.

### (iii) जलप्रपात (Water Fall) :-

उंचीवरून खाली पडणारा जलौध, प्रचंड आवाज करीत कोसळणारा जलप्रपात पर्यटकांना आकर्षित करतात. जगात बहुतेक जलप्रपाताजवळ पर्यटन केंद्रे स्थापन झालेली आहेत. उदा. नायगरा धबधबा हा सेंट लॉरेन्स धबधबा आहे, ज्यामुळे नायगारा नगराचा विकास झालेला आहे.

भारतातही जलप्रपातामुळे अनेक पर्यटन स्थळे निर्माण झालेली आहेत. उदा. कर्नाटकातील शरावती नदीवरील 'जोग' धबधबा, घटप्रभा नदीवरील 'गोकाक' धबधबा, गोव्यातील दूधसागर, महाबळेश्वर येथील 'लिंगमळा' धबधबा प्रसिध्द आहेत.

### (iv) उदक फवारे (Geysers) :-

भूपृष्ठाखालून पाण्याचे जोरदार फवारे आकाशात उडतात, त्यास उदक फवारे असे म्हणतात. हे शक्यतो उष्ण पाण्याचे फवारे असतात. या पाण्यामध्ये गंधकाचे प्रमाण जास्त असल्याने ते त्वचा रोगासाठी उपयुक्त असते. उदा. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील वज्रेश्वरी येथील गरम पाण्याचा झरा. उत्तर अमेरिकेतील यलोस्टोन पार्क तसेच आईसलँड, न्युझीलंड येथील गरम पाण्याचे झरे आहेत.

### (v) हिमनद्या (Glaciers) :-

बर्फाचे आकर्षण पर्यटकांना असल्याने हिमनद्यांचे क्षेत्र पर्यटन केंद्र म्हणून विकसित होऊ लागले आहे. अलास्कामधील पिटर्स क्रीक, युरोपमधील आलप्स पर्वतातील हिमनद्या पर्यटकांना आकर्षित करतात.

भारतात हिमालयीन पर्वत क्षेत्रात गंगोत्री, कोसा, रिसो, सियाचीन, कांचनगंगा, कारगील इ. प्रमुख हिमनद्या आहेत.

### (vi) बेटे (Island) :-

सर्व बाजूंनी पाण्याने वेढलेल्या भूमीस बेटे असे म्हणतात. निळे अथांग महासागर, वाळूचे मैदान, आदिवासी जीवन संस्कृती इ. सौंदर्यामुळे पर्यटन क्षेत्राचा विकास होत आहे. उदा. अंदमान-निकोबार, लक्षद्वीप, मॉरिशस बेटे, हवाई बेटे इ.

### (vii) समुद्र किनारे (Beaches) :-

निसर्गाची उधळण असणारे समुद्र किनारे पर्यटकांना आकर्षित करतात. समुद्र किनाऱ्यावर येणाऱ्या लाटा, भरती-ओहोटी, वाळुची मैदाने, नारळाच्या बागा इ. घटक समुद्र किनाऱ्याचे सौंदर्य वाढवत असते. उदा. मुंबई, गोवा इत्यादी.

## ड) वन्य प्राणीजीवन (Wild Life) :-

निसर्गात प्राणी हा महत्त्वाचा घटक आहे. जंगलामध्ये वन्य पशूपक्षांना मुक्तपणे आपले जीवन जगता येते. पशुपक्षांचा हा मुक्त संचार जवळून अनुभवण्यासाठी पर्यटक जंगलयुक्त प्रदेशात जात असतात.

### (i) अभयारण्ये (Sancturies) :-

पशूपक्ष्यांसाठी तयार करण्यात आलेल्या संरक्षित क्षेत्रास अभयारण्य म्हणतात. मानवाच्या हस्तक्षेपामुळे प्राण्यांच्या मुक्तपणे फिरण्यावर बंधने आली आहेत. आज जगात प्राण्यांसाठी विविध अभयारण्ये निर्माण केली आहेत. ज्याद्वारे प्राण्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न केले जात आहेत.

भारतातही सुमारे ५५३ अभयारण्ये अस्तित्वात आहेत. काही अभयारण्ये विशिष्ट प्राण्यांसाठी प्रसिध्द आहेत. उदा. काझीरंगा-एकशिंगी गेंडा, गीर-सिंह, ताडोबा-वाघ, पालामाऊ-चिता, मदुमलाई-हत्ती इत्यादी.

भारताबाहेर इतर देशातसुध्दा निरनिराळ्या प्राण्यासाठी अभयारण्य उभारलेली आहेत. त्याठिकाणी पर्यटनाचा विकास झालेला आहे. उदा. मध्यपूर्व आफ्रिकेतील नैरोबी, माऊंट केनिया, सोरोटी इत्यादी.

### (ii) मृगया क्षेत्रे (Hunting Region) :-

शिकार हा मानवाचा प्राचीन व्यवसाय आहे. पूर्वी अन्नासाठी शिकार केली जात असे. प्राचीनकाळी राजे, महाराजे, मंत्री, सरदार यांच्या शिकारीच्या छंदासाठी मृघयाक्षेत्रे निर्माण केली जात असत. आफिक्रेतील सॅव्हना गवताळ प्रदेश, ध्रुवीय प्रदेशातील व्हाईट फॉक्स, पोलार डिअर या प्रकारची मृघया क्षेत्रे आहेत. सागरी भागातही मासेमारीसाठी पर्यटकांची गर्दी असते.

आज शिकार बंदी असल्याने व त्यांच्या अवयवाची विक्री करणे गुन्हा असल्याने मृघया क्षेत्र पर्यटनास मर्यादित स्वरूप प्राप्त झालेले आहे.

### इ) नैसर्गिक वनस्पती (Natural Vegetation) :-

पृथ्वीवरील वनस्पतीचे आच्छादन पर्यटकाचे मन उल्हासित करते. विविध प्रकारच्या पानाफुलांनी बहरलेले वनस्पतीचे सौंदर्य खूपच सुंदर असते. जंगले, गवताळ कुरणे, वाळवंटी प्रदेशातील मरूस्थळे पर्यटकांना आकर्षित करतात.

#### (i) जंगले (Forests) :-

पर्यटन व पर्यावरण या दोन्हीसाठी जंगलाची आवश्यकता असते. उंच पर्वतीय जास्त पावसाच्या ठिकाणी वनस्पतींच्या आश्रयाने राहणाऱ्या पशूपक्षांचे निरीक्षण केले जाते. भारतात सिमला, उटी, दार्जिलिंग, केरळ इ. ठिकाणी जंगलामध्ये पर्यटनाचा विकास झालेला आहे.

महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या डोंगररांगात असलेले आंबा, फोंडा ही ठिकाणे सांगली, सातारा, कोल्हापूरच्या पर्यटकासाठी पर्वणीच ठरलेली आहेत.

#### (ii) गवताळ कुरणे (Grassland) :-

खंडातर्गत कमी पाऊस असणाऱ्या प्रदेशात गवताळ कुरणे पसरलेली असतात. या कुरणांना जगभरात विविध नावानी ओळखले जाते. आफ्रिकेतील उष्णकटिबंधीय गवळात प्रदेशास सॅव्हाना म्हणून ओळखले जाते. समशितोष्ण कटिबंधात यांना स्टेपी (रशिया), प्रेअरी (उत्तर अमेरिका), व्हेल्ड (आफ्रिका) नावाने ओळखले जाते. पावसाळ्यात ही कुरणे हिरवेगार तर हिवाळ्यात ती पिवळी पडतात. पावसाळ्यातील व हिवाळ्यातील हे सौंदर्य पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करतात.

#### (iii) मरूस्थळी (Oasis) :-

वाळवंटी प्रदेशात हिरवाईने नटलेला प्रदेश म्हणजे मरूस्थळ होय. मरूस्थळानाच ओयासिस असे म्हटले जाते. येथे पाण्याची थोडीफार उपलब्धता असल्याने खजूराची व इतर झाडी आढळतात. सहारा व अरबस्थानच्या वाळवंटात अशी मरूस्थळी पाहावयास मिळतात.

वरील विविध भौगोलिक घटकामुळे पर्यटनाचा विकास होत असतो.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ❊

❑ **खाली दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१. खालीलपैकी कोणत्या भागात पर्यटन केंद्राचा विकास अधिक होतो?

*अ) पठारी* *ब) डोंगराळ* *क) खंडांतर्गत* *ड) किनारी.*

२. नर्मदा नदीने कोठे संगमरवरी खचदरी निर्माण केली आहे?

*अ) जबलपूर   ब) उदयपूर   क) इंदौर   ड) जयपूर.*

३. जगातील सर्वात मोठी प्रवाळ मालिका कोठे आहे?

*अ) जपान   ब) जर्मनी   क) भारत   ड) ऑस्ट्रेलिया.*

४. जोग धबधबा कोणत्या नदीवर आहे?

*अ) घटप्रभा   ब) शरावती   क) कृष्णा   ड) तुंगभद्रा.*

५. घटप्रभा नदीवर ............... धबधबा आहे?

*अ) जोग   ब) गोकाक   क) लिंगमळा   ड) दूधसागर.*

६. एकशिंगी गेंड्यासाठी ............. अभयारण्य प्रसिध्द आहे?

*अ) ताडोबा   ब) नागार्जुन सागर   क) कांझीरंगा   ड) गीर.*

## २.२.२ सामाजिक घटक (Social Component)

पर्यटनामध्ये भौगोलिक घटकांबरोबरच सामाजिक घटकांसाठी महत्त्वाचे स्थान आहे. रॉबिन्सन यांनी 'पर्यटन भूगोल' या ग्रंथात सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक घटकांना विशेष महत्त्व दिले आहे. मानवी वस्त्या, प्रार्थना स्थळे, ऐतिहासिक अवशेष, स्मारके यांचे पर्यटकांना आकर्षण असते.

### (i) धर्म (Religion) :-

धर्म व धार्मिक स्थळांना पर्यटनामध्ये विशेष महत्त्व आहे. प्राचीन काळात पर्यटन हे धार्मिक कारणासाठी केले जात असे. आपल्या देशात शेकडो धार्मिक पर्यटन स्थळे आहेत. हरिद्वार, वाराणसी, अलाहाबाद, मधुरा, वृंदावन, तिरुपती, मदुराई, सारनाथ, कन्याकुमारी, पंढरपूर, तुळजापूर, शिर्डी-नाशिक. हिंदू धर्मियांची पवित्र धार्मिक स्थळे आहेत. तेथे पर्यटकांची गर्दी असते. इस्लाम धर्मियांची मक्का, मदिना, ख्रिश्चनांचे व्हॅटीकन सिटी, ज्यु लोकांचे जेरूसलेम येथेही पर्यटक येत असतात. महाराष्ट्रातही विविध ठिकाणी यात्रा व उत्सवानिमित्त लाखो भाविक पर्यटन स्थळांना भेटी देतात. उदा. पंढरपूर, पाली, जोतिबा, तुळजापूर, शिर्डी, अक्कलकोट इ.

### (ii) क्रीडा (Sports) :-

जगामध्ये विविध ठिकाणी सातत्याने खेळांचे आयोजन केले जाते. उदा. फुटबॉल स्पर्धा, ऑलिंपिक स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा इ. अशा विविध स्पर्धामुळे पर्यटक त्याठिकाणी जमा होतात व खेळाचा

आनंद लुटतात. अशा स्पर्धेच्या ठिकाणी देश विदेशातील लाखो पर्यटक येत असतात. त्यामुळे तेथे पर्यटन व्यवसायाला चालना मिळते.

अलीकडील काळात भारतामध्ये अनेक प्रकारचे साहसी खेळ खेळले जातात. उदा. हिवाळी स्किडंग, स्कूबा ड्रायव्हिंग, पॅराग्लाइडिंग, ट्रेकिंग, गिर्यारोहण, वॉटर राफ्टिंग इ. उत्तर भारतामध्ये गंगा, सिंधू, सतलज, चिनाब या नद्यांमध्ये रिव्हर राफटिंग हा साहसी खेळ पर्यटकांना अनुभवता येतो. पश्चिम घाट व हिमालयीन पर्वत रांगांमध्ये पॅराग्लाइडिंग या साहसी खेळाचे आयोजन केले जाते. समुद्री किनारी भागात सेलिंग, वॉटर स्कीइंग, विंड सर्फिंग अशा खेळाचे आयोजन केले जाते.

अशा विविध खेळांच्या निमित्ताने पर्यटन स्थळे विकसित होऊ लागली आहेत.

**(iii) वस्ती (Settlement) :-**

नगरे ही पर्यटकांची खास आकर्षण आहेत. प्रत्येक वस्तीचे किंवा नगराचे एक वेगळे वैशिष्ट्य असते. औद्योगिक, व्यापारी, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक अशा विविध कारणांमुळे नगरांचा विकास होत असतो आणि हेच त्या नगरांचे वैशिष्ट्य बनते. जगातील अनेक लहान मोठी शहरे या वैशिष्ट्यांमुळे आणि तेथे असणाऱ्या सोयीसुविधांमुळे पर्यटनाची केंद्रे बनली आहेत.

संयुक्त संस्थानातील पीटस् बर्ग, शिकागो, गॅरी, इंग्लंडमधील मँचेस्टर, कार्डीफ, जपानमधील ओसाका, टोकियो. भारतातील रूरकेला, जमशेदपूर ही औद्योगिक विकासामुळे पर्यटनाची केंद्रे बनली आहेत. काही शहरे ही शैक्षणिक सुविधांमुळे प्रसिद्ध आहेत. उदा. ऑक्सफर्ड, केंब्रीज, शांतीनिकेतन इ. कॅलिफोर्नियातील लासव्हेगास हे शहर जुगारासाठी प्रसिध्द आहे. सिंगापूर, हाँगकाँग ही शहरे मुक्त व्यापारामुळे प्रसिद्ध आहेत आणि त्यामुळेच पर्यटनाचे केंद्र बनत आहेत.

**(iv) ऐतिहासिक अवशेष स्मारके (Historical Retrains) :-**

ऐतिहासिक किल्ले, स्मारके, राजवाडे, राजधान्यांची ठिकाणे पर्यटकांना आकर्षित करत असतात. भारताला फार मोठी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. त्यामुळे भारतात अनेक ऐतिहासिक ठिकाणे ही पर्यटनाची केंद्रे बनलेली आहेत.

भारतातील ग्वाल्हेरचा मोती महाल, इंदौरमधील अहिल्यादेवी होळकरांचा राजवाडा, कोल्हापूरचा शालिनी पॅलेस, म्हैसूरचा न्यू पॅलेस, आग्रा येथील किल्ला दौलताबादचा किल्ला ही ऐतिहासिक ठिकाणे पर्यटकाना आकर्षित करतात. याशिवाय महाराष्ट्रातील शिवनेरी, रायगड, प्रतापगड, पन्हाळा या किल्ल्यांना ऐतिहासिकदृष्ट्या खूप महत्त्व असल्याने अनेक संशोधक, विद्यार्थी, इतिहासप्रेमी या स्थळांना भेटी देतात.

## ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ❊

❑ **खाली दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१. मुस्लिम धर्मियांचे कोणते धार्मिक ठिकाण प्रसिद्ध आहे?

*अ) व्हॅटिकन सिटी   ब) जेरूसलेम   क) मक्का मदिना   ड) वाराणसी.*

२. कोल्हापूरातील कोणता पॅलेस ऐतिहासिक परंपरेची साक्ष देतो?

*अ) मोतीमहाल   ब) शालिनी   क) न्यू पॅलेस   ड) लालकिल्ला.*

३. कोणते शहर हे मुक्त व्यापारासाठी प्रसिद्ध आहे?

*अ) सिंगापूर   ब) जमशेदपूर   क) टोकियो   ड) शांती निकेतन.*

४. कोणते शहर हे शैक्षणिक सुविधांमुळे प्रसिद्ध आहे?

*अ) शिकागो   ब) गॅरी   क) ओसाका   ड) ऑक्सफर्ड.*

५. कोणते हे शहर जुगारासाठी प्रसिद्ध आहे?

*अ) हाँगकाँग   ब) केंब्रीज   क) लासव्हेगास   ड) मुंबई.*

## २.२.३ सांस्कृतिक घटक (Cultural Component)

नैसर्गिक पर्यावरण व सामाजिक संबंध यांच्या सहसंबंधातून निर्माण झालेली समाजाची वर्तणूक म्हणजे 'संस्कृती' होय. संस्कृतीमध्ये चालीरिती, परंपरा, उत्सव, सण, कला, संगीत, हस्तकला, आहार इ. घटकांचा समावेश होतो. पर्यटनामध्ये नैसर्गिक सृष्टी सौंदर्याबरोबरच सांस्कृतिक घटकांना फार महत्त्वाचे स्थान आहे. ज्या देशाला प्रदीर्घ अशी सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. त्या देशाचा पर्यटनाच्या दृष्टीने चांगला विकास होतो.

### (i) चालीरिती, परंपरा व उत्सव (Traditional Festival) :-

प्रत्येक समाजाच्या चालीरिती, रूढी-परंपरा वेगवेगळ्या असतात. पर्यटकांना अशा भिन्न-भिन्न परंपरांचे आकर्षण असते. समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरा, सण, उत्सव अनुभवण्यासाठी दूरदूरवरून पर्यटक येत असतात.

भारत अनेक सण व उत्सव साजरे केले जातात. प्रत्येक प्रदेशाचा विशेष असा सण व उत्सव साजरा केला जातो. उदा. संक्रांत (महाराष्ट्र), वसंत पंचमी (उत्तर महाराष्ट्र), पतंग महोत्सव (गुजरात),

पोंगल (आंध्र प्रदेश, तामिळनाडू), नवरात्री, जन्माष्टमी, दसरा-दिपावली, रामनवमी (संपूर्ण भारत), बैसाखी (पंजाब), ओनम (केरळ), रथयात्रा (ओडिशा) इ. भारतातील अशा उत्सवामध्ये देश-विदेशातील पर्यटक सहभागी होत असतात.

### (ii) नृत्य व संगीत (Dance & Music) :-

मानवी समाजात व त्यांच्या परंपरा, चालिरीती, रूढी-परंपरा यामध्ये विविधता पहावयास मिळते. या विविधतेचे प्रतिबिंब त्यांच्या नृत्य व संगीतात पहावयास मिळते. भारताला नृत्य व संगीताची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. विविध प्रदेशाचे नृत्य वैशिष्ट्यपूर्ण आहे. उदा. भरतनाट्यम् (कनार्टक), कुचीपुडी (आंध्र प्रदेश), कथकली (केरळ), ओडिसी (ओडिसा) इ.

भारतात लोकनृत्यही फार प्रसिध्द आहे. या नृत्यातून मानवी भावना व्यक्त केल्या जातात. जीवनातील आनंदी क्षणी व नवीन ऋतूच्या आगमनावेळी नृत्ये सादर केली जातात. उदा. भांगडा (पंजाब), पांगी (हिमाचल प्रदेश), धमयाल धूप (हरियाणा), तारताली (राजस्थान), बांबूनृत्य (मिझोराम), गरबा, दांडिया (गुजरात), लेझीम, लावणी (महाराष्ट्र) इ.

भारतीय शास्त्रीय संगीत फार प्राचीन काळापासून प्रसिध्द आहे. ढोलक, बासरी, संतूर, पखवाज, सरोद, शहनाई इ. वाद्ये आपल्या प्राचीन संगीताची उज्ज्वल परंपरा व्यक्त करतात. भारतातील विविध संगीत प्रकार ही प्रसिद्ध आहेत. उदा. कर्नाटकी संगीत, गझल, कव्वाली, हिंदुस्थानी संगीत, लोकसंगीत इत्यादी. या संगीताच्या आकर्षणामुळे अनेक पर्यटक भारतात येतात.

### (iii) हस्तकला (Handicraft) :-

भारतातील लहान-मोठे हस्त उद्योग पर्यटकांना आकर्षित करतात. उदा. कश्मिरच्या शाली, गालीचे, म्हैसूरच्या रेशमी साड्या, चंदनाच्या वस्तू, बनारसी शालू, औरंगाबादची पैठणी इ. हस्तउद्योगांमुळे तेथील पर्यटनाचा विकास झाला आहे.

### (iv) आहार :-

भारतात आहारामध्ये भिन्नता पहावयास मिळते. प्रत्येक समाजा-समाजामधील भिन्नतेप्रमाणे आहारामध्येही भिन्नता आढळून येते. काही पर्यटन केंद्रे ही तेथे मिळणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण आहारामुळे प्रसिध्द आहेत. उदा. सिंगापूर, हाँगकाँग-चायनीज पदार्थ, कोकणातील-भात, मासे, दिल्ली-पेटा, म्हैसूर-म्हैसूरपाक, दक्षिण भारत-तांदळाचे विविध पदार्थ, महाराष्ट्र-पुरण पोळी इ.

### ❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ❊

❑ **खाली दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१. काश्मीरमध्ये कोणत्या हस्तोद्योगाचा विकास झालेला आहे?

*अ) चंदनाच्या वस्तू* *ब) शाल व गालीचे*

*क) पैठणी* *ड) रेशमी साडया.*

२. पतंग महोत्सव कोणत्या राज्यात उत्साहात साजरा केला जातो?

*अ) गुजरात* *ब) राजस्थान* *क) गोवा* *ड) महाराष्ट्र.*

३. केरळमधील कोणते नृत्य प्रसिद्ध आहे?

*अ) लावणी* *ब) भांगडा* *क) ओडिसी* *ड) कथकली.*

४. महाराष्ट्रातील कोणता आहार सुप्रसिद्ध आहे?

*अ) चायनीज* *ब) पुरणपोळी* *क) इडली* *ड) भात-मासे.*

## **२.२.४ इतर घटक** (Other Component)

पर्यटनाच्या विकासासाठी अनेक घटक कारणीभूत असतात. भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकांबरोबरच इतरही घटक पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असतात. इतर घटकांमध्ये मानवाची बदलती जीवनशैली, आरोग्य, मनोरंजनाच्या बदलत्या सोयी यांचा समावेश होतो.

आज २१ व्या शतकामध्ये मानवाच्या जीवनशैलीमध्ये खूप बदल झाले आहेत. मानव आज फक्त शेतीवर अवलंबून नसून तो वेगवेगळे व्यवसाय करत आहे. या व्यवसायांमुळे त्याचे आर्थिक उत्पन्न वाढले आहे. शिवाय सुट्टीचा कालावधी उपलब्ध होतो. आजच्या या धावपळीच्या जगात काही क्षण आनंदाने घालवण्यासाठी तो लहान मोठ्या सहलींचे आयोजन करतो.

जगाच्या काही भागामध्ये तंत्रज्ञानाचा (Technology) फार मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. कॅलिफोर्नियातील सिलीकॉन व्हॅली, भारतातील बेंगलोर, हैद्राबाद, पुणे यासारखी शहरे माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे पर्यटन केंद्रे बनत आहेत. देश-विदेशातील तंत्रज्ञ, व्यावसायिक अशा नगरांना प्रशिक्षणासाठी, व्यवसायासाठी भेटी देत असतात.

विविध देशात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सुविधांमुळे 'वैद्यकीय पर्यटन' हा नवीन पर्यटनाचा प्रकार विकसित होत आहे. भारतात विविध प्रकारच्या वैद्यकीय सुविधा स्वस्त व मुबलक प्रमाणात

आहेत. भारतातील आयुर्वेद उपचारास प्रचंड प्रतिसाद मिळत आहे, त्यामुळे आज आयुर्वेद उपचार करणारी ठिकाणेही पर्यटनाची केंद्रे बनत आहेत. उदा. आयुर्वेदिक हेल्थ रिसॉर्ट (केरळ), पतंजली योगपीठ (वाराणसी), होमिओपॅथिक सेंटर (पंजाब) इत्यादी.

वरीलप्रमाणे भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांप्रमाणेच इतर घटकांचे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व स्पष्ट करता येईल.

**❊ स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ❊**

❑ **खाली दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१. बेंगलोर हे पर्यटन ठिकाण कोणत्या कारणामुळे निर्माण झाले आहे?

*अ) आरोग्य* *ब) तंत्रज्ञान* *क) वस्ती* *ड) आहार.*

२. पुढीलपैकी कोणते आरोग्य पर्यटनाचे केंद्र आहे?

*अ) पतंजली योगपीठ* *ब) मुंबई* *क) पुणे* *ड) नाशिक.*

## २.३ सारांश

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. पर्यटन हा व्यवसाय पर्यटकाच्या आवडी-निवडीवर अवलंबून असतो. पर्यटन या व्यवसायाचा विकास विविध घटकांवर अवलंबून असतो. अनेक पर्यटकांना निसर्गसौंदर्य असणारी ठिकाणे आवडतात. उंच पर्वतरांगा, हिमाच्छादित शिखरे, दऱ्यातून वाहणाऱ्या नद्या, नद्यांनी निर्माण केलेली विविध भूरूपे, हिरवाईने नटलेला परिसर, समुद्र किनारे इ. घटक पर्यटकांची आकर्षणाची ठिकाणे असतात.

नैसर्गिक सौंदर्याबरोबरच पर्यटकांना समाजातील विविध परंपरा, सण, उत्सव, आहार, नत्य, संगीत, हस्तकला, क्रीडा, वस्ती, धार्मिक स्थळे इ. आकर्षित करत असतात.

वरील भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक घटकांमुळेच पर्यटनाचा विकास होत असतो.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **मृगया क्षेत्रे** : शिकारीसाठी राखीव क्षेत्रे.
- **हस्तकला** : कोणत्याही यंत्राशिवाय हाताने वस्तू तयार करणे.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

१. *ड) किनारी.*

२. *अ) जबलपूर.*

३. *ड) ऑस्ट्रेलिया.*

४. *ब) शरावती.*

५. *ब) गोकाक.*

६. *क) कांझीरंगा.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

१. *क) मक्का मदिना.*

२. *ब) शालिनी.*

३. *अ) सिंगापूर.*

४. *ड) ऑक्सफर्ड.*

५. *क) लासव्हेगास.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

१. *ब) शाल व गालीचे.*

२. *अ) गुजरात.*

३. *ड) कथकली.*

४. *ब) पुरणपोळी.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ची उत्तरे**

१. *ब) तंत्रज्ञान.*

२. *अ) पतंजली योगपीठ.*

## २.६ क्षेत्रीय कार्य

☼ तुमच्या परिसरातील अथवा जिल्ह्यातील एखाद्या पर्यटन स्थळास भेट द्या व त्या पर्यटन स्थळाच्या विकासाला कारणीभूत ठरलेल्या घटकांची यादी करा.

## २.७ सरावासाठी प्रश्न

१. पर्यटनातील विविध भूरूप सौंदर्य घटकांची थोडक्यात माहिती द्या.

२. पर्यटनातील नैसर्गिक वनस्पती व वन्यप्राणी यांचे महत्त्व सांगा.

३. पर्यटनातील हवामानाच्या विविध घटकांचे महत्त्व स्पष्ट करा.

४. पर्यटन व मानवी वस्ती यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

५. सांस्कृतिक घटक व पर्यटन.

६. पर्यटन व्यवसाय व क्रीडा.

## २.८ संदर्भ ग्रंथ सूची/अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **प्रा. ए. बी. सवदी** (१९९९) : *'द मेगा स्टेट महाराष्ट्र'*, निराली प्रकाशन, पुणे.

२. **डॉ. एस. बी. शिंदे** (२०१२) : *'पर्यटन भूगोल'*, फडके प्रकाशन, पुणे.

३. **अंकुशराव आहेर, मारकड** : *'पर्यटन भूगोल'*, पायल प्रकाशन, मिरत.

४. **खतीब के. ए.** (२०१४) : *'पर्यटन भूगोल'*, मेहता प्रकाशन, कोल्हापूर.

५. **डॉ. विठ्ठल घारपुरे** : *'पर्यटन भूगोल'*, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.


❑❑❑

सत्र–३ : घटक–३

# पर्यटनाचे वर्गीकरण व आधुनिक कल

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ पर्यटनाचे वर्गीकरण

३.२.१.१ राष्ट्रीयत्वानुसार

३.२.१.२ कालावधीनुसार

३.२.१.३ पर्यटकांच्या संख्येनुसार

३.२.१.४ हेतू नुसार

३.२.१.५ वाहतूक साधनाच्या प्रकारानुसार

३.२.१.६ ऋतूनुसार

३.२.१.७ स्वरूपानुसार

३.२.२ पर्यटनातील आधुनिक कल

३.२.२.१ छोट्या सुट्ट्यातील पर्यटन

३.२.२.२ एकल पर्यटन

३.२.२.३ कृषी पर्यटन

३.२.२.४ पर्यावरण पूरक पर्यटन (इको टुरिझम)

३.२.२.५ वारसा पर्यटन (हेरिटेज टुरिझम)

३.२.२.६ साहसी पर्यटन

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ क्षेत्रीय कार्य

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

- पर्यटनाचे वर्गीकरण समजेल.
- पर्यटनातील आधुनिक कल स्पष्ट करता येतील.

## ३.१ प्रास्ताविक

पर्यटन ही आधुनिक काळातील मानवाची एक प्रमुख आर्थिक क्रिया आहे. पर्यटन उद्योग हा भारतातील अत्यंत वेगाने वाढ होणारा एक उद्योग आहे. मागील घटकात आपण पर्यटनाचे भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर घटक अभ्यासले. पर्यटन व्यवसायाच्या विकासामुळे प्रदेशातील साधनसंपत्ती तसेच सोयींची गुणवत्ता सुधारते. कोणत्याही प्रदेशातील पर्यटन व्यवसायाचा विकास हा मुख्यत्वे वाहतूक सेवा, निवासी सेवा, मनोरंजन, बाजारपेठा इत्यादी घटकांवर अवलंबून असतो. पर्यटकांचे राष्ट्रीयत्व, पर्यटनाचा कालावधी, पर्यटकांची संख्या, पर्यटनाचा उद्देश, पर्यटकांनी वापरलेली वाहतूक साधने, ऋतू, पर्यटनाचे स्वरूप या व यासारख्या विविध आधारांवर पर्यटनाचे वर्गीकरण केले जाते. सध्या पर्यटन व्यवसाय हा एक अत्यंत महत्त्वाचा उद्योग बनला आहे. पर्यटन व्यवसायाच्या शाश्वत विकासासाठी या व्यवसायाचा सर्वांगीण अभ्यास करणे अत्यंत आवश्यक बनले आहे. यासाठी पर्यटनाचे विविध प्रकार व आधुनिक कल अभ्यासणे अत्यंत गरजेचे आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ पर्यटनाचे वर्गीकरण

विविध भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर आधारांवर पर्यटनाचे वर्गीकरण केले जाते.

#### ३.२.१.१ राष्ट्रीयत्वानुसार पर्यटनाचे वर्गीकरण

पर्यटकांच्या राष्ट्रीयत्वानुसार पर्यटनाचे खालील दोन प्रकार पडतात.

(i) देशांतर्गत पर्यटन.

(ii) आंतरराष्ट्रीय पर्यटन.

**(i) देशांतर्गत पर्यटन :** या पर्यटन प्रकारामध्ये पर्यटक आपल्या देशाच्या सिमेअंतर्गत असणाऱ्या पर्यटन स्थळांना भेट देतात. म्हणजेच पर्यटक देशांतर्गत भागात स्वतःच्या निवास ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करतात व त्याठिकाणच्या निवास, मनोरंजन व इतर सेवांचा उपभोग घेतात. या प्रकारच्या पर्यटनास देशांतर्गत पर्यटन असे म्हणतात. उदा. भारतीय व्यक्तीने काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत व गुजरातपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत किंवा भारतातील विविध बेटांना भेट देऊन केलेल्या पर्यटनास भारतातील देशांतर्गत पर्यटन असे म्हणतात.

**(ii) आंतरराष्ट्रीय पर्यटन :** पर्यटक जेव्हा आपल्या देशाबाहेरील पर्यटन स्थळांना भेट देतात, तेव्हा त्यास आंतरराष्ट्रीय पर्यटन असे म्हणतात. आपल्या एका सहलीत पर्यटक एक किंवा एकापेक्षा जास्त देशांना भेटी देतात. आंतरराष्ट्रीय पर्यटनासाठी पर्यटकाकडे व्हीसा, पासपोर्ट व इतर अनेक कागदपत्रे असणे आवश्यक असते. कोणत्याही राष्ट्राच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय पर्यटन अत्यंत महत्त्वाचे असते कारण त्यामुळे मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय चलन मिळते. आंतरराष्ट्रीय पर्यटन मनोरंजन, सुट्टी, आरोग्य, अभ्यास, धर्म, व्यवसाय, कुटुंब, मिशन, सभा, खेळ इत्यादी अनेक कारणांसाठी केले जाते.

## ३.२.१.२ पर्यटनाच्या कालावधीनुसार पर्यटनाचे वर्गीकरण

पर्यटनाच्या कालावधीनुसार पर्यटनाचे खालील दोन प्रकार पडतात.

(i) अल्पकालीन पर्यटन.

(ii) दीर्घकालीन पर्यटन.

**(i) अल्पकालीन पर्यटन :** जेव्हा पर्यटनाचा कालावधी एक दिवसापासून सात दिवसांपर्यंत असतो त्यावेळी त्यास अल्पकालीन पर्यटन असे म्हणतात. या प्रकारच्या पर्यटनामध्ये पर्यटक आपल्या निवासस्थानाच्या जवळील भागातील पर्यटन स्थळांना भेट देतात. या सहलीसाठी जवळचे व कमी अंतर असणारी ठिकाणे निवडली जातात. हे पर्यटन मुख्यतः विश्रांती, मनोरंजन आणि धार्मिक उद्देशाने केले जाते.

**(ii) दीर्घकालीन पर्यटन :** जेव्हा पर्यटनाचा कालावधी सात दिवसांपेक्षा जास्त व सहा महिन्यांपेक्षा कमी असतो तेव्हा त्या पर्यटनास दीर्घकालीन पर्यटन असे म्हणतात. या पर्यटनाचा उद्देश हा दीर्घकालीन सुट्टी घेऊन किंवा उपयोगात आणून एखाद्या मोठ्या प्रदेशाची माहिती घेणे किंवा एकाच सहलीमध्ये अनेक ठिकाणांना भेटी देणे हा असतो. दीर्घकालीन पर्यटन हे मुख्यतः मनोरंजन, ट्रेकिंग, अभ्यास, आरोग्य व धार्मिक कारणांसाठी केले जाते.

### ३.२.१.३ पर्यटकांच्या संख्येनुसार पर्यटनाचे वर्गीकरण

पर्यटकांच्या संख्येनुसार पर्यटनाचे खालील दोन प्रकार पडतात.

(i) वैयक्तिक पर्यटन.

(ii) समूह पर्यटन.

**(i) वैयक्तिक पर्यटन :** जेव्हा केवळ एकच व्यक्ती किंवा एकच कुटुंब पर्यटन करते तेव्हा त्यास वैयक्तिक पर्यटन असे म्हणतात. या पर्यटनामध्ये बहुतांश वेळा भेट देण्याची ठिकाणे काही मर्यादित लवचिकतेसह अगोदरच निश्चित केलेली असतात. या पर्यटनातील निर्णय हे स्वतः पर्यटकच घेत असतात. या प्रकारच्या पर्यटनामध्ये मनोरंजनासोबत व्यवसायाचाही विचार केला जातो. वैयक्तिक पर्यटनामध्ये विश्रांती, आनंद, धार्मिक स्थळांना भेटी व काही प्रमाणात व्यवसायासाठीही पर्यटक फिरत असतात. या पर्यटनात सेवा फक्त स्वतः किंवा कुटुंबांमध्ये मिळून वापरल्या जातात.

**(ii) समूह पर्यटन –** एकमेकांना ओळखणारे किंवा समान उद्देश असणाऱ्या अनेक लोकांना एकत्र करून जे पर्यटन केले जाते त्यास समूह पर्यटन असे म्हणतात. उदा. एखाद्या शिक्षण संस्थेने आयोजित केलेली विद्यार्थ्यांची सहल, एखाद्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची सहल, पर्यटन व्यावसायिकांकडून पर्यटक एकत्र करून त्यांचा समूह तयार करून आयोजित केलेली सहल. समूह पर्यटनामध्ये पर्यटक विविध सोयी मिळून वापरतात. समूह पर्यटन हे अनेक पर्यटकांना कमी खर्चिक व जास्त सुरक्षित वाटते. समूह पर्यटन हे पूर्वनियोजित असल्याने या पर्यटनात ताणविरहित सहलीचा आनंद घेता येतो.

### ३.२.१.४ पर्यटनाच्या हेतू/उद्देशानुसार पर्यटनाचे वर्गीकरण

पर्यटनाच्या हेतूनुसार पर्यटनाचे खालील प्रकार पडतात.

i) सांस्कृतिक पर्यटन.

ii) ऐतिहासिक पर्यटन.

iii) आरोग्य पर्यटन.

iv) वैद्यकीय पर्यटन.

v) धार्मिक पर्यटन.

vi) शैक्षणिक पर्यटन.

vii) ग्रामीण पर्यटन.

viii) कृषी पर्यटन.

ix) सुट्टी पर्यटन.

x) क्रीडा पर्यटन.

xi) उद्योगधंद्यांसाठी पर्यटन.

xii) औद्योगिक पर्यटन.

xiii) सामाजिक पर्यटन.

xiv) सहयोग पर्यटन आणि दौरे.

**(i) सांस्कृतिक पर्यटन :** जगातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारची संस्कृती विकसित झालेली आढळते. या वेगळ्या प्रकारच्या संस्कृतीच्या वस्तू, कला, संगीत, साहित्य, लोकसाहित्य, नृत्य, चित्रकला, क्रीडा, वास्तु, स्मारके इत्यादींमध्ये काही प्रमाणात साम्य व विविधताही आढळते. संस्कृतीमधील साधर्म्य व विविधतेमुळे लोकांमध्ये विविध संस्कृतीबद्दल कुतूहल व जिज्ञासा निर्माण होते. संस्कृती बद्दलच्या आकर्षण व कुतुहलामुळे केल्या जाणाऱ्या पर्यटनास सांस्कृतिक पर्यटन असे म्हणतात. भारतामध्ये सांस्कृतिक पर्यटनास विशेष स्थान आहे. भारतात हजारो ऐतिहासिक व पुरातत्व स्मारके आहेत जी प्राचीन इतिहास व संस्कृती याबद्दलचे ज्ञान मिळविण्याची संधी पर्यटकांना देतात. भारतातील समृद्ध सांस्कृतिक वारसा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना मोठ्या प्रमाणात सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांकडे आकृष्ट करतो.

**(ii) ऐतिहासिक पर्यटन :** ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठिकाणे, इमारती, किल्ले, वस्तुसंग्रहालये इत्यादी पर्यटकांना आकर्षित करतात. अशा ऐतिहासिक ठिकाणांना व वास्तूंना भेट देण्यासाठी केलेल्या पर्यटनास ऐतिहासिक पर्यटन असे म्हणतात. उदाहरणार्थ जालियनवाला बाग, पानिपत, आग्रा किल्ला, शिवनेरी किल्ला, फत्तेपूर सिक्री, म्हैसूरचा राजवाडा, सालारजंग वस्तुसंग्रहालय, तंजावर आर्ट गॅलरी यासारख्या ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाच्या ठिकाणास भेट देणे.

**(iii) आरोग्य पर्यटन :** रोमन कालखंडापासून आरोग्य पर्यटन चालते आहे. युरोपियन लोक सूर्यस्नान करण्यासाठी भूमध्य सागरी प्रदेशामध्ये सागर किनारी जात असत. त्यामुळे त्याकाळात रोममध्ये 'स्पा' निर्माण झाले. यालाच स्वित्झर्लंडमध्ये सॅनेटोरिया म्हणतात. शरीर निरोगी व सुंदर राहावे यासाठी उपचार घेण्यासाठी जे पर्यटन केले जाते त्यास आरोग्य पर्यटन असे म्हणतात. भारतामध्ये आरोग्याची काळजी घेण्यासाठी योग, मसाज, आयुर्वेद, युनानी इत्यादीसारख्या पारंपारिक पद्धतींचा वापर होतो. या पारंपारिक पद्धतीमुळे शरीर निरोगी व सुंदर राहण्यास मदत होते तसेच या आरोग्य पद्धतींचा शरीरावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. भारतात केरळ, कर्नाटक व आंध्र प्रदेश ही राज्ये आरोग्य पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत.

**(iv) वैद्यकीय पर्यटन :** वैद्यकीय पर्यटन हे आरोग्य पर्यटनापेक्षा भिन्न आहे. काही राष्ट्रांमध्ये वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया खूप महाग आहेत. यात्र भारतासारख्या काही राष्ट्रात हेच वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया तुलनात्मकदृष्ट्या कमी खर्चात केल्या जातात. त्यामुळे अनेक परदेशी रुग्ण उपचारांसाठी भारतातील प्रसिद्ध अशा अपोलो, टाटा, ब्रिच कँडी, जसलोक, हिंदुजा, संचेती इत्यादी हॉस्पिटलमध्ये दाखल होतात. वैद्यकीय पर्यटन म्हणजे वैद्यकीय उपचारांसाठी इतर राष्ट्रात प्रवास करणे होय. या पर्यटनाचा मुख्य हेतू हा वैद्यकीय उपचार असतो. असे पर्यटक वैद्यकीय उपचारांसोबतच देशातील इतर पर्यटन स्थळांनाही भेटी देतात.

**(v) धार्मिक पर्यटन :** प्राचीन काळापासून धार्मिक पर्यटन हे जगातील महत्त्वाचे पर्यटन आहे. जगात विविध धर्मांचे लोक राहतात व त्या प्रत्येक धर्माची श्रद्धास्थाने वेगवेगळी आहेत. अशा धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी लोक जातात यालाच धार्मिक पर्यटन असे म्हणतात. जेरूसलेम किंवा व्हॅटिकनला भेट ख्रिश्चन धर्मामध्ये अतिशय शुभ मानले जाते. जगभरातील मुस्लिम धर्मियांसाठी मक्का व मदिना तीर्थक्षेत्रे अत्यंत महत्त्वाची आहेत. बौद्ध धर्मियांसाठी लुंबिनी, बौद्धगया, सारनाथ या सारखी ठिकाणे महत्त्वाची आहेत. शीख धर्मियांसाठी अमृतसर, नांदेड ही महत्त्वाची धार्मिक ठिकाणे आहेत. हिंदू धर्मियांसाठी हरिद्वार, वाराणसी, मानसरोवर, रामेश्वर', अमरनाथ, केदारनाथ इत्यादी सारखी अनेक पवित्र धार्मिक ठिकाणे आहेत. अशा विविध पवित्र धार्मिक स्थळी प्रत्येक वर्षी जगभरातून मोठ्या संख्येने यात्रेकरु येतात.

**(vi) शैक्षणिक पर्यटन :** ज्ञान मिळविण्यासाठी केलेल्या पर्यटनास शैक्षणिक पर्यटन असे म्हणतात. या प्रकारच्या पर्यटनामध्ये पर्यटक इतर प्रदेशातील जमिन, लोक, भौगोलिक परिस्थिती, संस्कृती, हवामान, परिसंस्था, अर्थव्यवस्था, लोकसंख्या, जीवनपद्धती इत्यादींविषयीचे ज्ञान मिळवण्यासाठी पर्यटन करतो. शैक्षणिक पर्यटक हे त्या प्रदेशातील शैक्षणिक अभ्यासक्रमास प्रवेश घेत नाहीत कारण ते तेथील पर्यटक असतात विद्यार्थी नसतात. विद्यार्थी चर्चासत्र, परीक्षा, शैक्षणिक सहली यासाठी शैक्षणिक पर्यटन करतात.

**(vii) ग्रामीण पर्यटन :** ग्रामीण पर्यटनाचा आधार हा स्थानिक पर्यावरणाशी एकरूप होणे, स्थानिक उत्पादनांचा वापर व स्थानिक उपक्रमांमध्ये सहभाग हा आहे. ग्रामीण पर्यटनासाठी पर्यटकांना अत्यंत नैसर्गिक अशा ग्रामीण भागात नेले जाते. अनेक शहरी भागातील लोक शहरातील धकाधकीच्या जीवनापासून काही काळ दूर जाऊ इच्छितात. त्यांना नैसर्गिक वातावरणात निवांतपणा व शांतता हवी असते. त्यामुळे असे लोक एखाद्या दुर्गम खेड्याच्या ठिकाणी राहून तेथील जीवन जगू इच्छितात. असे पर्यटक ग्रामीण जीवनाबद्दल अधिक जिज्ञासू असतात.

**(viii) कृषी पर्यटन :** ज्या पर्यटकांना शेती, शेती व्यवस्थापन व पशुपालन यामध्ये रस असतो

त्यांच्यासाठी कृषी पर्यटन आयोजित केले जाते. कृषी पर्यटनामध्ये पर्यटक ग्रामीण भागात प्रत्यक्ष शेतांना भेट देतो व पिके कशी वाढवली जातात, खते कशी दिली जातात, जलसिंचन, पेरणी, मळणी, खुरपणी, कापणी यासारख्या शेतीच्या कामांबद्दल ज्ञान घेतात किंवा अशा कामात स्वतः सहभागीही होतात.

**(ix) सुट्टी पर्यटन :** सुट्टी पर्यटनाचा मुख्य हेतू हा निवासस्थानापासून दूर सुट्टी घालविणे हा आहे. सुट्टी पर्यटनात पर्यटक सुट्टीच्या काळात निसर्गरम्य ठिकाणे, धरणे, सागर किनारे, पर्वतीय भाग, जंगले यांना सहकुटुंब भेट देतात. जगभर सुट्टी पर्यटन हे मुख्यतः मुलांच्या शाळांच्या सुट्टीच्या वेळी केले जाते. या पर्यटनात पर्यटक कुटुंब, नातेवाईक, मित्र व सहकारी यांच्यासोबत पर्यटनाचा आनंद घेतात. युरोपियन संस्कृतीमध्ये वर्षातून एकदा दीर्घ सुट्टी घेऊन फिरण्याचा पध्दती आहे. युरोपियन लोकांनी जगात ज्या ठिकाणी राज्य केले त्या भागातही आता अशा सुट्ट्या दिल्या जातात. जगात सर्वात जास्त लोक वार्षिक सुट्टीमध्ये फिरायला जातात. याच काळात लांब पल्ल्याच्या तसेच परदेशी सहली काढल्या जातात. औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळात शहरातील धकाधकीच्या जीवनात विश्रांती व मनोरंजनाची गरज भासू लागली व यातूनच सुट्टी पर्यटनाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला.

**(x) क्रीडा पर्यटन :** पर्यटक पर्वतारोहण, चालणे, समुद्रपर्यटन, मासेमारी, सन बाथिंग, ट्रेकिंग, नौकाविहार, सर्फ ड्रायविंग, स्कुबा डायविंग, बंजी जंपिंग, स्काय डायव्हिंग इत्यादीसारख्या अनेक क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होण्यासाठी पर्यटनाला जातात याला क्रीडा पर्यटन असे म्हणतात.

**(xi) उद्योगधंद्यांसाठी पर्यटन :** अनेक देश हे वेगवेगळ्या उद्योगधंद्यांसाठी प्रसिद्ध आहेत. जसे जपान तंत्रज्ञानासाठी, जर्मनी मशिनरी साठी, तसेच इस्त्राईल शेती साठी प्रसिद्ध आहे. अशा ठिकाणी लोक उद्योगधंद्यांसाठी, त्यातील कामांसाठी भेटी देतात. तसेच एखाद्या उद्योगाची विविध देशांमध्ये कार्यालये असतील तर मीटिंगसाठी ही भेटी दिल्या जातात. त्यावेळेस कामाव्यतिरिक्तचा रिकामा वेळ पर्यटनासाठी वापरला जातो. व्यवसायिक बैठका, चर्चासत्रे व सभा यासाठी लोक फिरतात व यासंदर्भात सर्व सुविधा त्यांना पुरविल्या जातात. प्राचीन काळापासून लोक व्यापार उद्योगासाठी फिरतात. या पर्यटनासाठी उत्तम सुविधा उपलब्ध असाव्या लागतात. पर्यटक अशा पर्यटनामध्ये शॉपिंग, मनोरंजन यावर खूप पैसे खर्च करतात.

**(xii) औद्योगिक पर्यटन :** औद्योगिक क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान आधुनिक प्रगती व नवीन उत्पादने यांची माहिती जगभरातील ग्राहकांना व उत्पादकांना व्हावी यासाठी जगभर अनेक औद्योगिक प्रदर्शने भरविली जातात. जगातील सर्वात मोठे मशीन तंत्रज्ञानाचे प्रदर्शन जर्मनीमध्ये भरते. कृषी तंत्रज्ञान विषयी सर्वात मोठे प्रदर्शन चीनमध्ये होते. अशा प्रदर्शनांना जगभरातून उद्योजक, अभ्यासक, संशोधक, उत्पादक व ग्राहक भेट देतात. उद्योग आणि व्यापाराशी संबंधित संमेलने आणि परिषदा यांना उपस्थित राहण्यासाठी लोक फिरत असतात.

**(xiii) सामाजिक पर्यटन :** मानव हा एक सामाजिक प्राणी आहे. समाजाशिवाय त्याला आनंदी व सुरक्षित जीवन जगणे शक्य होत नाही. विविध सामाजिक हेतूंसाठी केलेल्या पर्यटनास सामाजिक पर्यटन असे म्हणतात. लोक नातेवाईक, मित्रमंडळी, आप्तेष्ट यांना भेटण्यासाठी आपल्या राहत्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातात. बऱ्याचदा वेगवेगळ्या जातींची, धर्मांची संमेलने आयोजित केली जातात. या संमेलनामध्ये सहभागी होण्यासाठी लोक मोठ्या संख्येने जातात. तसेच सामाजिक संस्थांची मिटिंग, चर्चासत्रे यामध्ये सहभागी होण्यासाठी जातात. यालाच सामाजिक पर्यटन असे म्हणतात. यामध्ये मर्यादित सोयीसुविधा वापरल्या जातात.

**(xiv) सहयोग पर्यटन आणि दौरे :** विविध प्रदेशांमध्ये पर्यटन वाढावे म्हणून सामंजस्य करार करून कमी खर्चामध्ये विशेष सहली आयोजित केल्या जातात. बऱ्याच वेळा विद्यार्थी, शेतकरी, उद्योजक, व्यवसायिक, सरकारी अधिकारी, मंत्री इत्यादी लोकांचा अभ्यास दौरा इतर देशांमध्ये आयोजित केला जातो. या दौऱ्याचा बराचसा खर्च सरकार करत असते व अशा पर्यटनासाठी सर्व उत्तम सोयीसुविधा वापरल्या जातात.

## ३.२.१.५ पर्यटनासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहतूक साधनाच्या प्रकारानुसार पर्यटनाचे वर्गीकरण

पर्यटनासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहतूक साधनाच्या प्रकारानुसार पर्यटनाचे खालील प्रकार पडतात.

(i) पायी पर्यटन.

(ii) रस्ते पर्यटन.

(iii) रेल्वे पर्यटन.

(iv) विमान पर्यटन.

(v) अवकाश पर्यटन.

(vi) जलमार्ग पर्यटन.

**(i) पायी पर्यटन :** पर्यटन किंवा गरज म्हणून काहीवेळा पायी सहली केल्या जातात. उदा. हिमालय, आल्प्स, रॉकीज, अँडीज, सह्याद्री यासारख्या पर्वतरांगांमध्ये ट्रेकिंग केले जाते. ट्रेकिंग हा मुख्यत्वे पायी पूर्ण करण्याचा प्रकार आहे. तसेच काही धार्मिक यात्रा व क्रिया या सुद्धा पायी कराव्या लागतात. उदा. नर्मदा परिक्रमा, पंढरपुर वारी यासारख्या यात्रा पूर्वापार चालत आल्या असून त्या पायीच केल्या जातात. या पर्यटनासाठी अत्याधुनिक सोयी सुविधांची गरज नसते. यात्रेसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा रस्त्यामधील विविध गावात घरांमध्येच निर्माण केल्या जातात किंवा तात्पुरते तंबू उभारले जातात.

**(ii) रस्ते पर्यटन :** जेव्हा रस्ता मार्गे प्रवास करत पर्यटन केले जाते, तेव्हा त्यास रस्ता पर्यटन म्हणतात. रस्ता पर्यटनासाठी खाजगी किंवा सरकारी वाहने वापरली जातात. प्रवासाचे अंतर व गरजेनुसार प्रवासासाठी प्रवासी भाड्याची वाहने, आराम बस किंवा खाजगी वाहने वापरली जातात. युरोपियन देश हे एकमेकांशी रस्त्याने जोडले असल्यामुळे येथे लोक पर्यटनासाठी रस्त्याची निवड करतात.

**(iii) रेल्वे पर्यटन :** जेव्हा पर्यटकांना कमी खर्चामध्ये जास्त अंतरावर पर्यटन करण्याची इच्छा असते तेव्हा ते पर्यटनासाठी रेल्वे वाहतुकीला पसंती देतात. पर्यटनासाठी जेव्हा रेल्वे वाहतुकीचा वापर केला जातो तेव्हा त्यास रेल्वे पर्यटन असे म्हणतात. युरोपातील सर्व देश एकमेकांशी रेल्वेद्वारे जोडले गेले आहेत. शिमला, उटी यासारखी ठिकाणे तेथील रेल्वेमार्गासाठीही पर्यटकांना आकर्षित करतात. भारतासारख्या खंडप्राय देशात रेल्वे पर्यटनाचे प्रमाणही जास्त आढळते.

**(iv) विमान पर्यटन :** जेव्हा पर्यटक कमीत कमी वेळेत जास्त लांबचा प्रवास करू इच्छितात तेव्हा ते पर्यटनासाठी हवाई वाहतूक साधन निवडतात. यास विमान पर्यटन असे म्हणतात. हे महाग परंतु जलद वाहतुकीचे माध्यम आहे.

**(v) अवकाश पर्यटन :** या पर्यटनात पर्यटकांना अवकाश यानात बसवून अवकाशातून फिरवून आणले जाते. हा एक पर्यटनाचा उदयोन्मुख प्रकार आहे. श्रीमंत पर्यटकांना काही मौल्यवान, प्रतिष्ठित व धाडसी कार्यक्रमाचा आनंद घ्यावासा वाटतो. त्यामुळे या पर्यटनाची सुरुवात करण्यात आली.

**(vi) जलमार्ग पर्यटन :** प्राचीन काळापासून आंतरराष्ट्रीय पर्यटन हे पहिल्यांदा जलमार्गाने होत होते. सध्या सर्व व सोयी सुविधांनीयुक्त मोठमोठी जहाजे ही पर्यटकांसाठी आकर्षण ठरत आहेत.

## ३.२.१.६ ऋतूनुसार पर्यटनाचे वर्गीकरण

ऋतूनुसार पर्यटनाचे खालील प्रकार पडतात.

(i) ग्रीष्मकालीन पर्यटन.

(ii) पावसाळी पर्यटन.

(iii) हिवाळी पर्यटन.

(iv) बारमाही पर्यटन.

**(i) ग्रीष्मकालीन पर्यटन :** उन्हाळी हंगामात लोक थंड हवामानाचा आनंद देण्यासाठी थंड हवेच्या ठिकाणांना भेटी देतात. ग्रीष्म ऋतूत होणाऱ्या पर्यटनास ग्रीष्मकालीन पर्यटन असे म्हणतात. बहुतांश शाळांना उन्हाळ्यामध्ये सुट्टी असल्यामुळे सर्वात जास्त पर्यटन या ऋतूमध्ये केले जाते.

भारतातील कुलू-मनाली, माउंट अबू, कोडाईकॅनॉल, उटी, महाबळेश्वर, लोणावळा, माथेरान इत्यादी थंड हवेची ठिकाणे ग्रीष्मकालीन पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत.

**(ii) पावसाळी पर्यटन :** पावसाळी हंगामात केल्या जाणाऱ्या पर्यटनास पावसाळी पर्यटन असे म्हणतात. पावसाळी हंगामात एकूणच निसर्ग सौंदर्य खुलते. धरती हिरवीगार बनते. काही ठिकाणी दुर्मिळ व अत्यंत सुंदर फुले फुलतात तर काही ठिकाणी दाट धुके, धबधबे, झरे निर्माण होतात. पावसाळ्यात अशी निसर्ग सौंदर्याने नटलेली सर्व ठिकाणे पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतात. पावसाळी पर्यटन हे शक्यतो जवळच्या ठिकाणी जास्त केले जाते. लोणावळा, खंडाळा, माळशेज, महाबळेश्वर, पाचगणी, आंबोली, चिखलदरा, भीमाशंकर इत्यादी ठिकाणे पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत.

**(iii) हिवाळी पर्यटन :** हिवाळी हंगामात हिमालय पर्वत रांगा आणि युरोपियन देशात बर्फवृष्टीची परिस्थिती उद्‌भवते. ही स्थिती पर्यटकांचे आकर्षण बनते. अशा हिवाळी ऋतूत होणाऱ्या पर्यटनास हिवाळी पर्यटन असे म्हणतात. काही पर्यटन केंद्रांमध्ये स्केटिंग, स्किइंग यासारखे बर्फात खेळावयाच्या हिवाळी खेळांचे आयोजन केले जाते. त्यामुळे अशी ठिकाणे पर्यटकांसाठी आकर्षण ठरतात. कोरिया पर्यटन संघटना १९९८ सालापासून 'फन स्की अँड स्नो फेस्टिवल' आयोजित करत आहे.

**(iv) बारमाही पर्यटन :** काही ठिकाणी हवा वर्षभर आल्हाददायी असते. अशा हवामानातील काही ठिकाणेही ऐतिहासिक सामाजिक तसेच सांस्कृतिक कारणासाठी प्रसिद्ध असतात. अशा ठिकाणी पर्यटक वर्षभर गर्दी करतात. अशा वर्षभर होणाऱ्या पर्यटनास बारमाही पर्यटन असे म्हणतात.

## ३.२.१.७ स्वरूपानुसार पर्यटनाचे वर्गीकरण

स्वरूपानुसार पर्यटनाचे खालील प्रकार पडतात.

(i) सामान्य पर्यटन.

(ii) विशेष पर्यटन.

**(i) सामान्य पर्यटन :** पर्यटन सहली आयोजित करणाऱ्या संस्था व व्यक्ती या वर्षभर पर्यटन सहली आयोजित करीत असतात. जेथे सर्वसाधारण सुरक्षितपणे सर्व प्रकारचा आनंद घेता येईल अशा प्रसिद्ध ठिकाणी या सहली आयोजित केल्या जातात. अशा ठिकाणी आयोजित केल्या जाणाऱ्या सहलीस सामान्य पर्यटन असे म्हणतात.

**(ii) विशेष पर्यटन :** काही वेळेस विशेष नैसर्गिक अविष्कार, खेळ, महोत्सव असतात अशा ठिकाणी सहली आयोजित केल्या जातात त्यांना विशेष पर्यटन असे म्हणतात.

## ❊ स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-१ ❊

- **खाली दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१. कोणत्या प्रकारच्या पर्यटनासाठी पर्यटकाकडे व्हीसा, पासपोर्ट व इतर अनेक कागदपत्रे असणे आवश्यक असते?

*अ) देशांतर्गत पर्यटन* *ब) आंतरराष्ट्रीय पर्यटन*

*क) कृषी पर्यटन* *ड) स्थानिक पर्यटन.*

२. कोणत्या प्रकारच्या पर्यटनाचा कालावधी एक दिवसापासून सात दिवसांपर्यंत असतो?

*अ) अल्पकालीन पर्यटन* *ब) दीर्घकालीन पर्यटन*

*क) वैयक्तिक पर्यटन* *ड) यापैकी नाही.*

३. एकमेकांना ओळखणारे किंवा समान उद्देश असणाऱ्या अनेक लोकांना एकत्र करून जे पर्यटन केले जाते त्यास कोणत्या प्रकारचे पर्यटन म्हणतात?

*अ) अल्पकालीन पर्यटन* *ब) समूह पर्यटन*

*क) वैयक्तिक पर्यटन* *ड) यापैकी नाही.*

४. संस्कृतीबद्दलच्या आकर्षण व कुतुहलामुळे केल्या जाणाऱ्या पर्यटनास कोणत्या प्रकारचे पर्यटन म्हणतात?

*अ) आरोग्य पर्यटन* *ब) सुट्टी पर्यटन*

*क) क्रीडा पर्यटन* *ड) सांस्कृतिक पर्यटन.*

५. जेव्हा पर्यटकांना कमी खर्चामध्ये जास्त अंतरावर पर्यटन करण्याची इच्छा असते तेव्हा ते पर्यटनासाठी कोणत्या प्रकारच्या वाहतुक साधनाला पसंती देतात.

*अ) रेल्वे* *ब) विमान* *क) अवकाश* *ड) यापैकी नाही.*

६. सर्वात जास्त पर्यटन कोणत्या ऋतूमध्ये केले जाते?

*अ) ग्रीष्म* *ब) पावसाळा* *क) हिवाळा* *ड) यापैकी नाही.*

## ३.२.२ पर्यटनातील आधुनिक कल

अलीकडच्या काळात पर्यटन क्षेत्रात काही नवीन कल दिसू लागले आहेत. हे कल या क्षेत्रातील प्रस्थापित कलांना पूरक असेच आहेत. हे कल पर्यटन उद्योगाच्या क्षितिजाचा विस्तार करीत आहेत आणि महसूल निर्मितीसाठी नवीन मार्ग निर्माण करीत आहेत.

पर्यटन क्षेत्रातील काही महत्त्वाचे आधुनिक कल पुढील प्रमाणे :-

**(i) छोट्या सुट्ट्यातील पर्यटन :** आधुनिक काळातील पर्यटकांच्या मोठ्या वर्गामध्ये या संकल्पनेची लोकप्रियता वाढत आहे. लोक कमी खर्चासह छोट्या सहलींसाठी नवनवीन ठिकाणे शोधत आहेत. संसाधने व दळणवळण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे प्रवास करणे आता सोपे झाले आहे. आजचे प्रवासी २०० ते ३०० किलोमीटरच्या परीघामधील पर्यटन केंद्रे शोधताहेत आणि दोन ते तीन दिवसांच्या कालावधीत लहान सुट्ट्यांचे नियोजन करीत आहेत. विस्तारित शनिवार व रविवार सह पर्यटक कमीतकमी लहान सुट्ट्यांसाठी जवळील पर्यटन स्थळांकडे जाण्यासाठी उस्फूर्त योजना आखत आहेत. अशा लहान सुट्ट्यातील पर्यटनामुळे स्वतःला नवजीवन देण्यासाठी पुरेसा वेळ मिळत आहे. मोठमोठे उद्योग समूह बऱ्याचदा कर्मचाऱ्यांची उत्पादकता वाढविण्यासाठी अशा ब्रेकची योजना आखत आहेत. आर्थिक व्यवहार्यता व मिळणाऱ्या सोयीसुविधा यामुळे आठवड्याच्या शेवटी पर्यटनासाठी निघून जाणे जास्त लोकप्रिय होत आहे.

**(ii) एकल पर्यटन :** आधुनिक जीवनातील अतिरिक्त ताण व पुनरावृत्ती मानवापुढे आव्हान निर्माण करीत आहे. त्यामुळे पर्यटक अनेकदा एकटेच प्रवासासाठी निघतात. अशा पर्यटनातून ते स्वतःचे आणि त्यांच्या जीवनातील उद्दिष्टांचे पुनरुत्थान करतात. असे पर्यटन हे केवळ नवीन ठिकाणांना भेट देण्यासाठी नसते तर स्वतःच्या आत्म्याशी पुनर्संपर्क प्रस्थापित करण्यासाठी व जीवनाचे लक्ष शोधण्यासाठीचा मार्ग म्हणून या पर्यटनाकडे पाहिले जाते. एकटेच पर्यटन करणारे प्रवासी नवीन लोकांना भेटतात, नवीन ठिकाणांचा शोध घेतात, भीतीवर मात करतात व स्वतःला शोधून स्वातंत्र्याचा सर्वाधिक उल्लेखनीय आनंद घेतात. एकल प्रवासी कुठेही जाऊ शकतात व ते विस्मयकारकपणे आपल्या मार्गाची निवड करतात.

भारतातील उत्तर-पश्चिम हिमालयातील श्रीनगर-लेह रस्ता, केरळ मधील अलेप्पी, तामिळनाडूमधील कोडाईकॅनॉल ही ठिकाणे एकल पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत.

**(iii) कृषी पर्यटन :** कृषी पर्यटनामध्ये शेती व पर्यटन ही दोन मुख्य क्षेत्रे एकत्र आणली जातात. पर्यटन क्षेत्रामध्ये विस्तारण्याची क्षमता आहे तर कृषी क्षेत्रामध्ये सामावून घेण्याची क्षमता आहे त्यामुळे कृषी क्षेत्र व पर्यटन क्षेत्र या दोन्ही क्षेत्रांचा फायदा होत आहे.

कृषी पर्यटन म्हणजे शेतात पर्यटकांसाठी निवास, भोजन, शेतातील कामात सहभाग, शेती व शेतीपूरक व्यवसायांचे ज्ञान यांची संधी उपलब्ध करून देणे होय. कृषी पर्यटनामध्ये पर्यटकांच्या राहण्याची सोय शेतकऱ्यांच्या घरामध्ये किंवा त्यासारख्या सोयी बांधून घेऊन उपलब्ध करून दिल्या जातात. येथील वातावरण हे ग्रामीण भागातील जीवनाचा आनंद देणारे असते. धकाधकीच्या जीवनातून थोडी विश्रांती व निवांत क्षण मिळावेत यासाठी लोक शांत, निसर्गरम्य व प्रदूषण विरहित अशा दुर्गम भागातील कृषी पर्यटन केंद्रास भेट देण्यासही तयार असतात.

**(iv) पर्यावरण पूरक पर्यटन (इको टुरिझम) :** अनियंत्रित व अनिर्बंध पर्यटन वाढीमुळे पर्यटन स्थळाचे ठिकाणावरील नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणावर मोठ्या प्रमाणावर होऊन त्याचा पर्यटनाच्या विकासावर वाईट परिणाम होतो. पर्यटनाचा पर्यावरणावरील दुष्परिणाम टाळून त्याचे संवर्धन करण्यासाठी तसेच स्थानिक लोकांच्या विकासासाठी पर्यटनाचा उपयोग व्हावा यासाठी अलीकडच्या काळात पर्यावरण पूरक पर्यटनाची सुरुवात झाली आहे. पर्यटन स्थळावरील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांना हानी न पोहोचवता पर्यटकांना पर्यटनाचा आनंद दिला जातो. या प्रक्रियेमध्ये स्थानिक लोकांना सहभागी करून घेतले जाते. या प्रकारच्या पर्यटनामुळे पर्यटकांना पर्यटनाचा आनंद देण्याबरोबरच नैसर्गिक व सांस्कृतिक साधनसंपत्तीचे संवर्धन होते. पर्यटनाचा विकास करताना प्रदूषण निर्माण करणाऱ्या गोष्टींवर प्रतिबंध घातले जातात व उपलब्ध नैसर्गिक व स्थानिक सुविधांच्या साह्याने पर्यटकांना सोयी सुविधा पुरविल्या जातात.

**(v) वारसा पर्यटन (हेरिटेज टुरिझम) :** भूतकाळातील, वर्तमान काळातील महत्त्वाच्या घटना व व्यक्तींशी संबंधित असणारी ठिकाणे, इमारती, कलाकृती इत्यादींचा अनुभव घेण्यासाठी केलेल्या पर्यटनास वारसा पर्यटन असे म्हणतात. वारसा पर्यटनात सांस्कृतिक, ऐतिहासिक व नैसर्गिक अशा सर्व घटकांचा समावेश होतो. राजवाडे, किल्ले, स्वातंत्र्य व सामाजिक चळवळीशी संबंधित वास्तू, स्मारके इत्यादींचे वारसा स्थळ म्हणून जतन केले जाते. अशा स्थळांना पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात त्यामुळे वारसा पर्यटन हा एक वाढणारा उद्योग आहे. वारसा पर्यटक पर्यटन स्थळी दीर्घकाळ राहतात व इतर प्रवाशांच्या तुलनेत अधिक पैसा खर्च करतात. वारसा स्थळांबद्दल त्यांच्या मनात आदर असतो त्यामुळे अशा पर्यटकांमुळे वारसा संसाधनांवर नकारात्मक प्रभाव पडण्याची शक्यता तुलनेने कमी असते.

**(vi) साहसी पर्यटन :** साहसी पर्यटनामध्ये नैसर्गिक ठिकाणी साहसी खेळ खेळणे व निर्जन तसेच अनोळखी भागाचा शोध घेण्यासाठी अशा भागात प्रवास करणे यांचा मुख्यत्वे समावेश होतो. तरुणांमध्ये साहसी पर्यटन वेगाने लोकप्रिय ठरत आहे. निसर्ग सानिध्यात पदभ्रमंती करणे व विविध साहसी खेळ किंवा धाडसी अनुभव घेणे याकडे पर्यटकांचा कल वाढू लागला आहे. जगभर बंजी जंपिंग, पॅराग्लायडिंग, पॅरासेलिंग, स्कीइंग, जंगल भ्रमंती, रिव्हर राफ्टींग, कयाकिंग, व्हॅली क्रॉसिंग, रॉक क्लाइंबिंग, गिर्यारोहण यासारख्या धाडसी किंवा साहसी क्रीडा प्रकारांची मागणी वाढली आहे. सर्वच राष्ट्रांमध्ये साहसी पर्यटनाच्या सुरक्षितता आणि गुणवत्तेसाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. भारतीय पर्यटन मंत्रालयानेही साहसी पर्यटन चालकांच्या मंजुरीसाठी दिशानिर्देश दिले आहेत. तसेच साहसी पर्यटनाच्या सुरक्षितता व गुणवत्तेच्या मानकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. साहसी पर्यटनाच्या ठिकाणांसह, पर्यटनाच्या पायाभूत सुविधा विकासासाठी वित्तीय सहाय्य देण्यात येत आहे. भारतात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्कीइंग अँड माउंटीनेरियर, गुलयर्ग, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ वॉटर स्पोर्ट्स, गोवा, भारतीय पर्वतारोहण फेडरेशन, डव्हान्स ऑपरेटर असोसिएशन ऑफ इंडिया यासारख्या संस्था साहसी पर्यटनासाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्याचे काम करीत आहेत.

## ✻ स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-२ ✻

❑ **खाली दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१. विस्तारित शनिवार व रविवारसह दोन ते तीन दिवसांच्या कालावधीत जे पर्यटन केले जाते त्यास कोणत्या प्रकारचे पर्यटन म्हणतात?

*अ) छोट्या सुट्ट्यातील पर्यटन* *ब) आंतरराष्ट्रीय पर्यटन*

*क) कृषी पर्यटन* *ड) साहसी पर्यटन.*

२. भारतातील खालीलपैकी कोणते ठिकाण एकल पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे?

*अ) श्रीनगर-लेह रस्ता* *ब) दिल्ली*

*क) कन्याकुमारी* *ड) यापैकी नाही.*

३. कृषी पर्यटनामध्ये पर्यटकांच्या राहण्याची सोय कोठे केली जाते?

*अ) शेतकऱ्यांच्या घरांमध्ये* *ब) हॉटेल*

*क) राहण्याची सोय केली जात नाही* *ड) यापैकी नाही.*

४. पर्यटनाचा पर्यावरणावरील दुष्परिणाम टाळून त्याचे संवर्धन करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या पर्यटनाची सुरुवात झाली आहे?

*अ) आरोग्य पर्यटन* *ब) पर्यावरण पूरक पर्यटन*

*क) क्रीडा पर्यटन* *ड) सांस्कृतिक पर्यटन.*

५. भूतकाळातील, वर्तमान काळातील महत्त्वाच्या घटना व व्यक्तींशी संबंधित असणारी ठिकाणे, इमारती, कलाकृती इत्यादींचा अनुभव घेण्यासाठी केलेल्या पर्यटनास कोणत्या प्रकारचे पर्यटन म्हणतात.

*अ) वारसा पर्यटन* *ब) आंतरराष्ट्रीय पर्यटन* *क) कृषी पर्यटन* *ड) साहसी पर्यटन.*

## ३.३ सारांश

सध्या पर्यटन हा जगातील एक अत्यंत वेगाने विकसित होणारा प्रमुख व्यवसाय आहे. जगभरात पर्यटनासाठी फिरणारांची संख्या सातत्याने वाढत आहे. पर्यटकांच्या मागणीनुसार वेगवेगळ्या प्रकारचे पर्यटन आयोजित केले जात आहे किंवा त्याच्या सुविधा दिल्या जात आहेत. पर्यटकांच्या गरजा, कल, आनंद, मागणी याचा विचार करून पर्यटकांना मोठ्या प्रमाणावर आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या पर्यटनाचे आयोजन करून दिले जात आहे. पर्यटन क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी मोठ्या प्रमाणावर

नियोजन करण्यात येत आहे. पर्यटनविषयक संशोधन व निर्णयांमध्ये सर्वसमावेशकता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. अलीकडच्या काळात एकल पर्यटन, पर्यावरण पूरक पर्यटन, वारसा स्थळे पर्यटन, साहसी पर्यटन याकडे पर्यटकांचा कल वाढला आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **ट्रेकिंग** : पायी सफारी.

२. **स्कीइंग** : बर्फावरून पट्टीच्या साह्याने घसरत जाणे.

३. **राफ्टींग** : वेगवान नदी प्रवाह, धबधबे यामधून छोट्या बोटीतून प्रवास करणे.

४. **मॉऊंटनिअरींग** : पर्वतारोही.

५. **व्हॅली क्रॉसिंग** : दोराच्या सहाय्याने दरी पार करणे.

६. **पॅराग्लायडिंग** : कापडी फुग्याच्या साहाय्याने आकाशात उडणे.

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-१ ची उत्तरे :-

१. *ब) आंतरराष्ट्रीय पर्यटन.*

२. *अ) अल्पकालीन पर्यटन.*

३. *ब) समूह पर्यटन.*

४. *ड) सांस्कृतिक पर्यटन.*

५. *अ) रेल्वे.*

६. *अ) ग्रीष्म.*

### ❑ स्वयं-अध्यनासाठी प्रश्न-२ ची उत्तरे :-

१. *अ) छोट्या सुट्ट्यातील पर्यटन.*

२. *अ) श्रीनगर-लेह रस्ता.*

३. *अ) शेतकऱ्यांच्या घरांमध्ये.*

४. *ब) पर्यावरण पूरक पर्यटन.*

५. *अ) वारसा पर्यटन.*

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) टिपा लिहा.

i) देशांतर्गत पर्यटन.

ii) आंतरराष्ट्रीय पर्यटन.

iii) अल्पकालीन पर्यटन.

iv) आरोग्य पर्यटन.

v) धार्मिक पर्यटन.

vi) शैक्षणिक पर्यटन.

vii) ग्रीष्मकालीन पर्यटन.

viii) कृषी पर्यटन.

ix) पर्यावरणपूरक पर्यटन.

x) वारसा पर्यटन.

### ब) सविस्तर उत्तरे लिहा

i) पर्यटन उद्देशानुसार पर्यटनाच्या वर्गीकरणाची चर्चा करा?

ii) ऋतुवर आधारित पर्यटनाचे वर्गीकरण स्पष्ट करा?

iii) पर्यटनातील आधुनिक कल स्पष्ट करा?

## ३.७ क्षेत्रीय कार्य

☼ तुमच्या जिल्ह्यातील पर्यटन स्थळांची यादी करून त्या पर्यटन स्थळांचे योग्य असे वर्गीकरण करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **Bhatia A. K.** *(1995)* : *"International Tourism Fundamental and Practices"*, Sterling Publishers, New Delhi.

२. **Robinson H.** *(1978)* : *"Geography of Tourism"*, MacDonald Evans, London.

३. **Roday S.**, **Biwal A.** and **Joshi, V.** *(2014)* : *"Tourism-Operations and Management"*, Oxford Unviersity Press, New Delhi.

४. **Selvam M** *(1989)* : "Tourism Industry in India", Himalaya Publising House, Bombay.

५. **Seth, P. N.**, **Bhat, S. S.** *(1993)* : *"An Introduction to Travel and Tourism"*, Sterling Publication Pvt. Ltd., New Delhi.

६. **डॉ. एस. बी. शिंदे** *(२००६)* : *'पर्यटन भूगोल'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

७. **डॉ. विठ्ठल घारपुरे** *(२००२)* : *'पर्यटन भूगोल'*, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर, नागपूर.

९. **प्रा. के. ए. खतीब** *(२००६)* : *'पर्यटन भूगोल'*, मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर.

१०. **प्रा. के. ए. खतीब** *(२०१४)* : *'भारतातील पर्यटन'*, मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर.

११. **दूर शिक्षण केंद्र** *(२०१७)* : *'भारतातील पर्यटन'*, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

❑❑❑

सत्र–३ : घटक–४

# पर्यटनाचे परिणाम

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ पर्यटनाचा आर्थिक घटकावर होणारा परिणाम

४.२.२ पर्यटनाचा सामाजिक व सांस्कृतिक घटकावरील परिणाम

४.२.३ पर्यटनाचा पर्यावरणावरील परिणाम

४.२.४ पर्यटनाचा शाश्वत विकास

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

४.६ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ क्षेत्रीय कार्य

४.९ अधिक वाचनासाठी संदर्भ

## ४.० उद्दिष्ट्ये

या विषय घटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

१. पर्यटनाचा आर्थिक घटकावरील परिणाम समजून घेता येईल.

२. पर्यटनाचा सामाजिक व सांस्कृतिक घटकावरील परिणाम समजून घेण्यास मदत होईल.

३. पर्यटनाचा पर्यावरणावरील होणारा परिणाम अभ्यासता येईल.

४. पर्यटनाचा शाश्वत विकास समजून घेता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

पर्यटन हा मानवाचा आधुनिक आर्थिक व्यवसाय असून तो फार झपाट्याने विकसित होत आहे. पर्यटन हा एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. यामध्ये लघु उद्योगापासून ते मध्यम उद्योगापर्यंत विविध संधी उपलब्ध आहेत. पर्यटनाचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घटकांवर परिणाम होत चालला आहे. त्यामुळे त्याचा अभ्यास करणे अनिवार्य झाले आहे. पर्यटन व्यवसायाचा मानवी क्रियांवर कसा परिणाम झाला? मानवाने पर्यटन व्यवसायात काय प्रगती केली? आणि या प्रगतीचा पर्यावरणावर काय परिणाम झाला. हे अभ्यासणे गरजेचे आहे.

पर्यटनाचा पर्यावरणावर व मानवावर चांगला व वाईट असा दोन्ही प्रकारचा परिणाम झाला आहे. पर्यटनामुळे परकीय चलन, रोजगाराची संधी, स्थानिक बाजारपेठ, लघु उद्योगांना चालना, यासारखा फायदा झाला आहे. याचबरोबर पर्यटनामुळे काही वाईट परिणामही झालेले आहेत. त्याप्रमाणे पर्यटकांना अन्न उत्पादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भूमी उपयोजन चालू आहे. त्याचा परिणाम पर्यावरणाची हानी होते. पर्यटनाच्या ठिकाणी जागेच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पर्यटन स्थळांच्या ठिकाणी वर्षभर रोजगार मिळत नाही. लोक आर्थिक उद्योगात मोठ्या प्रमाणावर गुंतल्याने सामाजिक घटकांकडे दुर्लक्ष करतात, तर काहीवेळा काही ठिकाणी याच घटकांचा पर्यटनासाठी वापरही होताना दिसून येतो. उदा. कृषी पर्यटन, केरळमधील मसाल्याच्या बागा, कोल्हापूरातील मर्दानी खेळ, गुजरातमधील पतंग उत्सव इ.

पर्यटनाचा पर्यावरणावर परिणाम ही सध्याची एक समस्या निर्माण झाली आहे. वाढती लोकसंख्या, इमारती, हॉटेलचे वाढते प्रमाण, केर-कचरा याचा परिणाम होतो.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ पर्यटनाचा आर्थिक घटकावर होणारा परिणाम

सध्या पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. जगातील बहुतांशी देशात या उद्योगाची वाढ होत आहे. पर्यटनामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उत्पादनाच्या संधी उपलब्ध होत आहेत. पर्यटनाचा अधिक घटकावर चांगला परिणाम दिसतो, तो खालीलप्रमाणे :-

#### अ) रोजगाराच्या संधी :-

पर्यटन हा व्यवसाय रोजगार निर्मिती करणारा उद्योग आहे. पर्यटन व्यवसायामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारच्या रोजगाराच्या संधी असतात. यामध्ये काही कुशल व अकुशल कामगारांचा समावेश केला जातो. पर्यटनामुळे सेवा उद्योगाला चालना मिळाली. सेवा उद्योगात प्रचंड

प्रमाणात संधी असतात. पर्यटन स्थळांच्या ठिकाणी घरगडी, हमाल, घोडेवाले, हाऊसकिपर्स, माळी, खाद्य व शितपेय विक्रेते इ. लोकांचा समावेश केला जातो. पर्यटन स्थळांच्या ठिकाणी हॉटेल, खानावळ, प्रवासी एजंट, वाहतूकदार यासारखे व्यवसाय वाढीस लागतात. उदा. महाबळेश्वर याठिकाणी रेस्टॉरंट, पंचतारांकित हॉटेल यासारख्या व्यवसायातून रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. काही पर्यटन स्थळे काही खास वस्तूसाठी प्रसिध्द असतात. उदा. महाबळेश्वर-स्ट्रॉबेरी, सावंतवाडी-लाकडी खेळणी, सिमला-स्वेटर्स यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. काही पर्यटन स्थळे निसर्ग पर्यटनास महत्व देतात. धबधबा, जंगले, सरोवरे, दऱ्या, अशा प्रदेशात रोजगाराच्या संधी निर्माण होतात. उदा. सरोवरांच्या ठिकाणी-बोटींग, नौकायन, दऱ्यांच्या प्रदेशात रोप-वे, झुलता पाळणा, जंगलांच्या प्रदेशात जंगल सफरी.

एस. मेडलिक यांच्या मते ज्या प्रदेशात साधनसंपदा कमी आहे. तिथे पर्यटनामुळे रोजगार निर्माण होतात. द. अमेरिकामधील ब्राझील सारख्या देशात पर्यटन व्यवसायाला प्रचंड चालना दिली आहे. आणि त्यातून रोजगार निर्माण केला आहे. अनेक धाडसी प्रवासी ॲमेझॉनच्या नदीच्या खोऱ्याची सफर करण्यासाठी येतात. पर्यटनामुळे कमी भांडवलात रोजगार निर्माण करता येतो. यामुळे रोजगार व प्रादेशिक तसेच राष्ट्रीय विकासाला हातभार लागतो.

## ब) प्रदेशाचा आर्थिक विकास :-

काही देशांची अर्थव्यवस्था पर्यटन या व्यवसायावर अवलंबून आहे. पर्यटनापासून मिळणाऱ्या उत्पादनातून त्या देशाचा विकास होत असतो. जागतिकीकरणामुळे पर्यटन व्यवसायात नवनवीन कल्पना येत आहेत. उदा. आरोग्य धामे, किल्ले, करमणुकीची साधने इत्यादी पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी ह्या पर्यटन स्थळापर्यंत जाण्यासाठी रस्ते, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रवासी बस सेवा, रेल्वे, विमान, हॉटेल्स इ. घटक त्या पर्यटन स्थळांचा विकास घडवून आणतात. औद्योगिकीकरणातून मिळणारे उत्पादन हे जास्त असते, पण त्यामानाने पर्यटन व्यवसायातून मिळणारे उत्पादन कमी असते, पण रोजगाराची संधी निर्माण करतात. कोणत्याही देशाचा सर्वच भाग उद्योगधंद्यासाठी चांगला नसतो, जो भाग उद्योगधंद्यासाठी चांगला नसतो तो भाग पर्यटनासाठी चांगला असतो व त्याठिकाणी पर्यटन स्थळांची निर्मिती करून त्या देशाचा/प्रदेशाचा विकास करता येतो. उदा. इंग्लंडचे-स्कॉटलंड. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात गोवा हे राज्य पूर्णपणे पर्यटन व्यवसायावर अवलंबून असून प्रादेशिक विकास घडवून आणला आहे. महाराष्ट्रातील 'सिंधुदुर्ग' जिल्ह्याने महाराष्ट्राचा प्रादेशिक विकास केला आहे. ईशान्य भारतातील अरूणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा, मिझोराम या राज्यांची भौगोलिक परिस्थिती औद्योगिकीकरणासाठी चांगली नाही, पण या राज्यांनी स्वत:चा विकास करण्यासाठी पर्यटन व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढवला.

## क) परकिय चलन :-

पर्यटन व्यवसायातून जे परकीय चलन मिळते, त्यातून त्या देशाचा विकास होत असतो. त्यावेळी विकसित देशातील पर्यटक अविकसित किंवा विकसनशील देशात पर्यटनासाठी येतात, त्यावेळी त्यांचे चलन त्या देशाला मिळते. त्यामुळे त्या चलनाचा उपयोग कमी विकसित देश इतर वस्तू आयात करण्यासाठी करतात. त्यामुळे अशा चलनाचा फायदा त्या देशांना होत असतो. यातूनच परकीय चलन बदलून देणारे व्यवसाय ही चालू होतात.

## ड) उत्पादन वाढ :-

पर्यटन व्यवसायामुळे देशाच्या उत्पादनात वाढ होते. प्रसंगी त्या देशाच्या विकासाला हातभार लागतो. यामध्ये अनेक पर्यटन स्थळे शोधली जातात, किंवा काही निर्माणही केली जातात. हे करत असताना त्याठिकाणी पर्यटक कसे आकर्षित होतील याकडे लक्ष दिले जाते. त्यासाठी त्याभागात सर्व सोयीसुविधा पुरवल्या जातात. उदा. विविध सेवा व्यवसाय, हॉटेल, वाहतूक यातून आर्थिक फायदा मिळत असतो आणि यातून राष्ट्रीय उत्पादनात भर पडत असते.

## इ) लघु उद्योगांना चालना :-

काही पर्यटन स्थळांच्या ठिकाणी लघु उद्योगांना चालना मिळाली आहे. त्याप्रमाणे सावंतवाडी याठिकाणी विविध खेळणी तयार करणारे उद्योगाचे केंद्रीकरण झाले आहे. किनारपट्टीच्या प्रदेशात घोडागाडी, बोटींग यासारखे लघु उद्योग चालवले जातात. त्याचप्रमाणे भारतातील गोवा याठिकाणी परकीय चलन बदलून देणाऱ्या केंद्रांचा विकास झाला आहे. नृसिंहवाडी या धार्मिक पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पेढे तयार करण्याचे उद्योग निर्माण झाले. त्याचप्रमाणे अलिकडच्या जागतिकीकरणाच्या कालखंडात आज एक मोठा उद्योग निर्माण झाला आहे आणि तो म्हणजे ‘टूर्स’ निर्माण करणारा उद्योग उदा. केसरी टूर्स, विणा वर्ल्ड. यातूनही रोजगाराची संधी निर्माण झाली आहे.

## ई) स्थानिक बाजारपेठा :-

पर्यटक ज्यावेळी एखाद्या पर्यटन स्थळाला भेट देतात किंवा त्या स्थळांची भ्रमंती करत असतात, त्यावेळी त्याठिकाणच्या काही प्रसिध्द वस्तू खरेदी करत असतात. उदा. हस्तउद्योग, कुटीरउद्योग इ. निर्माण झालेल्या वस्तू खरेदी करत असतात. कोकणामध्ये भ्रमंती करताना सावंतवाडीला लाकडी खेळणी खरेदी केली जातात. महाबळेश्वरला ‘स्ट्रॉबेरी’ घेतली जाते. यातूनच स्थानिक बाजारपेठेची निर्मिती होते.

## प) महसूल निर्मिती :-

कोणत्याही देशात ज्यावेळी वस्तू खरेदी केली जाते, त्यावेळी त्या वस्तूवर त्या देशाचे शासन कर लावत असते. त्यामुळे विदेशी पर्यटक पर्यटन स्थळांच्या ठिकाणच्या वस्तू खरेदी करते, त्यावेळी त्या उद्योगालाही चालना मिळते व शासनालाही कर रूपाने चलनाची निर्मिती होत असते. ज्याप्रमाणे हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळी, दुकाने, टॅक्सी इ. यातूनच शासनाला महसूल मिळतो.

## फ) राष्ट्रीय साधनसंपत्तीचा उपयोग :-

प्रत्येक देशात अनेक पर्यटन स्थळांचा विकास झाला आहे. पर्वतीय/डोंगराळ भागात किल्ल्यांची निर्मिती केल्याने पर्यटक त्याठिकाणी येतात. राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये यांची निर्मिती केली जाते व साधन संपत्तीचा उपयोग केला जातो. समुद्र किनाऱ्यांच्या ठिकाणी बीचेसची निर्मिती केली आहे..उदा.तामिळनाडूमध्ये 'मरियाना' बीच, कोयना धरण क्षेत्रात जंगलांची निर्मिती करून विविध उद्योगांना चालना दिली आहे. वाराणसी याठिकाणी शासनाने कोटी रुपये खर्च करून गंगा नदी प्रदूषण मुक्त केली आणि पर्यटनाचा विकास केला. महाराष्ट्रातील शेगाव या ठिकाणी आनंद सागर सारखी ठिकाणे विकसित केली आहेत.

## ग) गुंतवणूक :-

अलिकडच्या काही काळात शासन पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. काहीवेळा ही गुंतवणूक सरकारी व खाजगी क्षेत्रात असते. पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी शासन पर्यटन विकास मंडळाची स्थापना करते. पर्यटन स्थळांपर्यंत जाण्यासाठी वाहतूक व दळणवळणाची साधने निर्माण करतात, यामध्ये रस्ते, रेल्वे, विमान यासारख्या जलद वाहतूकीच्या सोयी शासन निर्माण करत असते. तसेच पर्यटकांच्या सोयीसाठी शासकीय विश्रामगृहाची निर्मिती केली जाते. तर खाजगी भागात हॉटेल, रेस्टॉरंट, चित्रपटगृहे, नाट्यगृहे, दुकाने यांची निर्मिती खाजगी क्षेत्रातून होते.

# ४.२.२ पर्यटनाचा सामाजिक व सांस्कृतिक घटकावरील परिणाम

पर्यटनाचा सामाजिक घटकांवर होणाऱ्या परिणामांचा पर्यटन भूगोल शास्त्रात जेवढा व्हावा तेवढा अभ्यास व संशोधन झालेले नाही असे 'पर्यटन भूगोलशास्त्र' या ग्रंथाचे लेखक श्री. एच. रॉबिन्सन यांनी म्हटले आहे. तरीही काही विशिष्ट सामाजिक घटकांवरील पर्यटनाचा परिणाम अगदीच स्पष्ट असून त्यांचा विचार पुढे केलेला आहे.

## अ) पर्यटन व वस्त्या :-

पर्यटनाचा एक दृश्य परिणाम म्हणजे नवीन मानवी वस्त्यांची निर्मिती होय. यासंदर्भात श्री.पिंचमेल

यांनी फ्रान्समधील पर्यटन व वस्ती यांच्या अन्योन्यसंबंधात म्हटले आहे की, ‘या देशात उद्योगधंद्यापेक्षा पर्यटनामुळे अधिक वस्त्या निर्माण झालेल्या आहेत.’ स्पेनमध्येसुध्दा किनारी प्रदेशात अनेक लहानलहान नवीन वस्त्या पर्यटन विकासामुळेच निर्माण झाल्या आहेत.

## १. सामाजिक रूढी, परंपरा, आचार-विचार, चालीरिती :-

पर्यटनामुळे पर्यटन स्थळांच्या ठिकाणची आचार-विचार-चालीरिती यांची देवाण-घेवाण होते..एखाद्या पर्यटन स्थळाच्या ठिकाणची परंपरा समजावून घेतली जाते. उदा. भारताला एक प्रकारची सांस्कृतिक परंपरा आहे. धार्मिक पर्यटन स्थळांच्या ठिकाणी अनेक चालीरिती पहावयास मिळतात.

## २. राष्ट्रीय एकात्मता वाढीस मदत :-

पर्यटनाचे आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत असे दोन प्रकार पडतात, ज्यावेळी देशांतर्गत पर्यटन होते. उदा. भारतात विविध धर्माचे, जातीचे लोक एकत्रित राहतात व पर्यटनामुळे प्रदेश निहाय भाषा, वेश, आहार, परंपरा, चालीरिती यामध्ये विविधता दिसते, पण ती पर्यटनामुळे जाणून घेतली जाते व यातूनच राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते.

## ३. पर्यटन व राहणीमान :-

ज्यावेळी एखाद्या विकसित देशातून पर्यटक पर्यटनाच्या निमित्ताने विकसनशील किंवा अविकसित म्हणजेच द. आशियाई देश, आफ्रिकेतील देशात येतात. त्यावेळी त्या विकसित देशातून आलेल्या पर्यटकांचे वेशभूषा, भाषा, वस्त्र परिधान यांचा परिणाम हा पर्यटन स्थळांच्या ठिकाणी असणाऱ्या लोकांवर होतो व राहणीमानात बदल होण्यास सुरवात होते. यातूनच राहणीमानाचा दर्जा वाढत जातो.

## ४. आंतरराष्ट्रीय सामंजस्य :-

पर्यटनामुळे जागतिक शांतता निर्माण होण्यास सहकार्य होते. पर्यटनामुळे दोन देशातील संबंध चांगले निर्माण होतात. दोन देशातील वाद, मतभेद, समस्या सुटण्यास मदत होते. पर्यटनामुळे दोन देशातील लोकांची मते जाणून घेण्यात येतात. दोन देशातील वितुष्ठ विसरून नव्याने दोन्ही देश स्वत:चा विकास करू शकतात. पर्यटन स्थळांच्या विकासामुळे दोन देशातील संबंध सुधारतात.

## ५. पर्यटन व शेतकरी :-

पर्यटन स्थळांचा विकास होत असताना त्या ग्रामीण वस्त्यांचा ही विकास होत असतो. ज्यावेळी पर्यटन स्थळांच्या ठिकाणी रस्त्यांची, विजपुरवठा, पाणीपुरवठा यांची सोय होत असते. त्यावेळी या

सोयीसुविधा त्याठिकाणच्या शेतकऱ्यांनाही मिळतात. त्यामुळे त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांचा विकास होतो. भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे भारतात बैलगाडी सफर, पिकांची ओळख, गावराण जेवण यांची माहिती राष्ट्रातील पर्यटकांना दिली जाते. राष्ट्रातील लोक ग्रामीण भागामध्ये जाऊन त्याठिकाणी या प्रकारचा आनंद साजरा करतात.

### ६. पर्यटक व इतर सामाजिक घटक :-

पर्यटनामुळे जीवनमान बदलते. पर्यटक व स्थानिक लोक यांच्यात एक नाते निर्माण होते. यातूनच विचारांची देवाण-घेवाण होते. पर्यटकांचा स्थानिक लोकांशी जो संबंध येतो, त्यास 'इकोकॉटर्स' असे म्हणतात आणि त्यावर पर्यटनाचा मोठा प्रभाव आढळतो. या दोन्हीचा संबंध वस्तूंची विक्री, बीचेस तर नाईट क्लबवर किंवा विचारांची देवाणघेवाण करताना होतो.

## ब) पर्यटनाचा सांस्कृतिक घटकावरील परिणाम :-

पर्यटन स्थळामुळे प्राचीन अवशेष, निसर्ग सौंदर्य याची जपणूक करण्याची प्रवृत्ती वाढीस लागते.

### १. पर्यटन व अन्न संस्कृती :-

प्रत्येक पर्यटन स्थळांच्या ठिकाणी अन्नपदार्थांमध्ये विविधता दिसून येते व पर्यटक पर्यटन स्थळाला भेट देतात, तेव्हा त्याठिकाणच्या अन्नाची चव घेतात. भारतात प्रदेशनिहाय आहार वेगवेगळा दिसून येतो. ज्याप्रमाणे दक्षिण भारतात भात, मासे, खोबऱ्याचे पदार्थ, उत्तर भारतात गहू, बटाटे, मोहरीचे तेल यांच्यापासून बनवलेले पदार्थ वापरतात.

### २. पर्यटन व नित्तिमत्ता :-

धार्मिक पर्यटनाच्या ठिकाणी भाविकांबरोबर गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोकही असतात. त्यामुळे अशा ठिकाणी गुन्हेगारी वाढते. तर काही ठिकाणी जीवनावश्यक वस्तूचे भाव कृत्रिम तुटवडा निर्माण करतात, खूप वाढवतात. काही ठिकाणी परप्रांतीय किंवा परदेशी पर्यटकांची आर्थिक लूटमार होते. काही ठिकाणी फसवणूक होते. उदा. एखादी वस्तू स्थानिकास १० रुपयास विकली जात असेल तर तीच वस्तू परदेशी पर्यटकास १०० ते २०० रुपयास विकली गेलेली उदाहरणे आजही पहायला मिळतात. पर्यटक पर्यटन स्थळाला भेटी देत असताना बऱ्याच वेळी स्वैर वागताना दिसून येते. मद्यपान, धुम्रपान, जुगार इ.चा त्रास स्थानिक रहिवाशांना होताना दिसून येतो. अतिरिक्त मद्यपानामुळे मनावरचा ताबा सुटतो व शिवीगाळ, मारामाऱ्या, गुंडगिरी व स्त्रियांबद्दल आसक्ती निर्माण होणे असे प्रकार घडतात. त्यामुळे अनेक गैरप्रकार घडतात, त्यामुळे पर्यटन काळात स्थानिक लोकांना असुरक्षितता वाटते.

### ३. पर्यटन व कला आविष्कार :-

कलाविष्कारामध्ये साहित्य, नाटक, चित्रपट, करमणुकीची साधने, शिल्पे, चित्रे इत्यादीचा समावेश होतो. भारतामध्ये पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विविध महोत्सव साजरे केले जातात. काही ठिकाणी विविध प्रकारचे प्रदर्शने भरविली जातात. यातून विविध कला गुणांची देवाण-घेवाण होते. विविध सण, उत्सवाच्या वेळी विविध देशातून पर्यटक येतात. उदा. कुंभमेळा, नवरात्री, पतंगोत्सव, पुष्करमेळा, गणेशोत्सव, नाताळ या सणांच्यावेळी परदेशी पर्यटक आकर्षित होतात. उदा. गोव्याला डिसेंबर महिन्यात नाताळ सणाच्यावेळी जगभरातून अनेक पर्यटक एकत्र येतात. तसेच कुंभमेळ्याच्यावेळी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात गोदावरी किनारी लाखो भाविक जमा होतात. कोकणामध्ये गणेश उत्सवाच्यावेळी कोकणामध्ये अनेक पर्यटक एकत्र येतात.

### ४. पर्यटन व धर्म :-

जगामध्ये सर्वात जास्त पर्यटन हे धार्मिक होते. उदा. हिंदू धर्मातील लोक काशीयात्रा, अमरनाथ, ब्रदीनाथ, केदारनाथ, बारा जोतिर्लिंग, शिर्डी, वणी, तिरूपती, जोतिबा इ. ठिकाणी जातात. पंढरपूरला आषाढी यात्रेच्यावेळी लाखो पर्यटक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरला येतात. शिर्डी या ठिकाणी साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी संपूर्ण भारतातून लोक एकत्र येतात. मुस्लिम धर्मातील लोक सौदी अरेबियामधील मक्का मदिना या ठिकाणी यात्रा करतात. जेरूसलेम शहर ख्रिश्चन लोकांचं श्रध्दास्थान आहे. तर बौध्द-बुध्दगया, नेपाळ, श्रीलंका, थायलंड यांची यात्रा करतात, तर शिख धर्मीय लोक अमृतसर व गुरूद्वार येथे जातात.

### ५. पर्यटन व जुगार :-

जगामध्ये अमेरिका व भूमध्यसागरातील पर्यटन केंद्रात मोठया प्रमाणावर जुगार चालतो, पण पत्त्यांचा व यंत्राचा वापर केला जातो. उदा. मॉर्ट, कार्लो, लास वेगास, लॉस एंजल, तिलू जाना, अटलांटिक सिटी, न्यू जर्सी इ. ठिकाणे जुगाराचे अड्डे झाले आहेत. अशा ठिकाणी कमी वेळात व कमी कष्टाने मिळाल्याने संघटित गुन्हेगारी, वेश्या व्यवसाय अशा समाज विघातक गोष्टी वाटतात. या सगळ्यांचा परिणाम तेथील संस्कृतीवर होतो.

अशाप्रकारे पर्यटनाचा सामाजिक व सांस्कृतिक घटकावर होणारा परिणाम दिसून येतो. यात काही फायद्याचे तर काही तोट्याचे घटकही असल्याचे दिसून येते.

## ४.२.३ पर्यटनाचा पर्यावरणावरील परिणाम

पर्यटन हा उद्योग असा आहे की, तो सभोवतालच्या पर्यावरणातील वैविध्यपूर्ण ठिकाणे पर्यटकांना

आकर्षित करत असतात. पर्यावरण म्हणजे जमीन, हवा, पाणी, वनस्पती, प्राणी यांची सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती यांच्या संयुक्त प्रक्रियेने बनलेली परिस्थिती की ज्यामध्ये भूपृष्ठावरील लोक व प्राणी जगतात. या पर्यावरणाचा पर्यटनाशी जवळचा संबंध असतो. त्यामुळे पर्यटन हा एक महत्त्वाचा उद्योग आहे. अनेक पर्वत, नद्या, धबधबे, जंगले, सागरी किनारपट्टी, अभयारण्ये, गुहा इत्यादी असे अनेक घटक पर्यटनाची ठिकाणे म्हणून विकसीत होत आहेत. मानव दररोज तेच तेच काम करून वैतागलेला असतो. त्यासाठी तो शांत व आल्हाददायक ठिकाणी तो जातो व यातूनच पर्यटन ही संकल्पना निर्माण झाली. मानवाने निसर्गाच्या सानिध्यात राहून स्वत:च्या करमणुकीची व मन:शांततेची सोय करून घेतली त्यामुळे मानव-निसर्गामध्ये एक घनिष्ठ नाते निर्माण झाले आहे. मानवाने निसर्गाच्या मदतीने अनेक पर्यटन स्थळांचा विकास केला आहे. यातूनच त्याने एक चूक केली ती म्हणजे त्याने निसर्गामध्ये मोठ्या प्रमाणात ढवळाढवळ केली. म्हणजेच त्याने निसर्गावर अतिक्रमण केले. आणि त्यातूनच पर्यावरणीय समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामध्ये जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, केरकचरा, पशुपक्षांची शिकार, गर्दी इ. सारख्या पर्यावरणीय समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा पर्यटन व पर्यावरण याचा अभ्यास करणे गरजेचे झाले आहे व पर्यटनाचा पर्यावरणामधील विविध घटकांवर कसा परिणाम झाला आहे. याचा अभ्यास सदर घटकामध्ये आपण करणार आहोत.

## अ) पर्यटन व प्राकृतिक पर्यटनाची ठिकाणे :-

प्राकृतिक घटकामध्ये पर्वत, पठारे, नद्या, धबधबे, डोंगर, दऱ्या, बेटे इत्यादीचा समावेश केला जातो. मानवाने पर्वताची शिखरे थंड हवेची ठिकाणी म्हणून विकसित केली ही पर्वताची ठिकाणे विकसित करताना मानवाने त्या ठिकाणाची झाडे तोडून टाकली. पर्वताचा उतारामध्ये बदल केला याचा परिणाम म्हणजे भूमीपात मोठ्या प्रमाणात होऊ लागले. त्याचप्रमाणे डोंगर पोखरून अनेक बोगदे निर्माण करण्यात आले. त्यामुळे पर्यावरणातील जैवविविधतेमध्ये बदल केला गेला. मानवाने पर्वतांच्या व डोंगरांच्या भागात मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप केला आहे. उदा. भारतातील सिमला, कुलू-मनाली, महाबळेश्वर, उटी इ. ठिकाणी मानवाने निसर्गत: अतिक्रमण केले आहे. भारतामध्ये पठारी प्रदेशात अनेक पर्यटन स्थळे निर्माण झाली आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील 'कास' चे पठार हे 'पुष्प' पठार म्हणून ओळखले जाते. येथे पावसाळ्यात विविध रानफुले उमलतात. ती फुले पाहण्यासाठी पर्यटकांची प्रचंड गर्दी होते. ही नाजूक फुले मानवाच्या पायाखाली तुडवली जातात व तेथील पर्यावरणावर विपरित परिणाम होतो. तसेच पर्यटकांच्या गाड्यांच्या गर्दीमुळे ध्वनी प्रदूषण व वायूप्रदूषण ही घडून येते. पर्यटक फोटो काढण्याच्या नादात प्रचंड मोठ्या प्रमाणावर फुलांची तुडवणूक करतात. म्हणून अलीकडे या पठारावर वाटेचे कुंपण लावण्यात आले आहे. परंतु याचा परिणाम वन्य प्राण्यांवर होत आहे. त्यांच्या संचारावर नकळत बंधने येत आहेत. कामाच्या ताणातून मुक्त होण्यासाठी पर्यटक खास करून पावसाळ्यात

धबधब्यांना भेटी देतो. पावसाळ्यातील पर्यटन स्थळ म्हणजे धबधबे होय. पावसाळ्यात प्रचंड गर्दीचे ठिकाण म्हणजे धबधबे. पण अशा धबधब्यांच्या ठिकाणी अतिउत्साही पर्यटक मद्य प्राशन करून अशा ठिकाणी अश्लिल वर्तन, गोंधळ घालणे हे नित्याचे झाले आहे. या पर्यटन स्थळांच्या ठिकाणी नवीनच एक समस्या निर्माण झाली आहे. ती म्हणजे खाद्यपदार्थांचे स्टॉल मांडून नैसर्गिक सौंदर्य नष्ट केले जात आहे. मोबाईलमध्ये 'सेल्फी' घेण्याच्या नादात आपला जीव गमवावा लागला आहे. उदा. कोल्हापूर-सावंतवाडी मार्गावरील आंबोली या धबधब्याच्या ठिकाणी पावसाळ्यातील प्रत्येक रविवारी प्रचंड गर्दी असते. त्यामुळे तिथे ट्रॅफिकची समस्या, गर्दी, गोंधळ इ. समस्या नित्याच्या झाल्या आहेत.

समुद्र किनाऱ्याचे आकर्षण पर्यटकांना जास्त असते. सर्वसाधारणपणे शीत कटिबंधातील पर्यटक हे उष्ण कटिबंधातील बिचेसच्या ठिकाणी पर्यटनाच्या निमित्ताने अशा पर्यटन स्थळांना भेटी देतात. ही परंपरा गेली तीन-चार दशकापासून वाढतच चालली आहे. यामध्ये संयुक्त संस्थानातील मिथाली, कॅरेबियन बेटे, भूमध्य सागरी किनारी, सागरी बेटे, उदा. मॉरिशस, मालदिव, भारतातील गोवा व कोकण, कारवार येथील सागरी किनाऱ्यावर पर्यटक प्रचंड गर्दी करत असताना दिसतात. त्यामुळे पर्यटन व्यवसाय वाढतो. पण त्याचा विपरीत परिणाम दिसून येतो. पर्यटकाकडून प्लॅस्टिक, काचेच्या बाटल्या, प्लॅस्टिक कचरा, अन्न, पेय, यामुळे कचऱ्यांचे ढिग वाढत आहेत. पर्यटकांच्या गर्दीमुळे तेथील जैव विविधतेवरही परिणाम झाला आहे. उदा. गोव्यातील बीचेसवर अलीकडे बॅक्टेरियाचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. यामध्ये अनेक नद्याच्या किनारी भागात धार्मिक पर्यटन स्थळांचा विकास केला आहे. पण अशा पर्यटन स्थळी अस्वच्छतेचे साम्राज्य वाढत चालले आहे. उदा. पंढरपूरच्या आषाढी एकादशी दिवशी मोठ्या प्रमाणात नदीचे प्रदूषण होते. वाराणसी, नाशिक, नृसिंहवाडी या ठिकाणी १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो, त्यावेळी नदीमध्ये लाखो भाविक आंघोळ करतात, त्यामुळे त्या नद्यांचे पाणी प्रदूषित होते. म्हणजे अति पर्यटनामुळे जलप्रदूषण होते.

जगामध्ये अनेक बेटांचा पर्यटन स्थळे म्हणून विकास झाला आहे. उदा. मॉरेशियस, ग्रेट बॅरीयर, टिक, न्युझीलंड, अंदमान निकोबार, लक्षद्वीप यासारखी बेटे विकसित झाली आहेत. पण अशा बेटांवर पर्यटक मोठ्या प्रमाणात प्रदूषण करत आहेत, त्याचा परिणाम त्याठिकाणच्या जैवविविधतेवर परिणाम होत आहे. उदा. अंदमान निकोबार ही बेटे निसर्गाने संपन्न आहेत. पण मानवाने त्यात ढवळाढवळ केली व त्यावर परिणाम झाला. त्याठिकाणच्या वनस्पती तोडल्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. तसेच ऑस्ट्रेलिया जवळील 'ग्रे वॉरियर टिक' ही जगातील सर्वात लांब प्रवाळ खडकांची रांग आहे व जगातील अनेक पर्यटक त्याठिकाणी आकर्षित होतात, पण मानवाच्या सततचा वावर असल्याने व प्लॅस्टिक पिशव्या, अन्नपदार्थ, रंगद्रव्ये यामुळे या प्रवाळ खडकावर परिणाम होत चालला आहे.

## ब) पर्यटन व नैसर्गिक वनस्पती :-

मानवाजवळ जिज्ञासू वृत्तीमुळे व हव्यासापोटी वनस्पति नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक धाडसी प्रवासी जगलांची सफर करण्यासाठी पसंती दर्शवितात, त्याचा परिणाम जंगलामध्ये वाहने दाखल होतात, त्यामुळे हवेचे प्रदूषण जंगलामध्ये होते. त्याचप्रमाणे ध्वनी प्रदूषणही होते. मानवाने अनेक जंगलांना आगी लावल्या आहेत. उदा. अलीकडील काळात ॲमेझॉन जंगल जगातील सर्वात मोठे जंगल, सर्वात जास्त जैवविविधता, प्राणी, वनस्पति अशा जंगलांना मानवामुळे वणवा लागला. त्याचा परिणाम ज्या जंगलातून जगाला २०% ऑक्सीजन मिळत होता. ते जंगल मोठ्या प्रमाणात नष्ट झाले. याचा परिणाम ब्राझीलमध्ये असणारे 'मोजॅस' हे शहर दोन दिवस धुराणे वेढलेले होते. अगदी सूर्याचा प्रकाशही कमी येत होता. म्हणजे मानवाने निसर्गावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे.

काही साहसी प्रवासी जंगलामध्ये वस्ती करतात ते जंगलात तंबू करून राहताना झाडांच्या फांद्या तोडल्या जातात. शेकोटीसाठीही फांद्या तोडतो, त्यामुळे तेथील पर्यावरण बिघडताना दिसून येते. पर्यटक व राष्ट्रीय जंगले, अभयारण्ये, गवताळ कुरणे इ. ठिकाणी जातो. अशा ठिकाणी वातावरण, तेथील झाडे, वेली, फळे, फुले यांना नकळत नुकसान होते. त्यामुळे त्याठिकाणची जैवविविधता धोक्यात येते. बऱ्याचवेळा काही पर्यटक पर्यटन स्थळांच्या ठिकाणी प्राण्यांना खाद्यापदार्थ खाऊ घालतात, त्यांचा परिणाम ते प्राणी आजारी पडतात.

## क) पर्यटन व वन्यजीवन :-

पृथ्वीच्या पृष्ठ भागावरील जैव विविधता टिकवण्यासाठी नैसर्गिक वनस्पती हा वन्य पशुपक्षी यांना अभय देण्यासाठी अभयारण्याची संकल्पना पुढे आली. काही अभयारण्यामध्ये विशिष्ट प्राण्यांना अभय दिलेले असते. उदा. जिम कॉर्बेट पार्क, एकशिंगी गेंड्यासाठी, कांझीरंगा (आसाम), गुजरातमधील सिंहासाठीचे गिर अभयारण्य, अहमदनगर-सोलापूर जिल्ह्यांच्या सिमेवर रणथंबोर पक्षी अभयारण्य अशा ठिकाणी शासनाने प्राणी व पक्षांच्या प्रजाती नैसर्गिक पध्दतीने कशा वाढतील, याकडे लक्ष दिले आहे. परंतु कळत नकळकत पर्यटकांकडून वन्य पशू पक्षांवर विपरीत परिणाम होत आहे. वाहनांच्या वर्दळीमुळे प्राण्यांच्या मुक्त संचारावर परिणाम होत आहे. फोटो काढणे, टेप लावणे, रेल्वे व वाहनांच्या आवाजामुळे प्राण्यांच्या वर्तनावर परिणाम होतो. मानव निसर्गात जावून वन्य पशू पक्षांच्या सानिध्यात राहून रोमहर्षक अनुभव घेत आहे. परंतु याचा विपरीत परिणाम होत आहे. पर्यटकांच्या अतिरिक्त संख्येमुळे तेथील अभयारण्याची शांतता बिघडते. सातत्याने होणाऱ्या गोंगाटामुळे त्यांच्या स्वास्थ्यावर परिणाम होत आहे. आरोग्यावर त्यांच्या दैनंदिन संबंधावर होणाऱ्या परिणामामुळे प्रजनन क्षमतेवरही परिणाम होत आहे. त्यामुळे त्यांची संख्या घटताना दिसून येते.

## ड) पर्यटन व प्रदूषण :-

मानव अलिकडील काळात प्रदूषण मोठ्या प्रमाणात करत आहे. त्याचा परिणाम पर्यावरणावर होत आहे. यामध्ये पर्यटनामुळे होणारे प्रदूषण हे जरी तुलनात्मकदृष्ट्या कमी असले तरी ते पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. मानव पर्यटनासाठी समुद्र किनारे, तळी, सरोवरे, जंगले इ. ठिकाणी पर्यटन करीत असताना दिसून येतात. पर्यटकांच्या वाहनामुळे हवेचे व ध्वनीचे प्रदूषण होते.

### १. समुद्र किनाऱ्याचे प्रदूषण :-

समुद्र किनारपट्टी ही पर्यटकांना वारंवार आकर्षित करत असते. त्यामुळे पर्यटकांचे प्रमाण समुद्र किनाऱ्यावर जास्त असते. या वाढत्या संख्येचा परिणाम विविध समुद्र किनाऱ्यावर होत असतो. पर्यटकांना विविध सेवा पुरवण्यासाठी अशा ठिकाणी मोठी हॉटेल्स, मॉल्स्, बाजारपेठा विकसित होतात. तसेच समुद्रामध्ये सफर करण्यासाठी स्पीड बोट, बनाना रायडिंग, पॅराशूट, स्नॉर्किंग इ. मुळे या किनारपट्टीला वर्दळ निर्माण होते. पर्यटकांची वर्दळ वाढल्यामुळे गोंगाट, गर्दी वाढते. तसेच केरकचराही मोठ्या प्रमाणात वाढतो. पर्यटक विविध वस्तू इतरत्र टाकतो. त्यामुळे बिचेसचे सौंदर्य कमी होते. तसेच हॉटेलमधून बाहेर पडणारा कचरा व सांडपाणी यामुळे ही समुद्रकिनाऱ्याचे पाणी प्रदूषण होत आहे. त्याचा परिणाम जलचर प्राण्यांवर होत आहे.

### २. जल प्रदूषण :-

जल प्रदूषण ही समस्या पर्यटन स्थळांच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. नद्या, तळी, सरोवरे यांच्या सानिध्यात विकसित झालेली पर्यटन स्थळे आणि त्यामध्ये त्या गावचे सांडपाणी सोडले जाते. त्यामुळे त्याचे प्रदूषण होते. अशा प्रकारचे प्रदूषण धार्मिक स्थळांच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होते. उदा. पंढरपूर, केदारनाथ, बद्रीनाथ, वाराणसी इ. ठिकाणी. कारण विशिष्ट काळात धार्मिक पर्यटकांची गर्दी अचानक वाढल्याने सांडपाणी व मलमूत्र विसर्जन यामुळे जल प्रदूषण वाढते. काही तळ्याच्या ठिकाणी विकसित झालेली पर्यटनांची केंद्रे तेथील पाणी प्रदूषित करत असताना दिसते. उदा. नैनिताल हे थंड हवेचे ठिकाण एका तळ्याकाठी विकसित झाले आहे. नैसर्गिक उतारामुळे त्या गावचे पाणी त्या तळ्यात जाते. त्यामुळे त्या तळ्याचे जल प्रदूषण होते. वाढत्या पर्यटकांमुळे वेण्णा लेक महाबळेश्वर या ठिकाणीही जल प्रदूषण होण्यास मदत होत आहे. उटी या ठिकाणी जलपर्णी सारखी वनस्पती वाढून पाणी दूषित करते. अशा प्रकारचे प्रदूषण हे नृसिंहवाडी या ठिकाणी कृष्णा व पंचगंगा नद्यांच्या प्रदेशात जलपर्णी वाढून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. याचा परिणाम नद्यांचे पाणी दूषित होत आहे.

### ३. ध्वनी प्रदूषण :-

नैसर्गिक सृष्टी सौंदर्याची ठिकाणे, घनदाट, अरण्ये, वन्य पशु पक्षी यांच्या सानिध्यात आपण काही काळ घालवावा हा हेतू असतो. पण कळत नकळत निसर्गाचा नियम पायदळी तुडवला जातो. म्हणजेच वाहनांचा आवाज, माणसांचा गोंगाट, टेपरेकॉर्डर. रेडिओ, मद्य प्राशन करून मोठ्याने दंगामस्ती करणे, इ. कारणामुळे अशा ठिकाणची शांतता भंग पावते. अलिकडील बरीच ठिकाणे गर्दीची ठिकाणे बनत चालली आहेत. त्याचा वन्यप्राण्यावर परिणाम दिसून येतो.

## ४.२.४ पर्यटनाचा शाश्वत विकास

पर्यावरणाचे संतुलन राखणे गरजेचे असते. पर्यटन हा मानवाला आनंद देणारा असतो. पर्यटनाचा विकास करणे गरजेचे असते. हा विकास करताना तेथील जैवविविधता व मानव यांचा सहसंबंध अभ्यासणे गरजेचे असते. पर्यटनाचा विकास करताना तो भविष्यात कशा प्रकारचे स्वरूप प्राप्त करू शकतो, याची दूरदृष्टी असावी. यामध्ये आर्थिक विकास व पर्यटन, पर्यावरण व पर्यटन, सामाजिक व सांस्कृतिक घटक व पर्यावरण आणि मानव व पर्यटन यांच्या सहसंबंधाचा अभ्यास सखोल होणे गरजेचे असते. पर्यटनाचा शाश्वत विकास करताना त्याचे नियोजन लघु स्तरापासून उच्च स्तरापर्यंत विचार करून करावे लागते. एखाद्या प्रदेशातील पर्यटनाची संधी व मानवाने केलेला विकास यांचा अभ्यास महत्त्वाचा असतो.

### १. आर्थिक शाश्वत विकास व पर्यटन :-

आर्थिक शाश्वत विकास व पर्यटन या घटकात आर्थिक विकास घडवून आणताना कोणकोणत्या बाबी लक्षात घ्यायच्या याकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे की जेणेकरून त्या प्रदेशाचा सर्वांगीण विकास तर होईलच आणि तो पर्यावरणपूरकही असेल जसे की-

- पर्यटनाचा विकास करताना त्या प्रदेशातील सर्व घटकांना सामावून घेणे गरजेचे आहे, त्याच्यामध्ये एक साखळी तयार करणे, यामध्ये लघू उद्योजकांपासून ते मोठ्या उद्योगांना सामावून घ्यावे.
- लघु उद्योजक व मोठे उद्योजक यांच्या संघटना तयार कराव्यात.
- आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्गदर्शक आणून स्थानिक सेवा सुविधा पुरवणाऱ्या घटकांचे मार्गदर्शन घडवून आणावे.
- सहकारी तत्त्वावरील विविध पर्यटनाच्या संस्था उभ्या करून हा व्यवसाय सर्व समावेशक करावा.

- स्थानिक उत्पादित मालाची चांगली बाजारपेठ पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी उभारण्यात यावी.
- आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्पादन होणारी बाजारपेठ निर्माण करावी.
- पर्यटन मार्गदर्शन केंद्रे निर्माण करून उच्चशिक्षित तज्ञाचे मार्गदर्शन उपलब्ध करून घ्यावे.
- रेल्वे बुकिंग, टॅक्सीबुकींग, हॉटेल बुकींग यांचे ऑनलाईन पोर्टल उपलब्ध करून द्यावे.
- पर्यटन ठिकाणाची ऑनलाईन माहिती उपलब्ध करून द्यावी.
- सरकारने स्थानिक व्यावसायिकांना उत्तेजन द्यावे.

## २. पर्यावरण व पर्यटनाचा शाश्वत विकास :-

पर्यावरणाचा समतोल राखणे गरजेचे आहे. पर्यटनाच्या ठिकाणची जैवविविधता राखली पाहिजे. नैसर्गिक वनस्पती, पशु, पक्षी, प्राकृतिक रचना यांच्यावर विपरित परिणाम होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. निसर्गाचा समतोल राखून पर्यटनाचा विकास केला पाहिजे.

- पर्यावरण खात्याच्या मार्गदर्शनाखाली सुचवलेल्या उपाय योजनेचे काटेकोर पालन करावे.
- रेस्टॉरंट, हॉटेल, विविध प्रकारचे बांधकाम हे पर्यावरण पूरक असावे.
- पर्यटन ठिकाणची जैवविविधता बिघडणार नाही याची काळजी घ्यावी.
- नैसर्गिक वनस्पतीचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.
- नो हॉर्न झोन, सायलेंट झोन, नो व्हेइकल झोन, नो प्लॅस्टिक झोन यासारख्या संकल्पना राबवाव्यात.
- वन्य पशु पक्षांचे नैसर्गिक आवास स्थान अबाधित ठेवावे.
- नैसर्गिक तळी, सरोवरे, नद्या, धबधबे प्रदूषित होणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- सांडपाण्यावर प्रक्रिया प्रकल्प राबवावेत.
- कचऱ्यावर प्रक्रिया प्रकल्प राबवावेत.
- जागतिकीकरणाला फाटा देवून नैसर्गिक पध्दतीने पर्यटन ठिकाणाचा विकास करावा.
- गोंगाट, गर्दी होणार नाही याची व्यवस्था करावी.

## ३. सामाजिक सांस्कृतिक घटक व पर्यटनाचा शाश्वत विकास :-

सांस्कृतिक घटकामध्ये किल्ले, मंदिरे, गिरीजाघरे, चर्च, समाध्या, पॅगोडा इ. समावेश होतो. पर्यटकांना याचे मोठ्या प्रमाणात आकर्षण असते. अशा ठिकाणचा विकास करताना पुरातत्व विभाग व पर्यटन विभाग यांनी सहकार्य करावे.

- पर्यटकांना किल्ल्याची नासधूस करण्यापासून परावृत्त करावे.
- पुरातत्त्व विभागानुसार पर्यटन स्थळांचा विकास करावा.
- ऐतिहासिक वारसा जपावा.
- धुम्रपान, मद्यपान निषिध्द करावे.
- लाऊड स्पिकर यावर बंदी घालावी.
- चर्च, मंदिरे यासारख्या ठिकाणी धार्मिक पावित्र्य राखावे.
- स्थानिक लोकांच्या भावना दुखवल्या जाणार नाही याची काळजी घ्यावी.
- पर्यटक व स्थानिक लोक यांच्यात चांगले संबंध निर्माण व्हावेत.
- पर्यटकांना स्थानिक संस्कृतिची ओळख करून देणारे कार्यक्रमाचे नियोजन करावे.
- प्रदर्शने, जाहिराती, माहितीपट इ.द्वारे पर्यटकांना पर्यटन ठिकाणच्या संस्कृतीची माहिती करून द्यावी.

## ४. पर्यावरण पर्यटन व मानव यांचा सहसंबंध :-

पर्यावरण हा पर्यटनाचा गाभा आहे. पर्यावरणातील विविध घटकांवर पर्यटनाचा विकास साधला जातो. पर्यटनाचा विकास साधायचा असल्यास नैसर्गिक पर्यावरण, पर्यटन व मानव यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यामध्ये मानवाची भूमिका महत्त्वाची आहे. मानवाने पर्यटन स्थळाचा विकास साधताना त्या ठिकाणच्या पर्यावरणाला हानी पोहचणार नाही याची काळजी घ्यावी. पर्यावरणात बदल करताना तो बदल संतुलित असावा व पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे. धोके लक्षात घेऊन त्यावर उपाययोजना कराव्यात. पर्यटन हा उद्योग कोणत्याही देशाचा विकास घडवण्याचा महत्त्वाचा उद्योग आहे. यासाठी शासन प्रयत्न करत आहे. त्यामध्ये पर्यटन महामंडळ पुरातत्त्व विभाग कार्य करतात.

अशाप्रकारे पर्यटनाचा शाश्वत विकास करण्यासाठी वरील विविध बाबींचा विचार मानवाने करणे गरजेचे आहे. पर्यटनाचे भवितव्य व विकास हा मानवाच्या हाती आहे.

## ४.३ सारांश

सदरच्या प्रकरणामध्ये आपण पर्यटनाचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकावर तसेच पर्यावरणावर काय परिणाम होतो, याची सविस्तर चर्चा केली. यातून काय समजून घेतले तर पर्यटन हा अत्यंत महत्त्वाचा उद्योग आहे. पर्यटनाचा विकास करताना त्याचा परिणाम पर्यावरणावर सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर होणार नाही याची काळजी घ्यावी.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- ☼ **इको टुरिझम :** पर्यावरणपूरक पर्यटन.
- ☼ **शाश्वत विकास :** दीर्घकालीन हानी न पोहचवणारा विकास.

## ४.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

❑ **खालील दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**

१. खालीलपैकी कोणते धार्मिक ठिकाण आहे?

*अ) गोवा* *ब) नायगरा* *क) पंढरपूर* *ड) सिमला.*

२. खालीलपैकी कोणता धबधबा भारतातील आहे?

*अ) नायगरा* *ब) जोग* *क) एंजिल्स* *ड) यापैकी नाही.*

३. महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण कोणत्या राज्यात आहे?

*अ) महाराष्ट्र* *ब) कर्नाटक* *क) हिमाचल प्रदेश* *ड) उत्तर प्रदेश.*

४. खालीलपैकी कोणते ठिकाण सांस्कृतिक पर्यटनाचे आहे?

*अ) सिमला* *ब) गोवा* *क) नायगरा* *ड) आग्रा.*

## ४.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. *क) पंढरपूर.*

२. *अ) नायगरा.*

३. *अ) महाराष्ट्र.*

४. *ड) आग्रा.*

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

### ❑ टिपा लिहा.

१. पर्यटनाचा आर्थिक घटकावरील परिणाम.

२. पर्यटन क्षेत्रातील रोजगाराच्या संधी.

३. पर्यटन स्थळामुळे प्रदेशाचा आर्थिक विकास.

४. पर्यटन व परकीय चलन.

५. पर्यटनामुळे राष्ट्रीय उत्पादनातील वाढ.

६. पर्यटन व्यवसायामुळे लघु व मध्यम उद्योगातील वाढ.

७. पर्यटन व गुंतवणूक.

८. पर्यटन व आंतरराष्ट्रीय सामंजस्य.

९. पर्यटन आणि कला आविष्कार.

१०. पर्यटनाचा प्राकृतिक स्थळावरील परिणाम.

११. पर्यटनाचा शाश्वत विकास.

### ❑ दीर्घोत्तरी प्रश्न.

१. पर्यटनाचा आर्थिक घटकावर होणारा परिणाम स्पष्ट करा?

२. पर्यटन आणि पर्यावरण यातील संबंध स्पष्ट करा?

३. पर्यटन व प्रदूषण यावर सविस्तर चर्चा करा?

४. भारतातील प्राकृतिक पर्यटनाच्या ठिकाणाची सविस्तर माहिती लिहा?

५. पर्यटन व सामाजिक घटक याचा सहसंबंध स्पष्ट करा?

## ४.८ क्षेत्रीय कार्य

☼ तुमच्या परिसरातील एखाद्या पर्यटन स्थळास भेट देऊन पर्यटनाचे कोणते परिणाम त्या ठिकाणी झालेले आहेत त्याची माहिती घ्या व अहवाल तयार करा.

## ४.९ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. **Bhatia A. K.** : *'International Tourism'.*

२. **Bhatia A. K.** (1982) : *'Tourism Development'.*

३. **Bhatt Harish** (2006) : *'Sustainable Tourism'.*

४. **Bhatt Harish** (2006) : *'Impact of ICTs in Tourism'.*

५. **Bryden J. M.** (1973) : *'Tourism and Development'.*

६. **डॉ. घारपुरे विठ्ठल** (१९९९) : *'सामाजिक व सांस्कृतिक भूगोल'.*

७. **डॉ. घारपुरे विठ्ठल** (१९९९) : *'जैविक भूगोल शास्त्र'.*

८. **डॉ. घारपुरे विठ्ठल** (२०००) : *'वस्ती भूगोल'.*

९. **डॉ. घारपुरे विठ्ठल** (२०००) : *'भूगोल शास्त्र : विचार व संकल्पना'.*

१०. **डॉ. घारपुरे विठ्ठल** (२००१) : *'पर्यटन भूगोल'.*

११. **खतिब के. ए.** : *'पर्यटन भूगोल'.*

१२. **डॉ. सावंत प्रकाश** (२००९) : *'आर्थिक भूगोल'.*

१३. **डॉ. शिंदे एस. बी.** (१९९७) : *'पर्यटन भूगोल'.*

१४. **Singh Ashok** (Edited) (2002) : *'Cultural Tourism in India'.*


❑❑❑

सत्र-४ : घटक-१

# भारतातील पर्यटन विकास व नियोजन

## (Development and Planning of Tourism in India)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

  १.२.१ भारतातील पर्यटन व्यवसायाची पार्श्वभूमी

  १.२.२ आधुनिक काळातील भारतातील पर्यटन विकास

  १.२.३ भारतातील पर्यटन नियोजन

१.३ सारांश

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ क्षेत्रीय कार्य

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## १.० उद्दिष्ट्ये

भारतातील पर्यटन विकासाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्याला-

अ) भारतातील पर्यटन व्यवसायाची पार्श्वभूमी समजेल.

ब) आधुनिक काळात पर्यटनाचा कसा विकास झाला हे समजेल.

क) भारतातील पर्यटन नियोजनाची माहिती होईल.

ड) पर्यटन व्यवसाय भारतासाठी किती महत्त्वाचा आहे ते कळेल.

## १.१ प्रास्ताविक

अलिकडच्या काही दशकात पर्यटन व्यवसायाला जगात किती महत्त्व आहे व त्यामुळेच आर्थिक विकास साधणारा व्यवसाय म्हणून हा जागतिक उद्योग बनला आहे. जगातील चौथ्या क्रमांकाचा महत्त्वाचा व्यवसाय म्हणून पर्यटनाकडे बघितले जात आहे. भारतासारख्या विकसनशील देशाच्या दृष्टीने तर राष्ट्रीय उत्पन्नात प्रचंड वाढ करणारा आणि मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा व्यवसाय ठरला आहे. आज पर्यटन हा देशातील सर्वात वेगाने वाढणारा सेवाभावी व्यवसाय असून संभाव्य पर्यटन विकासासाठी भारतात त्याला फारच पोषक वातावरण आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी पर्यटन व्यवसायाकडे पाहिजे तेवढे लक्ष दिले गेले नाही, मात्र भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खऱ्या अर्थाने देशातील पर्यटनाचा टप्प्या-टप्प्यामध्ये विकास होत गेला. आज देशाच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे स्थान महत्त्वपूर्ण बनले आहे. राष्ट्रीय एकूण उत्पन्नाच्या ७% उत्पन्न तर ९% लोकांना आज पर्यटन व्यवसायातून रोजगार उपलब्ध झाला आहे.

भारतात असणारी प्रचंड विविधता, अनेक प्रकारची प्राकृतिक आकर्षणे, दाट असणारी जंगले, जंगलाच्या आश्रयाने राहणारे वन्य पशु-पक्षी, मोठ्या प्रमाणावर असणारी ऐतिहासिक स्थळे, कला, साहित्य, संगीत, नृत्य, चित्रकला इ.चा झालेला विकास, अनेक धर्मियांची जागतिक पातळीवरील धार्मिक स्थळे इ. सर्व गोष्टींच्या उपलब्धतेमुळे भारत जगातील पर्यटकांचे आकर्षण ठरला आहे. त्याचाच परिणाम म्हणून भारतात आज पर्यटन व्यवसायाचा झपाट्याने विकास होत आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ भारतातील पर्यटन व्यवसायाची पार्श्वभूमी (Historical Background of Tourism in India) :-

प्राचीन काळापासून भारतात प्रवास केला जात होता, मात्र तो व्यापारासाठी होत होता. ऐतिहासिक काळामध्ये राज्या-राज्यामध्ये, देशा-देशामध्ये, लहान मोठ्या राज्यांच्या राजधान्या, शहरे यांच्या दरम्यान व्यापार होत होता. नंतरच्या काळात भारतात बऱ्याच ठिकाणी व्यापारी मार्ग प्रस्थापित झाल्यावर देशांतर्गत व्यापार वाढत गेला. प्रवासातून, व्यापारातून सांस्कृतिक देवाण-घेवाण वाढत गेली. वेगवेगळ्या परिसरातील भौगोलिक भिन्नता समजू लागली. इ.स. ३००० वर्षापूर्वी पैसा व व्यापार याची सुरवात झाली. मात्र त्याकाळचा प्रवास अत्यंत साधेपणाने होत होता. प्रवासाची कोणतीही साधने उपलब्ध नव्हती. लोक पायी, घोडे, खेचर, बैलगाड्या, पालख्या यातून प्रवास करत असत. तो प्रवासही अतिशय अवघड असायचा. आडवळणाने, जंगलातून प्रवास करावा लागत असल्याने त्यामध्ये असुरक्षितता होती.

प्रवास हा दिवसाच होत होता. भारतात इतर देशातूनही प्रवासी येत होते, मात्र त्यांचा उद्देश व्यापाराशिवाय धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृति, शिक्षण यांचा अभ्यास करणे, प्रचार आणि प्रसार करणे हाच होता.

नंतरच्या काळात व्यापाराबरोबरच धार्मिक कारणासाठी प्रवास होऊ लागला. भारतात सम्राट अशोकाने बौध्द धर्माच्या प्रचारानिमित्त व्यापक प्रवास केल्याच्या नोंदी आहेत. त्यामध्ये नेपाळ, पाटलीपुत्र, लुंबिनी, सारनाथ, कपिलवस्तु, गया इ. ठिकाणांचा समावेश होता. अशोकाप्रमाणेच राजा हर्षवर्धन यानेही बौध्द धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी फार मोठा प्रवास केला होता. इब्न बतुता या प्रसिध्द अरब विद्वानाने आफ्रिका, पश्चिम आशिया, भारत, इंडोनेशिया, चीन या देशातून प्रवास केला होता. त्याकाळी त्याने मालदीव, श्रीलंका आणि भारतातून सुमारे १४०० मैलांचा प्रवास केल्याची नोंद सापडते. १३व्या शतकाच्या उत्तरार्धात मार्कोपोलोने सुमारे २५ वर्षे आशिया खंडातून प्रवास केला. या प्रवासात त्याने पर्शिया, अफगाणिस्तान, पामीर पठार, गोबीचे वाळवंट, चीन, सुमात्रा, जावा, श्रीलंका आणि भारत देशातून प्रवास केल्याचे त्यांनी आपल्या प्रवास वर्णनात लिहून ठेवले आहे. तसेच १६व्या आणि १७ व्या शतकात युरोप खंडातून अनेक धर्मप्रसारकांनी, संशोधक व प्रवाशांनी भारत व इतर देशातून प्रवास केला होता. यावरून असे दिसून येते की, ऐतिहासिक काळातही भारत देशात प्रवास झाला होता, त्याला अनेक कारणे जबाबदार होती. हॅन घराण्याचा बादशाह मिंग टी याने इ.स. ६५ मध्ये बौध्द धर्माची माहिती घेण्यासाठी एक मंडळ भारतात पाठविले होते. इ.स.३ऱ्या शतकात चिनी धार्मिक यात्रेकरू मोठ्या संख्येने भारतात आल्याचे आढळते. हा प्रवास अत्यंत साधेपणाने केला जात होता, त्यामध्ये कोणतीही औपचारिकता नव्हती. मात्र त्यानंतरच्या काळात कौटिल्याच्यावेळी पासपोर्ट किंवा पारपत्र एका देशातून दुसऱ्या देशात जाण्यासाठी आवश्यक केले होते. लोकांना राहण्यासाठी धर्मस्थळांची सोय करण्यात आली होती. या काळात गुरूनानक यांनीही महाराष्ट्र, केरळ, म्हैसूर इ. ठिकाणी धर्मशाळा बांधल्या होत्या.

नंतरच्या काळात मोंगलांनी काश्मिर खोऱ्यातील निसर्गरम्य ठिकाणी विश्रामालये बांधली. ब्रिटिशांनी दार्जिलिंग, डलहौसी, सिमला, नैनिताल, उटी इ. ठिकाणी प्रवासी निवासालये बांधली. खऱ्या अर्थाने ब्रिटिशांच्या काळातच प्रवास अधिक संघटित झाला. ब्रिटिशांनीच इस्ट इंडिया कंपनीच्या देखरेखीखाली डाक प्रवासी योजना सुरू केली. हळूहळू वाहतुकीच्या साधनांत प्रगती होत गेली. प्रवासासाठी घोडागाडीचा वापर सुरू झाला. महत्त्वाचे म्हणजे भारताला इतर देशांच्या तुलनेत प्रदीर्घ ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक वारशाबरोबरच प्रचंड भौगोलिक विविधता लाभलेली आढळते. विस्तृत असणारे समुद्र किनारे, जगातील सर्वात उंच हिमालय पर्वत, मोठ्या व पवित्र नद्या, अनेक निसर्गसंपन्न बेटे, उष्ण हवामानापासून थंड हवामानापर्यंत, वाळवंटापासून बर्फाळ प्रदेशापर्यंत सर्व प्रकारचे हवामान लाभलेले आहे. दाट जंगलापासून ओसाड प्रदेशापर्यंत, विविध वंशाचे, धर्माचे, जातीचे, विविध भाषा बोलणारे लोक राहताना आढळतात. देशात विविध कलांचा, साहित्य, संगीत, नृत्य, चित्रकलेला भरपूर विकास

झालेला आढळतो. अनेक शिल्पे, त्यावरील कोरीव काम, अनेक गुहा, किल्ले, स्मारके यांचा विकास प्राचीन ऐतिहासिक काळातच झालेला आढळतो. त्यामुळेच भारताला पर्यटन व्यवसायात फार मोठे भवितव्य असल्याचे दिसते. अनेक प्रकारच्या हस्तकलांचा देशात विकास झालेला आहे.

अशाप्रकारे ऐतिहासिक काळापासूनच पर्यटन व्यवसायाच्या विकासाचे विविध आधार देशात आढळून येतात. त्यामुळेच पर्यटन व्यवसायाच्या विकासाला चालना मिळालेली दिसून येते. अजूनही पर्यटन व्यवसाय वाढीसाठी काही गोष्टींची गरज आहे, त्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची हॉटेल्स, मोटेल्स, रेस्टॉरंटस्, चांगली व आरामदायी वेगवान वाहतूक व्यवस्था, सुप्त असणाऱ्या पर्यटन स्थळांचा शोध आणि विकास, आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रभावीपणे केली जाणारी जाहिरात, राजकीय व सामाजिकदृष्ट्या देशात शांतता व सुव्यवस्था इत्यादीची आवश्यकता आहे.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ✻

❑ **योग्य पर्याय निवडा.**

१. प्राचीन काळात भारतात होणारा प्रवास प्रामुख्याने कशासाठी होत होता?

*अ) संशोधनासाठी* *ब) धार्मिक कारणासाठी*

*क) व्यापारासाठी* *ड) मनोरंजनासाठी.*

२. पैसा आणि व्यापार यांची सुरवात कधी झाली?

*अ) १००० वर्षापूर्वी ब) २००० वर्षापूर्वी क) ३००० वर्षापूर्वी ड) ४००० वर्षापूर्वी.*

३. इब्न बतुता या अरब प्रवाशाने सुमारे किती मैलाचा प्रवास आशिया खंडातून केला होता?

*अ) १२०० मैल ब) १४०० मैल क) १६०० मैल ड) यापैकी नाही.*

४. १३व्या शकताच्या उत्तरार्धात कोणी २५ वर्षे आशिया खंडातून प्रवास केला होता?

*अ) शंकराचार्य ब) अलेक्झांडर क) मार्कोपोलो ड) सम्राट अशोक.*

५. इ.स. ६५ मध्ये बौध्द धर्माची माहिती घेण्यासाठी कोणी शिष्टमंडळ भारतात पाठविले होते?

*अ) हिऊन त्सांग ब) मार्कोपोलो क) मिंग टी ड) फा-हिएन.*

६. भारतात कोणाच्या काळात पासपोर्ट किंवा पारपत्र आवश्यक करण्यात आले?

*अ) चाणक्य ब) कौटिल्य क) सम्राट अशोक ड) राजा हर्षवर्धन.*

७. डाक प्रवासी योजना भारतात सर्वप्रथम कोणी सुरू केली?

*अ) चाणक्य ब) समाट अशोक क) ब्रिटिश ड) कौटिल्य.*

## १.२.२ आधुनिक काळातील भारतातील पर्यटन विकास (Tourism Development of Modern Period in India) :-

पर्यटन व्यवसायाचे मोठ्या प्रमाणावरील आर्थिक आणि सामाजिक लाभ जगातील पाश्चिमात्य विकसित देशांनी पूर्वीच उठविले असले तरी भारतातील आधुनिक पर्यटनाची सुरवात दुसऱ्या महायुध्दानंतर प्रामुख्याने भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर झाल्याचे दिसते. भारत देशाचा इतिहास दैदिप्यमान आहे. या इतिहासाचा परिणाम पर्यटन विकासावर झाल्याचे दिसून येते. भारताची उच्च सांस्कृतिक परंपरा येथील इतिहासाशी संबंधित आहे. भारतात वास्तव्य केलेल्यांनी देशाच्या उज्ज्वल सांस्कृतिक विकासात मोलाची भर घातलेली आहे. या प्राचीन सांस्कृतिक परंपरेचा उल्लेख पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांच्या ''डिस्कव्हरी ऑफ इंडिया'' या ग्रंथात केलेला आहे. देशाला लाभलेले आकर्षक भौगोलिक स्थान, विविध प्रकारचे हवामान, प्राणी, पक्षी, जंगले, खनिजे, नद्या, धबधबे, पर्वत, शिखरे, बिचेस, बेटे इ.नी देशाचे प्राकृतिक दालन समृध्द केलेले आहे. हजारो वर्षांची असणारी प्राचीन संस्कृति, विविधि कला, नृत्यकला, गायन, संगीत, लोककला, हस्तकला, चित्रकला, शिल्पकला, वास्तूकला यांनी भारताला ''पर्यटनाचे नंदनवन'' बनविलेले आहे. जगातील फार थोड्या देशांना भारताइतकी पर्यटन विकासाची अनुकूल परिस्थिती लाभलेली आहे. भारतात असणाऱ्या जगप्रसिध्द कलाकृती उदा. ताजमहाल, द्राविडीयन वास्तू कलेची अनेक सुंदर व भव्य मंदिरे. उदा. मदूराई, जगप्रसिध्द लेणी उदा. अजिंठा-वेरूळ, जगप्रसिध्द बिचेस उदा. कलंगुट, जगातील सर्वात उंच पर्वत उदा. हिमालय, जगप्रसिध्द बेट, उदा. अंदमान-निकोबार, जगप्रसिध्द किल्ले उदा. लाल किल्ला. हाच ठेवा आधुनिक पर्यटनाचा पाया ठरलेला आहे. या सर्वांच्या उपलब्धतेतून भारतातील आधुनिक पर्यटनाला सुरवात झालेली दिसते.

भारतातील आधुनिक पर्यटन व्यवसायाच्या विकासामध्ये खालील विविध टप्प्यांचा समावेश झालेला दिसून येतो.

### I] सार्जंट समिती (The Sargent Committee) :-

सार्जंट समिती हा भारतातील आधुनिक पर्यटन विकासा साठीचा श्रीगणेशा किंवा पहिला टप्पा होता. भारतातील पर्यटन व्यवसायाच्या विकासासाठी ब्रिटिश शासनाने स्वातंत्र्यपूर्व काळात जाणीवपूर्वक केलेला हा प्रयत्न होता. सन १९४५ साली त्यावेळचे ब्रिटिश शिक्षणविषयक सल्लागार सर जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली. या समितीचा मुख्य उद्देश भारतातील पर्यटनाच्या संभाव्य विकासासाठी सर्व्हेक्षण करणे हा होता. या समितीने पर्यटनविषयक बाबींचा अभ्यास करून आपला अहवाल, ब्रिटिश सरकारला ऑक्टोबर १९४६ मध्ये सादर केला. या अहवालामध्ये भारताच्या आर्थिक विकासासाठी देशातील तसेच परदेशातील पर्यटकांना आकर्षित करून पर्यटन विकास

साधण्याची गरज आहे अशी शिफारस सर्वानुमते करण्यात आली होती. तसेच संपूर्ण देशात पर्यटन व्यवसाय वाढण्यासाठी एक निमसरकारी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याविषयी शिफारसदेखील करण्यात आली होती.

### ♦ सार्जंट समितीची कार्ये :-

सार्जंट समितीची कार्ये पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली होती.

१) युध्दापूर्वी व युद्धानंतर भारतातील देशी व विदेशी पर्यटकांच्या स्वरूपाचे व विस्ताराचे सिंहावलोकन करून पर्यटनाच्या वाढीसाठी संभाव्यतेचे परीक्षण करणे.

२) भारतात व परदेशात पर्यटनाच्या जाहिराती करणे.

३) गाईडस्‌साठी प्रशिक्षण देण्याच्या तरतुदी करणे.

४) पर्यटकांना जास्तीतजास्त सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी इतर शासकीय विभागांशी सहसंबंध प्रस्थापित करणे.

५) भारतामध्ये पर्यटकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा म्हणून हवाई व इतर खात्यामध्ये परस्पर संबंध प्रस्थापित करणे.

६) सर्व प्रकारच्या वाहतूक व्यवस्थेत समन्वय साधून पर्यटकांची जास्तीतजास्त चांगली सोय करणे.

७) परदेशी पर्यटकांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची हॉटेल्स बांधण्यासाठी तरतूद व त्यासाठी हॉटेल्स व रेस्टॉरंट चालकांशी संबंध प्रस्थापित करणे.

८) जगातील ज्या देशातून भारतात पर्यटक येऊ शकतील अशा देशांच्या राजधान्यांच्या ठिकाणी पर्यटन जाहिरात कार्यालय स्थापन करणे.

## II] मध्यवर्ती पर्यटन संघटना (Central Tourism Organisation-CTO) :-

सार्जंट समितीने आपला अहवाल १९४६ मध्ये ब्रिटिश सरकारला सादर केल्यानंतर समितीच्या शिफारशीला अनुसरून भारतात मध्यवर्ती पर्यटन संघटनेची स्थापना करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार भारतात मुंबई, दिल्ली, कोलकत्ता आणि चेन्नई येथे प्रादेशिक पर्यटन कार्यालये सुरू करण्यात आली. तसेच भारतीय वकिलातीमार्फत जगात पर्यटन उद्योगाच्या जाहिरातीसाठी छोटी-छोटी कार्यालये उघडण्याची शिफारस करण्यात आली. त्याशिवाय एक पर्यटन वाहतूक अस्थायी समिती (Adhoc Committee) स्थापन करण्याची सूचना केली.

## III] पर्यटन वाहतूक समिती (Tourist Traffic Committee) :-

मध्यवर्ती पर्यटन संघटनेच्या सुचनेनुसार इ.स.१९४९ मध्ये वाहतूक मंत्रालयांतर्गत पर्यटन विकासाविषयी एक वेगळी पर्यटन वाहतूक समिती स्थापन करण्यात आली. या शाखेच्या प्रयत्नाने भारतातील पर्यटन व्यवसायाच्या विकासाला आणखी गती मिळाली. परिणामी १९५५-५६ मध्ये या शाखेचा विस्तार करण्यात आला व चार उपशाखा करण्यात आल्या. त्यांच्याकडे पुढील कामे सोपविण्यात आली.

### अ) पर्यटन वाहतुक विभाग (Tourist Traffic Department) :-

या विभागाकडे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या कायदेशीर बाबी पाहणे, ट्रॅव्हल एजंटस्, होटेल्स, विश्रामालये इ. विषयी आकडेवारी गोळा करणे व त्याचा मासिक अहवाल सादर करणे अशी कामे सोपविण्यात आली.

### ब) पर्यटन प्रशासन विभाग (Tourist Administration Department) :-

या विभागाकडे आर्थिक बाबी पाहणे, अंदाजपत्रक, नवीन कार्यालये उघडण्यासंबंधी कामकाज पाहणे इ.ची जबाबदारी देण्यात आली.

### क) पर्यटन जाहिरात विभाग (Tourist Advertisement Department) :-

या विभागाकडे पर्यटन विकासाच्या जाहिरातीसंबंधी बुलेटिन्स, हँडबिल्स, पोस्टर्स इत्यादीच्या छपाईची कामे पाहण्याचे काम सोपविण्यात आले.

### ड) जाहिरात साहित्य वितरण विभाग (Distribution of Advertisement Material Department) :-

या विभागाकडे पर्यटनाची जाहिरात करण्याच्या साहित्याचे वितरण करण्याचे काम सोपविणेत आले.

देशातील पर्यटन विकास साधण्यासाठी पर्यटन वाहतूकी अंतर्गत विविध समित्या नेमून कामाची जबाबदारी देण्यात आली. काही कालावधीनंतर या पर्यटन वाहतूक समितीच्या कार्याचा विस्तार करण्यात आला व भारतात स्वतंत्र पर्यटन संचलनालय सुरू करण्याची कल्पना पुढे आली. परिणामी, पर्यटन माहिती कार्यालयांची निर्मिती करण्यात आली.

## IV] पर्यटन माहिती कार्यालये (Tourist Information Offices) :-

भारतात पर्यटनाचा अधिकाधिक विकास व्हावा म्हणून देशात आणि परदेशात माहिती कार्यालये उघडण्यात आली.

## अ) भारतातील माहिती कार्यालये :-

देशात दिल्ली, कोलकत्ता, मुंबई आणि चेन्नई या ठिकाणी प्रादेशिक पर्यटन कार्यालये यापूर्वीच सुरू झाली होती. या कार्यालयांची सुसंगत साखळी निर्माण व्हावी म्हणून १९५५ साली आणखी महत्त्वांच्या ठिकाणी पर्यटन कार्यालये उघडण्यात येऊन त्यांच्याकडे पुढील कामे सोपविण्यात आली.

१) पर्यटन केंद्राची अद्ययावत माहिती घेऊन ती पर्यटकांना पुरविणे.

२) पर्यटकांसंबंधी सर्व विभागांशी संबंध ठेवणे.

३) पर्यटकांना सर्व प्रकारची मदत करणे.

४) पर्यटकांच्या सुविधांचा विकास करून त्या पर्यटकांपर्यंत व्यवस्थित पुरविल्या जातात की नाही हे पाहणे.

५) देशांतर्गत पर्यटकांच्या आवश्यक गरजांची पूर्तता करणे.

## ब) परदेशातील कार्यालये :-

भारतात परदेशी पर्यटक आकर्षित करण्यासाठी परदेशात पर्यटन कार्यालये उघडणे आवश्यक होते. त्यानुसार डिसेंबर १९५२ मध्ये न्यूयॉर्क येथे माहिती कार्यालय उघडण्यात आले. संयुक्त संस्थाने देश विकसित असल्याने या देशातून पर्यटक मोठ्या प्रमाणावर भारतात यावेत हा त्यामागचा उद्देश होता. त्यानंतर श्रीलंका व ऑस्ट्रेलियात भारतीय वकिलातीत पर्यटनाचा प्रचार करण्यासाठी खास कुशल मनुष्यबळ पुरविणेत आले. नंतर युरोपमध्ये पर्यटनाचे पहिले कार्यालय जुलै १९५५ मध्ये लंडन येथे सुरू करण्यात आले. फेब्रुवारी १९५६ मध्ये फ्रान्समधील पॅरीस या राजधानीच्या ठिकाणी व सप्टेंबरमध्ये जर्मनीतील फ्रँकफुर्ट येथे कार्यालये सुरू करण्यात आली. अशाचप्रकारे ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, श्रीलंका येथील पर्यटकांना आकृष्ट करण्यासाठी सप्टेंबर १९५६ मध्ये कार्यालये सुरू करण्यात आली.

भारतात स्वदेशी पर्यटन कार्यालयांकडे जी कामे सोपविण्यात आली होती, तीच कामे परदेशातील कार्यालयांकडेही सोपविण्यात आली होती तिच कामे याही कार्यालयाकडे सोपविण्यात आली. तसेच भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांना माहिती पुरविणे, परेदशात पर्यटनविषयक जाहिराती करणे, जनसंपर्क साधणे, वेळोवेळी मध्यवर्ती पर्यटन विभागाला आवश्यक ती माहिती पुरविणे ही कामे परदेशी कार्यालयांकडे सोपविणेत आली.

## V] पर्यटन मंत्रालयाची स्थापना :-

पर्यटन उद्योगाकडे संपूर्ण लक्ष केंद्रित व्हावे म्हणून भारतात १ मार्च १९५८ मध्ये वाहतुक

मंत्रालयांतर्गत स्वतंत्र पर्यटन खाते सुरू करण्यात आले. त्यासाठी एक महासंचालक, एक उपमहासंचालक, चार संचालक नेमणेत आले. त्यांच्याकडे पर्यटन संदर्भातील प्रशासन, जाहिराती, प्रवास, संपर्क, नियोजन आणि पर्यटनाचा विकास करण्याचे काम सोपविण्यात आले.

१४ मार्च १९६७ च्या राष्ट्रपतीच्या आदेशानुसार भारतात स्वतंत्र पर्यटन आणि नागरी हवाई वाहतूक विभागाची स्थापना करण्यात आली. यासाठी स्वतंत्र मंत्रालय निर्माण करण्यात आले. त्याचा संपूर्ण कारभार एका पूर्णवेळ मंत्र्याकडे सोपविणेत आला. त्याचा परिणाम म्हणून भारतातील पर्यटन उद्योगाला आणखी चालना मिळाली.

## अ) पर्यटन मंत्रालयाची कार्ये :-

१) देशातील निरनिराळ्या भागातील हवामानाचा अंदाज घेण्यासाठी हवामान विषयक सेवांचे आयोजन करणे.

२) देशातील विमानतळे, हवाई वाहतूक केंद्रे इत्यादीचे संघटन करणे.

३) हवाई वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजणे.

४) हवाई मार्गे प्रवासी व मालाच्या वाहतुकीस चालना देणे.

५) हवाई वाहतुक मंडळ १९५३ च्या कायद्यानुसार देशात पर्यटन विकास महामंडळाची स्थापना करणे.

६) रेल्वे प्रवासामध्ये रेल्वे तपासणीस मंडळाची स्थापना करणे.

७) देशातील पर्यटनाच्या विकास आणि वाढीला चालना देणे.

८) देशांतर्गत पर्यटन केंद्रांच्या ठिकाणी युवकांसाठी वसतीगृहे बांधणे.

९) पर्यटनाच्या विकासासाठी इतर मंत्रालयाशी संबंध प्रस्थापित करणे.

१०) लोकसभेच्या विविध समित्यांमार्फत पर्यटक कार्यक्रमांची व्यवस्थित मांडणी करणे.

११) आंतरराष्ट्रीय व इतर प्रतिनिधींशी पर्यटनाच्या संदर्भात तडजोड घडवून आणणे.

१२) राज्य सहकार व नियोजन मंडळाच्या सहकार्याने पर्यटनाचे नियोजन व संघटन करणे.

१३) पर्यटक उद्योग कार्यक्रमासाठी माहिती व आकडेवारी गोळा करणे.

१४) पर्यटक व्यवसायाच्या संदर्भात इतर देशांशी झालेल्या करारांची अंमलबजावणी करणे.

## ब) स्वतंत्र पर्यटन खाते (Department of Tourism) :-

१९६७ नंतरच्या काळात भारतातील पर्यटन खाते हा पूर्णपणे स्वतंत्र विभाग बनला. तो विभाग पर्यटनविषयक धोरणे आखणारा व पर्यटनाशी संबंधित कार्यक्रमांची अंमलबजावणी करणारा विभाग आहे. देशातील पर्यटनाला चालना देणे व पर्यटन व्यवसायाचे संघटन करणे असे या खात्याचे दोन प्रकारचे कार्य आहे. पर्यटन खात्यामध्ये पुढील ७ विभाग कार्यरत होते.

१) नियोजन व कार्यक्रम विभाग.

२) जाहिरात व परिषदा विभाग.

३) प्रवास, व्यापार व आदरातिथ्य विभाग.

४) निवास व्यवस्था विभाग.

५) वन्य पशुपक्षी विभाग.

६) बाजार संशोधन विभाग.

७) प्रशासन विभाग.

## VI] भारतीय पर्यटन विकास महामंडळ (Indian Tourism Development Co-operation, ITDC) :-

पर्यटन उद्योगाच्या भारतातील विकासाच्या संदर्भात इ.स. १९६३ मध्ये झा समिती नेमण्यात आली होती. भारतात पर्यटनाचा अधिक विकास व्हावा म्हणून या समितीने १९६५ मध्ये पर्यटन खात्यांतर्गत हॉटेल महामंडळ, भारतीय पर्यटन महामंडळ व भारतीय पर्यटन वाहतूक मंहामंडळ अशी स्वतंत्र महामंडळे नेमली. शिवाय झा समितीच्या अहवालात असे म्हटले होते कि पर्यटन विकासासाठी सार्वजनिक क्षेत्रात अधिक कार्यक्रम होणे आवश्यक आहे. दर्जेदार हॉटेल्स बांधणे व त्यांचे व्यवस्थापन पाहणे, पर्यटनाच्या-जाहिरातीसाठी साहित्य निर्माण करणे, पर्यटकांला चांगल्या दर्जाच्या वाहतूक सुविधा प्रदान करणे ही कामे या मंडळांकडे सोपविणेत आली. या सर्व कामात एकसूत्रीपणा असावा म्हणून नंतर सरकारने वरील तिनही मंडळे विसर्जीत करून त्याचे एका मंडळात विलीनीकरण करण्याचे ठरविले. त्यानुसार ऑक्टोबर १९६६ मध्ये ''भारतीय पर्यटन विकास महामंडळा''ची (ITDC) स्थापना करण्यात आली.

## अ) भारतीय पर्यटन महामंडळाचे उद्देश व कार्ये :-

१) पर्यटकांच्या निवासासाठी पर्यटन स्थळांजवळ सोयीस्कर ठिकाणी हॉटेल्स, मोटेल्स, पर्यटन बंगले, अतिथीगृह, रेस्टॉरंटस् बांधणे.

२) पर्यटकांना वाहतुकीच्या सुविधा उपलब्ध करून देणे.

३) पर्यटकांना देण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांत वाढ करणे.

४) पर्यटकांसाठी पर्यटन स्थळी सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत रजनी, करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणे.

५) करमुक्त दुकानांची बाजारपेठेत उपलब्धता करून देणे.

६) पर्यटकांना वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठांची निर्मिती करणे.

७) परिषदा सेवांची निर्मिती करणे.

८) प्रशिक्षण व सल्लागार सेवांची निर्मिती करणे.

९) खाद्य महोत्सव, यात्रा, साहसी कार्यकम्रांचे नियोजन करणे.

वरील उद्देशांना अनुसरून भारतातील पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी अनेक प्रकारचे उपक्रम व योजना पर्यटन विकास महामंडळाने हाती घेतल्या. आज भारतीय पर्यटन विकास महामंडळाकडे ५५०० हून अधिक खोल्या व सुमारे १००० च्या दरम्यान प्रवासी गाड्या आहेत. महामंडळाने निवास व भोजन व आंतरराष्ट्रीय विमानतळांवर करमुक्त व्यापारी केंद्रे, दर्जेदार व आकर्षक पर्यटक साहित्य, उच्च दर्जाची विश्रामालये, रेस्टॉरंटस्, जागतिक दर्जाच्या बाजारपेठा याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. हे महामंडळ परदेशी पर्यटक व देशातील उद्योगधंदे, यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करते. ''भारतीय पर्यटन विकास महामंडळ'' म्हणजे देशातील सर्वात मोठी पर्यटन संघटना असून भारतीय पर्यटन विकासात त्याचा मोलाचा वाटा आहे. आज महामंडळाचे भाग भांडवल प्रचंड वाढलेले असून कार्यक्षेत्रामध्येही वाढ झाली आहे. भारताला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळवून देण्यात या महामंडळाचा सहभाग प्रमुख आहे. या वाढत्या कार्याचा व्याप संभाळण्यासाठी विविध समित्या व सल्लागार मंडळे नेमली आहेत.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाला एक कार्यकारी संचालक असून तो या महामंडळाचा अध्यक्ष असतो. महामंडळाच्या विभागीय कार्यालयाचे प्रमुख हे या महामंडळाचे संचालक असतात. आज या महामंडळाने देशाबाहेरही रेस्टॉरंटस् उभारलेली आहेत. अशाप्रकारे महामंडळाच्या सेवांचे जाळे भारतात व भारता बाहेरही तयार करण्यात आलेले आहे. महामंडळाकडे देशातील सर्वात मोठ्या सभागृहाची सोय आहे. दिल्लीच्या अशोक हॉटेलची सभागृहाची क्षमता २५०० असून या हॉटेलमध्ये ५५० रूम्स उपलब्ध आहेत. या महामंडळाकडे तज्ञ व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग आहे. भारतीय पर्यटन विकास महामंडळ देशात अनेक ठिकाणी हॉटेल व्यवस्थापन, केटरिंग व न्यूट्रीशन संस्था चालविते. तसेच मोठ्या शहरात फूड क्राफ्ट इन्स्टिट्यूटस् आहेत. पर्यटनविषयक शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत. शिवाय हे महामंडळ

पर्यटन यात्रांचे संयोजन करते. आज या महामंडळाकडे काही व्यावसायिक ग्रुप काम करतात, त्यामध्ये अशोक ग्रुप ऑफ हॉटेल्स, अशोका ट्रॅव्हल्स ॲण्ड टूर, ड्युटी फ्री शॉपस् ॲन्ड टॅक्स. तसेच एअर इंडिया, इंडियन एअर लाईन्स, स्टेट ट्युरिझम कार्पोरेशन, इंडियन रेल्वे याचेशी कोलॅबोरेशन आहे. देशांतर्गत पर्यटकांसाठी ''एन्जॉय इंडिया'', ''डिस्कव्हर इंडिया'', ''पिल्ग्रीम टूर्स'', ''बुध्दिस्ट पॅकेज'' असून भारतातील पर्यटनाला त्यामुळे चालना मिळाली आहे.

या सर्व गोष्टींचे फलित म्हणून- (१) देशांतर्गत व विदेशी पर्यटकांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. (२) मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. (३) परदेशी पर्यटकांमुळे देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळत आहे. (४) पर्यटन हा देशातील मोठा सेवा उद्योग ठरला आहे. (५) ३७ आंतरराष्ट्रीय विमानसेवांचे जाळे निर्माण झाले आहे. (६) आरोग्य पर्यटनाचा देशात झपाट्याने विकास होत आहे. (७) निसर्ग पर्यटन झपाट्याने वाढत आहे. (८) साहसी पर्यटन स्थळांचा विकास होत आहे. (९) टेक्नॉलॉजीकल पार्कस् विकसीत होत आहेत. (१०) सायन्स म्यूझियमचा विकास होत आहे. (११) आरोग्य पर्यटन स्थळांचा विकास होत आहे. (१२) योग केंद्रे व आयुर्वेद केंद्रांचा विकास होत आहे.

या सर्व गोष्टींसाठी गरज आहे ती पायाभूत सुविधांमध्ये वाढ होण्याची, विमान सेवांमध्ये बदल होण्याची, पर्यटनस्थळांमध्ये सुगमता निर्माण होण्याची, उच्च दर्जांच्या हॉटेल्सची, कुशल मनुष्य बळाची आणि चांगल्या प्रकारच्या शाश्वत नियोजनाची. भारत सरकार व पर्यटन मंत्रालय त्यादृष्टीने प्रयत्नशील आहे.

## ✻ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ✻

**योग्य पर्याय निवडा.**

१. ''डिस्कव्हरी ऑफ इंडिया'' या ग्रंथात भारतातील प्राचीन उज्ज्वल सांस्कृतिक परंपरेचा कोणी उल्लेख केलेला आहे.

*अ) लालबहादूर शास्त्री* *ब) इंदिरा गांधी*

*क) जवाहरलाल नेहरू* *ड) राजीव गांधी.*

२. इ.स. १९४५ रोजी कोणाच्या अध्यक्षतेखाली पर्यटन समिती गठित करण्यात आली होती.

*अ) सार्जंट* *ब) माल्थस* *क) रॉबर्ट* *ड) मॅकिन्डर.*

३. सार्जंट समितीने पर्यटन अहवाल ब्रिटिश सरकारला कोणत्या वर्षी सादर केला.

*अ) १९४५* *ब) १९४६* *क) १९४७* *ड) १९४८.*

४. पर्यटन विकासासाठी भारतात झा समिती कोणत्या साली नेमण्यात आली?

*अ) १९६१ ब) १९६२ क) १९६३ ड) १९६४.*

५. भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली?

*अ) १९६४ ब) १९६५ क) १९६६ ड) १९६७.*

६. वाहतूक मंत्रालयांतर्गत पर्यटन वाहतूक समितीची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

*अ) १९४६ ब) १९४७ क) १९४८ ड) १९४९.*

७. पर्यटन मंत्रालयाची स्थापना कोणत्या वर्षी करण्यात आली?

*अ) १९४८ ब) १९५० क) १९५२ ड) १९५८.*

## १.२.३ भारतातील पर्यटन नियोजन (Planning of Tourism in India) :-

नियोजन केल्याशिवाय कोणत्याही उद्योगाचा विकास होत नाही. पर्यटनाची यशस्वी वाटचाल होण्यासाठी पर्यटन व्यवसायाच्या प्रत्येक टप्प्यावर नियोजन करण्याची गरज असते. जगातील सर्व पर्यटनाभिमुख देशांनी हे दाखवून दिले आहे कि, पर्यटन व्यवसायाच्या सर्वंकष नियोजनामुळे त्या-त्या देशांच्या दिर्घकालीन पर्यटन विकासाला मोठी चालना मिळालेली आहे. जेथे नियोजनाचा अभाव असतो तेथे त्या व्यवसायामध्ये सामाजिक , आर्थिक, पर्यावरणीय अनेक प्रश्न उभे राहतात व त्याचे दुष्परिणाम त्या देशातील विकासावर आणि पर्यायाने समाजव्यवस्थेवर झालेले दिसून येतात. पर्यटन हा तसा संमिश्र विचारांचा व गुंतागुंतीचा व्यवसाय आहे कि ज्यामध्ये वेगवेगळ्या अनेक व्यवसायांची एकत्र संगती लागलेली असते. पर्यटनाच्या नियोजनामुळेच आपण नैसर्गिक, आर्थिक, सांस्कृतिक व इतर अनेक प्रकारच्या साधनसंपत्तीचे दिर्घकालीन संवर्धन आणि व्यवस्थापन करू शकतो. पर्यटन नियोजनामुळे पर्यटन व त्याच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व व्यवसायांशी सहसंबंध प्रस्थापित करू शकतो.

### अ) पर्यटन नियोजनाचा अर्थ किंवा व्याख्या :-

''नियोजन म्हणजे निश्चित केलेले ध्येय साध्य करण्यासाठी कार्य करण्याची पध्दत होय.'' याचाच अर्थ कोणतेही कार्य पूर्णत्वाकडे जाण्यासाठी नियोजनाची गरज असते. तसेच मर्यादित व उपलब्ध साधनसंपत्तीमध्ये विकास साधण्यासाठी नियोजनाची गरज असते. पर्यटन हा सर्वाधिक रोजगार, अर्थप्राप्ती, प्रादेशिक विकास आणि देशाची प्रतिमा उंचावणारा उद्योग आहे. सन १९६३ साली संयुक्त राष्ट्रसंघाने ''प्रवास व पर्यटन'' या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये अविकसित व विकसनशील देशातील पर्यटनाचा विकास साधण्याच्या दृष्टीने काही नियोजनात्मक सूचना करण्यात आल्या, त्यामध्ये पर्यटक विकासावर भर देण्यात आला होता.

## ब) पर्यटन नियोजनाची प्रक्रिया :-

एखाद्या ठिकाणी पर्यटकांच्या दृष्टीने आकर्षण असेल आणि तेथे पर्यटकांच्या आवश्यक गरजांची समाधानकारक पूर्तता होत असेल तर तेथे पर्यटनाच्या संभाव्य विकासासाठी शक्यता असते, त्यासाठी भविष्यकालीन नियोजन करणे गरजेचे असते. हे नियोजन करत असताना स्थानिक लोकांच्या सहभागाची त्यामध्ये नितांत गरज असते. या नियोजन प्रक्रियेत काही मूलभूत घटक विचारात घ्यावे लागतात. प्रथम नियोजनाची उद्दिष्ट्ये ठरवावी लागतात. ही उद्दिष्ट्ये सर्वसमावेशक असावीत, नंतर उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी कार्यवाही करण्याची योजना आखावी लागते, त्यानंतर उपयुक्ततेचे मोजमाप करावे लागते. या नियोजन प्रक्रियेतील काही प्रमुख टप्पे खालीलप्रमाणे :-

I) पर्यटक मागणी व पुरवठा यांचा आढावा.

II) उद्दिष्ट्ये निश्चितीकरण.

III) क्षेत्रीय नियोजन.

IV) मुलभूत सुविधा.

V) आर्थिक नियोजन.

VI) मनुष्यबळ नियोजन.

VII) व्यवस्थापकीय रचना.

VIII) विकासाचे मोजमाप.

IX) वेळेचे नियोजन.

### I) पर्यटक मागणी व पुरवठा यांचा आढावा :-

पर्यटन विकासाच्या नियोजनामध्ये उपलब्ध असलेले घटक व त्यांचे स्वरूप यांची माहिती घेणे ही प्राथमिक गरज असते. नियोजन प्रक्रियेची ही पहिली पायरी आहे. विकास करत असताना उपलब्ध साधनसंपत्तीचा अभ्यास करताना माहितीचा अभाव हा सर्वात महत्त्वाचा भेडसावणारा प्रश्न असतो. त्यासाठी उपलब्ध आकर्षण स्थळांचे सर्वेक्षण करून त्याचा एक स्थुल आराखडा तयार करावा लागतो. पिटर या अभ्यासकाने पर्यटनाच्या नियोजनासाठी काही तत्त्वे सांगितलेली आहेत. ज्यामध्ये प्रदेशातील पर्यटन स्थळांच्या विकासाचा फायदा स्थानिक व प्रादेशिक पातळीवर व्हावा, पर्यटन स्थळांच्या विशेष विकास योजनांसाठी अशा स्थळांची निवड करावी की ती सर्वसमावेशक असावीत, या स्थळांच्या विकासाचे उद्दिष्ट सहज साध्य होणयासारखे असावे व एकाच प्रदेशात पर्यटन केंद्रांची स्पर्धा टाळावी अशी काही तत्त्वे पाळावी लागतात. तसेच नियोजन करताना पर्यटकांच्या मागणीचा अंदाज बांधला पाहिजे.

पर्यटकांच्या गरजा, वाढत्या मागण्या, वाढत्या अपेक्षा आणि त्या पूर्ततेसाठी केले जाणारे उपाय याचे नियोजन आवश्यक ठरते.

## II) उद्दिष्ट्ये निश्चितीकरण :-

प्राथमिक माहितीचे संकलन केल्यानंतर पर्यटनाच्या नियोजनाची उद्दिष्ट्ये ठरविता येतात. पर्यटन नियोजनाची उद्दिष्ट्ये ही पर्यटकांची गरज, लोकांचे राहणीमान उंचावणारे, रोजगाराची निर्मिती करणारे, स्थानिक साधनसंपत्तीचा विकास करणारी, पर्यावरणाचे संवर्धन करणारी, राष्ट्रीय विकासाला चालना देणारी, समाजाची एकात्मता वाढविणारी असली पाहिजे.

## III) क्षेत्रीय नियोजन :-

यामध्ये ज्या पर्यटन स्थळाचे नियोजन करावयाचे आहे, त्या स्थळाचा भूक्षेत्रीय आढावा घेतला जातो. पर्यटन केंद्राने वर्तमानस्थितीत व्यापलेले क्षेत्र, त्यामध्ये वेगवेगळ्या घटकांचे झालेले केंद्रिकरण, वाढती लोकसंख्या, पर्यटकांच्यामुळे निर्माण झालेल्या वाढत्या गरजा, त्यासाठी आवश्यक असणारे भूक्षेत्र, त्यासाठीची आर्थिक तरतूद, केंद्राच्या सभोवताली असलेले क्षेत्र, स्वरूप, रचना, उपलब्धता याचा विचार करून नियोजन करावे लागते. विस्तारीकरणाचा आराखडा तयार करावा लागतो.

## IV) मुलभूत सुविधा :-

पर्यटनाचे नियोजन करताना प्रथम मुलभूत सुविधा आणि वैकल्पीक सुविधा अशी वर्गवारी करावी लागते. नियोजन प्रक्रियेमध्ये मुलभूत सुविधांकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे लागते. पर्यटनाच्या विकासासाठी भरपूर जमीन, मुबलक पाणी, वीज, वाहतुकीच्या दर्जेदार सुविधा, पर्यटकांचे संरक्षण, आरोग्य, चांगले रस्ते, चांगल्या निवासाच्या सोयी इ. मुलभूत गोष्टी आवश्यक असतात. याशिवाय मोठ्या बाजारपेठा, बागा, खेळणी, मैदाने व वैकल्पीक गोष्टी आवश्यक असतात, त्यांचे नियोजन करणे महत्त्वपूर्ण ठरते.

## V) आर्थिक नियोजन :-

यशस्वी पर्यटन विकासासाठी आर्थिक नियोजन करणे हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. पर्यटन स्थळाच्या नियोजनपूर्वक विकासासाठी मोठ्या प्रमाणावरील आर्थिक गुंतवणुकीची गरज असते. पायाभूत सोयींची उपलब्धता, पर्यटकांसाठी वैकल्पीक सोयींची निर्मिती, नियोजनाचा प्रारूप आराखडा यासाठी पैशाची गरज असते. हा पैसा शासन व वित्तीय संस्था यांच्याकडून उपलब्ध होतो. पर्यटन वाढीसाठी जेथे सर्व प्रकारची अनुकूलता आहे. अशा ठिकाणी गुंतवणूकदार पुढे येऊन गुंतवणूक करतात. कारण त्यांच्या गुंतवणूकीतून लगेच परतावा व फायदा मिळू लागतो. मात्र मागासलेल्या भागातील पर्यटन विकासासाठी आर्थिक तरतूद करणे मोठे कष्टाचे काम असते.

### VI) मनुष्यबळ नियोजन :-

कार्यक्षमता व व्यावसायिकता हे दोन घटक पर्यटन यशस्वी करण्यासाठी गरजेचे असतात. यासाठी पर्यटन व्यवासायात काम करणाऱ्या लोकांना योग्य प्रशिक्षणाची गरज असते. पर्यटन विकासाच्या सुरवातीच्या काळात मात्र याकडे दुर्लक्ष केले जाते. पर्यटन हा मुळातच सेवा व्यवसाय असल्याने यासाठी कार्यक्षम कौशल्यप्राप्त सेवाभावी लोकांची मोठी गरज असते. पर्यटन व्यवसायाच्या कामामध्ये मोठी विविधता असल्याने त्यासाठी वैविध्यपूर्ण मनुष्यबळ मिळवावे लागते. यासाठी नियोजनामध्ये मनुष्यबळ विकास कार्यक्रम योजनेचा समावेश करावा लागतो. व्यक्तीमध्ये सौंदर्यदृष्टी, कला, वर्तणूक, लवचिकता, सहिष्णूता, मानवतावाद, आर्थिक नियोजन इ. गुणांची वाढ झाली तरच हा सेवा व्यवसाय करता येतो.

### VII) व्यवस्थापकीय रचना :-

मनुष्यबळ नियोजनानंतर व्यवस्थापकीय रचना करण्याचे नियोजन करावे लागते. पर्यटन केंद्रामध्ये ज्या विविध सेवा पुरविल्या जातात, त्यांची वर्गवारी करून त्या सर्व स्तरांपर्यंत पोहचविण्यासाठी योग्य व्यवस्थापनाची गरज असते. त्यासाठी व्यवस्थापनामध्ये प्रामुख्याने शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक व खाजगी व्यवस्थापक, लोक सहभाग इ. गरज असते.

### VIII) विकासाचे मोजमाप :-

उत्तम प्रकारचा विकास साधण्यासाठी राबविलेल्या योजनांच्या प्रगतीची वेळोवेळी पाहणी करावी लागते. फक्त नियोजन करून नियोजनकाराचे काम संपत नाही तर त्या नियोजनाची कार्यवाही केल्यानंतर त्याचे दुष्परिणाम काय आहेत. याचेही मोजमाप करावे लागते. केलेल्या नियोजनाचे मूल्यमापन करणे, या नियोजनाची फलद्रूपता तपासणे, त्यातील दोष दर्शविणे, चुकीचे निराकरण करण्यासाठी पुरवणी नियोजन करणे या बाबी कराव्या लागतात. शेवटी प्रत्येक नियोजन हे उपयुक्तता, पर्यटकांचे समाधान, गुंतवणूकदारांचा फायदा आणि सर्वंकष विकास हेच असते.

### IX) कालावधी व वेळेचे नियोजन :-

नियोजन हे कालबध्द असावे लागते. उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी करावयाची कार्यवाही कालबध्द असावी लागते. नियोजनाचा कालावधी हा ३ वर्षापासून ते २५ वर्षांपर्यंत असतो. प्रत्येक उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी ठरवून दिलेल्या काळातच ते साध्य व्हावे लागते नाही तर नियोजनाची आर्थिक बाजू नुकसानीत येते. पर्यटन केंद्राच्या विकासाची गती प्रचंड वाढत आहे. त्या प्रमाणातच नियोजनाचा काळ ठरवावा लागतो.

## क) पर्यटन नियोजनाचे प्रकार :-

पर्यटनाच्या नियोजनामध्ये पर्यटन नियोजन प्रक्रियेतील विविध बार्बीचा विचार करत असताना आणखी एक महत्त्वाचा मुद्दा विचारात घ्यावा लागतो. तो म्हणजे वेगवेगळ्या प्रकारची आणि कमीजास्त महत्त्वाची पर्यटन केंद्रे. काही पर्यटन केंद्रे आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यताप्राप्त झालेली असतात. उदा. सिमला, कुलूमनाली, आग्रा तर काही पर्यटन केंद्रांचा राष्ट्रीय तसेच प्रादेशिक पातळीवर प्रभाव असतो. उदा. महाबळेश्वर, कास इ. या पर्यटनकेंद्रांच्या वैविध्यपूर्ण दर्जानुसार पर्यटन नियोजन आराखड्यामध्येही बदल करावे लागतात. यातूनच पर्यटन नियोजनाचे खालील प्रकार पडलेले दिसतात.

### I) राष्ट्रीय नियोजन :-

प्रत्येक राष्ट्राचे पर्यटनाच्या विकासाच्या दृष्टीने एक राष्ट्रीय पातळीवरचे नियोजन असावे लागते. राष्ट्राच्या विकासामध्ये पर्यटनाचे जेवढे जास्त महत्त्व तेवढे नियोजनाच्या बाबतीतही महत्त्व द्यावे लागते. पर्यटन व्यवसायातून आंतरराष्ट्रीय चलन तर मिळतेच पण राष्ट्रा-राष्ट्रातील संबंधही दृढ होत जातात. राष्ट्रीय पातळीवरच्या नियोजनामध्ये पर्यटन केंद्रे आंतरराष्ट्रीय दर्जाची कशी होतील यासाठी सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा तयार करण्याची मार्गदर्शक तत्त्वे ठरवावी लागतात. तसेच परदेशी पर्यटकांच्या आगमन-निर्गमनाची वाहतूक व्यवस्था, पारपत्र व्यवस्था, चलन व्यवस्था, पर्यटकांच्या सुरक्षिततेची काळजी, उत्तम दर्जाची निवास व्यवस्था, या बाबींचे नियोजन करावे लागते. देशातील आंतरराष्ट्रीय दर्जाची पर्यटनस्थळे एकमेकांशी सर्व प्रकारच्या वाहतूक, दळणवळण सेवेनी जोडलेली असावी लागतात. प्रत्येक राज्यातील अशा महत्त्वाच्या पर्यटन स्थळांच्या विकासाची, संवर्धनाची विशेष काळजी घ्यावी लागते, त्यासाठी एक उच्च स्तरीय नियंत्रण मंडळही असावे लागते.

### II) प्रादेशिक नियोजन :-

प्रादेशिक नियोजनामध्ये प्रामुख्याने लहान-मोठ्या पर्यटन केंद्रांच्या विकासाच्या राज्यांतर्गत कार्यकक्षेत येणाऱ्या पर्यटन केंद्रांच्या नियोजनाचा विचार केला जातो. पर्यटन केंद्राच्या स्थानातील जे क्षेत्रीय प्रशासन असते, त्याला त्या पर्यटन केंद्रामध्ये येणाऱ्या पर्यटकांच्या सर्व प्रकारच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी नियोजन आखावे लागते. यामध्ये प्रामुख्याने राज्यस्तरीय नियोजन तत्वांचा मार्गदर्शक तत्त्वे म्हणून वापर करावा लागतो. दळणवळणाचे मार्ग, नियंत्रण कक्ष, बाजारपेठांची निर्मिती, विकासाच्या पायाभूत योजना, पर्यटकांच्या संरक्षणाची, सुरक्षिततेची जबाबदारी, गुंतवणुकीच्या योजना इत्यादीचे सर्वंकष नियोजन करावे लागते. या प्रादेशिक नियोजनासाठी राष्ट्रीय पातळीवरील नियोजनाच्या मार्गदर्शक तत्त्वे तसेच कांही योजनांचा उपयोग होत असतो.

### III) स्थानिक नियोजन :-

पर्यटनाच्या स्थानिक नियोजनामध्ये प्रामुख्याने स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून प्रादेशिक व राष्ट्रीय नियोजन कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी लागते. पर्यटनाचे स्थानिक नियोजन अत्यंत महत्त्वाचे असते, कारण त्याचा प्रत्यक्ष संबंध पर्यटकांशी असतो. एखाद्या पर्यटन केंद्राच्या ठिकाणी येणारे पर्यटक, त्यांची वाहतूक, वाहनांचे पार्किंग, निवासाच्या सोयी, त्यांच्या भ्रमंतीसाठीची वाहतूक व्यवस्था, गर्दीचे नियोजन, आपतकालीन सुरक्षाव्यवस्था, आरोग्य, वीज, पाणी, पोलीस कक्ष इ. बाबी तर पहाव्या लागतातच त्याबरोबरच स्थानिक लोकांचा सहभाग, रोजगाराची निर्मिती, महसूल गोळा करणे, बाजारपेठेची उभारणी, पर्यटकांच्या विविध गरजा भागविण्यासाठीची भांडवल उभारणी, स्थानिकांना रोजगार, भांडण-तंटे इ. अनेक बाबींचा नियोजनपूर्वक विचार स्थानिक नियोजनात होतो.

## ड) पर्यटन नियोजनातील अडचणी :-

i) पर्यटन नियोजन करण्यासाठी प्रथम पर्यटन स्थळांसंबंधी सर्व प्रकारची माहिती गोळा करावी लागते, अशी माहिती मिळण्यामध्ये अडचणी येतात.

ii) शहरीकरण व औद्योगिकीकरण जास्त असलेल्या प्रदेशातील पर्यटन क्षेत्राच्या नियोजनात स्थानिक लोक फारसे सहभागी होत नाहीत.

iii) स्थानिक लोकांच्यामध्ये पर्यटनाबद्दल फारशी जागृती झालेली नसते.

iv) पर्यटन व्यवसाय अनेक सेवांचे एकत्रीकरण असते. परंतु या सर्व सेवा एकत्र आणणे मोठे कठीण काम असते.

v) एखादे धार्मिक अथवा सांस्कृतिक पर्यटन केंद्र विकसित करताना लोकभावनांचा विचार करावा लागतो अन्यथा अनेक अडचणी निर्माण होतात.

vi) पर्यटनाची बाजारपेठ पर्यटकांच्या आवडीनुसार सतत बदलत असते. व्यावसायिक हा बदल करायला फारसा उत्सुक नसतो.

vii) पर्यटकांच्या आवडी-निवडी व गरजांचा विचार करून पर्यटनाचे नियोजन करावे लागते, परंतु पर्यटकांची वाढती संख्या व सततच्या बदलणाऱ्या आवडी-निवडीमुळे नियोजन करणे कष्टाचे होते.

viii) पर्यटन हा व्यवसाय पर्यटकांचे समाधान व नियोजनाशी निगडीत असल्यामुळे नियोजन लागू केल्यानंतर त्याचा विकास व्यवस्थित होतो की नाही हे पाहणे कठीण जाते.

## इ) पंचवार्षिक योजना व भारतातील पर्यटन नियोजन :-

भारतातील पर्यटन विकास हा अनेक टप्प्यांतून गेलेला आहे. सरकारच्या आर्थिक नियोजनाचा विचार करता भारत सरकार जास्तीतजास्त पर्यटन विकासाचे स्वप्न बाळगून आहे. सरकार पर्यटन योजना आणि नियोजनाचा पर्यटन उद्योगामध्ये सातत्याने विचार करताना दिसते. आज देशाच्या विकासात पर्यटन व्यवसायाचे मोठे योगदान आहे. भारत सरकार अनेक पाऊल त्यासाठी उचलताना आढळते. भरपूर राष्ट्रीय पर्यटन योजनांचे नियोजन करून अनेक समित्या स्थापून, कृती आराखडे तयार करून, पंचवार्षिक योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतूद करून त्यांची अंमलबजावणी करताना दिसते. आज शेकडो प्रवास व पर्यटन संस्था पर्यटन विकासासाठी धडपडत आहेत.

### ☼ पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-१९५६) :-

पहिली पंचवार्षिक योजना १९५१ ते १९५६ च्या या पाच वर्षासाठी सरकारने जाहीर केली. मात्र स्वतंत्र पर्यटन मंत्रालय नसल्याने या पंचवार्षिक योजनेमध्ये पर्यटन विकासासाठी आर्थिक तरतूद नसल्याचे दिसते.

### ☼ दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-१९६१) :-

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची सुरवात १९५६ ते १९६१ या काळात झाली. मात्र या योजनेमध्ये भारतातील पर्यटन विकास साधण्यासाठी ३३६.३८ लाख रुपये पर्यटनावर खर्च करण्यासाठी देण्यात आले. हिच पहिली वेळ होती की सरकारने स्वतंत्र बजेट पर्यटन विकासासाठी ठेवले होते. यामध्ये राज्य आणि केंद्रासाठी स्वतंत्र नियोजन केल्याचे आढळते. हा निधि प्रामुख्याने दळणवळण आणि पर्यटक यांच्या निवास व्यवस्था यासाठी खर्च केला. तसेच परदेशी पर्यटकांच्या सोयीत वाढ, देशांतर्गत पर्यटकांसाठी सोयी-सुविधा, वन्यजीव व साहसी पर्यटन, हिवाळी क्रिडा केंद्रे, बीच रिसॉर्ट, राष्ट्रीय स्मारके, बाजारपेठांचे नियोजन, यात्री निवास, धर्मशाळा, मुसाफीरखाने, विमानतळांची निर्मिती इ.साठी आर्थिक तरतूद करण्यात आली, शिवाय पर्यटन खात्यांतर्गत भारतीय यात्री विकास समितीची स्थापना करण्यात आली. जागतिक दर्जाच्या बाजारपेठांचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### ☼ तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१-१९६६) व वार्षिक नियोजन :-

या योजनेत देशाचा आर्थिक विकास होण्यासाठी पर्यटनाचा विकास करण्याचे ठरले. या योजना काळात देशात ६ पट परदेशी पर्यटक वाढले. १९५१ साली देशात १७००० परदेशी पर्यटक आले होते, तर १९६१ मध्ये ही संख्या १,२३,००० वर गेली. परकिय चलन तिसऱ्या योजनेमध्ये देशातील पर्यटन

विकासासाठी ८०० लाख रु.ची तरतूद करण्यात आली. दुसऱ्या योजनेमधील राहिलेली विकासाची कामे तिसऱ्या योजनेत केली. त्यामध्ये पर्यटकांच्या निवासाच्या सोयी, वाहतक, रस्ते, गुलमर्ग येथील हिवाळी पर्यटन केंद्राचा विकास, हॉटेल्स व पर्यटन संबंधीत उद्योगासाठी कर्जाची तरतूद इ.वर लक्ष केंद्रित केले. या योजनेत वार्षिक नियोजन करण्यात आले. १९६६-६७ साली ५८.५० लाख, १९६७-६८ साली ८७.६५ लाख, १९६८-६९ मध्ये १८३.८१ लाख रुपये पर्यटन विकासावर खर्च करण्यात आला. देशांतर्गत पर्यटन विकासाची जबाबदारी त्या-त्या राज्यांवर टाकण्यात आली.

### ☼ चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-१९७४) :-

या पंचवार्षिक योजना काळात परदेशी चलन मोठ्या प्रमाणावर मिळवून देणारा व्यवसाय म्हणून पर्यटन विकासाकडे लक्ष देण्यात आले. तसेच पर्यटन उद्योगामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होतो म्हणून काही जागतिक दर्जाच्या पर्यटन केंद्रांची निवड करून त्यांच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले. यामध्ये पर्यटन केंद्रावरील पायाभूत सेवा-सुविधांकडे लक्ष दिले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये पर्यटन विकसासाठी ८ कोटी रु.ची तरतूद करण्यात आली होती, मात्र चौथ्या योजनेत ३६ कोटी रु.ची तरतूद करण्यात आली. त्यामध्ये केंद्रासाठी २५ कोटी तर राज्यांतील पर्यटन विकासासाठी ११ कोटी रु.ची तरतूद झाली.

### ☼ पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-१९७९) :-

पाचव्या पंचवार्षिक योजनेत देशातील पर्यटन विकास साधण्यासाठी कांही उद्दिष्ट्ये ठेवण्यात आली त्यामध्ये जगातील महत्त्वाच्या देशात भारतातील पर्यटन स्थळांची प्रसिध्दी करणे, भारतातील मोठया कंपन्यांमार्फत तंत्रज्ञानाचा विकास करणे, दळणवळणाच्या सोयींचा विकास करणे, आंतरराष्ट्रीय विमान भाड्यात कपात करून भविष्यातील देशातील पर्यटन विकासाला कशी चालना मिळेल याचा प्रयत्न केलेला आढळतो. त्यासाठी प्राधान्यक्रमाने काही गोष्टी ठरविण्यात आल्या त्यामध्ये-

१) वाढत्या आंतरराष्ट्रीय पर्यटनाचा विचार करून पर्यटन स्थळी चांगल्या हॉटेल्सची निर्मिती.

२) भारतातील कांही ठराविक प्रदेशातील पर्यटन स्थळांचा विकास.

३) कोवालम (गोवा), गुलमर्ग, कुलुमनाली, प्राचीन स्मारके, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, यासाठी तसेच खाजगी हॉटेल्स, वाहन कंपन्यासाठी कर्जाची सोय उपलब्ध करण्यात आली.

४) ५ व्या पंचवार्षिक योजनेत या सर्वांसाठी १३३ कोटी रुपयाची आर्थिक तरतूद करण्यात आली. त्यातील ७८ कोाटी रुपये केंद्रीय विभागासाठी आणि ५५ कोटी रुपये राज्य आणि केंद्रशासित प्रदेशासाठी देण्यात आली.

## ☼ सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-१९८५) :-

सहावी पंचवार्षिक योजना १९८० मध्ये घोषित झाली. १९८० पर्यंत देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पर्यटनामुळे झालेल्या आर्थिक व सामाजिक फायद्याचा अभ्यास करण्यात आला. आणखी दर्जेदार सुविधा दिल्या तर भारतात पर्यटनाचा चांगला विकास होईल हे ठरवून पर्यटकांसाठी मोठमोठ्या हॉटेल्सची सुविधा करण्याचे ठरले. देशात पर्यटनाचा शाश्वत विकास साधून पर्यावरणावर व सांस्कृतिक पर्यटन केंद्रावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला. राज्य आणि केंद्र यांच्यामध्ये समन्वय साधून त्यासाठी सहाव्या पंचवार्षिक योजनेत १८७.४६ कोटी रु.ची तरतूद करण्यात आली. त्यातील ११५.४६ कोटी रुपये राज्यांतील पर्यटन केंद्रांचा विकास करण्यासाठी तर ७२ कोटी रुपये केंद्रासाठी खर्च करण्याचे ठरले. इंडियन एअर लाइन्स, एअर इंडिया विमानातील बैठकीच्या जागा वाढवून विमानतळे सुसज्ज करण्यात आली. तसेच जास्त विमाने विमानतळावर उतरतील याचीही व्यवस्था करण्यात आली.

## ☼ सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-१९९०) :-

सातव्या पंचवार्षिक योजनेत भारतातील पर्यटन विकासासाठी काही उद्देश डोळ्यासमोर ठेवण्यात आले, त्यामध्ये-

१) ७व्या योजनेत पर्यटन विकासामध्ये वार्षिक ७% वाढ अपेक्षित.

२) पर्यटनाला व्यवसायाचा दर्जा.

३) पर्यटन विकास साधण्यासाठी खाजगी क्षेत्रातून पायाभूत सेवा-सुविधेसाठी गुंतवणूकीची अपेक्षा.

४) राष्ट्रीय एकात्मता तसेच स्थानिक हस्तकला व्यवसायांना पर्यटन उद्योगास चालना देणे.

५) काही ठराविक प्रदेशात पर्यटक येत असल्याने तेथे पर्यटन विकास करणे.

६) पर्यटन वस्तूंचे सर्व ठिकाणी वितरण वाढविणे.

७) बौध्द, इस्लाम, हिंदू, जैन, शिख इ. धर्माच्या पर्यटन स्थळांचा विकास साधणे.

## ☼ आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-१९९७) :-

आठवी पंचवार्षिक योजना वेळेत सुरू झाली नाही. या योजनेत वार्षिक नियोजन करून पर्यटन विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामध्ये १९९०-९१ साली पर्यटन विकासासाठी ८३ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली. तर ९१-९२ साली ९० कोटी रुपयाची आर्थिक तरतूद करण्यात आली. आठव्या योजनेतही अनेक योजना पर्यटन विकास करण्यासाठी आखण्यात आल्या, त्यामध्ये खाजगी

क्षेत्रासाठीही पर्यटन व्यवसाय खुला करण्यात आला, विविध पर्यटन केंद्रांच्या विकासावर लक्ष केंद्रित करण्यात आले, त्यामध्ये हिवाळी क्रिडा केंद्रे, बीच रिसॉर्ट, अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांचा विकास, सर्वसामान्य पर्यटकांसाठी राहण्याच्या सोयी, पर्यटनाचा शाश्वत विकास यावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरले.

८ व्या योजनेच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेतील पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेण्यात आले. भारतातील १५ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांनी पर्यटनाला उद्योगाचा दर्जा दिला. खाजगी क्षेत्रातील उद्योगांनी पर्यटन विकास व सेवा-सुविधांकडे लक्ष दिले त्याचा परिणाम पर्यटन केंद्रांच्या विकासासाठी झाला. पर्यटनाचा विकास करण्यासाठी खाजगी क्षेत्रच महत्त्वाचे आहे हे लक्षात आले. त्यासाठी कर्जाची सोय करण्यात आली. काही ठराविक पर्यटन केंद्राचा जाणीवपूर्वक विकास साधण्यात आला. ''पर्यटन विकास निधी'' स्थापन करून निवडक पर्यटन केंद्रांच्या विकासासाठी देण्यात आला. पर्यटन बाजारपेठा व प्रसिध्दी करण्यासाठी इतर संस्थांची मदत घेण्यात आली. तांत्रिक विकास करून पर्यटकांशी संपर्क साधून त्यांचे अद्ययावत रेकॉर्ड ठेवण्याचे ठरले. या काळात परदेशी पर्यटकांच्या संख्येत घट झाली, आरोग्याच्या सोयींवर राज्यशासनाने लक्ष द्यावे सांगण्यात आले. गरिबी निर्मूलन व ग्रामीण विकास, पर्यटन विकास कार्यक्रमाशी जोडण्याचे ठरले. पर्यटन विकासातील वाहतूकीचे महत्त्व विचारात घेऊन सर्व प्रकारच्या वाहतूक विकासावर भर देण्यात आला. वाहने खरेदी करण्यासाठी सवलती देण्यात आल्या. सर्व राज्यांनी आपला सांस्कृतिक ठेवा पर्यटकांसाठी उपलब्ध करून द्यावा व पर्यटन विकासाचा मास्टरप्लॅन तयार करावा, आर्थिक बाबींचे नियोजन करून पर्यटन विकास साधावा, वारसा पर्यटन केंद्रांचे जतन करून किल्ले, राजवाडे, हवेली या पर्यटनासाठी उपलब्ध करून द्याव्यात व शहरांचे नियोजन करावे. पर्यटन विकास साधताना मानव संसाधनाचा व्यवस्थित वापर करावा, सर्व विद्यापीठांनी 'प्रवास व पर्यटन' यासारखे कोर्स विकसित करावेत. ''आग्रा वारसा केंद्र'' विकसित करावे आणि उत्तरप्रदेश व बिहारमधील बौध्द धार्मिक ठिकाणांचा विकास करावा. या सर्व कामासाठी आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये २७२ कोटी केंद्रासाठी तर ५०१.६२ कोटी राज्य व केंद्रशासित प्रदेशांसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली.

## ☼ नववी पंचवार्षिक योजना (१९९७-२००२) :-

पर्यटन विकासातील आठव्या योजनांची पूर्तता करण्यासाठी ६३९७ कोटी रुपयाची नवव्या योजनेत मागणी करण्यात आली. मात्र पर्यटन विभागाने त्यासाठी ५३७० कोटी रु. मान्य केले. ९व्या योजनेत पर्यटन विकासाच्या दृष्टीने खालील प्रयत्न झाले.

१. **उत्पादनांचा विकास** : पर्यटकांसाठी दर्जेदार पर्यटन उत्पादने कमी खर्चात देणे.

२. **समन्वय** : पर्यटन व्यवसायासाठी संबंधीत सर्व संस्थांची समन्वय साधून पर्यटनाचा विकास करणे.

३. **तफावती दूर** : भारतातील सर्वांगीण पर्यटन विकासासाठी तफावती दूर करून आरोग्य पर्यटनाचा विकास, ग्रामीण व गांव पर्यटनाचा विकास, यात्रा पर्यटनांचा विकास, वारसा पर्यटनांचा विकास, साहसी पर्यटनांचा विकास, तरूणांप्रमाणेच वृध्दांसाठीही पर्यटनाचा विकास करणे.

४. **पायाभूत सेवा-सुविधांचा विकास** : भारतातील ईशान्येकडील राज्ये, थंड हवेची ठिकाणे व इतर महत्त्वाच्या पर्यटन केंद्रांच्या ठिकाणी पायाभूत सेवा-सुविधांची निर्मिती करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली.

५. **लोकसहभाग** : देशातील पर्यटन विकास साधायचा असेल तर लोकसहभाग वाढला पाहिजे व त्यासाठी प्रचार करणेची गरज असून पर्यटन रोजगारात वाढ करणे.

६. **मालाची विक्री व वितरण** : ९ व्या योजनेत मालाची विक्री व वितरण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा (इंटरनेट) वापर वाढवून त्यासाठी पर्यटन मंत्रालयांतर्गत १९९९ मध्ये वेबसाईट सुरू करण्यात आली.

७. **कॉम्प्युटरचा वापर** : तांत्रिक ज्ञानाच्या प्रसारासाठी संगणकाच्या वापरावर भर देणेत आला. संगणकाद्वारे पर्यटकांपर्यंत पोहचण्याचे ठरले.

८. **पर्यावरणीय सुरक्षा व संरक्षण** : पर्यटनाचा शाश्वत विकास साधून स्थानिक साधनसंपत्तीवर ताण येणार नाही याची काळजी घेण्यात आली. पर्वतीय भागातील पर्यावरणाचे रक्षण, पर्यटन स्थळे, स्वच्छ आणि निरोगी, स्थानिक परंपरा जपणारे, संस्कृती आणि वारसा यांचे जतन करणाऱ्या पर्यटनाच्या विकासावर भर देण्यात आला यासाठी नियमावली करण्याचे ठरले.

९. **निर्यातक्षम दर्जा** : परदेशी चलन वाढण्यासाठी, रोजगार आणि जास्तीजास्त परदेशी पैसा मिळविण्यासाठी पर्यटनाला निर्यातक्षम दर्जा देण्यात अला.

१०. **संघटनांना बळ** : नवव्या योजनेत पर्यटनाच्या संबंधित असणाऱ्या संघटनांना बळ देऊन पर्यटन विकासातील त्यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने पाऊल टाकण्यात आले. पर्यटकांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये उच्चतम दर्जा ठेवण्यात आला.

११. **मानवसंसाधन विकास** : पर्यटन व्यवसायामध्ये कुशल मजूर पुरवठा होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आला, त्यासाठी खाजगी तसेच सरकारी पातळीवर प्रशिक्षण देण्याची सोय करण्यात आली.

१२. **ईशान्य भारतात पर्यटन विकास** : भारतातील इशान्येकडील राज्यात असणारा निसर्ग सौंदर्याचा फायदा पर्यटन विकासाला होऊन राज्या-राज्यातील विकासाची दरी कमी

करण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्थानिक लोकांच्यात त्यासाठी जनजागृती व प्रसिध्द करण्यात आली.

### ☼ दहावी पंचवार्षिक योजना (२००२-२००७) :-

१०वी पंचवार्षिक योजना ही २००२ च्या राष्ट्रीय पर्यटन नियोजनाशी मिळती-जुळती होती. पर्यटनाचा जागतिक स्तरावर विचार करून त्यामध्ये पर्यटनातील आधुनिक कलांचा विचार करण्यात आला. भारतात असणारा पर्यटन विकासाचा वाव व परदेशी पर्यटकांचा मिळणारा प्रतिसाद याचा विचार करून, लांब पल्ल्याचे मार्ग, शेजारील देशांचा प्रवास, ग्रामीण आणि समान वंशाचे पर्यटन, आरोग्यधामे, वृध्दांच्या पर्यटनातील सहभाग, आध्यात्मिक पर्यटन, निसर्ग पर्यटन, क्रीडा पर्यटन, साहसी पर्यटन या आधुनिक पर्यटन कलांकडे लक्ष केंद्रित करण्यात आले. तसेच देशातील पर्यटन विकासातील अडथळ्यांचाही अभ्यास करण्यात आला. आर्थिक वाढ, रोजगार निर्मिती, ग्रामीण आर्थिक विकास, देशांतर्गत पर्यटन विकास, आंतरराष्ट्रीय पर्यटनात वाढ करण्यासाठी केंद्र सरकार, राज्यसरकार, खाजगी क्षेत्र तसेच पर्यटनाशी संबंधित संस्थांची मदत घेण्याचे ठरलेल्या १०व्या योजनेत हे सर्व करण्यासाठी खालील बाबींवर भर देण्यात आला.

१. पर्यटनाला राष्ट्रीय पातळीवर अग्रक्रम देणे.

२. पर्यटन केंद्रांची वाढ करणे.

३. पर्यटन उत्पादने दर्जेदार व भरपूर उपलब्ध करून देणे.

४. जागतिक दर्जाच्या सेवा-सुविधा उपलब्ध करून देणे.

५. परिणामकारक विपणन योजना व कार्यक्रम आखणे.

हे सर्व करण्यासाठी १०व्या योजनेत ५५८६ कोटीची तरतूद करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात ५५०० कोटी रुपयेच खर्च करण्यात आले.

### ☼ अकरावी पंचवार्षिक योजना (२००७-२०१२) :-

११व्या पंचवार्षिक योजनेमध्ये ३११२.७१ कोटी रुपये देशातील ९९१ पर्यटन केंद्रावरील सेवा-सुविधा, ग्रामीण पर्यटन, मानव संसाधनाचा विकास करण्यासाठी घोषित करण्यात आले. मुख्य रस्ते, पर्यटन केंद्रापर्यंतचे रस्ते, मागास भागातील पर्यटन केंद्रावर लक्ष केंद्रित करण्यात आले. त्यातील २.५% निधी २०११-१२ पासून आदिवासी विभागातील पर्यटन केंद्रांच्या विकसासाठी वापरण्याचे ठरले. या ११व्या योजनेत पर्यटन मंत्रालयाने पर्यटन विकासासाठी ५१५६ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला. त्यातील ९९.२३% रक्कम पर्यटन विकासासाठी वापरण्यात आली.

## ☼ बारावी पंचवार्षिक योजना (२०१२–२०१७) :–

या योजनेत जरी २०११ पर्यंत १ कोटी परदेशी पर्यटक भारतात येण्याचे ठरविले होते, त्यानुसार १ कोटी २५ लाख परदेशी पर्यटकांनी भारताला भेट दिली. या योजनेत त्यांच्यासाठी पर्यटन बाजारपेठा, पायाभूत सेवा–सुविधेत वाढ जसे की विमानतळे, रस्ते, आरोग्य, मुख्य पर्यटन स्थळे, विमानातील ज्यादा बैठक व्यवस्था, प्रचंड प्रसिध्दी इत्यादीवर लक्ष केंद्रित केले. तसेच देशांतर्गत पर्यटकांमध्ये २०१० साठी ७.२ कोटी लोकांनी पर्यटन केले तर ८ कोटी १२ लाख देशांतर्गत पर्यटकांनी २०११ साली पर्यटन केले. २००६ साली देशांतर्गत ४ कोटी ६१ लाख पर्यटकांनी पर्यटन केले होते. यावरून भारतातील वाढत्या पर्यटनाची कल्पना येते.

आज पर्यटनामध्ये नवनवीन कल वाढताना आढळतात, त्यामध्ये ग्रामीण पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, साहसी पर्यटन, क्रूझ पर्यटन, आरोग्य पर्यटन इ. कलांचा समावेश होत आहे. शिवाय राष्ट्रीय अग्रकम पर्यटन व्यवसायाला दिला गेला आहे. आज भारतीय पर्यटन विकास महामंडळ आणि भारतीय पर्यटन मंत्रालयाच्या वतीने खालील उपक्रम हाती घेतले आहेत.

१) जागतिक स्पर्धेत भारत एक जगाचे आकर्षण.

२) पर्यटन उत्पादनात वाढ व जागतिक दर्जाच्या बाजारपेठा.

३) जागतिक दर्जाच्या पायाभूत सेवा–सुविधा.

४) बाजारपेठांचे शाश्वत नियोजन.

५) मानव संसाधनात वाढ.

६) सेवा व्यवसायात वाढ इत्यादी.

अशा प्रकारे भारतातील पर्यटन विषयक विकास विविध टप्प्यांतून होत गेलेला असून आजही देशाला पर्यटन विकास साधण्यासाठी भारताला जागतिक बाजारपेठेत ''ब्रँड'' बनवावा लागणार आहे, त्यासाठी जगातील पर्यटकांना चांगली सेवा देणे, पर्यटनातील नवनवीन कल्पना राबविणे. उदा. निसर्ग पर्यटन, आरोग्य पर्यटन, साहसी पर्यटन, योगा पर्यटन, आयुर्वेद पर्यटन इ. गरजेचे आहे.

## ✲ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ✲

### ❑ योग्य पर्याय निवडा.

१. खालीलपैकी कशामुळे दीर्घकालीन पर्यटन विकासाला चालना मिळते.

*अ) प्रश्न सोडविल्यामुळे* *ब) प्रदूषण रोखल्यामुळे.*

*क) नियोजनामुळे* *ड) यापैकी नाही.*

२. निश्चित केलेले ध्येय साध्य करण्यासाठी कार्य करण्याची पध्दत म्हणजे काय?

*अ) प्रक्रिया   ब) आराखडा   क) उद्देश   ड) नियोजन.*

३. सन १९६३ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेने कोणत्या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते.

*अ) ग्लोबल वार्मिंग   ब) गोलमेज परिषद*

*क) प्रवास व पर्यटन   ड) यापैकी नाही.*

४. खालीलपैकी कोणती पर्यटन नियोजनाची प्रक्रिया नाही.

*अ) उद्दिष्ट्ये निश्चितीकरण   ब) क्षेत्रीय नियोजन*

*क) मुलभूत सुविधा   ड) सांस्कृतिक कार्यक्रम.*

५. खालीलपैकी कोणत्या अभ्यासकाने पर्यटनाच्या नियोजनाची तत्त्वे सांगितली होती.

*अ) मॅकिन्डर   ब) कु. सेंपल   क) हंम्बोल्ट   ड) पिटर.*

## १.३ सारांश

भारतातील पर्यटन उद्योग अनेक टप्प्यांतून गेलेला आहे. फार प्राचीन काळापासून भारतात प्रवास केला जात आहे. प्राचीन काळी भूप्रदेशाची माहिती मिळविण्यासाठी प्रवास झाला. त्यानंतर व्यापाराच्या उद्देशाने कांही काळ प्रवास झाला. नंतरच्या काळात धर्मप्रसारासाठी प्रवास करण्यात आला. हळूहळू देशात सुरक्षित मार्ग व निवासाच्या सोयी करण्यात आल्या. १५व्या शतकानंतरचा प्रवास हा मोठ्या प्रमाणावर धार्मिक कारणासाठी व व्यापारासाठी करण्यात आला.

ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी थंड हवेची ठिकाणी शोधली व तेथे निवासालये बांधली. खऱ्या अर्थाने भाताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच देशात प्रवास आणि पर्यटनाची सुरवात झाली. सार्जंट समितीने आपला अहवाल १९४६ मध्ये सादर केल्यानंतर भारतातील आधुनिक पर्यटनाची सुरवात झाली.

नंतरच्या काळात भारत सरकारने जाणीवपूर्वक पर्यटन विकासाचा देशात प्रयत्न केला. विविध पंचवार्षिक योजनांमध्ये आर्थिक तरतूद करून देशातील पर्यटन विकासाला चालना दिली. देशातील प्राकृतिक रचना, लोकजीवन, प्राचीन संस्कृती, अनेक धर्मियांची धार्मिक ठिकाणे, ऐतिहासिक ठिकाणे, निसर्गरम्य पर्यटनस्थळे या सर्वांचा देशातील पर्यटन विकासामध्ये मोलाचा वाटा आहे. आज जागतिक स्पर्धेत पर्यटनातील नवीन कलानुसार आणि पर्यटकांच्या आवडी-निवडीनुसार पर्यटन व्यवसायात बदल केला जात आहे. आज भारताला पर्यटन व्यवसायातून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन, रोजगार,

प्रादेशिक विकास इ. अनेक फायदे झालेले आहेत. सरकार पर्यटनाच्या विकासासाठी जाणीवपूर्वक व अग्रक्रम देवून प्रयत्न करत आहे. भारताला पर्यटन व्यवसायात फार मोठे भवितव्य आहे.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१. *क) व्यापारासाठी.*

२. *क) ३००० वर्षापूर्वी.*

३. *ब) १४०० मैल.*

४. *क) मार्कोपोलो.*

५. *क) मिंग टी.*

६. *ब) कौटिल्य.*

७. *क) ब्रिटिश.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. *क) जवाहरलाल नेहरू.*

२. *अ) सार्जंट.*

३. *ब) १९४६*

४. *क) १९६३.*

५. *क) १९६६.*

६. *ड) १९४९.*

७. *ड) १९५८.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

१. *क) नियोजनामुळे.*

२. *ड) नियोजन.*

३. *क) प्रवास व पर्यटन.*

४. *ड) सांस्कृतिक कार्यक्रम.*

५. *ड) पिटर.*

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

### ❑ दीर्घोत्तरी प्रश्न.

१. भारतातील पर्यटन व्यवसायाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगा.

२. आधुनिक काळातील भारतातील पर्यटन विकासाचा आढावा घ्या.

३. भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना उद्देश व कार्ये सांगा.

४. भारतातील पर्यटन नियोजनाची सविस्तर माहिती द्या.

### ❑ टिपा लिहा.

१. सार्जंट समिती.

२. भारतीय पर्यटन मंत्रालयाची कार्ये.

३. भारतीय पर्यटन विकास महामंडळ.

४. पर्यटन नियोजनाची प्रक्रिया.

५. पर्यटन नियोजनाचे प्रकार.

६. ९व्या पंचवार्षिक योजनेचे वर्णन करा.

७. पर्यटन व गरीबी निर्मूलन.

८. पर्यटन व प्रादेशिक विकास.

## १.६ क्षेत्रीय कार्य

१. विद्यार्थ्यांनी आपल्या नजीकच्या पर्यटन स्थळाला भेट देऊन त्याच्या विकासाचा अभ्यास करावा.

२. विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील सुप्त पर्यटन स्थळांची माहिती गोळा करून त्याच्या विकासासाठी उपाय सुचवावेत व त्यावर अहवाल तयार करावा.

३. पर्यटन विकासासाठी जबाबदार असणाऱ्या घटकांची यादी तयार करून त्यावर एक प्रकल्प सादर करावा.

४. पर्यटन प्रक्रियेतील मुद्यांची पर्यटन स्थळी पडताळणी करून पहावी.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. **डॉ. एस. बी. शिंदे** : *'पर्यटन भूगोल'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. **प्रा. के. ए. खतीब** : *'पर्यटन भूगोल'*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३. **प्रा. अ. वि. भागवत** : *'पर्यटन भूगोल'*, अश्वमेध प्रकाशन, पुणे.

४. **A. K. Raina & S. K. Agarwal** : *"Tourism Development"*, Sarup & Sons, New Delhi.

५. **N. Jayapalan** : *"An Introduction to Tourism"*, Atlantic Publishers, Delhi.

६. **संपादक मंडळ** : *'पर्यटन भूगोल', दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

७. **G. S. Batra** : *'Tourism in the 21st Century'.*

८. **K. K. Shrivastava** : *'Tourism in India'.*


❑❑❑

सत्र-४ : घटक-२

# भारतातील पर्यटन स्थळे

## (Tourism Centers in India)

अनुक्रमणिका


२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

 २.३.१ भारतातील नैसर्गिक पर्यटन स्थळे

 २.३.२ भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे

 २.३.३ भारतातील सांस्कृतिक पर्यटन स्थळे

 २.३.४ भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे

२.४ सारांश

२.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ क्षेत्रीय कार्य

२.९ अधिक वाचनासाठी संदर्भ


## २.१ उद्दिष्ट्ये

खालीलप्रमाणे भारतातील पर्यटन स्थळांच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये आहेत.

अ) भारतातील पर्यटन प्रकारानुसार पर्यटन स्थळांची ओळख करून घेता येईल.

ब) भारतातील नैसर्गिक पर्यटन स्थळांची माहिती मिळू शकेल.

क) भारतातील धार्मिक पर्यटनाविषयी ओळख होईल.

ड) भारतातील सांस्कृतिक पर्यटनाविषयी ओळख होईल.

इ) भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांची माहिती होईल.

## २.२ प्रास्ताविक

भारतातील पर्यटनाच्या विकासातील महत्वाचा कालखंड म्हणून स्वातंत्र्योत्तर कालखंड मानला जातो. वैविध्यपूर्ण निसर्ग व सांस्कृतिक वैभव हे भारताचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. या सर्व घटकांना उजाळा देण्याचे महत्वपूर्ण कार्य हे पर्यटनाने केले आहे. भारतातील भौगोलिक विविधतेतून सर्व संपन्न अशी विविध पर्यटन स्थळे निर्माण झाली आहेत. अर्थात त्यामध्ये थंड हवेची स्थळे, अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने, सरोवरे, तळी, नद्या, धबधबे, बेटे, इत्यादी पर्यटन स्थळांचा समावेश होतो. त्याचबरोबर भारतात ऐतिहासिक काळापासून जगाच्या विविध भागातून आलेल्या वेगवेगळ्या धार्मिक व सांस्कृतिक घटकांच्या विकासातून अनेक धर्माची धार्मिक व सांस्कृतिक स्थळे निर्माण झाली आहेत. अशी ठिकाणे आज पर्यटनाची केंद्रे होऊ पाहत आहेत. भारताने प्राचीन काळापासून जे बदल पाहिले त्या बदलांच्या खुणा म्हणजेच ऐतिहासिक वैशिष्ट्ये होत. भारताच्या वैभवशाली इतिहासाला जाणून घेण्यासाठी ऐतिहासिक ठिकाणांना भेट देणे क्रमप्राप्त ठरते. म्हणूनच या घटकामध्ये भारताचे नैसर्गिक, धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक वैभव पर्यटन स्थळांच्या स्वरुपात मांडण्यात आले आहे.

## २.३ विषय विवेचन

### २.३.१ भौगोलिक पर्यटन स्थळे

भारतात विविध प्रकारची भूरचना, हवामान, प्राणी, वनस्पती व साधनसंपत्ती आढळते. जगातील सर्वात उंच हिमालय पर्वत, गंगेचे विस्तीर्ण मैदान, विविधतेने नटलेले द्वीपकल्पीय पठार, वायव्य दिशेकडे पसरलेले विस्तीर्ण असे थर वाळवंट, रमणीय पश्चिम व पूर्व किनारपट्टी, सागरी बेटे अश्या नैसर्गिक वैशिष्ट्यांची उधळण झालेली दिसून येते. हे भौगोलिक घटक परदेशी तसेच अंतर्गत पर्यटकांना साद घालत आहेत. पर्यटक इतर पर्यटन प्रकारापेक्षा भौगोलिक पर्यटन स्थळांना जास्त महत्व देतो. त्यादृष्टीने खालीलप्रमाणे भारतातील भौगोलिक पर्यटन स्थळांची मांडणी करण्यात आली आहे.

#### २.३.१.१ थंड हवेची ठिकाणे (Hill Stations) :-

भारतात पर्वतीय प्रदेशातील जास्त उंचीवरील थंड हवेची ठिकाणे हि ब्रिटीश काळापासून ओळखली जातात. समशीतोष्ण कटिबंधातील हवामानासारखी स्थिती ब्रिटिशांना या ठिकाणी दिसल्याने त्यांनी उष्ण ऋतुमान काळात राज्यकारभार थंड हवेच्या ठिकाणी स्थलांतरित केला. या काळात अनेक ब्रिटीश अधिकाऱ्यानी पर्यटन स्थळांचा शोध घेतला या पर्यटन स्थळांना आज लाखोंच्या संख्येने पर्यटक भेटी देताना दिसतात. उंच पर्वतशिखरे, घनदाट वने, खोल दऱ्या, थंड हवामान, नागमोड्या वळणाचे रस्ते, खळखळणाऱ्या नद्या व विस्तीर्ण सरोवरे अशी अनेक वैशिष्ठ्ये थंड हवेच्या ठिकाणी पहावयास

मिळतात. भारतात हिमालय पर्वत व द्वीपकल्पीय पर्वतीय प्रदेशात थंड हवेची पर्यटन स्थळे पसरली आहेत. हिमालयीन गिरिस्थाने हि सुचीपर्णी वने, बर्फाच्छादित शिखरे, खोल दऱ्या इत्यादी वैशिष्ट्यांनी नटली आहेत. तर द्वीपकल्पीय प्रदेशात विषुववृत्तीय प्रकारच्या वनांनी व्याप्त गिरिस्थाने दिसून येतात. अश्या भारतातील विविधतापूर्ण थंड हवेच्या पर्यटन स्थळांची माहिती पुढीलप्रमाणे.

### १. शिमला (Shimla) :-

हिमाचल प्रदेशातील राजधानीचे व पर्यटकांनी गजबजलेले महत्वाचे थंड हवेचे ठिकाण म्हणून शिमला ओळखले जाते. टेकड्यांवर वसलेली टुमदार घरे, इमारती, वळणदार रस्ते, सुचीपर्णी झाडे, रेल्वे स्टेशन इत्यादी वैशिष्टे या ठिकाणी दिसून येतात. पर्यटकांना उन्हाळा व हिवाळ्यात वेगवेगळ्या प्रकारे पर्यटनाचा आस्वाद घेता येतो. येथे प्रमुख शहरापासून काही अंतरावर असणारी कुफरी, नालदेहरा व तातापानी हि आकर्षणाची ठिकाणे आहेत. तर जाखू हिल्स, समर हिल्स, तारादेवी मंदिर, राष्ट्रपती निवास इत्यादी शिमल्यातील महत्वाची ठिकाणे आहेत. घोडेस्वारी व साहसी खेळ हि येथील पर्यटकांसाठी पर्वणीच म्हणून मानली जाते.

### २. मनाली (Manali) :-

शिमलापासून २५० किमी अंतरावर मनाली हे थंड हवेचे ठिकाण कुल्लू खोऱ्यात वसले आहे. सुचीपर्णी झाडांच्या दाट वनांनी वेढलेले हे ठिकाण अनेक प्रेक्षणीय स्थळांसाठी प्रसिद्ध आहे. त्यामध्ये हडीम्बा देवी मंदिर, मनकर्णिका मंदिर, वशिष्ठ मंदिर येथील गरम पाण्याचे झरे, इत्यादीचा समावेश होतो. तर मानली पासून उत्तरेस ५० किमी अंतरावर रोहतांग हि खिंड ४००० मी. उंचीवरील हिमाच्छादित ठिकाण आहे. मनाली मध्ये सफरचंदाच्या बागा तसेच बियास नदीमध्ये राफ्टींग हा खेळ प्रसिद्ध आहे.

### ३. मसुरी (Masuri) :-

मसुरी हे गिरीस्थान उत्तराखंड राज्यातील प्रसिद्ध रमणीय पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते. देहराडून पासून ३० किमी अंतरावर हे ठिकाण वसले असून सर्व बाजूनी हिमाच्छादित शिखरांनी वेढले आहे. ब्रिटीश अधिकारी कॅप्टन यंग यांनी हे शहर वसवले आहे. या ठिकाणी गनहिल, लाल तिब्बा, केम्टी फॉल्स, मॉल रोड हि प्रसिद्ध स्थळे आहेत.

### ४. दार्जिलिंग (Darjiling) :-

पश्चिम बंगालमधील उत्तरेकडील ब्रिटीश काळातील गिरीस्थान म्हणून दार्जिलिंग प्रसिद्ध आहे. या ठिकाणी टॉय ट्रेन च्या सहाय्याने नयनरम्य निसर्ग अनुभवत पोहचता येते. येथे टायगर हिल, पद्मजा नायडू

झू, पीस पॅगोडा, हिमालयन मौन्टेनियरिंग संस्था, बुद्धिस्ट टेम्पल प्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळे आहेत. दार्जिलिंगचे चहाचे मळे हे एक वैशिष्ट्य आहे.

### ५. **श्रीनगर** (Shrinagar) :-

जम्मू काश्मीर मधील उन्हाळी राजधानीचे ठिकाण म्हणून श्रीनगरची ओळख आहे. श्रीनगरवर दीर्घकाळ मुघलांची राजवट असल्याने येथील बगिच्यांची नावे मुघल गार्डन म्हणून ओळखली जातात. झेलम नदीच्या तीरावरील व दल आणि नगिन सरोवरांनी वेढलेले श्रीनगर आकर्षक वाटते. गुलमर्ग हे श्रीनगर जवळील हिवाळी पर्यटन स्थळ आहे. येथील निशात बाग येथे हजरतबागला इस्लाम धर्म संस्थापक मोहम्मद पैगंबर यांचा केस ठेवला आहे.

### ६. **माउंट अबू (Mount Abu) :-**

राजस्थानमधील अरवली पर्वतातील प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण म्हणून माउंट अबूची ओळख आहे. येथे नखी सरोवर तसेच मध्ययुगीन काळातील संगमरवरी दिलवारा जैन मंदिरे प्रसिद्ध आहेत. उदयपुर पर्यंत हवाई मार्गाने येऊन माउंट अबूला रस्त्याने जाता येते. येथील नखी सरोवर उंचीवरील सरोवर म्हणून ओळखले जाते.

### ७. **उटी (Ooty) :-**

उत्तर तामिळनाडू मधील या ठिकाणास ‘दि क्विन ऑफ हिल स्टेशन्स’ असे संबोधले जाते. हे ठिकाण उदगमंडलम या नावानेही ओळखले जाते. या ठिकाणाची समुद्रसपाटीपासून उंची २२४० मी. इतकी आहे. येथील बॉटनिकल गार्डन, उटी लेक, चहाचे मळे, चहा निर्मिती कारखाना व दक्षिण भारतातील दुसरे सर्वात उंच शिखर दोडाबेटटा (२६३७ मी.) हि प्रमुख प्रेक्षणीय स्थळे आहेत. हे ठिकाण तामिळनाडू, कर्नाटक व केरळ राज्यांशी रस्त्याने जोडले आहे.

### ८. **कोडाईकॅनाल (Kodaikanol) :-**

तमिळनाडूतील दक्षिणेकडील अन्नामलाई टेकड्यात २३०० मी. उंचीवर वसलेले हे एक प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण आहे. येथे सरोवर, चहाचे मळे, सिल्वर कास्केड धबधबा हि वैशिष्टे आहेत.

### ९. **इतर ठिकाणे (Other Places) :-**

याव्यतिरिक्त भारतात नैनिताल, पहलगाम, लेह, कुन्नूर, मुन्नार, माथेरान, महाबळेश्वर, आंबोली इत्यादी थंड हवेची पर्यटन स्थळे आहेत.

## २.३.१.२ अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने (Sanctuaries and National Parks) :-

भारत देश हा विविधतेने नटल्याने येथे भूपृष्ठरचना व हवामान या घटकामुळे नैसर्गिक वनस्पती व प्राण्यामध्ये विविधता आढळते. भारतात जगाच्या २.४ टक्के जमिनीवर ८.८६ टक्के सर्व प्रकारच्या प्रजाती आढळतात. वनस्पतींच्या ४५००० पेक्षा जास्त तर प्राण्यांच्या ९१००० पेक्षा जास्त प्रजाती भारतात आढळतात. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून प्राण्यांची शिकार व वृक्षतोड यामुळे अनेक प्राणी-वनस्पती प्रजाती भारतातून नामशेष झाल्या. त्यामुळे यापासून बचाव करण्यासाठी देशात अभयारण्य व राष्ट्रीय उद्याने संकल्पनेच्या आधारे प्राणी व वनस्पतीना संरक्षण व संवर्धन देण्याचे ठरले. त्यानुसार भारतात आजपर्यंत ७३३ संरक्षित क्षेत्रे असून त्यामध्ये १०३ राष्ट्रीय उद्याने व ५३७ अभयारण्ये आहेत. आफ्रिकेमध्ये वनपर्यटनाच्या झालेल्या विकासामुळे भारतातही अश्या प्रकारचे पर्यटन वाढवण्यावर भर देण्यात आलेला आहे. आज भारतात महत्वाचे वनविभाग हे पर्यटनदृष्ट्या विकसित झाले आहेत. पर्यटनाच्या बाबतीत महत्वाची अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने खालीप्रमाणे आहेत.

### १. **जीम कोर्बेट राष्ट्रीय उद्यान** (Jim Corbett National Park) :-

उत्तराखंड राज्यातील नैनिताल व गढवाल जिल्ह्यात पसरलेले हे राष्ट्रीय उद्यान भारतातील पहिले राष्ट्रीय उद्यान आहे. याची स्थापना १९३६ मध्ये झाली. हे वन वाघांना संरक्षण देण्याच्या हेतूने विकसित केले आहे. हे राष्ट्रीय उद्यान ५२१ चौ.किमी क्षेत्रात पसरले आहे. येथे ४०० मी. ते १२०० मी. पर्यंतच्या भूपृष्ठ उंचीमुळे वनस्पती व प्राण्यांमध्ये विविधता आढळते. साल, हळदू, पिंपळ, रोहिणी, आंबा तसेच उंचीवरील भागात पाईन वृक्षाची झाडे आढळतात. या वनात इकोटूरीजम (Ecotourism) व वनसफारीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. येथे हत्ती, वाघ, बिबट्या, वनमांजर, हरीण, काळवीट, सांबर, चितळ, काळे अस्वल, लांडगा, कोल्हा, मोर इत्यादी पशुपक्षी आढळतात.

### २. **काझीरंगा राष्ट्रीय उद्यान** (Kaziranga National Park) :-

हे राष्ट्रीय उद्यान आसाम मधील ब्रम्हपुत्रा नदीच्या किनाऱ्यावर आढळते. हे राष्ट्रीय उद्यान दुर्मिळ व नामशेष होत असलेल्या एक शिंगी गेंड्यासाठी प्रसिद्ध आहे. दलदलयुक्त उंच गवताळ प्रदेशात हत्ती, वाघ, बिबट्या, हरीण, काळवीट, सांबर, चितळ, अस्वल, विविध जातीचे सर्प इत्यादी सजीव आढळतात.

### ३. **मानस राष्ट्रीय उद्यान** (Manas National Park) :-

हे आसाममधील दुसरे राष्ट्रीय उद्यान असून ९५० चौ. किमी. क्षेत्रात पसरले आहे. या क्षेत्रास युनेस्को कडून नैसर्गिक वारसा पर्यटन स्थळाचा मान मिळाला आहे. तर या क्षेत्रात हत्ती व वाघ या

प्राण्यांचे संरक्षण व संवर्धनाबाबतीत प्रयत्न केले जात आहेत. १९९० साली या राष्ट्रीय उद्यानाची सुरुवात झाली. हे उद्यान लहान मोठ्या टेकड्यांवर वसलेले असून निमसदाहरित व सदाहरित वनस्पतींनी व्यापले आहे.  येथे हत्ती व वाघाव्यतिरिक्त एकशिंगी गेंडे, सोनेरी माकड, रानरेडा, डुक्कर, हरीण इत्यादी प्राणी आढळतात.

४. **सुंदरबन राष्ट्रीय उद्यान** (Sundarban National Park) :-

हे राष्ट्रीय उद्यान पश्चिम बंगाल राज्यात १३३० चौ. किमी. प्रदेशात वसलेले असून दलदलयुक्त गंगा नदीच्या त्रिभुज प्रदेशात पसरले आहे. या वनाचा सर्व भाग मॅनग्रुव्ह प्रकारच्या वनस्पतींनी व्यापला आहे. येथे रॉयल बेंगाल वाघाला संरक्षण दिले आहे. या प्रदेशात हरीण, चितळ, सांबर, मगर मोठ्या प्रमाणावर आढळतात. या ठिकाणी जंगलसफारी पाण्यातूनच करावी लागते. डिसेंबर ते फेब्रुवारी या महिन्यांमध्ये येथे भेट देण्यास उत्तम मानले जाते.

५. **पालामाऊ राष्ट्रीय उद्यान** (Palamau National Park) :-

झारखंड राज्यातील हे राष्ट्रीय उद्यान ११२९ चौ. किमी. प्रदेशात पसरले असून राज्यातील एकमेव वाघासाठी राखीव म्हणून ओळखले जाते. याव्यतिरिक्त येथे बिबट्या, अस्वल, चितळ, हरीण, नीलगाय, सांबर, डुक्कर इत्यादी प्राणी आढळतात. या उद्यानास बेतला या नावाने ओळखतात.

६. **रणथम्बोर राष्ट्रीय उद्यान** (Ranthambor National Park) :-

हे राजस्थानमधील वाघासाठी संरक्षित केलेले राष्ट्रीय उद्यान आहे. याचे क्षेत्रफळ १३३४ चौ. किमी. इतके असून या ठिकाणी वाघांना अनेक ठिकाणाहून आणून संरक्षण दिले आहे. सवाई माधोपुर जिल्ह्यात हे उद्यान पसरले आहे. जयपूर पासून १३० किमीवर रणथम्बोर राष्ट्रीय उद्यान आहे. जयपूरच्या महाराजांचे हे एकेकाळी शिकारीचे ठिकाण म्हणून ओळखले जात होते. येथील ओबडधोबड भूपृष्ठरचनेमुळे व पानझडी वाणामुळे याचे वैभव वाढते.

७. **गीर राष्ट्रीय उद्यान** (Gir National Park) :-

हे गुजरातमधील लुप्त होत चाललेल्या आशियाई सिंहांसाठी असलेले एकमेव राष्ट्रीय उद्यान असून ते पश्चिमेकडील गिरनार पर्वतीय प्रदेशात आहे. याचे क्षेत्रफळ १४१२ चौ. किमी. इतके आहे. १९६५ रोजी एक अभयारण्य म्हणून स्थापन झालेल्या या उद्यानात बिबट्या, तरस, जंगली मांजर, कोल्हा, मुंगूस, साळींदर, चितळ, सांबर, नीलगाय, मगर, इत्यादी प्राणी आढळतात. पर्यटनदृष्ट्या हे ठिकाण प्रसिद्ध मानले जाते.

## ८. केओलदेव राष्ट्रीय उद्यान (भरतपूर) (Keoldev National Park) :-

हे भारतातील प्रसिद्ध पक्षी अभयारण्य म्हणून ओळखले जाते. राजस्थानमधील भरतपूर शहराजवळ असलेले हे उद्यान १९७१ मध्ये संरक्षित करण्यात आले. या ठिकाणी ३६६ पेक्षा जास्त पक्ष्यांच्या प्रजाती आढळतात. हे उद्यान २९ चौ. किमी. क्षेत्रात वसलेले आहे. दरवर्षी हजारोंच्या संख्येने वाटरफावुल प्रकरचे पक्षी येथे स्थलांतर करतात. दलदल युक्त गवताळ प्रदेश हे या वनाचे वैशिष्ट्य आहे.

## ९. नागार्जुनसागर राष्ट्रीय उद्यान (Nagarjunsagar National Park) :-

हे भारतातील सर्वात मोठे वाघांसाठी राखीव संरक्षित उद्यान म्हणून ओळखले जाते. याचे क्षेत्रफळ ३७२८ चौ. किमी. इतके असून आंध्रप्रदेशातील कृष्णा नदीवरील नागार्जुनसागर धरण प्रकल्पावरून हे नाव देण्यात आले आहे. याची स्थापना १९७८ या वर्षी झाली. येथे रॉयल बेंगाल वाघ, बिबट्या, अस्वल, चितळ, सांबर, इत्यादी. प्राणी आढळतात.

## १०. इतर राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये (Other National Parks and Sanctuaries) :-

भारतात वरील वनाव्यतिरिक्त कर्नाटक दक्षिण सीमेवरील बांदीपूर राष्ट्रीय उद्यान, तामिळनाडू राज्यातील मदुमलाई राष्ट्रीय उद्यान व केरळ मधील पेरियार राष्ट्रीय उद्यान ही प्रमुख मानली जातात. महाराष्ट्रातील राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये ही पुढील घटकामध्ये विस्तृतपणे मांडण्यात आली आहेत.

भारतात मान्सून पर्जन्य काळ हा जून ते सप्टेंबर महिन्यांमध्ये असल्याने या काळात राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये बंद असतात. इतर काळात वर्षभर ही वने पर्यटकांसाठी खुली राहतात.

# २.३.१.३ पुळणी (बीच) पर्यटन स्थळे (Beaches) :-

समुद्र किनाऱ्यावर झालेल्या वाळूच्या संचयन क्रियेपासून पुळणी तयार होतात. पर्यटन व्यवसायातील महत्वाचा घटक म्हणून बीच पर्यटनास ओळखले जाते. शुभ्र वाळूचे विस्तृत संचयन, अथांग समुद्र, नारळ व पोफळीच्या बागा, स्वच्छ सूर्यप्रकाश हे दृश्य ज्या समुद्र किनाऱ्यावर दिसते तो किनारा बीच पर्यटनात प्रसिध्द होतो. भारताला ७५१६ किमी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. पश्चिमेकडील समुद्र किनारा पर्यटन दृष्ट्या प्रसिद्ध मानला जातो. तर पूर्वेकडील समुद्र किनारा हा विस्तृत आणि रुंद मानला जातो. पुढीलप्रमाणे बीचेसची माहिती सांगता येईल.

## १. अरबी समुद्रकिनाऱ्यावरील पुळणी (बीचेस) (Beaches on -rabian Sea Coast) :-

जगातील सुप्रसिद्ध पर्यटन स्थळांच्या यादीत अरबी समुद्रकिनाऱ्यावरील बीचेसची गणना होते. पुढीलप्रमाणे बीचेस सांगता येतील.

अ) **गोवा** (Goa) :-

गोवा राज्यात आंतरराष्ट्रीय पर्यटनाचा सर्वाधिक विकास झाला आहे. यामध्ये बीचेसचा मोठा सहभाग आहे. कलंगुट, बागा, कोलवा, मिरामार, बायना, अंजुना इत्यादी बीचेस हे परदेशी तसेच देशांतर्गत पर्यटकांचे आकर्षण बनले आहेत. भारतात सर्वाधिक बीच पर्यटनाचा विकास झालेले राज्य म्हणून गोव्याला मान मिळाला आहे.

ब) **केरळ** (Kerala) :-

केरळला भारताचा स्वर्ग मानले जाते. या राज्यात पश्चिम किनारपट्टीवरील प्रसिद्ध बीचेस (पुळणी) पैकी कोवालम व अलेप्पी हे प्रेक्षणीय मानले जातात. अलेप्पी बीच हा पूर्वेकडील व्हेनिस म्हणून ओळखला जातो. केरळ मधील समुद्रकिनाऱ्यांचे सर्वात महत्वाचे वैशिष्ठ म्हणजे येथील खाजणे. याच्या सभोवताली गर्द वनराई असल्याने विविध प्राण्यांचे दर्शन आपल्याला होते.

क) **इतर बीचेस** (Other Beaches) :-

वरील राज्यांव्यतिरिक्त महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात काही प्रसिद्ध बीचेस/ पुळणी आढळतात. पुढे महाराष्ट्राबाबत विस्तृत चर्चा करताना बीचेसचा आढावा घेणार आहोत. कर्नाटक राज्यात गोकर्ण, कारवार, मुरडेश्वर, मंगलोर हे प्रसिद्ध बीच आहेत. परंतु गोवा हे बीच पर्यटनात प्रसिद्ध राज्य उत्तरेस असल्याने कर्नाटकात फारसा विकास झालेला नाही.

२. **बंगालच्या उपसागर किनाऱ्यावरील पुळणी (बीचेस)** (Beaches on Bay of Bengal Coast) :-

भारताला पूर्वेकडील लाभलेला विस्तृत व रुंद समुद्र किनारा म्हणून बंगालच्या उपसागराचा पूर्व किनारा ओळखला जातो. या किनाऱ्यावरील बीचेस पुढीलप्रमाणे सांगता येतील.

अ) **पश्चिम बंगाल** (West Bengal) :-

पश्चिम बंगाल राज्यातील पूर्वेकडील किनारा गंगा नदीच्या हुगळी या वितरिकेने व्यापला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गाळ व चिखलयुक्त प्रदेश तसेच सुंदरबनच्या दाट वनाचा तयार झाल्याने पश्चिमेकडील मांडरमणी, शंकरपूर व दिघा बीच हे प्रसिध्द मानले जातात. पूर्व किनाऱ्यावरील राज्यांच्या तुलनेत हे बीच विकसित झालेले नाहीत.

ब) **ओरिसा** (Odissa) :-

बीच पर्यटनात ओरिसा हे राज्य विकसित मानले जाते. येथे चांदीपूर, तलसारी, डागरा, गोपालपूर,

पुरी, कोणार्क, इत्यादी प्रसिद्ध बीचेस आढळतात. यापैकी तलसारी आणि पुरी हे परदेशी पर्यटकांसाठी आकर्षण ठरले आहेत. कोणार्क मध्ये जगप्रसिद्ध सूर्यमंदिर असून शेजारी सुंदर बीच पसरला आहे.

**क) आंध्रप्रदेश** (Andhra Pradesh) :-

आंध्रप्रदेशात श्रीकाकुलम, सुर्यलंका, मायपाड, यारडा, रामकृष्ण, पेरुपलेम,रुशिकोंडा, कृष्णपटणम, कोडूरू, कोठा, भिम्ली इत्यादी बीच आढळतात. यापैकी बहुतांश बीचेसला परदेशी पर्यटक भेटी देतात.

**ड) तामिळनाडू** (Tamil Nadu) :-

तामिळनाडू राज्यातील चेन्नईमधील मरीना बीच हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात लांब नागरी बीच म्हणून ओळखला जातो. याची लांबी १३ किमी. इतकी आहे. तसेच याच्या शेजारी पार्थसारथी, स्वामी विवेकानंदांचे घर, चर्च, चेन्नई लाईट हाउस, म्युझियम इत्यादी इतर आकर्षणाची केंद्रे आहेत. याचबरोबर महाबलीपुरम, कन्याकुमारी, धनुष्कोडी, एडवर्ड इलियट, सिल्व्हर, वेलणकन्नी, थिरूवल्लूर, व्हाईट, फ्रेंच इत्यादी बीचेस (पुळणी) पर्यटकांनी फुलून गेलेली आढळतात.

## २.३.१.४ बेटांची पर्यटन स्थळे (Island Tourist Centres) :-

भारतात एकूण १२०८ बेटे असून त्यापैकी अरबी समुद्रात आणि बंगालच्या उपसागरात ही बेटे आहेत. अरबी समुद्रातील लक्षद्वीप बेटांचा समूह ज्यात मिनिकॉय, अमनदीव या बेटांचाही समावेश होतो. बेटे हि समुद्रकिनाऱ्यासारखी नयनरम्य, वनानी व्याप्त, अलिप्त असतात. खालीलप्रमाणे बेटांचे विभाजन करता येईल.

**१. अंदमान आणि निकोबार बेटे** (Andaman and Nicobar Islands) :-

या ५७२ बेटांच्या समूहापैकी ३७ बेटांवर लोकवस्ती आहे. येथे स्वराज बीच, राधानगर बीच, नेताजी सुभाषचंद्र बोस बेटे, चिडिया टापू बीच, बरतंग खाडी व ज्वालामुखी, माउंट हेरीएट राष्ट्रीय उद्यान, महात्मा गांधी सागरी राष्ट्रीय उद्यान इत्यादी आकर्षणे देशांतर्गत व परदेशी पर्यटकांना खुणावतात.

**२. लक्षद्वीप बेटे** (Lakshadweep Islands) :-

एकूण ३९ बेटांनी बनलेल्या या द्वीपसमूहाची निर्मिती प्रवाळ कीटकांच्या संचयन क्रियेतून झाली आहे. यातील प्रवाळ बेटांचे बरेचसे भाग अटोल (Atoll) प्रकारचे आहेत. या द्वीपसमूहापैकी १७ बेटांवर लोकवस्ती आहे. येथे अगात्ती, बंगरम अटोल (Atoll), कडमत बेट, कल्पेणी बीच व स्कुबा डायविंग, लक्षद्वीप बीच, मिनीकॉय बीच इत्यादी पर्यटकांची आकर्षणे आहेत.

### ३. **इतर बेटे** (Other Islands) :-

वरील बेटांच्या समूहाव्यतिरिक्त केरळमधील मनरो बेट, आसाम मधील जगातील सर्वात मोठे नदीतील बेट माजुली, कर्नाटक मधील सेंट मेरीज बेटे, मुंबई मधील एलिफंटा बेटे, तामिळनाडू मधील रामेश्वरम बेट, दीव बेट, गोवा मधील ग्रांड आयलंड इत्यादी बेटे पर्यटकांना खुणावतात.

## २.३.१.५ तळी व सरोवरे (Ponds and Lakes) :-

भारतात संयुक्त संस्थाने मधील पंचमहासरोवरांच्या इतकी मोठी सरोवरे लाभली नसली तरी काही सरोवरे पर्यटकांची आकर्षणाची केंद्रे बनली आहेत. ज्या प्रकारे पर्यटक बीचेस, थंड हवेची ठिकाणे यांना पसंती देतो तशी सरोवरे आकर्षित करू शकत नाहीत. कारण भारतात पर्यटनाच्या नवीन संकल्पना अद्याप रुजल्या नाहीत. त्यामुळे तळी आणि सरोवरे याठिकाणी इतर पर्यटनाची केंद्रे असतील तर त्यांची प्रसिद्धी होते. या ठिकाणी पर्यटकांना नौकाविहार, पोहणे, किनाऱ्यावर तंबू ठोकणे, किनाऱ्याचे सौंदर्य पाहणे अशा अनेक कारणाने पर्यटनास पसंती देता येते. खालीलप्रमाणे भारतातील काही प्रमुख सरोवरांची पर्यटन स्थळे सांगता येतील.

### १. **दल सरोवर** (Dal Lake) :-

काश्मीर केंद्रशाषित प्रदेशाची राजधानी असलेल्या श्रीनगर मधील सुंदर सरोवर म्हणून दल सरोवर ओळखले जाते. या सरोवरामध्ये हाऊसबोटीच्या माध्यमातून पर्यटन व्यवसाय विकसित झाला आहे. यास 'लेक ऑफ फ्लॉवर्स' म्हटले जाते. याच्या शेजारी विविध मुघलकालीन बगीचे आहेत. हिवाळ्यात हे सरोवर गोठते.

### २. **पेंगोंग सरोवर** (Pengong Lake) :-

पेंगोंग हे लदाख या केंद्रशाषित प्रदेशातील महत्वाचे आणि प्रसिद्ध सरोवर मानले जाते. हे लेह पासून सीमाभागातून चीनमध्ये जाते. थ्री इडियट या हिंदी चित्रपटातून हे सरोवर लोकांच्या समोर आल्याने हल्ली या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देत आहेत. परिणामी येथे कचरा प्रदूषण वाढले आहे.

### ३. **नैनिताल सरोवर** (Nainital Lake) :-

हे सरोवर गोड्या पाण्याचे सरोवर म्हणून ओळखले जाते. हे नैनिताल या उत्तराखंड राज्यामधील थंड हवेच्या ठिकाणी असून ते डोळ्याच्या आकाराचे आहे. याव्यतिरिक्त येथे भीमताल, सुरताल, सिताताल, गरुड ताल अशी अनेक सरोवरे परिसरात आढळतात.

४.  **वेम्बनाड सरोवर** (Vembanad Lake) :-

केरळ मधील सर्वात मोठे सरोवर म्हणून वेम्बनाड सरोवर प्रसिद्ध आहे. या ठिकाणी दरवर्षी नेहरू ट्रॉफी बोट रेस अयोजीत केली जाते. या परिसरात कुमारकोम पक्षी अभयारण्य असल्याने पर्यटकांना पर्वणीच मानली जाते. या सरोवरात हाउसबोटी असल्याने वेगळ्या प्रकारे पर्यटनाचा आनंद लुटता येतो.

५.  **चिल्का सरोवर** (Chilka Lake) :-

चिल्का सरोवर हे ओरिसा राज्यातील पूर्व किनाऱ्यावर असून हे खाऱ्या पाण्याचे सरोवर म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी विविध प्रकारचे स्थलांतरित पक्षी येत असल्याने हे पक्षी निरीक्षकांसाठी आकर्षण ठरले आहे.

६.  **कोल्लेरू सरोवर** (Kolleru Lake) :-

कोलेरू सरोवर आंध्रप्रदेश राज्यात असून हे गोड्या पाण्याचे सरोवर म्हणून ओळखले जाते. हे गोदावरी आणि कृष्णा नद्यांच्या त्रिभुज प्रदेशात निर्माण झाले आहे. या सरोवरात चिल्का सरोवराप्रमाणे स्थलांतरित पक्षी मोठ्या संख्येने येतात.

७.  **पुलिकत सरोवर** (Pulikat Lake) :-

हे आंध्रप्रदेशातील महत्वाचे दुसरे सरोवर असून खाऱ्या पाण्याचे आहे. हे समुद्रकिनाऱ्याला समांतर असून येथे अनेक बेटे निर्माण झाली आहेत. मान्सून काळात या सरोवराला कलंगी आणि आरनी या दोन नद्या गोड्या पाण्याचा पुरवठा करतात.

८.  **पिचोला सरोवर** (Pichola Lake) :-

हे सरोवर राजस्थान मधील उदयपुर शहरात असून ते एक महत्वाचे पर्यटन स्थळ बनले आहे. जल मंदिर आणि जलनिवास या दोन राजवाड्यांमध्ये हॉटेल्स केल्याने लोकांना हि एक पर्वणीच झाली आहे.

९.  **सांभर सरोवर** (Sambhar Lake) :-

राजस्थान राज्यातील हे खाऱ्या पाण्याचे भारतातील सर्वात मोठे सरोवर असून येथे वेगवेगळ्या चित्रपटांचे शुटींग करण्यात आलेले आहे. पर्यटक येथे फ्लेमिंगो या स्थलांतरित पक्ष्याला पाहण्यास येतात.

१०. **इतर सरोवरे** (Other Lakes) :-

याव्यतिरिक्त पश्चिम बंगाल मधील रवींद्र व मिरी, आसाम मधील चान्दुबी, हफ्लोंग व सोन्बील, गुजरातमधील कंकरिया, थोल व सुरसागर, महराष्ट्रातील लोणार ही महत्वाची सरोवरांची पर्यटन स्थळे म्हणून ओळखली जातात.

## २.३.१.६ धबधबे (Waterfalls) :-

नदी मार्गात निर्माण झालेल्या नैसर्गिक कड्यामुळे धबधबे तयार होतात. भारतात धबधब्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देतात. उंचावरून कोसळणारे पाणी, उसळणारे तुषार, शेजारची हिरवळ, पाण्याचा मोठा ओघ बघून कोणालाही आकर्षण वाटेल. यामुळेच पर्यटकांना मान्सून काळातील महत्वाचे पर्यटन स्थळ म्हणून पर्यटक नियोजनात एक तरी धबधबा निवडून ठेवतात. भारतात बहुतांश धबधबे पावसाळी मानले जातात. त्यामुळे मान्सून काळात पर्यटनाचा पर्याय म्हणून धबधबे प्रमुख मानले जातात. खालीलप्रमाणे भारतातील महत्वाची धबधब्यांची पर्यटन स्थळे सांगता येतील.

### १. **जोग धबधबा** (Jog Waterfall) :-

हा कर्नाटकातील प्रसिद्ध धबधबा असून तो आशिया खंडातील सर्वात उंच धबधबा (२५३ मी.) म्हणून ओळखला जातो. हा शरावती नदीवर असून पश्चिमेकडे कोसळणारे पाणी दुपारनंतर तुषारातून इंद्रधनू तयार करते. धबधब्याच्या पायथ्याला जाने कठीण असून हा अनुभव घेण्यासाठी लोक देशभरातून येथे येतात.

### २. **दुधसागर धबधबा** (Dudhsagar Waterfall) :-

गोव्यातील बीचप्रमाणे पावसाळ्यानंतरचे महत्वाचे आकर्षण म्हणून मडगावपासून पूर्वेस ४६ किमी अंतरावर हा धबधबा ओळखला जातो. येथे ट्रेकिंग, रेल्वे अथवा रस्त्याने पोहचता येते. पावसाळ्यातील प्रचंड प्रवाह दुधाप्रमाणे भासतो म्हणून त्यावरून या धबधब्यास दूधसागर नाव मिळाले आहे.

### ३. **चित्रकुट धबधबा** (Chitrakote Waterfall) :-

हा छत्तीसगढ राज्यातील प्रसिद्ध धबधबा म्हणून ओळखला जातो. इंद्रावती नदीवरील हा धबधबा असून पावसाळ्यात येथे प्रचंड पाण्याचा प्रपात दिसतो. हा तीन प्रवाहांनी विभागला असून केवळ ३० मी. उंच पाण्याचा प्रवाह सुद्धा अजस्त्र वाटतो.

### ४. **मगोड धबधबा** (Magod Waterfall) :-

कर्नाटकातील जोग धबधब्यासोबत जवळपास २०० मी. उंचीवरून कोसळणारा येल्लापूर पासून १७ किमी अंतरावर आहे. हा धबधबा बघण्यासाठी डोंगररांगेतून चढण चढत जाऊन दरीमध्ये याचे विलोभनीय दृश्य पाहता येते.

### ५. **अथिरापल्ली धबधबा** (Athirapalli Waterfalls) :-

केरळ मधील सर्वात मोठा धबधबा म्हणून अथिरापल्ली नाव घेतले जाते. जून ते सप्टेंबर काळात

येथे शुभ्र पाण्याचा मोठा प्रवाह खाली पडताना विलोभनीय वाटतो. या प्रदेशात विविध पक्षी व प्राणी यांचा अधिवास असल्याने हि एक निसर्गप्रेमींना पर्वणीच मानली जाते. या ठिकाणी अनेक चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे.

६. **नोहकलीकाई धबधबा** (Nohkalikai Waterfall) :-

जगातील सर्वाधिक पर्जन्य प्रदेशातील मोठे आकर्षण म्हणून हा धबधबा ओळखला जातो. खडकाळ कड्यावरून पडणारे पाणी मान्सून काळात मोठ्या आवाजाने पडते. मेघालय राज्यातील एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणून हा धबधबा ओळखला जातो.

७. **इतर धबधबे** (Other Waterfalls) :-

वरील धबधब्यांच्या व्यतिरिक्त आंबोली, ठोसेघर, लिंगमाळा, सवतसडा, सडा-वाघापूर धबधबा (महाराष्ट्र), धुवाँधार व बहुती धबधबा (मध्यप्रदेश), भागसु धबधबा (हिमाचल प्रदेश) एलिफंटा धबधबा (मेघालय) इत्यादी धबधबे पर्यटकांनी फुलून जातात.

### ⁎ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ⁎

१. रोहतांग खिंड हे पर्यटन स्थळ कोणत्या थंड हवेच्या पर्यटन स्थळाचा भाग आहे?

*अ) शिमला ब) मसुरी क) मनाली ड) दार्जिलिंग.*

२. जम्मू काश्मीरची उन्हाळयाची राजधानी म्हणून कोणते थंड हवेचे ठिकाण ओळखले जाते?

*अ) दार्जिलिंग ब) नैनिताल क) जम्मू ड) श्रीनगर.*

३. भारतातील पाहिलं राष्ट्रीय उद्यान म्हणून कोणत्या उद्यानास ओळखले जाते?

*अ) रणथम्बोर ब) काझीरंगा क) जिम कोर्बेट ड) सुंदरबन.*

४. कोणते राष्ट्रीय उद्यान आशियाई सिंहासाठी प्रसिद्ध आहे?

*अ) नागार्जुनसागर ब) गीर क) ताडोबा ड) मानस.*

५. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात लांब बीच म्हणून खालीलपैकी कोणता बीच आहे?

*अ) शंकरपूर ब) बागा क) मरीना ड) अलेप्पी.*

## २.३.२ भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे

भारतात भौगोलिक पर्यटन स्थळांच्या विकासाबरोबर भारतीय संस्कृतीच्या इतिहासाचे साक्षीदार म्हणून धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे ओळखली जातात. भारतात विविध धर्मांच्या विविधतेमुळे

पर्यटनात धार्मिक ठिकाणांना वेगळे महत्व मिळाले आहे. खालीलप्रमाणे धार्मिक घटकांचे वर्गीकरण करता येईल.

## २.३.२.१ धार्मिक घटक (Religious Factors) :-

**१. मंदिरे** (Temples) :-

अध्यात्मिकता हि आंतरिक शांतीसाठी भारतात नाहीतर जगभर महत्वाची आहे. मध्ययुगीन काळापासून भारतात धार्मिक ठिकाणांना भेटी देणे एक पवित्र कार्य मानले जात आहे. हिंदू धर्मीय लोकसंख्या देशात सर्वाधिक असल्याने सर्वदूर मंदिरे असून त्यांची वेगवेगळी शिल्पकला दिसून येते. जन्मस्थळे, कुलदैवत, समाधीस्थळ, अष्टविनायक, ज्योतिर्लिंग, चारधाम, शक्तिपीठे, अशा वेगवेगळ्या रुपात मंदिरे देशभर धार्मिक पर्यटकांना आकर्षित करीत आहेत.

**२. दर्गाह व मशिदी** (Durgah and Masjid) :-

भारतात वेगवेगळी मुस्लीम संतांची तसेच अनेक पवित्र ठिकाणे असून या ठिकाणी मुस्लीम आणि इतर धर्मीय भाविक श्रद्धेने भेटी देतात. त्यामुळे दर्गे व मशिदी भारतभर पसरल्या आहेत. या ठिकाणी मोठ्या यात्रा व उरूस भरतात. शिल्पकलेचा उत्तम नमुना म्हणूनही हि ठिकाणे परदेशी पर्यटकांना आकर्षित करतात.

**३. गुरुद्वारा** (Gurudvara) :-

शीख धर्मीय भाविकांचे पवित्र ठिकाण म्हणून गुरुद्वारा प्रसिद्ध आहेत. शीख समुदाय जगभर पसरला असल्याने विविध देशात गुरुद्वारा पहावयास मिळतात. भारतात पंजाब, हरयाणा, उत्तरप्रदेश सर्वत्र व महाराष्ट्रात नांदेड येथे गुरुद्वारा असून त्यांच्या वास्तुकला व पवित्र वातावरणामुळे देशांतर्गत तसेच परदेशी पर्यटक भेट देतात.

**४. गिरिजाघर (चर्च)** (Church) :-

ख्रिश्चन धर्माचे प्रार्थना स्थळ म्हणून गीरीजाघरे ओळखली जातात. या धर्मातील वेगवेगळ्या पंथामुळे गीरीजाघरांचे स्वरूप तसेच वास्तुकला वैविध्यपूर्ण वाटते. या ठिकाणी ख्रिश्चन धर्मीय तसेच इतर धर्मातील लोक मोठ्या संख्येने भेटी देतात.

**५. विहार** (Monastry) :-

बौद्ध धर्मीय लोक, तसेच शांती साठी पर्यटनास आलेले परदेशी पर्यटक विहारांना भेटी देतात. व

तेथे पवित्र वातावरणात काही काळ राहतात. भारतात तिबेटी व भारतीय बौद्ध धर्मीय विहार असून त्यांची शिल्पकला पर्यटकाना आकर्षित करते.

## २.३.२.२ उत्तर भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे (Religious Tourist Centres in North India) :-

### १. जम्मू व काश्मीर :-

#### अ) अमरनाथ गुहा :-

जम्मू व काश्मीर मधील ३८८८ मी. उंचीवर वसलेले हे एक प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणाचा शोध भ्रीगु ऋषींनी लावला असे म्हणतात. येथे बर्फामध्ये निर्माण होणारे शिवलिंग असून या ठिकाणास जुलै व ऑगस्ट महिन्यात सहा लाखांपेक्षा जास्त भावीक ४३ किमी ट्रेक करत पोहचतात. या यात्रेस प्रसिद्ध 'अमरनाथ यात्रा'' म्हणतात. या ठिकाणी जाण्यासाठी श्रीनगर किंवा पहलगाम मधून ट्रेक सुरु होतो. भारतातील हिंदू धर्मीय लोकांचे हे एक श्रद्धा स्थान मानले जाते.

#### ब) वैष्णोदेवी मंदिर :-

हे प्रसिद्ध मंदिर जम्मू पासून ६० किमी अंतरावर असून येथे कटरामार्गे जावे लागते. समुद्रसपाटीपासून १५८५ मी. उंचीवरील या ठिकाणी नवरात्री व दुर्गा पूजेच्या काळात येथे मोठ्या संख्यने हिंदू धार्मिक भाविक भेट देतात. येथील यात्रेस वर्षानुवर्षे भाविकांची संख्या वाढत आहे. २०१८ मध्ये येथे ८५.८७ लाख भाविकानी भेट दिली होती. येथील गुहेत वैष्णोदेवी मंदिर असून भाविक येथे पायी चालत येतात दर्शन घेतात. या ठिकाणी मोठ्या श्रद्धेने भाविक नवस मागतात. वर्षभर चोवीस तास येथे दर्शन घेता येते.

### २. लडाख :-

#### अ) **ठीकसे मोनेस्ट्री** (Thikse Monastery) :-

लेह पासून १९ किमीवर असणारे ठीकसे या ठिकाणी गेलुग समुदायाची तिबेटन वास्तुकलेतील हि मोनेस्ट्री तिबेट मधील पोटला पॅलेस ची प्रतिकृती आहे. हे ठिकाण समुद्रसपाटीपासून ३६०० मी. उंचीवर असून येथे बुद्धीस्ट कला, स्तूप, मूर्ती, भिंतीवरील चित्रे व तलवार प्रसिद्ध आहे. येथे तिबेटन गुरु दलाई लामा यांनी मैत्रेय बुद्ध हि १५ मी. उंच मूर्ती स्थापित केली आहे. हे एक महत्वाचे आकर्षण मानले जाते.

**ब) रीझोंग मोनेस्ट्री** (Rizong Monastery) :-

हे ठिकाण लेहपासून ७३ किमी अंतरावर असून येथे मोनेस्ट्री सोडून इतर लोकवस्ती नाही. या प्रार्थना स्थळाची स्थापना १८३१ मध्ये त्सुल्तीम लामा यांनी केली. येथे आजपर्यंतच्या लामांची लिखाणे, चरित्रे व चित्रे सुरक्षित ठेवली आहेत. येथे देशातील तसेच परदेशी पर्यटक ध्यानधारणेसाठी येतात.

**क) लामायुरू मोनेस्ट्री** (Lamayuru Monastery) :-

या मोनेस्ट्रीस 'स्वातंत्र्याचे ठिकाण' म्हणून ओळखले जाते. ही एक लडाख मधील सर्वात जास्त भेट देणाऱ्या मोनेस्ट्रीपैकी एक असून याचे बांधकाम ११ व्या शतकातील आहे. येथील धार्मिक वातावरणामुळे तत्कालीन लडाखच्या राजाने या ठिकाणास 'अटकेपासून अलिप्त ठिकाण' म्हणून घोषित केले.

**ड) इतर मोनेस्ट्री** (Other Monastery) :-

वरील मोनेस्ट्री व्यतिरिक्त हेमिस, अल्ची, फुग्तल, स्पितुक, रंगदम, लीकीर, शे इत्यादी ठिकाणी प्रसिद्ध बौद्ध मोनेस्ट्री आहेत.

**३. पंजाब :–**

**अ) अमृतसर** (Amritsar) :-

शीख धर्मियांचे पवित्र ठिकाण म्हणून येथील सुवर्ण मंदिर (हरमिंदर साहिब) हे ओळखले जाते. जगातील शीख समुदायासाठी हे ठिकाण सर्वात पवित्र व महत्वाचे मानले जाते. याचे बांधकाम १६ व्या शतकात गुरु रामदास यांनी पूर्ण केले. या ठिकाणाचा इतिहास प्रसिद्ध असून येथील म्युजियम मध्ये त्याचे दर्शन घडते. या मंदिरास संपूर्ण सोन्याच्या पत्र्यांनी मढवले असल्याने त्यास 'गोल्डन टेम्पल' म्हटले जाते. येथे सर्वात मोठी लंगर (भोजनालय) असून सर्व धर्मीय लक येथे भेट देतात.

**ब) अकाल तख्त, अमृतसर** (Akaltakht, Amritsar) :-

अमृतसरमधील गुरु गोविंदसिंग यांनी शीख धर्मातील पाच शक्तिशाली तख्त पैकी एक बांधले असून हे सुवर्ण मंदिराच्या शेजारी आहे. याचे बांधकाम संगमरवरी दगडात असून त्याचे पाच मजले आहेत.

**क) तरणतारण साहिब** (Taran Taaran Sahib) :-

तरण तारण साहिब हे शीख समुदायाचे सर्वात मोठे श्रद्धा स्थान आहे. सर्व गुरुद्वारांच्या

सरोवरामधील सर्वात मोठे सरोवर या ठिकाणी आहे. याचे बांधकाम गुरु अर्जुन देवजी यांनी सोळाव्या शतकात केले.

## ४. उत्तरप्रदेश :-

### अ) **मथुरा** (Mathura) :-

श्रीकृष्णाचे जन्मस्थान म्हणून मथुरेतील मंदिरे प्रसिद्ध आहेत. ६ व्या शतकापासून हे ठिकाण ओळखले जाते. येथे केशवदेव मंदिर व पोत्र कुंड प्रसिद्ध आहेत. या ठिकाणी जन्माष्ठमी, दिवाळी व होळी मोठ्या प्रमाणात साजरी होते. तसेच मथुरेत विश्रामघाट, गीतामंदीर, जामा मस्जिद इत्यादी ठिकाणे प्रसिद्ध आहेत.

याचबरोबर वृंदावन या मथुरे जवळील ठिकाणी बनके बिहारी मंदिर हे कृष्णाचे मंदिर असून प्रेम मंदिर हे सुद्धा आकर्षक मंदिर आहे.

### ब) **वाराणसी** (Banaras) :-

वाराणसीला 'काशी' असे म्हटले जाते. हिंदू धर्मीय भाविकांसाठी हे मध्ययुगीन काळापासून महत्वाचे ठिकाण मानले जाते. येथील बनारस घाट प्रसिद्ध असून या ठिकाणी येऊन अंघोळ केल्याने पापक्षालन होते असे मानले जाते. याचबरोबर संकट मोचन मंदिर, तिबेटन मंदिर, श्री काशी विश्वनाथ मंदिर, केदार घाट, दुर्गा मंदिर इत्यादी प्रसिद्ध आकर्षणे आहेत. या ठिकाणापासून सारनाथ हे बौद्ध धर्मीय ठिकाण असून येथे धम्म्यक स्तूप व चौखंडी स्तूप आहेत. येथेच भगवान बुद्धांनी त्यांच्या पहिल्या ओआच शिष्यांना धम्म दीक्षा दिली होती.

### क) **अयोध्या** (Ayoddhya) :-

हे ठिकाण राम जन्मभूमी म्हणून ओळखले जाते. हे हिंदू धर्मियांसाठी पवित्र ठिकाण असून पाच हजार पेक्षा जास्त मंदिरे या शहरात आहेत. येथे रामजन्म भूमी, हनुमान गढी, सीता कि रसोई, श्री मनिराम दास छावणी इत्यादी प्रमुख मंदिरे आहेत.

### ड) आग्रा :-

आग्रा हे उत्तरप्रदेशातील पर्यटन दृष्ट्या अतिशय प्रसिद्ध शहर आहे. येथे ताजमहाल असून याव्यतिरिक्त जामा मस्जिद, नगीना मस्जिद, मीना मस्जिद, मोटी मस्जिद इत्यादी मुस्लीम धर्मीयांची पवित्र ठिकाणे आहेत. तसेच 'गुरु का ताल' हा गुरुद्वार प्रसिद्ध आहे.

## ५. उत्तराखंड :–

### अ) हरिद्वार (Haridwar) :-

हे जिल्ह्याचे ठिकाण गंगा नदी जेथे मैदानात प्रवेश करते तेथे वसले आहे. येथे 'हर कि पौरी' हा पवित्र गंगा घाट असून चंडी देवी मंदिर, मानसी देवी मंदिर, माया देवी मंदिर, सुरेश्वरीदेवी मंदिर, इत्यादी मंदिरे तर पावन धाम, रामानंद आश्रम, उमा महेश्वर आश्रम इत्यादी आश्रम आहेत. येथे रामकृष्ण मठ व सेवाश्रम आहे. हरिद्वारमध्ये देशभरातून हिंदू भाविक भेट देतात.

### ब) ऋषीकेश (Rushikesh) :-

हरिद्वारपासून उत्तरेस गंगा नदी पात्रावरील पवित्र हिंदू धर्मियांचे ठिकाण म्हणून ऋषीकेश ओळखले जाते. येथील त्रिवेणी घाट स्नान व आरतीसाठी प्रसिद्ध असून नीलकंठ मंदिर, ऋषी कुंड हा गरम पाण्याचा झरा, वशिष्ठ गुहा इत्यादी प्रसिद्ध ठिकाणे आहेत.

### क) बद्रीनाथ व केदारनाथ (Badrinath and Kedarnath) :-

बद्रीनाथ हे चामोली जिल्ह्यातील एक नागरी ठिकाण असून समुद्रसपाटीपासून ३१०० मी. उंचीवर वसले आहे. येथे भारतातील चारधामापैकी बद्रीनाथ मंदिर आहे. हे हिंदू धर्मीय लोकांचे प्रसिद्ध मंदिर म्हणून ओळखले जाते.

केदारनाथ हे समुद्रसपाटीपासून ३५८३ मी उंचीवर वसले असून येथे शंकराचे मंदिर असून ते प्रतिकूल वातावरणामुळे केवळ एप्रिल व नोव्हेंबर महिन्यात भाविकांना खुले असते. येथे थेट रस्त्याची सोय नसल्याने लोकांना घोडा व इतर साधनांचा वापर करावा लागतो. हे १२ ज्योतिर्लिंगापैकी सर्वात उंचीवरील ठिकाण आहे. २०१३ साली येथे मोठी पुराची आपत्ती आली होती.

## ६. बिहार :–

### अ) गया (Gaya) :-

गया हे ठिकाण बिहारमध्ये पटणापासून १०० किमी अंतरावर असून येथे जैन, हिंदू व बौद्ध धर्मीय धार्मिक पर्यटन स्थळे आढळतात. येथे प्रसिद्ध 'विष्णूपाद मंदिर' असून मध्ययुगीन काळात पुनर्निर्माण केले गेले. हे मंदिर वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना मानले जाते. येथे बोधगया या ठिकाणी महाबोधी मंदिर हे बुद्धांचे एकमेव मंदिर असून येथे दक्षिण आशियातील व परदेशी पर्यटक मोठ्या संख्येने येतात. या ठिकाणी बुद्धांनी ज्ञानप्राप्ती केलेला पिंपळ वृक्ष असून यास 'बोधिवृक्ष' असे म्हणतात. या ठिकाणी मोठी

बुद्ध मूर्ती आहे याचबरोबर डूंगेश्वरी मंदिर, चायनीज टेम्पल, मंगळा गौर मंदिर, लॉर्ड यामा मंदिर इत्यादी मंदिरे महत्वाची आकर्षणे आहेत.

### ७. राजस्थान :–

#### अ) **अजमेर** (Ajmer) :-

अजमेर मधील अजमेर शरीफ दर्गाह हा सुफी संत ख्वाजा मोइनुद्दिन चिस्ती यांचा असून येथे हिंदू व मुस्लीम धर्माचे भाविक श्रद्धेने भेट देतात. या दर्ग्याचे बांधकाम मोहम्मद बिन तुघलक यांनी केले. या दर्ग्याला सम्राट अकबरची श्रद्धा होती. आजही भाविक नवस करण्यास येथे येतात.

### ८. ओरिसा :–

#### अ) **जगन्नाथपुरी** (Jagannathpuri) :-

भारतातील चार धामांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे पूर्व किनाऱ्यावरील तीर्थक्षेत्र म्हणजे जगन्नाथपुरी. जगन्नाथ हा विष्णूचा अवतार असून हे मंदिर १२ व्या शतकात बांधण्यात आले आहे. येथील वैशिष्ठ म्हणजे लाकडाची मूर्ती दर १२ किंवा १९ वर्षांनी बदलली जाते. मंदिराचा परिसर मोठा असून येथे रसोईघर, मंडप, तसेच विविध छोटी मंदिरे आहेत. येथे चंदन यात्रा, स्नान यात्रा व पवित्रोत्सव असे उत्सव व यात्रा होतात. हे देशभरातील हिंदू भाविकांसाठी महत्वाचे मंदिर मानले जाते.

#### ब) **कोणार्क** (Konark) :-

जगन्नाथपुरी पासून ईशान्येस ३६ किमी अंतरावर कोणार्कचे सूर्यमंदिर आहे. हे मंदिर प्राचीन काळात बांधले असून या मंदिराच्या सर्व बाजूने एकूण २४ दगडात कोरलेली १२ फूट उंचीची चाके आहेत. तर सात घोड्यांचे सारथ्य आहे. या मंदिराच्या बांधकामातील शैलीमुळे हे एक अभियांत्रिकीचा उत्तम नमुना मानले जाते. या ठिकाणी देशांतर्गत व परदेशी पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात.

### ९. गुजरात :–

#### अ) **सोमनाथ मंदिर** (Somnath Temple) :-

गुजरातमधील सौराष्ट्र जिल्ह्यातील १२ ज्योतिर्लिंगापैकी एक म्हणून सोमनाथ मंदिर प्रसिद्ध आहे. हे चालुक्य पद्धतीचे बांधकाम असणारे अतिशय सुंदर मंदिर अनेकवेळा ऐतिहासिक आक्रमणामुळे भंग पावले असून त्याचा १९५१ मध्ये जीर्णोद्धार केला. या मंदिरास मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक भेट देतात.

## २.३.२.३ दक्षिण भारतातील धार्मिक ठिकाणे (Religious Tourist Centres in South India)

### १. आंध्रप्रदेश :–

**अ) तिरुपती** (Tirupati) :-

आंध्रप्रदेशातील दक्षिण भागात असणारे तिरुपती मधील वेंकटेश्वरा मंदिर भारतातील सर्वात श्रीमंत देवस्थान मानले जाते. हे हिंदू धर्मियांसाठी पवित्र ठिकाण असून येथे वर्षभर लाखो भाविक गर्दी करतात. येथून सर्वात जवळचे विमानतळ चेन्नई हे असून ते १३८ किमी दक्षिणेस आहे. हे मंदिर सात टेकड्यांवर वसले असून येथील देवतेस सप्तगिरीश असेही म्हटले जाते.

### २. कर्नाटक :–

**अ) श्रवणबेळगोळ** (Shravanbelgola) :-

हे ठिकाण दक्षिण कर्नाटकातील बेंगलोरपासून १४४ किमी अंतरावर असून भारतातील महत्वाचे जैन धर्मीय पवित्र स्थान म्हणून ओळखले जाते. येथे ५८ फूट उंचीची गोमटेश्वर बाहुबली मूर्ती असून ती उभ्या स्थितीमध्ये एका दगडात विंध्यगिरी टेकडीवर कोरली आहे. या मूर्तीचा मस्तकाभिषेक दर १२ वर्षांनी केला जातो. शेजारील टेकड्यांवर जैन मंदिरे आढळतात. यांचे बांधकाम ६ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत झालेले पहावयास मिळते.

### ३. तामिळनाडू :–

**अ) मदुराई** (Madurai) :-

दक्षिण भारतातील प्रसिद्ध मीनाक्षी मंदिर हे 'सिटी मदुराई' येथे असून ते १२ व्या शतकात बांधण्यात आले आहे. दाक्षिणात्य पद्धतीचे बांधकाम असलेले हे मंदिर फार सुंदर दिसते. १४ एकरात पसरलेल्या या मंदिराला चार बाजूने द्वार आहेत. हे मंदिर शत्रूपासून संरक्षण होण्यासाठी तीन भिंतींनी बंदिस्त असून १४ गोपूर आहेत. येथे नटराज मूर्ती असून ती विलोभनीय वाटते. येथे हिंदू भाविक श्रद्धेने भेट देतात. विवाहविधीसाठी हा मंदिर परिसर प्रसिद्ध आहे.

**ब) रामेश्वरम** (Rameshwaram) :-

तामिळनाडू मधील रामेश्वरम बेटावर वसलेले 'रामनाथस्वामी' हे शिव मंदिर असून ते चार धाम पैकी एक म्हणून ओळखले जाते. रामायण महाकाव्यात येथे रामाने शिवलिंगाची पूजा केली असा उल्लेख

आहे. या मंदिरात दोन शिवलिंग असून त्यातील एक रामाने स्थापन केलेले वाळूचे असून दुसरे विश्वलिंगम म्हणून ओळखले जाणारे शिवलिंग हनुमानाने स्थापित केले आहे असे मानले जाते. येथे मंदिराचा मार्ग आकर्षक असून सर्वात लांब म्हणून ओळखला जातो. येथे लाखो लोक चारधाम यात्रेस भेट देतात.

### ४. गोवा :-

**अ) बेसिलिका बॉम जीजस चर्च** (Basilica Bom Jesus Church) :-

जुन्या गोव्यातील सर्वात आकर्षक व पर्यटकांनी फुललेले चर्च म्हणजे बेसिलिका बॉम जीजस चर्च. याचे बांधकाम १६०५ रोजी पूर्ण झाले. यासाठी जांभा खडक वापरला असल्याने चर्च लाल रंगात केलेल्या नक्षीकामामुळे सुंदर वाटतो. येथे सेंट फ्रान्सिस झेवियर यांचे शरीर पेटीमध्ये ठेवले असून ते दर १० वर्षांनी दर्शनास ठेवले जाते. दरवर्षी येथे ख्रिश्चन समुदाय ५ डिसेंबरला उत्सवास एकत्र येतो. वस्तुसंग्रहालय, चर्चमधील प्रार्थना, वास्तुकला व शेजारील दोन चर्च पर्यटकांना मोठी पर्वणीच आहेत.

### * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २ *

१. अमरनाथ हे प्रसिद्ध धार्मिक ठिकाण कोणत्या राज्यात आहे?

*अ) जम्मू काश्मीर ब) उत्तराखंड क) महाराष्ट्र ड) पश्चिम बंगाल.*

२. लडाखमधील खालीलपैकी कोणती बौद्ध मोनेस्ट्री तिबेट मधील पोटला पेलेसची प्रतिकृती आहे?

*अ) रीझोंग ब) लामायुरू क) ठीकसे ड) लीकीर.*

३. शीख समुदायाचे श्रद्धास्थान खालीलपैकी कोणत्या ठिकाणी आहे?

*अ) शिमला ब) फत्तेपूर क) पटना ड) अमृतसर.*

४. मंदिरांचे शहर म्हणून उत्तरप्रदेशातील कोणत्या शहरास ओळखले जाते?

*अ) आग्रा ब) मथुरा क) अयोध्या ड) हरिद्वार.*

५. जैन धर्मियांचे दक्षिण भारतातील श्रद्धास्थान कोणते?

*अ) माउंट अबू ब) चंडीगड क) धर्मस्थळ ड) श्रवणबेळगोळ.*

## २.३.३ भारतातील सांस्कृतिक पर्यटन स्थळे (Cultural Tourist Centres in India)

भारतात नैसर्गिक विविधतेमुळे त्याचा परिणाम सांस्कृतिक विविधतेवर झालेला दिसून येतो.

भारताला अतिशय प्रगल्भ इतिहास सांस्कृतिक ठेवा जपण्याच्या दृष्टीकोनातून महत्वाचा आहे. पर्यटन व्यवसायाच्या वृद्धीमध्ये नैसर्गिक स्थळासोबत तेथे तेवढेच महत्व सांस्कृतिक घटकांना आहे. खालीलप्रमाणे पर्यटनाचे सांस्कृतिक घटक सांगता येतील.

## २.३.३.१ भारतातील सांस्कृतिक पर्यटनाचे घटक (Factors of Cultural Tourist Centres in India)

### १. वास्तुकला :-

पर्यटन स्थळाच्या ठिकाणी सांस्कृतिक महत्व असणारा घटक म्हणून विविध राजवाडे, हवेल्या, राजधानी, महाल, इमारत इत्यादी वस्तूंची वैविध्यपूर्ण ठेवण असेल तर अशा ठिकाणी पर्यटक आकर्षित होतात. भारतात मुघल व राजपूत राजांच्या काळात भारतात वेगवेगळ्या प्रकारच्या वास्तू बांधण्यात आल्या. आज अशा ठिकाणी पर्यटक वास्तुकला पाहण्यासाठी भेट देतात.

### २. चित्रकला :-

चित्रकलेतील मानवी भाव भावनांचे, निसर्गाचे, मानवी दृश्यांचे रेखाटन या गोष्टी चित्रकलेस उच्चस्तरावर नेतात. भारतात वेगवेगळ्या ऐतिहासिक कालखंडात चित्रकलेचा अविष्कार वेगळ्या रूपाने समोर आला आहे. भिंतीवरील कलाकुसर व तैलचित्रे ही आजही वैभवशाली इतिहासाचा वारसा आहेत.

### ३. शिल्पकला :-

शिल्पकलेचा वैविध्यपूर्ण नमुना आपणास वेगवेगळ्या कालखंडातील राजवटीमध्ये पहावयास मिळतो. शिल्पकला भारताच्या इतिहासातील उच्च कलेचा नमुना सांगते. अशी ठिकाणे परदेशी पर्यटकांनी फुलून जातात. उदा. अजिंठा-वेरूळ लेणी, खजुराहो मंदिर इत्यादी.

### ४. नृत्य-संगीत-गायन :-

प्रादेशिक व सांस्कृतिक विविधतेचा तसेच जीवनशैलीचा परिणाम नृत्य, संगीत व गायनाच्या प्रकारावर होतो. भाषिक विविधता भारतात असल्याने ग्रामीण साहित्याची मांडणी कलाविष्कारात झाल्याने त्यात प्रचंड विविधता आली आहे. या विविधतेस जगासमोर आणणे महत्वाचे आहे. भरतनाट्यम, कथक्कली इत्यादी नृत्याविष्कार तर सतार, वीणा, बासरी, तबला, ढोलक इत्यादी वाद्ये लोकसंस्कृतीला जागे करतात.

## ५. सण व उत्सव :-

भारत देश हा उत्सवांचा देश म्हणून ओळखला जातो. अनेक धर्म व पंथ एकत्र नांदताना त्यातील महत्वाचे क्षण सर्वांशी मिळून आनंद घेण्याची संस्कृती भारतात असल्याने वेगवेगळे सण व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. उदा. होळी, दिवाळी, नवरात्री, नाताळ इत्यादी.

## २.३.३.२ सांस्कृतिक पर्यटन स्थळे :-

### १. **अजिंठा-वेरूळ लेणी** (Ajanta-Ellora Caves) :-

महाराष्ट्रातील औरंगाबाद जिल्ह्याच्या ठिकाणापासून १०० किमी अंतरावर असलेल्या अजिंठा लेणी हि १९ व्या शतकात शोधण्यात आली. त्यांचा निर्मितीचा कालावधी इसवीसन पूर्व २ रे शतक ते इसवीसन ४८० असा आहे. येथे एकूण ३० लेण्यांमधून बौद्ध धर्मातील कलेची उच्चतम पातळी दिसून येते. तर चित्रकला व शिल्पकला यातून गौतम बुद्धांचे जीवन स्पष्ट केले आहे. विहार, स्तूप, सभामंडप, शयनकक्ष, प्रार्थना स्थळ, छोटा तलाव अशा अनेक वैशिष्ठ्यांनी हे ठिकाण भरले आहे.

वेरूळ लेणी औरंगाबाद पासून अवघ्या ३० किमी अंतरावर असणाऱ्या वेरूळ लेण्या हिंदू, बौद्ध व जैन धर्माची वैशिष्ठे घेऊन उभ्या आहेत. येथे इसवीसन ६०० ते १००० दरम्यान लेण्यांची निर्मिती झाली. येथील १६ क्रमांकाची लेणी असणारे कैलासनाथ मंदिर अखंड दगडामध्ये निर्माण करण्यात आले आहे. अशा प्रकारचे हे जगातील सर्वात मोठे मंदिर आहे. या ठिकाणी १०० लेणी असून त्यातील फक्त ३४ लेणी पर्यटकांसाठी खुली आहेत. येथील लेणी क्र. १ ते १२ मध्ये बौद्ध लेणी असून १३ ते २९ मध्ये हिंदू धर्मीय लेणी आहेत. लेणी क्र. ३० ते ३४ मध्ये जैन धर्मीय लेणी आहेत. अजिंठा व वेरूळ ही दोन्ही ठिकाणे युनेस्को कडून जागतिक वारसा पर्यटन स्थळ म्हणून घोषित झाली आहेत.

### २. **बिबी का मकबरा** (Bibi ka Makabara) :-

औरंगाबाद मधील ताजमहालची प्रतिकृती म्हणून बीबी का मकबरा ओळखला जातो. संगमरवर दगडाचा वापर करून ही इमारत बांधली आहे. मध्यभागी औरंगजेबची पत्नी राबिया यांची कबर असून त्या सभोवताली संगमरवरी गाभारा आहे. दक्षिण भारतातील ताजमहाल म्हणून यास ओळखले जाते.

### ३. **उदयपूर** (Udaypur) :-

राजस्थानी संस्कृतीचा वारसा जपणारे एक अतिशय रमणीय ठिकाण म्हणून उदयपूरचा उल्लेख होतो. पिचोला सरोवर व शेजारील पॅलेसचे विहंगम दृश्य हे आकर्षित करणारे असून या ठिकाणी देशभरातून तसेच परदेशी पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात.

४. **वाराणसी** (Varanasi) :-

काशी म्हणून ओळखले जाणारे हे शहर हिंदू धर्मातील मंदिर वास्तुकला व घाट या बाबतीत विलोभनीय असून येथे कुंभमेळ्याच्या वेळेस देशांतर्गत तसेच परदेशी पर्यटक मोठ्या संख्येने एकत्र येतात. त्याचबरोबर येथे मध्ययुगीन काळापासून बनारसी शालू निर्माण केला जातो. हा हस्तकलेचा उत्तम नमुना आहे.

५. **खजुराहो** (Khajuraho) :-

हे ठिकाण मध्यप्रदेशात झाशी पासून १७५ किमी दूर असून इसवीसन ९५० मध्ये चंडेला राजवटीत बांधलेली खजुराहोची मंदिरे ही शृंगारिक व कामुक भावना प्रकट करत असल्याने हे ठिकाण परदेशी तसेच देशांतर्गत पर्यटकाना खुणावते. एकूण ८५ मंदिरापैकी २५ मंदिरे अस्तित्वात असून त्यापैकी कन्दारिया महादेव मंदिरावर सुंदर शिल्पकृती आहेत. त्यामध्ये नर्तिका, देवी, देवता, माता, इत्यादी शिल्पे दगडात कोरलेली आहेत.

६. **महाबलीपुरम** (Mahabalipuram) :-

इसवीसन ७ व्या व ८ व्या शतकात बांधलेले तामिलनाडूच्या पूर्व किनाऱ्यावरील प्राचीन मंदिरांचा समूह म्हणून हे ठिकाण ओळखले जाते. हे ठिकाण चेन्नईपासून ६० किमी अंतरावर असून पंचरथ, गुफा मंदिर, शोर टेम्पल इत्यादी महत्वाची शिल्पे आहेत.

७. **हंपी** (Hampi) :-

कर्नाटकातील बेल्लारी जिल्ह्यात असणारे हे विजयनगरची राजधानी असणारे ठिकाण होते. इसवीसन १५०० मध्ये बीजिंग नंतर जगातील दुसरे मोठे शहर म्हणून हंपी ओळखले जात होते. १६ चौ. किमी प्रदेशात व्यापलेले हे ठिकाण भारतातील प्रसिद्ध सांस्कृतिक पर्यटन स्थळांपैकी एक म्हणून ओळखले जाते. येथे मंडप, मंदिरे, खांब, तळी इत्यादी विविध शिल्पे व वास्तुकलेचे सुंदर नमुने आहेत.

८. **सांची** (Sanchi) :-

मध्यप्रदेशात स्थित सम्राट अशोकाने बांधलेले सांचीचे स्तूप देशाच्या राजमुद्रा ठरवण्यामध्ये महत्वाचे ठरले. येथील चार बाजूला तोंड असणारे, बसलेले सिंह भारताची राजमुद्रा म्हणून स्वीकारले गेले. येथील कमानीवर विविध प्रकारची शिल्पकला दिसून येते. येथे अशोकस्तंभ सापडल्या नंतर त्यावरील सिंहांचे शिल्प म्युजियममध्ये लावण्यात आले आहे. इसवीसन पूर्व ३ ऱ्या शतकात बांधकामास सुरुवात झालेली टप्प्याटप्प्याने एकूण ३ स्तूपे व एक बौद्ध मंदिर या परिसरात दिसून येतात. येथे मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक भेट देतात.

## ९. **नालंदा** (Nalanda) :-

बिहारमधील नालंदा विद्यापीठ म्हणून ओळखले जाणारे हे ठिकाण पटना पासून ९५ किमी आग्नेयेस असून त्याचे अस्तित्व इसवीसन ५ वे शतक ते १२ वे शतक या काळामध्ये याचे अस्तित्वात होते. या परिसरात बौद्ध विहार इंडोनेशियाच्या राजाने बांधला होता. येथे विद्यापीठाचे अवशेष असून मोठ्या संख्येने परदेशी व देशांतर्गत पर्यटक भेटी देतात.

## १०. **म्हैसूर** (Mysore) :-

कर्नाटकातील बेंगलोरपासून १५० किमी अंतरावरील म्हैसूर हे शहर दक्षिण भारतातील ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले जाते. इसवीसन १३ व्या शतकापासून १९५६ पर्यंत या ठिकाणी वडियार घराण्याची राजवट होती. या शहरास महिषासुर राक्षसावरून नाव पडले आहे. म्हैसूर पलेस हे येथील वास्तुकलेच्या नमुन्यातील परमोच्च बिंदू मानले जाते. दरवर्षी दसरा सणानिमित्त येथे दिव्यांची रोषणाई संपूर्ण राजवाड्यावर केली जाते. येथे म्हैसूर पाक, मसाला डोसा, चंदनाच्या वेगवेगळ्या वस्तू, म्हैसूर सिल्क, लाकडाची खेळणी इत्यादी गोष्टी जगभर प्रसिद्ध आहेत.

## ११. **ताजमहाल** (Tajmahal) :-

ताजमहाल हे जागतिक आश्चर्याचे केंद्र म्हणून त्याच्या वास्तुकलेने व सुंदरतेने ओळखले जाते. मुघल राजवटीच्या काळात शाहजहान यांनी आपल्या पत्नीच्या (मुमताज) स्मरणार्थ हि वस्तू बांधली. याच्या मध्यभागी तिचे थडगे आहे. संगमरवरी दगडात बांधलेली हि इमारत वास्तुकलेचा अजब अविष्कार म्हणून ओळखली जाते.

## १२. **इतर** (Others) :-

वरील सांस्कृतिक ठिकाणाव्यतिरिक्त लडाखमधील लेह व त्याचा परिसर हा तिबेटीयन संस्कृतीसाठी प्रसिद्ध मानला जातो. येथील सांस्कृतिक वैशिष्टे देशांतर्गत तसेच परदेशी पर्यटकांना आकर्षित करतात. रांगोळी, चित्रकला, वास्तुकला, शिल्पकला इत्यादी घटक वेगळा अनुभव देऊन जातात. त्याचबरोबर कन्याकुमारी हे तामिळनाडू मधील स्वामी विवेकानंदांचे स्मारक (विवेकानंद रॉक मेमोरियल) महत्वाचे असून येथे थिरूवल्लूर या संताचा ९५ फुटांचा पुतळा समुद्रावरील बेटावर आहे. याव्यतिरिक्त वाराणसी हे शालूसाठी प्रसिद्ध आहे. तसेच कोइमत्तुर हे खास रेशीम साड्यांसाठी देशभर प्रसिद्ध आहे.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३ ❊

१. ताजमहालची प्रतिकृती म्हणून खालीलपैकी कोणती वास्तू ओळखली जाते?

*अ) बीबी का मकबरा   ब) वाडियार पॅलेस   क) खजुराहो   ड) महाबलीपुरम.*

२. वाराणसी हे शहर कोणत्या हस्तकलेसाठी प्रसिद्ध आहे?

*अ) लाकडी खेळणी ब) मुर्तीकाम क) शालू ड) शाल.*

३. हंपी हे सांस्कृतिक पर्यटन स्थळ कोणत्या राज्यात आहे?

*अ) राजस्थान ब) आसाम क) कर्नाटक ड) तामिळनाडू.*

४. भारताची राजमुद्रा जेथून घेण्यात आली ते सांस्कृतिक ठिकाण कोणते?

*अ) नालंदा ब) सारनाथ क) सांची ड) वेरूळ.*

५. चंदनाच्या कलाकुसरीच्या वस्तूंचा कोणत्या सांस्कृतिक स्थळावर विकास झाला आहे?

*अ) वाराणसी ब) उदयपुर क) आग्रा ड) म्हैसूर.*

## २.३.४ भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे (Historical Tourist Centres in India) :-

भारताचा इतिहास हा सिंधू संस्कृतीपासून सुरु होतो. इसवीसन ५ व्या शतकापर्यंत भारत एकसंघ भूमी होता. त्यानंतर ११ व्या शतकात मुस्लीम राजवट भारतावर इसवीसनाच्या १९ व्या शतकापर्यंत चालली. १७ व्या शतकात आलेल्या युरोपियनांनी भारतावर कब्जा केला व ३०० वर्षे भारतावर राज्य केले. हा मोठा कालखंड भारतातील ऐतिहासिक स्थित्यंतरे होताना दिसून येतो. परिणामी प्रत्येक राजवटीची चिन्हे ऐतिहासिक घटकांच्या सहाय्याने भारतीय भूमीवर उभी आहेत. त्यामुळे भारतातील ऐतिहासिक ठिकाणे व वैशिष्टे हि पर्यटनाच्या बाबतीत विविधतापूर्ण आढळतात. खालीलप्रमाणे पर्यटनाचे ऐतिहासिक घटक सांगता येतील.

### २.३.४.१ भारतातील पर्यटनाचे ऐतिहासिक घटक (Factors of Historical Tourist Centres in India)

**१. किल्ले :-**

भारतात डोंगरी, भुईकोट व सागरी असे तिन किल्ल्यांचे प्रकार दिसून येतात. डोंगरी किल्ले हे ओबडधोबड भूपृष्ठरचनेच्या प्रदेशात असल्याने शत्रूसाठी अवघड होते. त्यामुळे भारतातील डोंगराळ व पर्वतीय शिखरावर किल्ले आढळतात. राजस्थान व महाराष्ट्रात डोंगरी किल्ले पर्यटनाच्या बाबतीत महत्वाचे आहेत. तर भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील अजोड असे सागरी किल्ले पर्यटनास अनुकूल आहेत.

### २. युद्धभूमी :-

इतिहासकाळात भारतात अनेक युद्धे साम्राज्यविस्तारासाठी झाली. हि युद्धे इतिहासात आजही आठवणीत आहेत. त्यापैकी पानिपतच्या ३ लढाया, प्लासीची लढाई, हळदी घाटाची लढाई इत्यादी महत्वाच्या वाटतात. अशी ठिकाणे आज म्युजियम स्वरुपात व स्मारकांच्या स्वरुपात पर्यटनाच्या बाबतीत प्रसिद्ध बनत आहेत.

### ३. जन्म-मृत्यू ठिकाण :-

आजपर्यंत अनेक मोठे राजे, महापुरुष, तत्त्ववेत्ते, समाजसुधारक यांची जन्म व मृत्यूची ठिकाणे पर्यटनासाठी खुली आहेत. त्यांच्या इतिहासाला अशा ठिकाणी गेल्याने उजाळा मिळतो. उदा. श्रीरंगपट्टणम, शिवनेरी गड, इत्यादी.

### ४. स्मारके :-

भारतीय इतिहासात मध्ययुगीन काळापासून अनेक शूरवीरांनी आपले रक्त भूमीवर सांडले आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ समाधी स्थळावर अथवा युद्धाच्या ठिकाणी स्मारक बनवले जाते. येथे येणारा प्रत्येक पर्यटक या स्मारकाला भेट दिल्यानंतर शुरविरांची आठवण काढतो. अशी ठिकाणे पर्यटन स्थळे म्हणून प्रसिद्ध आहेत.

### ५. राजधानीची ठिकाणे :-

भारतात वेगवेगळ्या राजवटीमध्ये अनेक राजधानीची ठिकाणे प्रसिद्ध मानली जात होती. आजही या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक भेटी देतात. उदा. फत्तेपूर-सिक्री, रायगड, झाशी, पुणे, इत्यादी.

## २.३.४.२ भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे :-

### अ) किल्ल्यांची ठिकाणे

**१. लाल किल्ला** (Red Fort) :-

हा किल्ला दिल्लीत असून तो १७ व्या शतकात मुघल बादशहा शाहजहानने बांधला. येथून देशाचे प्रधानमंत्री तिरंगा फडकावतात. येथे बगीचा, संरक्षक भिंत, बुरुज, दिवान-ए-आम, दिवाण-ए-खास हे दरबार, लाहोरी गेट, दिल्ली गेट, मुमताज महाल, रंग महाल, हम्माम्स, बावली, हिरा महाल, हयात बक्ष बाग इत्यादी सुंदर वैशिष्टे आहेत. येथे देशांतर्गत व विदेशी पर्यटक लाखोंच्या संख्येने भेट देतात.

२. **आग्रामधील लाल किल्ला** (Red Fort in Agra) :-

दिल्ली हि मुगलांची राजधानी होण्याअगोदर आग्रा हे राजधानीचे ठिकाण म्हणून अस्तित्वात होते. लाल दगडामध्ये बांधल्याने हा दिल्लीतील लाल किल्लयाशी समान वाटतो. येथेही संरक्षक भिंत, बुरुज, दिवान-ए-आम, दिवाण-ए-खास हे दरबार इत्यादी वैशिष्टे महत्वाची आहेत.

३. **अमेरचा किल्ला** (Fort in Amer) :-

हा किल्ला ४ चौ. किमी. परिसरात पसरला असून तो राजस्थानची राजधानी जयपूरपासून ११ किमी अंतरावर आहे. येथील अंतर्गत बांधकाम शैलीवर मुघल कलेचा परिणाम जाणवतो. सहा विभागात विभागलेल्या या किल्लयाला मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देतात.

४. **मेहरानगढ जोधपुर** (Mehrangad in Jodhpur) :-

राजस्थानमधील जोधपुर शहरात वसलेल्या मेहरानगडची उंची मूळ शहरापासून १२५ मीटर इतकी असून तो १४५९ मध्ये बांधण्यात आला. या किल्लयावर राजपूत घराणे राठोड यांच्या विविध वस्तू असणारे म्युजियम आहे. यात तोफ, हत्तीवरील अंबारी, शस्त्रास्त्रे, पेंटिंग इत्यादी गोष्टी आकर्षित करतात.

५. **ग्वाल्हेर किल्ला** (Gwaliar Fort) :-

इसवीसन १० व्या शतकात बांधलेला मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर या शहरातील ग्वाल्हेर किल्ला संरक्षणदृष्ट्या महत्वाचा होता. येथे गुर्जरी महाल आणि मन मंदिर हे दोन महाल आहेत. सुरुवातीच्या काळात राजपुतांच्या ताब्यात असणारा हा किल्ला मुघल, शीख, इंग्रज अशा वेगवेगळ्या राजवटींच्या अधिपत्त्याखाली होता. येथे जैन शिल्पे व मुर्त्या आढळतात.

६. **दौलताबाद किल्ला** (Daulatabad Fort) :-

देवगिरी म्हणून ओळखला जाणारा दौलताबाद किल्ला औरंगाबाद पासून केवळ २० किमी. अंतरावर आहे. येथे मुघल राजवटीने मोठा काळ व्यतीत केलेला दिसून येतो. तुघलकाने तर दिल्लीची राजधानी येथे आणली होती. हा किल्ला अतिशय कठीण आणि संरक्षित असून तो जिंकण्यास कठीण होता. येथे अनेक बांधकामे मूळ स्थितीत असून ऐतिहासिक वैशिष्टे किल्लयाचे महत्व ठळकपणे सांगतात. किल्ल्याला दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात.

७. **चित्तोडगड किल्ला** (Chittorgarh Fort) :-

भारतातील मोठ्या किल्लयांपैकी एक म्हणून राजस्थानमधील चित्तोडगड किल्ला ओळखला जातो. यास 'चित्रकुट' म्हणून नाव होते. येथे गौमुख तलाव किल्लयावर असून कीर्ती व विजयस्तंभ हे स्तंभ महत्वाचे आहेत.

## ब) युद्धस्थाने :-

### १. **पानिपत** (Panipat) :-

हरयाणामधील पानिपत हे शहर दिल्लीपासून ९० किमीवर असून येथे भारतीय इतिहासातील तीन युद्धे घडली. यातील तिसरे युद्ध मराठा व अब्दाली सैन्यात झाले. हे युद्ध इतिहासातील मोठे युद्ध मानले जाते. येथे इब्राहीम लोधीची समाधी असून मेमोरियल येथील युद्धाची आठवण करून देते.

### २. **प्लासी** (Plassey) :-

प्लासी हे पश्चिम बंगालमधील शहर असून येथे ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी व बंगालचे नवाब यांच्यात २३ जून १७५७ रोजी निर्णायक युद्ध झाले होते. यामुळे ब्रिटीशांचा बंगाल प्रांतावर अंमल निर्माण झाला होता. या ठिकाणाला या दृष्टीने महत्व आहे.

## क) जन्म-मृत्युस्थाने :-

### १. **श्रीरंगपट्टणम** (Shrirangpattana) :-

कर्नाटकातील म्हैसूर पासून १५ किमी अंतरावर असणारे श्रीरंगपट्टणम हे टिपू सुलतानची राजधानी असणारे ठिकाण होते. येथे भव्य रंगनाथस्वामी मंदिर असून ते ग्रानाईट खडकात बांधले आहे. येथे टिपू सुलतानचा महाल असून एक संग्रहालय म्हणूनही प्रसिद्ध आहे. म्हैसूर व श्रीरंगपट्टणम मार्गावर टिपू सुलतानचा मृत्यू झाला होता.

### २. **शिवनेरी** (Shivneri)

शिवनेरी हा छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असून तो महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात आहे. याला शिवनेरी नाव यादव घराण्याच्या काळात पडले. या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक भेट देतात.

## ड) स्मारके :-

### १. **जालियनवाला बाग** (Jaliyanwala Bagh) :-

१३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथील जालियानवाला बाग येथे रौलेट कायद्याच्या विरोधात जमलेल्या लोकांवर जनरल डायरने गोळ्या झाडल्या होत्या. त्यात ४०० पेक्षा जास्त लोक मृत्यू पावले तर हजारो जखमी झाले. या घटनेप्रित्यर्थ जालियानवाला बाग मेमोरिअल बांधले आहे. येथे हजारो पर्यटक गोळ्यांचे निशाण, विहीर व संग्रहालय बघण्यास येतात.

२. **कोहिमा स्मारक** (Kohima Monument) :-

एप्रिल १९४४ रोजी झालेल्या दुसऱ्या जागतिक महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या भारतीय ब्रिटीश सैनिकांच्या स्मृतीप्रित्यर्थ नागालँड राज्याची राजधानी कोहिमा येथे सैनिकांचे समाधीस्थळ सुशोभित केले आहे. या ठिकाणी ९१७ सैनिकांच्या समाधी आहेत. हे भारतातील सर्वात मोठ्या वार मेमोरियल पैकी एक आहे.

## इ) राजधानीची ठिकाणे :-

१. **फत्तेपूर-सिक्री** (Fattepur-Sikri) :-

मुघल सम्राट अकबर यांनी या ठिकाणाला आपल्या राजवटीतील राजधानी म्हणून महत्व दिले. येथे जामा मस्जिद असून त्यात शेख सलीम चिस्ती दर्गाह तसेच दिवान-ए-खास, किंग्स गेट, राणी महाल, बुलंद दरवाजा, अनुप तलाव इत्यादी विलोभनीय वैशिष्टे आहेत. आग्रापासून जवळ असल्याने ताजमहाल सोबत येथे मोठ्या संख्येने पर्यटक भेट देतात.

२. **दिल्ली** (Delhi) :-

भारताची राजधानी असणारी दिल्ली हि प्राचीन काळापासून एक शहर म्हणून अस्तित्वात आहे. तोमरस राजवट दिल्लीवर सुरुवातीस होती. परंतु मुघल काळात दिल्ली सल्तनत म्हणून तिला महत्व प्राप्त झाले. त्यानंतर ब्रिटिशांनी भारताची ब्रिटीश कालीन राजधानी म्हणून दिल्लीला महत्व दिले. दिल्ली येथे राजघाट, कुतुबमिनार, जामा मस्जिद, निजामुद्दीन दर्गाह, संसद, राष्ट्रपती भवन, इंडिया गेट, राजपथ, इत्यादी अनेक महत्वाची पर्यटन स्थळे आहेत.

३. **हैदराबाद** (Hyderabad) :-

इसवीसन १५९१ रोजी कुतुबशहाने गोवलकोंडा हि राजधानी पसरवण्याच्या उद्देशाने हैदराबाद ची स्थापना केली. हे तेलंगाना राज्याचे राजधानीचे ठिकाण असून कुतुबशाही नंतर निजामाने या शहरावर ताबा घेतला. १७ ऑक्टोबर १९४८ रोजी भारतीय सैन्याने हैदराबाद भारतात सामील केले. येथे गोवलकोंडा किल्ला, सालारजंग म्युजियम, चारमिनार, उभी बुद्धमूर्ती असणारे हुसेनसागर तलाव, रामोजी फिल्म सिटी, बिर्ला मंदिर इत्यादी प्रेक्षणीय स्थळे आहेत.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-४ ❊

१. खालीलपैकी कोणता किल्ला शाहजहानने बांधला?

*अ) चितोडगड  ब) लाल किल्ला  क) अमेरचा किल्ला  ड) मेहरानगड.*

२. दौलताबाद किल्ला कोणत्या राज्यात आहे?

*अ) राजस्थान   ब) उत्तरप्रदेश   क) महाराष्ट्र   ड) कर्नाटक.*

३. पानिपत हे ऐतिहासिक ठिकाण कोणत्या राज्यात आहे?

*अ) उत्तरप्रदेश   ब) हरयाणा   क) महाराष्ट्र   ड) मध्यप्रदेश.*

४. टिपू सुलतानची राजधानी म्हणून कोणते ऐतिहासिक ठिकाण ओळखले जाते?

*अ) मदुराई   ब) श्रीरंगपट्टण   क) शिमोगा   ड) बेंगलोर.*

५. दुसऱ्या महायुद्धात धारातीर्थी पडलेल्या भारतीय ब्रिटीश सैन्याचे समाधी स्थळ कोठे आहे?

*अ) दिल्ली   ब) अमृतसर   क) कोहिमा   ड) मुंबई.*

## २.४ सारांश

भारतातील पर्यटन व्यवसाय हा नैसर्गिक पर्यटन स्थळांच्या सभोवताली केंद्रित झाला आहे. भौगोलिक पर्यटन स्थळांच्या संबंधी विचार करता थंड हवेची पर्यटन स्थळे, वने, पुळणी, जलविभाग ह्या घटकांचा प्रामुख्याने समावेश होतो. थंड हवेच्या पर्यटन स्थळांचा विकास प्रामुख्याने उत्तर भारतात, हिमालय पर्वत प्रदेशात झाला आहे. ब्रिटिशांनी भारतीय हवामानातील उष्म्यापासून वाचण्यासाठी उंचीवरील ठिकाणी आपले प्रशासकीय कार्य उन्हाळ्यात स्थलांतरित केले. त्यामधून गिरीपर्यटन नावारूपास आले. त्याचबरोबर उष्णकटिबंधीय हवामानामुळे समुद्र किनारी प्रदेशात बीच पर्यटन निर्माण झाले. पश्चिम किनाऱ्यावर पर्यटन विकास झाल्याने येथील निवडक पर्यटन स्थळांवर आंतरराष्ट्रीय पर्यटनात वाढ झाली आहे. तुलनेने पूर्व किनाऱ्यावर बीच पर्यटनाचा कमी विकास झाला आहे.

जलविभाग हा पर्यटनाचा अविभाज्य घटक आहे. सरोवरे, नद्या व धबधबे या घटकांच्या सहाय्याने पर्यटकांना मोठी पर्वणीच झाली आहे. भारतात आंतरराष्ट्रीय पर्यटनाचा विकास होण्याजोगी सरोवरे नसल्याने पर्यटकांचा ओढ दिसून येत नाही. पूर्व किनाऱ्यावरील सरोवरे तुलनेने पर्यटनाच्या बाबतीत विकसित झाली आहेत. केरळमधील वेंबनाड सरोवर हे नैसर्गिक सौंदर्यांच्या बाबतीत अग्रक्रमावर आहे. भारतात धबधबे पावसाळी हवामानाच्या काळात पर्यटकांनी फुलून जातात. इतर काळात धबधबे पर्यटन इतके विकसित झालेले नाही.

धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाच्या बाबतीत भारत देश समृद्ध मानला जातो. धार्मिक पर्यटन उत्तर भारतात तुलनेने विकसित झाले असून देशांतर्गत पर्यटक जास्त संख्येने भेटी देतात. तर सांस्कृतिक पर्यटन स्थळे हि परदेशी पर्यटकांनी फुललेली दिसून येतात. सांस्कृतिक विविधतेमुळे भारतात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी पर्यटन स्थळे निर्माण झाली आहेत. त्याचबरोबर ऐतिहासिक संपन्नतेचा परिणाम भारतात सर्वदूर

ऐतिहासिक पर्यटनाच्या विकासावर झालेला दिसून येतो. किल्ले, युद्धस्थाने, राजधान्या, जन्म-मृत्यू ठिकाणे हि प्रमुख ऐतिहासिक ठिकाणे म्हणून ठळकपणे पुढे येताना दिसून येतात.

## २.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **थंड हवेची ठिकाणे :** पर्वतीय प्रदेशात कमी उंचीवरील थंड हवामानाची ठिकाणे.
- **पुळणी :** उष्णकटीबंधातील समुद्रकिनाऱ्यावरील शुभ्र वालुकामय सपाट प्रदेश जेथे समुद्रस्नान केले जाते.
- **राष्ट्रीय उद्याने :** वनांचा ऱ्हास थांबवण्याच्या दृष्टीकोनातून संरक्षित केलेले वन.
- **अभयारण्ये :** वन्यप्राण्यांसाठी राखीव क्षेत्र.
- **सरोवरे :** नैसर्गिक जलसाठा.
- **धबधबे :** नदीचे उंच कड्यावरून पडणारे पाणी.
- **शिल्पे :** दगडावर केलेले कोरीवकाम.
- **मोनेस्ट्री/स्तूप :** बौद्ध धर्मातील प्रार्थना स्थळ.

## २.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे :-

१. *क) मनाली.*

२. *ड) श्रीनगर.*

३. *क) जिम कोर्बेट.*

४. *ब) गीर.*

५. *क) मरीना.*

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे :-

१. *अ) जम्मू काश्मीर.*

२. *क) ठीकसे.*

३. *ड) अमृतसर.*

४. *क) अयोध्या.*

५. *ड) श्रवणबेळगोळ.*

## ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे :-

१. *अ) बीबी का मकबरा.*

२. *क) शालू.*

३. *क) कर्नाटक.*

४. *क) सांची.*

५. *ड) म्हैसूर.*

## ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे :-

१. *ब) लाल किल्ला.*

२. *क) महाराष्ट्र.*

३. *ब) हरयाणा.*

४. *ब) श्रीरंगपट्टणम.*

५. *क) कोहिमा.*

# २.७ सरावासाठी स्वाध्याय

१. उत्तर भारतातील थंड हवेची पर्यटन स्थळे सांगा.

२. दक्षिण भारतातील थंड हवेची पर्यटन स्थळे सांगा.

३. भारतातील प्रमुख राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये लिहा.

४. भारतातील प्रसिद्ध बीच पर्यटन केंद्रे लिहा.

५. पश्चिम किनाऱ्यावरील बीच पर्यटन विषद करा.

६. भारतातील सरोवर पर्यटनावर निबंध लिहा.

७. भारतातील प्रमुख बेटांवरील पर्यटन स्पष्ट करा.

८. उत्तर भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे सांगा.

९. दक्षिण भारतातील धार्मिक पर्यटनांवर संक्षिप्त उत्तर द्या.

१०. भारतातील सांस्कृतिक पर्यटनाचे घटक लिहा.

११. भारतातील सांस्कृतिक पर्यटन स्पष्ट करा.

१२. भारतातील ऐतिहासिक पर्यटकांचे घटक लिहा.

१३. भारतातील किल्ल्यांची पर्यटन स्थळे लिहा.

१४. भारतातील ऐतिहासिक पर्यटनावर थोडक्यात लिहा.

## २.८ क्षेत्रीय कार्य

१. आपल्या परिसरातील थंड हवेच्या पर्यटन स्थळांना भेटी देणे.

२. आपल्या परिसरातील राष्ट्रीय उद्यान अथवा अभयारण्याला भेट देऊन तेथील पर्यटनाचा कालावधी, येणारे पर्यटक व पशुपक्ष्यांची विविधता अभ्यासणे.

३. आपल्या परिसरातील धबधब्यास भेट देऊन त्याची उंची, पडणाऱ्या पाण्याचा कालावधी, येणारे पर्यटक इत्यादी गोष्टीची माहिती घेणे.

४. धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन स्थालामधील फरक समजून घेण्यासाठी जिल्ह्यातील अथवा राज्यातील धार्मिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे तपासून त्यांची यादी तयार करणे.

५. आपल्या परिसरातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांची यादी करून त्यापैकी एका पर्यटन स्थळास भेट देणे.

## २.९ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. **प्रा. के. ए. खातीब :** *'पर्यटन भूगोल'*, मेहता पब्लिशिंग हाउस, कोल्हापूर.

२. **प्रा. के. ए. खातीब :** *'भारताचा भूगोल'*, मेहता पब्लिशिंग हाउस, कोल्हापूर.

३. **डॉ. एस. बी. शिंदे :** *'पर्यटन भूगोल'*.

४. Incredible India website.

५. www.wikipedia.org.


❑❑❑

# महाराष्ट्रातील पर्यटन विकास आणि नियोजन

## (Tourism Development and Planning in Maharashtra)

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ महाराष्ट्रातील पर्यटनाचा विकास

    ३.२.२ महाराष्ट्रातील पर्यटनाचे नियोजन

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न

३.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ क्षेत्रीय अभ्यास

३.९ संदर्भ ग्रंथ सूची/अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये

१. महाराष्ट्रातील पर्यटनाच्या क्षेत्राच्या झालेल्या विकासाचा सर्वांगीण अभ्यास करणे

२. महाराष्ट्रात पर्यटन वाढीसाठी महाराष्ट्र सरकारने केलेले नियोजन अभ्यासने

## ३.१ प्रस्तावना

मागील काही घटकांमध्ये आपण भारतातील पर्यटनाचा विकास व नियोजन अभ्यासले. भारतात महाराष्ट्र हे अत्यंत प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. त्यामुळे भारतातील पर्यटनाचा विकास बघत

असताना महाराष्ट्राचा अभ्यास नाही केल्यास तो अपूर्ण होईल म्हणून या भागात आपण महाराष्ट्रातील पर्यटन विकास व नियोजन बघणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

परदेशी पर्यटकांच्या आगमनात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे (२०.८%) आणि देशांतर्गत पर्यटकांसाठी राज्य (७.२%) मानले जाते. महाराष्ट्रात सर्व प्रकारचे पर्यटन, म्हणजे ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि नैसर्गिक या सर्व प्रकारच्या पर्यटनासाठी महाराष्ट्र प्रसिद्ध आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन महाराष्ट्राच्या साम्राज्यामध्ये सातवाहन वंश, राष्ट्रकूट राजवंश, पाश्चात्य, चालुक्य, मोगल आणि मराठे इत्यादी साम्राज्याचा समावेश आहे यात मराठा साम्राज पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. राज्याचा समृद्ध इतिहास, परंपरा आणि संस्कृती त्याच्या प्राचीन किल्ल्यांमध्ये जतन आहे. महाराष्ट्र अनेक तीर्थक्षेत्रांसाठी लोकप्रिय आहे उदा. पंढरपूर, देहू, आळंदी, जेजूरी, शिर्डी, नांदेड येथील साहिब गुरुद्वारा, शिर्डी येथील साई बाबा मंदिर आणि नागपूर येथे दीक्षाभूमी. याचप्रमाणे महाराष्ट्र सांस्कृतिक आकर्षणासाठीही जगामध्ये ओळखले जाते ते एलोरा अजंठा लेणींसाठी. अजंठा हि औरंगाबाद जिल्ह्यातील लेणी सुमारे ३० रॉक-कट बौद्ध लेणी आहेत जी साधारण शतकात निर्माण झाली. अजंठा लेण्यांच्या जवळ म्हणजे २९ किमी वर एलोरा लेणी आहेत. या दोन्ही लेण्यांना जागतिक वारसा दर्जा मिळाला आहे. म्हणूनच औरंगाबाद ला महाराष्ट्राची पर्यटन राजधानी म्हणून ओळखलं जाते. याशिवाय, ७२० किमी लांब किनारपट्टी महाराष्ट्राला लाभली आहे. त्याच्या बाजूला पश्चिम घाट आहे जो घनदाट जंगले आणि वन्यजीव अभयारण्याने नटलेला आहे. अनेक आकर्षक थंड हवेची ठिकाणे या घाटात वसलेली आहेत.

### ३.२.१ महाराष्ट्रातील पर्यटनाचा विकास

महाराष्ट्रातील एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या एकूण उत्पादनांमध्ये पर्यटनाचा वाट २० ते २२ टक्के आहे आणि महाराष्ट्रातील रोजगाराच्या ३.५ टक्के रोजगार हे पर्यटन व्यवसायातील आहेत. १९९१ च्या आर्थिक जनगणनेनुसार ४,६१००० लोक पर्यटन व्यवसातील हॉटेल आणि रेस्टॉरंट मध्ये काम करत होते. तसेच ३,८७,००० लोक वाहतूक उद्योगामध्ये काम करीत होते.

महाराष्ट्रात १९९१ ला ७. दशलक्ष पर्यटक आले तेच २००० साली ९.३७ दशलक्ष झाले आणि २०११ साली एकूण ९ करोड पर्यटक महाराष्ट्रात आले आणि २०१८ ला एकूण १२ करोड पर्यटक महाराष्ट्रात आले. देशांतर्गत पर्यटकांची आवक १९९५ मध्ये ६.१६ दशलक्ष वरून २००० मध्ये ८.३० दशलक्ष इतकी झाली आहे तीच वाढून २११ मध्ये ७.०४ करोड इतकी झाली आणि वाढून २०१८ मध्ये ११.०९ करोड इतके झाले. अंदाजे महाराष्ट्र पर्यटनाचा ६.१४% च्या वाढीव वार्षिक वाढीचा दर

दर्शवितो. त्यापैकी महाराष्ट्राचा वाटा ६.०७% आहे. देशांतर्गत पर्यटक आगमनामध्ये महाराष्ट्र ७ व्या क्रमांकावर आहे. सन २००० मध्ये परदेशी पर्यटकांच्या संख्येपैकी महाराष्ट्रात २३.१७% आणि सन २००० मध्ये अखिल भारतीय परदेशी पर्यटकांच्या आगमनामध्ये द्वितीय क्रमांक आहे. आंतरराष्ट्रीय पर्यटक आगमन २००० मध्ये भारताची अंदाजे किंमत २.६४६४ दशलक्ष होती, जी मागील वर्षाच्या तुलनेत ४.४ टक्क्यांनी वाढली आहे. तीच वाढून २०११ मध्ये २० दशलक्ष झाली आणि २०१८ मध्ये ५० दशलक्ष झाली. २०१८ मध्ये महाराष्ट्राचा भाग हा १८ टक्के होता आणि महाराष्ट्र क्रमांक एक वर होते.

महाराष्ट्रामध्ये पर्यटनाच्या वाढी साठी पोषक वातावरण आहे. महाराष्ट्रात सर्व प्रकारचे पर्यटन होऊ शकते. जसे महाराष्ट्राला ७२० किमी.चा कोकण किनारा असल्यामुळे समुद्र किनाऱ्यावरील पर्यटन महाराष्ट्रात चालते. अनेक प्रकारचे किनारे महाराष्ट्रात सापडतात. ज्यात दगडी, दाट झाडी असलेली किनारपट्टी तसेच वालुकामय किनारपट्टी महाराष्ट्रात सापडते. २ महत्वाचे सागरी किल्ले महाराष्ट्रात आहेत जे पर्यटकांचे आकर्षण आहेत. ते म्हणजे मुरुड जंजिरा आणि सिंधुदुर्ग किल्ला. महाराष्ट्रात या किनारपट्टीला लागून पश्चिमघाट पसरलेला आहे. पश्चिम घाट ही जगातील सर्वात जास्त जैवविविधता असणाऱ्या आठ जागांपैकी एक आहे. महाराष्ट्रात याला सह्याद्री रांगा म्हणून ओळखतात. यावर अनेक दुर्मिळ तसेच नष्ट होत चाललेल्या वनस्पती व प्राणी आढळतात. यावर महाराष्ट्र सरकारने व्याघ्र प्रकल्प उभा करून अभयारण्ये उभी केली आहेत. कळसुबाईसारखे शिखर तसेच अनेक थंड पाण्याची ठिकाणे जशी महाबळेश्वर व माथेरान याच सह्याद्री रंगामध्ये आहेत. जवळपास महाराष्ट्रातील सर्व नद्या याच सह्याद्री घाटात उगम पावत असल्याने पवित्र ठिकाणे आहेत जी देशांतर्गत पर्यटकांना आकर्षित करतात. या शिवाय पठारावर अनेक धार्मिक तशीच सामाजिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळे विकसित झाली आहेत. ज्या मध्ये पंढरपूर, शिर्डी, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद हि ठिकाणे आहेत. औरंगाबाद मधील अजंठा एलोरा लेणी पाहायला प्रत्येक परदेशी पर्यटक येतो. पश्चिम घाट व हि लेणी हि जागतिक वारसा म्हणून घोषित केली आहेत.

या शिवाय महाराष्ट्र एक प्रगत राज्य आहे अनेक शहरे विकसित आहेतै जसे मुंबई हि भारताची आर्थिक राजधानी आहे तर पुणे हे एक महानगर ज्याला शिक्षणाचे तसेच सांस्कृतिक माहेरघर म्हटले जाते. त्यामुळे हि शहरे पर्यटकांची आकर्षणे आहेत. तसेच महाराष्ट्रात शेती उद्योगात विविधता आहे तसेच सहकार क्षेत्र प्रगत आहे त्यामुळे शेती पर्यटनही सुरु झाले आहे. तसेच कोकण व पश्चिम घाटात इको पर्यटनाला सुरुवात झाली आहे. जंगल सफारी, फुलपाखरू महोत्सव, काजवे महोत्सव, धबधब्यांमुळे पावसाळी पर्यटन या सारखी नवीन संकल्पना हि महाराष्ट्रात रुजत आहे. महाराष्ट्रात दळण वळणाची साधने विकसित आहेत. या शिवाय पुणे मुंबई येथे वैद्यकीय सेवा उपलबद्ध असल्याने वैद्यकीय पर्यटन हि विकसित होत आहे.

२०१३-१४ मध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन ने एकूण दररोज ७२.२२ लाख लोक वाहून नेले. मागील वर्षाच्या तुलनेने २.२ टक्क्यांनी बोजा कमी झाला. राज्यातील एकूण २३ शहरांमध्ये अंतर्गत वाहतूकही सार्वजनिक वाहतुकीवर अवलंबून आहे.

राज्यात रेल्वे मार्गाची लांबी ३१ मार्च २०१४ रोजी ६१.०३ कि.मी. होते (कोकण रेल्वेच्या ८३७८ कि.मी. सह) जे एकूण रेल्वेच्या ९.३% आहे. भारतामध्ये ६५,८०८ किमी लांबीची देशाच्या रेल्वे मार्गांची लांबी आहे. भारतातील पहिली ट्रेन धावली मुंबई ते ठाणे दरम्यान १६ एप्रिल १८५३ रोजी धावली. ही फक्त भारतातील नव्हे तर आशिया खंडातील सर्वात पहिली ट्रेन होती. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात रेल्वे वाहतुकीचा समावेश आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वे मुख्यालय असलेले केंद्र छत्रपती शिवाजी टर्मिनल मुंबई येथे आहे. मुंबई टर्मिनस (सीएसटी) आणि चर्चगेट येथून अनुक्रमे मुंबई राजधानी एक्सप्रेस, भारतातील सर्वात वेगवान ट्रेन आहे. राजधानी एक्सप्रेस नवी दिल्लीला जोडते.

राज्यात ७२० किमी लांबीचा किनारपट्टी आहे. केंद्र सरकार संचालित आणि  दोन प्रमुख बंदरांसह मुंबई पोर्ट ट्रस्ट (एमबीपीटी) आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) ही दोन्ही प्रमुख बंदरे आहेत. महाराष्ट्रात सुमारे ४८ छोटी बंदरे आहेत. यापैकी बहुतेक प्रवासी वाहतूक आणि माल वाहतूक हाताळण्याची क्षमता मर्यादित आहे.

राज्यामध्ये तीन आंतरराष्ट्रीय आणि सात देशांतर्गत विमानतळ आहेत. मुंबई सह नागपूर व पुणे हि मोठी विमानतळे आहेत. मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळ तयार करण्यासाठी प्रोजेक्ट हाती घेऊन ४० दश लक्ष प्रवासी हाताळू शकेल इतकी क्षमता असलेले विमानतळे उभी केली आहेत. असाच एक प्रकल्प नागपूर साठीही आहे.

या शिवाय महाराष्ट्रामध्ये इलेक्ट्रीसिटी विकसित आहे पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. पर्यटनासाठी लागणारी दुसरी महत्वाची सेवा म्हणजे हॉटेल्स. महाराष्ट्रामध्ये हॉटेल व्यवसाय जवळपास सर्व शहरांमध्ये विकसित झाला आहे. अगदी साध्या लॉज पासून ७ स्टार हॉटेल्स उपलब्ध आहेत. यातच महाराष्ट्र सरकारने न्याहारी आणि निवास योजना सुरु करून सामान्य लोकांनाही रोजगाराचा मार्ग उपलब्ध करून दिला आहे. २०१६ च्या माहिती मध्ये महाराष्ट्राची आकडेवारी १५,०२१.००० युनिटवर नोंदली गेली. जी २०१५ मध्ये १३,०५९.००० इतकी होती. मागच्या वर्षाच्या तुलनेने वाढ झालेली दिसून येते. २०१० मध्ये विक्रमी म्हणजे २१२५५००० इतकी पर्यटक नोंद झाली होती तर २००५ मध्ये सगळ्यात कमी म्हणजे १००२५००० इतकी नोंद झाली होती.

## ३.२.२ महाराष्ट्रातील पर्यटनाचे नियोजन

राज्यामधील पर्यटनाच्या योग्य, टिकावू आणि दीर्घकालीन विकासासाठी राज्यसरकारने ‘महाराष्ट्र

टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन' (एमटीडीसी) जानेवारी १९७५ मध्ये शासनाने स्थापित केले. हा स्वतंत्र विभाग खालील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून स्थापन करण्यात आला.

१. पर्यटनाशी संबंधित कामांसाठी स्वतंत्र संस्था स्थापन करणे.

२. राज्य सरकारने पर्यटनाबाबत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे.

३. पर्यटनविषयक कामांचे पर्यवेक्षण व देखरेख करणे.

४. अभ्यास व संशोधन करणे आणि ते संबंधित इतरांना सादर करणे

५. विभाग जेव्हा आवश्यक असेल. सर्व प्रकारचे राज्य पर्यटन डेटा (माहिती) राखण्यासाठी व उपलब्ध करुन देणे.

६. राष्ट्रीय पर्यटन प्रमोशनल उपक्रम राबविणे

७. आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगला संपर्क स्थापित करणे आणि इतर राज्यासह माहितीची देवाणघेवाण करणे

८. पर्यटन महामंडळाकडून राज्य सरकारला मौल्यवान सूचना व शिफारसी देणे

९. पर्यटन उद्योग चालना देणे.

१०. राज्यात नवीन पर्यटन स्थळांचे अन्वेषण व विकास करणे.

रोजगारासाठी पर्यटनाचे महत्त्व ओळखून परकीय चलन मिळवणे, अंतर्गत क्षेत्राचा विकास, सांस्कृतिक व नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे, कला व हस्तकला यांचे संवर्धन आणि अनेक संस्कृती व लोक यांच्यात परस्परसंवादाचे फायदे लक्षात घेऊन १९८९ पासून राज्य सरकारने अनेक पावले उचलली आहेत. पूर्वीच्या परिस्थितीवर उपाय म्हणून राज्य सरकारने पायाभूत सुविधा पुरवाव्यात आणि हॉटेल्स व परिवहन सेवा चालू ठेवण्याचा व्यवसाय शक्य तितक्या खासगी क्षेत्राला सोडावा असा निर्णय घेण्यात आला आहे. एमटीडीसीची भूमिका, जी पूर्वी फक्त हॉलिडे होम आणि बसेस चालविणे होती, त्यात पुनर्रचना केली गेली आहे जेणेकरुन ते अती विकास घडवून आणण्यासाठी उत्प्रेरक म्हणून काम करू शकतील. त्याच्या पुन्हा परिभाषित भूमिकेमध्ये, एमटीडीसी खालील उपक्रम राबवित आहे:

१. एक साधन म्हणून पर्यटन वापरून पर्यटन विकास आणि क्षेत्र विकासासाठी मास्टर प्लॅन तयार करणे. उदा. अजिंठा-एलोरा, लेक जिल्हा आणि निवडलेली तीर्थक्षेत्र आणि हिल स्टेशन.

२. खासगी क्षेत्रातील गुंतवणूकीसाठी जमीन संपादन करणे.

३. खासगी क्षेत्राला आर्थिक प्रोत्साहन देणे.

४. पायाभूत सुविधांच्या विकासाचे समन्वय साधणे.

५. माहिती आणि प्रसिद्धी प्रसार, प्रचार करणे.

६. नवीन संकल्पना प्रदर्शित करणे, उदा. कॅम्पिंग ग्राउंड्स, वॉटर-स्पोर्ट्स, कारवां, तंबू-कॅम्पस् विशेषत: तरुण आणि बजेट पर्यटकांसाठी या सोयी उपलब्ध करून देणे.

७. त्या सुविधा सुधारित करून खासगी क्षेत्राकडे हस्तांतरित करता येणार नाहीत.

८. प्रवासी व्यापार, केंद्र व राज्य सरकारी संस्था यांच्याशी समन्वय साधणे.

९. पर्यटकांच्या तक्रारींचे निवारण करणे.

१०. खाजगी क्षेत्राचा सहभाग येत नाही अशा क्षेत्रात शासकीय पातळीवर विकास करणे.

## ♦ मास्टर प्लॅन

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांच्या मदतीने राज्यातील पर्यटन विकासासाठी मास्टर प्लॅन पहिल्यांदा १० वर्षांसाठी तयार करण्यात आला. त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होता.

१) समुद्र किनाऱ्याचा विकास - ३२ ठिकाणी

२) मार्गाची सुविधा आणि मोटेल - ६४ स्थाने

३) जल क्रीडा सुविधा - ५४ठिकाणे

४) किल्ले - ३५ ठिकाणी

५) साहसी पर्यटन - हँग ग्लाइडिंग, रॉक आणि फोर्ट क्लाइंबिंग.

६) आधुनिक बोटी - बॉम्बे हार्बर

७) अजिंठा-एलोरा विकास योजना - रु. १९६ कोटी

८) लेक जिल्हा विकास - १० ठिकाणे

९) कला व हस्तकला गावे - म्हणजे औरंगाबाद, पुणे, बॉम्बे, नागपूर

१०) डे-अभ्यागत सुविधा - १२ ठिकाणे

११) तीर्थक्षेत्र - ८ स्थाने

१२) नवीन हिलस्टेशन्सचा विस्तार - ४ स्थाने

१३) जंगल सफारी - ६ स्थाने

१४) लोणार क्रेटर

१५) एलिफंटा बेट.

१६) खुल्या वातावरणाचे मनोरंजन - ५ स्थाने.

१७) अधिवेशन केंद्रे व प्रदर्शन मैदान - २ म्हणजे मुंबई व पुणे.

१८) विशेष पर्यटन क्षेत्र - विजयदुर्ग ते सिंधुदुर्ग किल्ला - ८४ कि.मी. आणि ९ जिल्ह्यांमधील राज्य विशेष पर्यटन क्षेत्र.

१९) रायगड जिल्ह्यातील ट्रॅव्हल सर्किट भारत सरकारने जाहीर केले.

मास्टर प्लॅन लक्षात घेऊन पर्यटनाला चालना देणारे महाराष्ट्र राज्य १९९३ मध्ये पर्यटन विकासाचे धोरण घेऊन अंमलबजावणीस सज्ज झाले.

## ♦ पर्यटन विकासासाठी धोरण

पर्यटन क्षेत्राच्या विकासास राज्य प्राधान्य देते कारण ही एक महत्त्वाची आर्थिक क्रिया आहे. पुढील दहा वर्षांत मास्टर प्लॅननुसार काही निवडक क्षेत्रांवर आपल्या विकासाच्या प्रयत्नांवर लक्ष केंद्रित केले. उर्वरित क्षेत्रासाठी उद्योजकांना आणि तज्ञांना आकर्षक आणि स्वच्छताविषयक सुविधा देण्यासाठी प्रोत्साहन दिले. पर्यटन धोरणाची उद्दीष्टे अशी आहेतः

- तज्ञांच्या मदतीने आणि स्थानिक सहभागाने नियोजित पर्यटन वाढीसाठी प्रयत्न करणे.
- पर्यटकांच्या आकर्षणाची माहिती प्रसारित करणे आणि अभ्यागतांना समृद्ध करणारा अनुभव प्रदान करणे.
- अस्तित्त्वात असलेल्या पर्यटन सुविधांचा स्तर वाढवणे.
- निवडलेल्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन सुविधा पुरविणे.
- युवक आणि बजेट पर्यटकांसाठी सुविधा प्रदान करणे.
- प्रमुख व्यवसाय, औद्योगिक आणि शहरी केंद्रांजवळ मनोरंजक सुविधा प्रदान करणे.
- देशासाठी अधिक परकीय चलन मिळवणे.
- रोजगार निर्माण करणे. विशेषत: राज्याच्या अंतर्गत भागात पर्यटनाचा विकास करणे.

पर्यावरणीय शाश्वत रीतीने एकात्मिक विकासासह त्याच्या नैसर्गिक आणि सांस्कृतिक संसाधनांचे संरक्षण करणे. हस्तकला आणि हातमाग आणि लोककला यासह त्यांच्या विविध कला आणि हस्तकला यांना प्रोत्साहन देणे.

पर्यटन क्षेत्रात खासगी क्षेत्रातील गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी परिस्थिती निर्माण करण्यासाठी पायाभूत विकास, माहितीचा प्रसार आणि पंथीय क्रियाकलापांचे समन्वय यासाठीचे प्रयत्न राज्य सरकारने मर्यादित ठेवले. हॉटेल्स आणि टूरिस्ट बसेस चालविणे हे राज्य एजन्सींचे काम नाही आणि हळूहळू राज्य अशा कामकाजातून आपले उपक्रम मागे घेईल आणि पर्यटन उद्योगातील व्यावसायिकांच्या स्वाधीन करेल असे नियोजनामध्ये ठरवले. राज्य आथिर्क प्रोत्साहन देखील देईल, योग्य साइट्स उपलब्ध करण्यास मदत करेल आणि अडथळे दूर करेल, विशेषत: पायाभूत विकासाशी संबंधित. मनुष्यबळ विकास आणि पर्यटकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी राज्य उच्च प्राधान्य देते. हे गुणवत्ता निमंत्रण सुनिश्चित करण्यासाठी प्रशिक्षण संस्था आणि योग्य यंत्रणा स्थापित करण्यात मदत करेल.

पर्यटन सेवा हे स्वयंसेवी गट आणि हॉटेलवाल्यांच्या संघटना, प्रवासी व्यापार आणि टूर ऑपरेटरच्या पर्यटकांना याची खात्री करण्यासाठी अधिक सक्रिय सहभागास प्रोत्साहित करेल.

पर्यटन कार्यालयाच्या मदतीने आपली नैसर्गिक आणि सांस्कृतिक संसाधने वाढविण्यात येतील आणि पर्यावरणीय संतुलनाला अडथळा आणणाऱ्या कोणत्याही गोष्टीस परवानगी दिली जाणार नाही हे राज्य सुनिश्चित करेल.

## ♦ पर्यटनाचा विकासात एकात्मिक दृष्टीकोन

पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यभरात पर्यटन सुविधांच्या स्थापनेचे उद्दिष्ट ठेवले, परंतु पर्यटन क्षमता जास्त असणाऱ्या किंवा पर्यावरणीय किंवा सांस्कृतिकदृष्ट्या अधिक संवेदनशील असणारे समुद्रकिनारे आणि वन पर्यटनासारख्या काही निवडक क्षेत्रात सरकार लक्ष केंद्रित करू इच्छित होते. प्रत्येक अर्थसंकल्पात अनुकूल असलेल्या विविध प्रकारच्या सुविधा देण्यास राज्याने प्रोत्साहन देऊ केले. मास्टर प्लॅन आणि केलेल्या अभ्यासांच्या आधारे, खाली दर्शविल्याप्रमाणे विविध क्षेत्रांची स्थापना करण्यासाठी खालील क्षेत्र आणि श्रेणी ओळखल्या गेल्या:

१. अजिंठा, एलोरा, कार्ला इ. ठिकाणी परदेशी पर्यटक जास्त आकर्षित व्हावेत या साठी सांस्कृतिक कार्यक्रम आणि लोककला कार्यक्रम आणि रॉक-कट लेणी प्रदर्शन आणि उत्सव, शिल्पग्राम, पारंपरिक वस्तूंची बाजारपेठ आणि कमी दरातील राहण्याच्या व्यवस्था, संग्रहालये उभारणे.

२. काही किल्ले स्थानिक पर्यटक डोळ्यासमोर ठेवून निवडण्यात आले. कॅम्पिंग आणि साध्या वसतिगृह सोयी, वसा भेट देणाऱ्यांसाठी सुविधा, किल्ला आणि टेकडी चढणे, चालणे , ट्रेकिंग, इ. चा विकास करणे.

३. तीर्थयात्रा पर्यटन खास घरगुती पर्यटक डोळ्यासमोर ठेवून स्वस्त निवास आणि दिवस अभ्यागतांच्या सुविधा उपलब्ध करणे.

४. विश्रांती पर्यटन देशांतर्गत पर्यटक तसेच परदेशी पर्यटक डोळ्यासमोर ठेवून समुद्र किनारे, निसर्गरम्य ठिकाणे विकसित करणे त्या ठिकाणी कमी दराच्या निवास सुविधा निर्माण करणे यासाठी न्याहारी, राहणे इ. सोयी करणे त्या ठिकाणी स्थानिक पदार्थाना बाजारपेठ, याच बरोबर करमणूक, जल पर्यटन, जल साहसी खेळ इ. विकास करणे.

५. थंड हवेची ठिकाणे व तलाव मुख्यत्वे देशांतर्गत पर्यटंकासाठी कॅम्पिंग आणि कमी दरातील निवास सोयी, वॉटर स्पोर्ट्स, ट्रेकिंगवर भर देणे.

६. साहसी पर्यटन देशांतर्गत पर्यटंकासाठी ट्रेकिंग, कॅम्पिंग, पाणी (राज्यातील) खेळ, जलपर्यटन, कारवां, चिखल झोपड्या इ. उभारणी करणे.

७. वन पर्यटन देशांतर्गत पर्यटंकासाठी तंबू उभारणे, मार्गदर्शित टूर, संग्रहालये इ.ची निर्मिती करणे.

८. शहरी क्षेत्र, पर्यटन व्यवसाय प्रवासी, प्रदर्शन मैदान आणि शिधा केंद्र, बाजारपेठ, औद्योगिक किंवा व्यवसाय, संध्याकाळचे मनोरंजन आणि केंद्रे, क्रीडा आणि प्रदूषणमुक्त हवा उपक्रम राबविणे.

९. इको टूरिझम-खास परदेशी पर्यटंकासाठी जवळील मूलभूत सुविधा वापरून वैकल्पिक पर्यटन, घरगुती पर्यटकांचा समुदाय विकास प्रकल्प, खास पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रांमध्ये विकास करणे.

अशा प्रकारे सांस्कृतिक आणि विश्रांतीच्या पर्यटनासाठी अप-मार्केट पर्यटकांची पूर्तता करताना प्रत्येक ठिकाणी स्वच्छ व स्वच्छताविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील याची दक्षता घेतली जाईल. साहसी आणि तीर्थक्षेत्र पर्यटनाच्या बाबतीत जसे ग्राहक मुळात घरगुती असतात तेथे सरकार अप-मार्केट सुविधांना प्रोत्साहन देणार नाही. तीर्थक्षेत्रांमध्ये आणि जेथेही प्रमुख यात्रांचे आयोजन केले जाते, तेथे ज्योतिबा, शिर्डी आणि नांदेडच्या धर्तीवर मास्टर प्लॅन तयार करण्यात येतील, यासाठी नगरविकास विभागाशी सल्लामसलत केली जाईल. या योजनेत मोबाइल टॉयलेट्स आणि तंबू, कारवां इत्यादी स्वरूपात तात्पुरती निवास व्यवस्था यासारख्या खर्चिक पद्धतींचा समावेश केला जाईल. मास्टर प्लॅननुसार हे क्षेत्र निश्चित केले जाईल आणि नवीन स्थळांचा विकास सुरू होण्यापूर्वी एकात्मिक विकास प्रकल्प अहवाल तयार केला जाईल. नैसर्गिक आणि सांस्कृतिक संसाधनांची वाढ, मनुष्यबळाचे प्रशिक्षण आणि सर्व विकास प्रकल्पांमध्ये स्थानिक सहभागाची खात्री करण्यासाठी हे आवश्यक आहे. या सारखे नियोजन करण्यावर भर दिला.

## ♦ पर्यटन – उपक्रमांची व्याप्ती

पर्यटन संबंधित उपक्रमांमध्ये हॉटेल, रिसॉर्ट्स, मोटेल, आरोग्य धामे, अपार्टमेंट हॉटेल्स, जल क्रीडा सुविधा, कला व हस्तकला, शुद्ध हवा मनोरंजन सुविधा, कॅम्पिंग, करमणूक उद्याने, रोपवे, कन्व्हेन्शन सेंटर आणि हेरिटेज हॉटेल्स समाविष्ट करण्यात आली.

## ♦ संवेदनशील नैसर्गिक सौंदर्य क्षेत्राचे संरक्षण

राज्यात उत्कृष्ट सांस्कृतिक वारसा आणि निसर्गरम्य सौंदर्य असे अनेक क्षेत्रे आहेत. त्याचप्रमाणे, भौगोलिक स्वारस्याची वैशिष्ट्ये (उदा. लोणार लेक, बॉम्बेमधील गिलबर्ट हिल) सारख्या उत्कृष्ट नैसर्गिक घटनेची क्षेत्रे आहेत ज्यांना वंशपरंपरासाठी जतन करणे आवश्यक आहे. सरकार अशा क्षेत्रांची ओळख करुन पर्यटकांच्या हितासाठी त्यांचा विकास करेल आणि असे विशेष नियम तयार करेल जे अशा वातावरणात नैसर्गिक वातावरण–सांस्कृतिक आणि वारसा हानी पोहोचविण्यास प्रतिबंधित करेल, असेही नियोजनात ठरवण्यात आले.

## ♦ पर्यटन विकास विभाग

विविध शहरी भागातील विकास योजना सामान्यत: केवळ निवासी, औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रासाठी अशी व्यवस्था करतात. पर्यटकांच्या क्रियाकल्पांना प्रोत्साहित करण्यासाठी राज्य शासन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सल्ल्यानुसार पर्यटकांसाठी उपयुक्त अशी काही विशिष्ट क्षेत्रे ओळखेल. अशा भागात बीच, रिसॉर्ट्स, हॉटेल्स, मोटेल्स, रेस्टॉरंटस्, हेल्थ फार्म इत्यादी पर्यटकांच्या बढती उपक्रम डी.ई. मध्ये अस्तित्त्वात असलेल्या झोनिंग आवश्यकतांमध्ये थोडीशी विश्रांती घेऊन स्थापित केल्या गेल्या.

पर्यटकांच्या हितासाठी ग्रेटर बॉम्बेच्या डेव्हलपमेंट झोनमध्ये गोल्फ कोर्स, स्विमिंग पूल, ग्लाइडिंग सुविधा, जिमखाना, करमणूक उद्याने इत्यादीसारख्या काही उपक्रमांना यापूर्वीच परवानगी आहे. अन्य शहरी भागातही डेव्हलपमेंट झोनमध्ये अशा प्रकारच्या क्रियाकल्पांना परवानगी देण्यात आली. ते ही ०.१ च्या एम एसआय निर्बंधाच्या अधीन राहून.

शहरी जमीन मर्यादा अधिनियमाअंतर्गत अधिशेष जमीन ग्राह्य करण्यात आली.

नवीन औद्योगिक धोरण १९९९ मध्ये नमूद केल्यानुसार, शहरी जमीन (कमाल मर्यादा व नियमन) अधिनियम १९९७ अंडर ६ च्या अंतर्गत अतिरिक्त जमीन घोषित करण्यात आली आहे. बीएमआर / पीएमआरच्या एकत्रिकरणावरील विक्री भावाच्या २% आणि १ टक्के हॉटेल हस्तांतरण शुल्क आकारून हॉटेल प्रकल्पांसाठी वापरण्याची परवानगी देण्यात आली.

१९९९ च्या नियोजन आराखड्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी खास पॅकेजेस देण्यात आले ते खालील प्रमाणे

१. महाराष्ट्र सरकारने पर्यटनाला चालना देण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला

२. जिल्ह्यात आणि नियुक्त केलेल्या भागात महाराष्ट्र शासनाने पॅकेज वाढविला आहे

३. तसेच पुढील १२ वर्ष्यांच्या कालावधीसाठी पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी सवलती आणि कर लाभ योजना.

४. पुढील १० वर्षांच्या कालावधीसाठी वीज देखील पुरविली जाईल.

५. ५० टक्के सवलतीच्या दारात सरकारी जमीन उपलब्ध असेल.

## ♦ विशेष पर्यटन क्षेत्र

टीएस-एल च्या युनिट २९ मधील विशेष पर्यटन क्षेत्राअंतर्गत राज्य सरकारने अधिसूचित केलेल्या मर्यादा असतील तिथे हॉटेल आणि पर्यटन संबंधित उपक्रमांसाठी सवलतीच्या दरात जागा देण्यात येतील ज्यात संभाव्य गुंतवणूकदारांना प्रोत्साहन व सवलती देण्यात येतील. हि राज्य शासनाने पुरविलेली मूलभूत पायाभूत सुविधा आहे.

## ♦ भारत सरकार द्वारे ओळखले जाणारे खास पर्यटन क्षेत्र

यात किनारपट्टीचे क्षेत्रफळ ८४ कि.मी. लांबीचा प्रदेश विशेषतः सिंधुदुर्ग जिल्हा निवडण्यात आला व विकास करण्यासाठी कार्यक्रम आखण्यात आले.

## ♦ ध्येय, धोरण आणि उद्दिष्टे- महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१५.

- महाराष्ट्राला लोकप्रिय आणि शाश्वत पर्यटन स्थळ म्हणून विकसित करणे.
- जागतिक, प्रादेशिक आणि स्थानिक स्तरावर जाहिरात करणे.
- सर्वोत्तम सराव आणि मानकांवर अफाट अनुभव असलेल्या सर्व सामाजिक-आर्थिक स्तरातील लोकांना सर्वसमावेशक संधी आणि प्रवेश प्रदान करणे.
- राज्याचे काही युनो पर्यटन स्थळ म्हणून जाहिरात करणे.
- पर्यटनासाठी पायाभूत सुविधा विकसित करणे.
- पर्यटन क्षेत्रात गुंतवणूकी सुलभ करणे.

- **उद्दीष्टे :-**
  - ☼ पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणूकीला चालना देणे.
  - ☼ पर्यटन क्षेत्रात जागतिक गुंतवणूकदार समुदायापर्यंत गुंतवणूकसाठी पोहोचणे.
  - ☼ पर्यटन पायाभूत सुविधा विकास करणे.
  - ☼ विपणन आणि जाहिरातींसाठी अभिनव पद्धती विकसित करणे.
  - ☼ पर्यटन स्थळे आणि मार्ग विकसित करणे.
  - ☼ पर्यटन विकासासाठी शाश्वत दृष्टीकोन स्वीकारणे.

- **लक्ष्य –**
  - ☼ २०२२ पर्यंत महाराष्ट्र – जगातील आघाडीचे पर्यटन स्थळ बनविणे.
  - ☼ ३०,००० कोटी रुपये गुंतवणूकीसाठी गुंतवणूकदारांना आकर्षित करणे.
  - ☼ पर्यटन क्षेत्रात १ दशलक्ष अतिरिक्त रोजगार निर्मिती.
  - ☼ पर्यटन प्रकल्पांची संख्या ५ वर्षात दुप्पट, दहा वर्षांत तिप्पट करणे.
  - ☼ पर्यटन क्षेत्रातील १ दशलक्ष कुशल आणि अर्ध-कुशल संसाधने विकसित करणे.

- **२०१६ मधील नियोजन आराखड्यामधील ठळक गोष्टी :-**

१. पर्यटन क्षेत्र वृद्धी साठी सार्वजनिक, खाजगी भागीदारी मॉडेल तयार करणे.

२. शाश्वत पर्यटन.

३. ग्रामीण पर्यटन.

४. कारवा पर्यटन.

५. बैठकी, परिषदा, प्रदर्शने याना प्रोत्साहन.

६. चित्रपट पर्यटन.

७. पर्यटन पोलीस.

८. स्मार्ट टिकेटिंग सिस्टिम.

९. संकल्पना आधारित पर्यटन.

१०. साहसी पर्यटन.

११. पर्यटन महोत्सव.

१२. वैद्यकीय पर्यटन.

१३. विपणन आणि प्रचालन प्रसिद्धी.

या सर्व प्रयत्ना नंतर हि अजून म्हणावा तसा पर्यटन विकास महाराष्ट्रात घडून आलेला नाही कारण आपल्या कडे साधन संपत्ती व मनुष्य बळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. मात्र नियोजनात कमी व आर्थिक तरतूद कमी पडते आहे.

## ३.३ सारांश

पर्यटन विकसित होण्यासाठी महाराष्ट्रात भौगोलिक सामाजिक तसेच आर्थिक वातावरण अत्यंत पोषक आहे. महाराष्ट्रात एकूण उत्पादनापैकी एक चतुर्थांश वाटा हा पर्यटनाचा आहे. तसेच नोकऱ्या हि चांगल्या प्रमाणात उब्लध आहेत. महाराष्ट्रामध्ये मुंबई एअरपोर्टमुळे परदेशी पर्यटकांना येणे सोपे आहे. त्यामुळे महाराष्ट्रात येणाऱ्या परदेशी पर्यटकांची संख्या जास्त आहे. हे पर्यटक सांस्कृतिक आकर्षणांना प्रथम प्राधान्य देतात. त्यामुळे ते अजंठा, एलोरा तसेच एलिफंटा गुहा बघायला जातात. याचमुळे औरंगाबादला पर्यटन राजधानी म्हणून ओळखले जाते. याचबरोबर महाराष्ट्रात धार्मिक पर्यटन सुद्धा जोरात चालते. पंढरपूर हे महाराष्ट्रीयन लोकांचे श्रद्धा स्थान आहे. त्यामुळे महाराष्ट्रातून लोक खूप मोठ्या प्रमाणात पंढरपूरला जातात. वारी हा एक धार्मिक यात्रा पर्यटनाचा प्रकार आहे. याच बरोबर शिर्डीच्या साई बाबा मंदिराला तिरुपती मंदिरासारखे महत्व आहे. तसेच ते औरंगाबाद जवळ आहे. कोल्हापूरची अंबाबाई दक्षिण तिरुपतीची बायको म्हणून तिरुपती दर्शनाला गेलेले लोक कोल्हापूर ला अंबाबाईच्या दर्शनाला येतात. ७२० किमी चा किनारा असल्यामूळे सागरी पर्यटन हि महाराष्ट्रात उपलब्ध आहे परंतु हे राज्यांतर्गत पर्यटनाला जास्त वापरले जाते. अजून देशीय पर्यटन तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटन येथे जास्त विकसित झाले नाही. कारण गोवा जवळ असल्यामुळे लोक गोव्याकडे जातात. तसेच किनार पट्टीला समांतर पश्चिम घाट आहे जो जैव विविधते साठी ओळखला जातो. तसेच याकडे जागतिक ठेवा म्हणूनहि पहिले जाते. खरं तर ecotourism तसेच थंड हवेची ठिकाणे विकसित करण्यास वाव आहे परंतु फक्त राज्यांतर्गत पर्यटनासाठी महाबळेश्वर, माथेरान आणि आंबोली हि तीन ठिकाणे विकसित झाली आहेत. राज्य सरकारने व्याघ्र प्रकल्प उभा केला आहे परंतु अजून विकसित झाला नाही. महाराष्ट्रात रस्ते. लोहमार्ग, विमान सेवा तसेच निवास व अन्न सेवा मोठ्या प्रमाणात आहेत. महाराष्ट्र सरकारने पर्यटनाचा विकास करण्यासाठी १९७५ साली प्रयत्न करण्यास सुरुवात केली, त्यानंतर सुरुवातीला ठराविक ठिकाणे त्यातहि सांस्कृतिक व धार्मिक ठिकाणे विकसित करणे, जाहिरात करणे, सेवा- सुविधा उभ्या करणे या वर भर देण्यात आला. त्यानंतर ठराविक जिल्हे विकसित करण्यावर भर देण्यात आला. ज्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. तेथे उभ्या करण्यात येणाऱ्या सुविधांवर कर सवलत

देण्यात आली तसेच गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देण्यात आले. या नंतर खाजगी गुंतवणूक दारांवर जास्त भर देण्यात आला. खाजगी आणि सरकारी सुविधांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला तसेच खास पर्यटन जसे कृषी पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, साहसी पर्यटन, ट्रेकिंग, पर्यटन महोत्सव, चित्रपट पर्यटन यासारखे नवीन प्रकार विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले, परंतु अजूनही महाराष्ट्रात पर्यटन हवे तेवढे विकसित झाले नाही.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **जेएनपीटी** : जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट.

२. **एमटीडीसी** : महाराष्ट्र टुरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन.

३. **जलपर्यटन** : पाण्याशी संबंधित पर्यटन.

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न

- **रिकाम्या जागा भरा.**

१. महाराष्ट्राला किती किमी लांब किनारपट्टी लाभली आहे?

*अ) ५२०* *ब) ६२०* *क) ७२०* *ड) ८२०.*

२. कोणता जिल्हा १९९८-९९ च्या नियोजन आराखड्यात पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला?

*अ) रायगड* *ब) कोल्हापूर* *क) सांगली* *ड) सिंधुदुर्ग.*

३. कोणत्या शहरास पर्यटन राजधानी म्हणून ओळखतात?

*अ) पुणे* *ब) मुंबई* *क) नागपूर* *ड) औरंगाबाद.*

४. १९९१ च्या आर्थिक जनगणनेनुसार पर्यटन व्यवसातील हॉटेल आणि रेस्टॉरंट मध्ये किती लोक काम करत होते?

*अ) ४१०००* *ब) ५१०००* *क) ६१०००* *ड) ७१०००.*

५. महाराष्ट्रात कोणते दोन महत्वाचे सागरी किल्ले आहेत जे पर्यटकांचे आकर्षण आहेत?

*अ) मुरुड जंजिरा व सिंधुदुर्ग* *ब) विजयदुर्ग व प्रतापगड*

*क) विशाळगड व पन्हाळगड* *ड) प्रतापगड व सिंहगड.*

## ३.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

*१. क) ७२०.*

*२. ड) सिंधुदुर्ग.*

*३. ड) औरंगाबाद.*

*४. क) ६१०००.*

*५. अ) मुरुड जंजिरा व सिंधुदुर्ग.*

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

### अ) थोडक्यात उत्तर द्या

१. महाराष्ट्रात कोणकोणत्या प्रकारचे पर्यटन आकर्षण आहेत यादी करा.

२. सह्याद्री घाट पर्यटन दृष्टीने कसा महत्वाचा आहे विशद करा.

३. MTDC ची उद्दिष्ट्ये काय आहेत?

४. महाराष्ट्रातील सर्वात प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळ कोणते व का?

५. महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय विमानतळे कोणकोणत्या शहरात आहेत?

६. कोणते रेल्वे स्टेशन जागतिक वारसा स्थळ मध्ये आहे?

### ब) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. महाराष्ट्रीतील पर्यटनासाठी पोषक घटकांवर निबंध लिहा.

२. महाराष्ट्रातील पर्यटनाची सध्य स्थिती मांडा.

३. महाराष्ट्रातील पर्यटन नियोजन आराखड्यावर निबंध लिहा.

## ३.८ क्षेत्रीय अभ्यास

१. आपल्या क्षेत्रातील कोणत्याही पर्यटनस्थळी भेट द्या आणि खालील घटकांचे विश्लेषण करा.

२. पर्यटन स्थळाचा विकास.

३. सोयी सुविधा.

## ३.९ संदर्भ ग्रंथ सूची/अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **घारपुरे विठ्ठल** (२००१) : *'पर्यटन भूगोल'*, पिंपळापुरे आणि कंपनी पुब्लिशर नागपूर.

२. **डॉ. नागतोडे आणि प्रा. पारधी** (२००६) : *'पर्यटन भूगोल'*, विद्या प्रकाशन नागपूर.

३. **शिंदे ऐ बी** (२००६) : *'पर्यटन भूगोल'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. **खतीब के. ऐ** (२००६) : *'पर्यटन भूगोल'*, मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर.


❑❑❑

सत्र-४ : घटक-४

# महाराष्ट्रातील पर्यटन केंद्रे

## (Tourism Centers in Maharashtra)

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ महाराष्ट्रातील नैसर्गिक पर्यटन केंद्रे

४.२.२ महाराष्ट्रातील धार्मिक पर्यटन केंद्रे

४.२.३ महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन केंद्रे

४.२.४ महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन केंद्रे

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ क्षेत्रीय कार्य

४.८ संदर्भ ग्रंथ सूची/अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांस पुढील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

१. महाराष्ट्रातील नैसर्गिक पर्यटन स्थळांची माहिती होईल.

२. महाराष्ट्रातील धार्मिक पर्यटन स्थळांची माहिती होईल.

३. महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन केंद्रे कोणती हे लक्षात येईल.

४. महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांची माहिती होईल.

## ४.१ प्रस्तावना

मागील घटकांमध्ये आपण महाराष्ट्रातील पर्यटनाचा विकास व नियोजन याविषयी माहिती घेतलेली आहे.

या घटकामध्ये आपण महाराष्ट्रातील विविध पर्यटन केंद्रांची माहिती घेणार आहोत. यामध्ये भौगोलिक/नैसर्गिक, धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक पर्यटन केंद्रे महत्त्वाची आहेत. पर्यटन ही अनेक घटकांनी मिळून बनलेली सांघिक कृती आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ महाराष्ट्रातील नैसर्गिक (भौगोलिक) पर्यटन केंद्रे

महाराष्ट्र हा नैसर्गिक सौंदर्याने नटलेला प्रदेश आहे. नैसर्गिक पर्यटन केंद्रांमध्ये थंड हवेची ठिकाणे, समुद्रकिनारे, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, सरोवरे इ. घटकांचा समावेश होतो.

### अ) महाराष्ट्रातील थंड हवेची ठिकाणे (गिरीस्थाने) :-

**१. महाबळेश्वर :-**

महाबळेश्वर हे महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय थंड हवेचे ठिकाण आहे. महाबळेश्वर हे सातारा जिल्ह्यात असून समुद्र सपाटीपासून १३७२ मीटर उंचीवर आहे. महाबळेश्वर हे सर्व बाजूंनी रस्त्यांनी जोडलेले असल्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यटक येथे येतात. येथील वनराई, सुगंधी फुले, तलाव, धबधबे, पाण्याचे झरे, पशुपक्षी इ. पर्यटकांना आकर्षित करतात. पूर्वी मुंबई प्रांताची उन्हाळ्यातील राजधानी म्हणून महाबळेश्वरची प्रसिध्दी होती. महाबळेश्वरची मुळ ख्याती सह्याद्रीच्या कुशीतील एका गावचे ग्रामदैवत महाबळी अशी आहे. हे महाबळीचे देऊन यादवांनी बांधले तर छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यावर सोन्याचा कळस चढवला व तेथील वस्ती हेच क्षेत्र महाबळेश्वर होय. नवीन महाबळेश्वर हे ब्रिटिशांनी विकसित केले आहे. महाबळेश्वर येथे अनेक स्थळे आहेत. उदा. लॉडविक पॉईंट, एलफिन्स्टन पॉईंट, मंकी पॉईंट, आर्थर सीड पॉईंट तर सुर्योदय पाहण्यासाठी विल्सन पॉईंट येथे गर्दी करतात.

महाबळेश्वरमधील आखणी एक आकर्षणाचे ठिकाण म्हणजे वेण्णा सरोवर होय. याशिवाय क्षेत्र महाबळेश्वर येथे पंचगंगेचे मंदीर आहे. येथे कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री व सावित्री या नद्यांचा उगम आहे. महाबळेश्वरमध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी निवासाच्या अनेक सोयी आहेत. महाबळेश्वरच्या या विविध नैसर्गिक वैशिष्ट्यांमुळे महाबळेश्वरला गिरीस्थानची राणी (Queen of Hill Station) असे संबोधले जाते.

## २. पाचगणी :-

हे महाबळेश्वरपासून सुमारे १८ कि.मी. अंतरावर असून अत्यंत सुंदर थंड हवेचे ठिकाण आहे. पाचगणी हे सातारा जिल्ह्यात असून समुद्रसपाटीपासून १३३४ मीटर उंचीवर आहे. पाचगणीच्या एका बाजूस कृष्णेचे खोरे तर दुसऱ्या बाजूस कोकण किनारपट्टी पहावयास मिळते. पाचगणीचे वैशिष्ट्य म्हणजे तेथे असलेले टेबललँड (सपाट प्रदेश) होय. पाचगणीमधील ब्रिटीशकालीन इमारती पाहण्यासारख्या आहेत. महाबळेश्वर खालोखाल पर्यटक पाचगणीला भेट देतात.

## ३. लोणावळा-खंडाळा :-

मुंबई-पुणे रस्त्यावरील प्रसिध्द थंड हवेचे ठिकाण म्हणजे लोणावळा-खंडाळा होय. हे ठिकाण पुणे जिल्ह्यात असून ते समुद्रसपाटीपासून ६२२ मीटर उंचीवर आहे. उन्हाळ्यात व पावसाळ्यात येथे पर्यटक येतात. येथील निसर्गसौंदर्य पाहण्यासारखे आहे. येथे अनेक आरोग्यधामे आहेत. लोणावळा (Lonavala) हे नाव Leni व Avani या दोन शब्दांपासून तयार झाले आहे. (Leni) लेणी म्हणजे गुहा व अवनी (Avani) म्हणजे मालिका किंवा रांगा होय. लोणावळ्याजवळील कर्ला लेणी, भजा लेणी व बेडेसा लेणी प्रसिध्द आहेत.

## ४. माथेरान :-

माथेरान हे रायगड जिल्ह्यातील प्रसिध्द थंड हवेचे ठिकाण आहे. हे ठिकाण समुद्र सपाटीपासून ३०० मीटर उंचीवर आहे. हे ठिकाण मुंबईपासून ९० कि.मी. तर पुण्यापासून १२० कि.मी. अंतरावर आहे. हे निसर्ग सौंदर्याने व दाट झाडीने वेढलेले थंड हवेचे ठिकाण आहे. येथे जवळपास ३८ पॉईंट आहेत. येथील हार्ट पॉईंट, लेक, सिंह गुंफा, पे मास्टर पार्क प्रसिध्द आहेत. नेरळ स्टेशनवरून ट्रॉय ट्रेनने माथ्यावर जाता येते. हे आशियातील एकमेव वाहनविरहित थंड हवेचे ठिकाण आहे.

## ५. आंबोली :-

आंबोली हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रसिध्द थंड हवेचे ठिकाण आहे. हे ठिकाण समुद्रसपाटीपासून ६९० मीटर उंचीवर आहे. हे ठिकाण सावंतवाडीपासून ३० कि.मी. अंतरावर आहे. येथे सभोवतालचे दाट जंगल, डोंगरदऱ्या, अप्रतीम सृष्टीसौंदर्य हे या ठिकाणाचे वैशिष्ट्य आहे. आंबोलीला महाराष्ट्र राज्यातील चेरापुंजी म्हणून ओळखले जाते.

मुसळधार पावसात आंबोलीचा परिसर हिरवागार आढळतो आणि तेथे शेकडो धबधबे कोसळत असतात. आंबोलीच्या जवळ सावंतवाडीच्या राजांचा राजवाडा व देवीचे मंदीर आहे. आंबोलीपासून जवळच हिरण्यकेशी नदीचा उगम आहे. येथून महादेवगड, मनोहरगड किल्लेही जवळ आहेत. येथील दाट जंगलात गवे, बिबटे, चितळ आदि वन्य प्राणी आढळतात.

## ६. चिखलदरा :-

हे अमरावती जिल्ह्यातील प्रसिध्द थंड हवेचे ठिकाण आहे. हे ठिकाण समुद्रसपाटीपासून १११८ मीटर उंचीवर आहे. हा प्रदेश विविध जमातीने व्यापलेला आहे. यामध्ये कोरड, माडीया अशा जमाती प्रमुख आहेत. येथील डोंगर उतारावरील वृक्षे, खळखळणारे झरे, प्रसन्न हवा ही गिर्यारोहकांना गिरीभ्रमणासाठी आकर्षित करते. येथील आदिवासी जीवन दर्शवणारे वस्तुसंग्रहालये, वनस्पती उद्यान, शिवमंदीर तसेच जलविहारासाठी शक्कर तलाव पर्यटकांना आकर्षित करतात.

## ७. जवाहर :-

हे ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाचे थंड हवेचे ठिकाण आहे. जवाहरला ठाणे जिल्ह्यातील महाबळेश्वर म्हणून संबोधले जाते. जवाहर हे वारली पेंटीगसाठी प्रसिध्द आहे. जवाहर येथील दादर, कोपरा धबधबे प्रेक्षणीय आहेत. याशिवाय हनुमान पॉईंट, सनसेट पॉईंट प्रसिध्द आहेत.

याशिवाय महाराष्ट्रात भंडारदरा (अहमदनगर), माळशेज घाट (पुणे), पन्हाळा (कोल्हापूर), तोरणमाळ (नंदुरबार) इ. प्रसिध्द थंड हवेची ठिकाणे आहेत.

# ब) समुद्रकिनारे (बीचेस) :-

महाराष्ट्राला सर्वसाधारणपणे ७२० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. महाराष्ट्रातील अनेक समुद्रकिनारे (बीचेस) प्रसिध्द आहेत. महाराष्ट्रातील किहीम, अलिबाग, गणपतीपुळे, हरीहरेश्वर, मार्व्हे, उटाणु इ. किनारे प्रसिध्द आहेत. भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राचा समुद्रकिनारा हा सुरक्षित (सेफ वॉटर) समजले जाते.

## १. गणपतीपुळे :-

गणपतीपुळे हे रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिध्द ठिकाण आहे. गणपतीपुळे हे एक शांत व प्रदूषणविरहित ठिकाण आहे. निळेशार पाणी, स्वच्छ हवा, पांढरी वाळू, नारळाच्या बागा पर्यटकांना आकर्षित करतात. गणपतीपुळे हे तेथे असणाऱ्या स्वयंभू गणपतीमुळे प्रसिध्द आहे. त्यामुळे या ठिकाणास धार्मिक महत्त्व आहे.

## २. डहाणु-बोर्डी किनारा :-

ठाणे जिल्ह्यातील डहाणु-बोर्डीच्या समुद्र किनाऱ्यावर रेल्वे किंवा बसमार्गाने जाता येते. डहाणु-बोर्डी समुद्र किनारा हा ठाणे किनारपट्टीला असून ते मुंबईपासून १४५ किलो मीटर अंतरावर आहे.

डहाणु-बोर्डी समुद्र किनारा हा पाण्यातील साहसी खेळासाठी प्रसिध्द आहे. येथे ग्लाइडिंग, ट्रेकिंग, पतंग उडविणे असे खेळ खेळले जातात.

## ३. जुहू समुद्रकिनारा :-

मुंबईतील हा सुप्रसिध्द बीच आहे. वर्सोवाच्या उत्तरेस हा बीच आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक गर्दी असणारे हा बीच समजला जातो. या समुद्रकिनाऱ्यावरील घोडेस्वारी, खाऊची दुकाने, क्रिकेट इ. घटक पर्यटकांना आकर्षित करतात. जुहू समुद्रकिनारी असणाऱ्या उंच-उंच इमारती, पंचतारांकित हॉटेल्स प्रसिध्द आहेत. जुहू बीचवरील 'गांधीग्राम' हे ठिकाण लहान मुलांना आकर्षित करते.

## ४. श्रीवर्धन-हरिहरेश्वर :-

हा एक शांत समुद्र-किनारा म्हणून ओळखला जातो. योग, ध्यान-धारणा, सूर्यस्नान, समुद्रकाठी चालणे इ.साठी हे ठिकाण उपयुक्त आहे. हरिहरेश्वरजवळील पेशवा स्मारक व हरिहरेश्वराचे मंदीर प्रसिध्द आहे.

## ५. मांडला व किहीम :-

हा मुंबईपासून फक्त १० कि.मी. अंतरावर असणारे एक प्रसिध्द बीच आहे. येथील घनदाट नारळाची झाडे, वन्य फुलझाडे, फुलपाखरे, पक्षी पर्यटकांना आकर्षित करतात.

हा किनारा प्रदूषणविरहित व हिरवाई असल्याने देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक येथे येतात. या समुद्रकिनाऱ्यापासून जवळ असणारे कोलाबा किल्ला, बौध्द लेणी, चर्च, मंदीरे यामुळे पर्यटक या ठिकाणी येतात.

## ६. मार्व्हे, मनोरी व गोराई :-

मुंबईजवळ मार्व्हे, मनोरी-गोराई हे समुद्रकिनारे आहेत. येथील सुर्योदय व सुर्यास्त पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करतात. मार्व्हे समुद्रकिनाऱ्याला बोरीवली समुद्रकिनारा असेही म्हटले जाते. मनोरी व गोराई हे खूप सुंदर समुद्र किनारे आहेत. पौर्णिमेच्या रात्री इथे लोकांची अफाट गर्दी असते.

## ७. तारकर्ली :-

मालवणच्या दक्षिणेस ६ कि.मी. अंतरावर तारकर्ली बीच आहे. तारकर्ली बीचचे पाणी खूप स्वच्छ आहे. येथे स्कुबा डायव्हिंग, स्नोर्कलिंग यासारखे पाण्यातील खेळ चालतात.

याशिवाय महाराष्ट्रात मालवण, मरीनड्राईव्ह, वेळणेश्वर, आलिबाग, दिवेघर, मुरुड, देवबाग इ. महत्त्वाचे समुद्रकिनारे आहेत.

## क) अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने :-

### १. नवेगाव राष्ट्रीय उद्यान :-

गोंदिया जिल्ह्यातील हे एक प्रसिध्द राष्ट्रीय उद्यान आहे. हे उद्यान सहलीसाठी किंवा पर्यटकांसाठी फार महत्त्वाचे मानले जाते. उद्यानाच्या मधोमध तळे असून तळ्याच्या मध्यभागी बेट आहे. हिवाळ्यात अनेक पक्षी स्थलांतरित होऊन याठिकाणी येतात. महाराष्ट्रातील जवळपास ६०% पक्षी प्रकार या उद्यानात सापडतात. येथे करकोचे, बगळे, मच्छीमार गरूड, बिबट्या, नीलगाय, भेकड, अस्वल हे प्राणी आढळतात. तलावाच्या जवळील प्रदेश हा डॉ. सलीम अली पक्षी अभयारण्य नावाने ओळखला जातो.

### २. बोर अभयारण्य :-

हे वर्धा जिल्ह्यातील प्रसिध्द अभयारण्य आहे. बोर नदीवर धरण बांधून त्याच्या पाठीमागे हे अभयारण्य बनलेले आहे. या अभयारण्यासाठी क्षेत्रफळ १३८ चौ.कि.मी. इतके आहे. हा परिसर घनदाट झाडांनी वेढलेला असून येथे विविध प्रकारचे वन्य प्राणी आढळतात. या अभयारण्यामध्ये बिबट्या, सांबर, चितर, भेकर, रानडुक्कर इ. प्राणी आढळतात. जुलै २०१४ साली हे अभयारण्य वाघासाठी राखीव म्हणून घोषीत करण्यात आले.

### ३. ताडोबा अंधारी राष्ट्रीय उद्यान :-

हे उद्यान चंद्रपूर जिल्ह्यात असून महाराष्ट्रातील सर्वात जुने व मोठे उद्यान म्हणून प्रसिध्द आहे. या उद्यानाने जवळपास ६२५ चौ.कि.मी. इतके क्षेत्र व्यापलेले आहे.

वाघासाठी हे अभयारण्य प्रसिध्द आहे. याशिवाय सांबर, हरिण, गवार, नीलगाय, चितळ, चिंकारा इ. प्राणी येथे आढळतात. येथे फिरण्यासाठी बसची सोय उपलब्ध आहे. शिवाय राहण्यासाठी निवासाची व्यवस्था आहे.

### ४. मेळघाट :-

हे उद्यान अमरावती जिल्ह्यात आहे. सातपुड्याच्या दक्षिणेकडील रांगांच्या परिसरात मेळघाट हा व्याघ्र प्रकल्प आहे. परतवाडा येथे या प्रकल्पाचे मुख्यालय असून येथे विश्रामगृहाचे आरक्षण केले जाते. नोव्हेंबर ते फेब्रुवारी हा कालावधी जंगलांचे सौंदर्य व प्राणी बघण्यासाठी उत्तम समजला जातो.

### ५. पेंच :-

हे नागपूर जिल्ह्यातील प्रसिध्द उद्यान आहे. नागपूरपासून सुमारे ६० कि.मी. अंतरावर हे उद्यान

आहे. पेंच नदीच्या दोन्ही काठावर हे उद्यान वसलेले आहे. या उद्यानामध्ये मोर, जंगली कोंबड्या, वाघ पाहायला मिळतात. महाराष्ट्र शासनाने १९९९ साली पेंच उद्यानास व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा दिला. ऑक्टोबर ते जून या कालावधीत अभयारण्यात प्रवेश दिला जातो. पावसाळ्यात या अभयारण्यात जाण्यासाठी बंदी असते.

## ६. दाजीपूर :-

राधानगरी आणि काळम्मावाडी धरणाच्या भोवतालच्या जंगल परिसराला मिळून १९८५ ला राधानगरी-दाजीपूर अभयारण्यचा दर्जा देण्यात आला. हे अभयारण्य कोल्हापूर जिल्ह्यात असून ते कोल्हापूरपासून जवळपास ७० कि.मी. अंतरावर आहे. या अभयारण्यात ३६ प्रकारच्या वन्य प्राण्यांची नोंद झालेली आहे. यामध्ये साळिंदर, अस्वल, भेकर, रानडुक्कर, उदमांजर, खवले मांजर, शेकरू इ. प्रमुख आहेत. हे अभयारण्य प्रामुख्याने गवासाठी प्रसिध्द आहे. येथे पर्यटकांना राहण्यासाठी विश्रामधाम आहे.

## ७. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान :-

मुंबई शहरात १०४ चौ.कि.मी. क्षेत्राचे हे उद्यान आहे. याची स्थापना १९९६ साली करण्यात आली. हे उद्यान वर्षभर भेट देण्यासाठी सोयीचे आहे. उन्हाळ्यात येथील गुलमोहराची शोभा अवर्णनीय असते. तर पावसाळ्यात येथील हिरवेगार नैसर्गिक सौंदर्य आणि खळखळणारे ओढे, नाले पर्यटकांना आकर्षित करतात.

## ८. कर्नाळा :-

रायगड जिल्ह्यात हे पक्षी अभयारण्य आहे. या अभयारण्याचे क्षेत्रफळ १२ चौ.कि.मी. इतके आहे. पनवेलपासून १२ कि.मी. अंतरावर हे अभयारण्य आहे. सुर्योदयापासून ते सुर्यास्तापर्यंत हे अभयारण्य पर्यटकांसाठी खुले असते. येथे जवळपास १२५ ते १५० जातीचे पक्षी आढळतात. येथे कोकिळ, मलबार, तंबाट, दयाळ, टिटवी, बगळे, भोरड्या इ. प्रकारचे पक्षी आढळतात. याशिवाय महाराष्ट्रातील चांदोली (सांगली), कोयना (सातारा), सागरेश्वर (सांगली), नागजिरा (भंडारा), जायकवाडी, माळढोक (सोलापूर) इ. अभयारण्ये व उद्याने प्रसिध्द आहेत.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ❊

१. महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे?

*अ) पुणे* *ब) सातारा* *क) सांगली* *ड) रायगड.*

२. गिरीस्थानाची राणी (Queen of Hill Stations) म्हणून कोणाला ओळखले जाते?

*अ) महाबळेश्वर ब) पाचगणी क) माथेरान ड) आंबोली.*

३. माथेरान हे थंड हवेचे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे?

*अ) सिंधुदुर्ग ब) रत्नागिरी क) रायगड ड) अमरावती.*

४. महाराष्ट्राची चेरापुंजी म्हणून कोणाला ओळखले जाते?

*अ) चिखलदरा ब) पाचगणी क) आंबोली ड) माळशेज.*

५. गणपतीपुळे हे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे?

*अ) सिंधुदुर्ग ब) ठाणे क) पुणे ड) रत्नागिरी.*

६. बोर अभयारण्ये कोणत्या जिल्ह्यात आहे?

*अ) गोंदिया ब) भंडारा क) वर्धा ड) धुळे.*

७. ताडोबा अभयारण्ये कोणत्या प्राण्यासाठी प्रसिध्द आहे?

*अ) वाघ ब) सिंह क) गेंडा ड) हरिण.*

८. गवा या प्राण्यासाठी कोणते अभयारण्य प्रसिध्द आहे?

*अ) ताडोबा ब) मेळघाट क) बोर ड) दाजीपूर.*

## ४.२.२ महाराष्ट्रातील धार्मिक पर्यटन केंद्रे

महाराष्ट्रातील भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक वैशिष्ट्यांमुळे महाराष्ट्राला पर्यटनाच्यादृष्टीने विशेष महत्त्व आहे. पुण्याचा गणेशोत्सव, अष्टविनायक स्थळे, पंढरपूर, आळंदी, देहू, कोल्हापूर, शिर्डी, तुळजापूर इ. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहेत.

### १. आळंदी :-

आळंदी हे पुणे जिल्ह्यातील प्रसिध्द धार्मिक ठिकाण आहे. इंद्रायणी नदीकाठी ज्ञानेश्वर महाराजांच्या वास्तव्यामुळे पावन झालेले देवस्थान म्हणजे आळंदी होय. हे ठिकाण पुण्यापासून २५ कि.मी. अंतरावर आहे. पुण्यातून येथे येण्यासाठी नियमित बसेस आहेत. येथे ज्ञानेश्वर महाराजांनी समाधी घेतली आहे. कार्तिकी एकादशीला येथे मोठी यात्रा भरते.

### २. देहू :-

इंद्रायणी काठावरील देहू हे संत तुकाराम महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेले देवस्थान आहे.

देहूरोड स्टेशनपासून जवळपास १० कि.मी. अंतरावर देहू आहे. तुकाराम महाराजांच्या मनन-चिंतनामुळे पावन झालेला 'भंडारा डोंगर' देहूपासून ५ कि.मी. अंतरावर आहे. तुकाराम बीजेला येथे यात्रा भरते.

### ३. जेजुरी :-

जेजुरी येथे खंडाबोचे प्रसिध्द देवस्थान आहे. हे पुण्याच्या आग्नेयेस असून पुरंदर तालुक्यात येते. पुण्यापासून सुमारे ३८ कि.मी. अंतरावर जेजुरी हे ठिकाण आहे. येथे चैत्र, मार्गशीर्ष, पौष, माघ महिन्यात तसेच सोमवती अमावास्येला मोठी यात्रा भरते.

### ४. माहुली :-

हे सातारा जिल्ह्यात असून कृष्णा व वेण्णा नदीच्या संगमावर वसलेले प्रसिध्द धार्मिक स्थळ आहे. साताऱ्यापासून हे ठिकाण ६ कि.मी. अंतरावर आहे. येथील विश्वेश्वर व रामेश्वर ही दोन मंदिरे प्रसिध्द आहेत. येथील मांगलाई देवीचे मंदीर व कृष्णेचा घाट पाहण्यासारखा आहे.

### ५. पाल :-

हे सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील प्रसिध्द खंडोबाचे देवस्थान आहे. पौष महिन्यात येथे खंडोबाची यात्रा भरते. यात्रेसाठी जवळपास एक लाख भाविक जमा होतात. या उत्सवात खंडोबा व म्हाळसा यांचा विवाह साजरा केला जातो.

### ६. कोल्हापूर :-

कोल्हापूर हे मुंबई-बेंगलोर या राष्ट्रीय महामार्गावर असलेले पश्चिम महाराष्ट्रातील प्रसिध्द शहर आहे. येथे साडेतीन शक्तीपीठातील एक शक्तीपीठ म्हणून महालक्ष्मीचे मंदीर आहे. हे पुराणतन काळातील मंदीर आहे. येथे नवरात्रीमध्ये मोठी यात्रा भरते. येथे नवरात्रीमध्ये पाचव्या दिवशी महालक्ष्मीचा पालखी सोहळा असतो. महाराष्ट्रातून अनेक भाविक या ठिकाणी येतात. दर मंगळवारी व शुक्रवारी मंदिरात भाविकांची गर्दी असते. हे मंदीर भक्कम आहे व येथे दगडावर कोरलेल्या कलाकृती पहावयास मिळतात. येथे भाविकांना राहण्यासाठी भक्त निवासाची व्यवस्था आहे.

### ७. वाडी रत्नागिरी (जोतिबा) :-

कोल्हापूरपासून जवळपास १६ कि.मी. अंतरावर ज्योतिबाचे मंदीर आहे. चैत्र महिन्यात येथे मोठी यात्रा भरते. महाराष्ट्र व कर्नाटकातून लाखो भाविक ज्योतिबाच्या दर्शनाला येतात. हे बारा जोतिर्लिंगापैकी एक ठिकाण समजले जाते. येथे जाण्यासाठी कोल्हापूरातून एस.टी. सेवा उपलब्ध आहे.

## ८. पंढरपूर :-

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर हे ठिकाण महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश येथील भाविकांचे श्रध्दास्थान आहे. विठोबा-रुक्मिणी हे महाराष्ट्रातील अनेक लोकांचे आराध्य दैवत आहे. आषाढी एकादशीला आळंदी व देहू येथून पंढरपूरला लाखो वारकरी पालखीसोबत चालत येतात. आषाढी, चैत्र, कार्तिकी आणि माघ एकादशीला पंढरपुरात मोठी यात्रा भरते. येथील मंदीर १४ व्या शतकात बांधले असून मंदिरास ६ प्रवेशद्वार आहेत. मुख्य प्रवेशद्वारासमोर नामदेव पायरी आहे.

पंढरपूर हे तीर्थक्षेत्र भीमा नदीकाठी वसले आहे. भिमा नदीचा आकार या ठिकाणी चंद्रासारखा वक्राकार झाला असल्याने भीमा नदीला येथे 'चंद्रभागा' नावाने ओळखले जाते. सोलापूर येथून एस.टी. सेवा उपलब्ध आहे. येथे अनेक विश्रामधाम, धर्मशाळा, हॉटेल्स आहेत. त्यामुळे भाविकांची निवास व्यवस्था होते. पंढरपूर येथील अनेक मठ पाहण्यासाठी भाविक गर्दी करतात. उदा. कैकाडी महाराजांचा मठ, तनपुरे महाराज मठ, गजानन महाराज मठ इ.

## ९. अक्कलकोट :-

सोलापूरपासून ५७ कि.मी. अंतरावर श्री स्वामी समर्थ हे धार्मिक स्थळ अक्कलकोट येथे आहे. स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी हजारो भाविक भेट देतात. दर गुरुवारी व पौर्णिमेला येथे भाविकांची गर्दी असते. स्वामी समर्थ हे जवळपास दोन दशके येथे वास्तव्यास होते. येथे भक्तांना राहण्याकरिता ट्रस्टचे भव्यदिव्य भक्तनिवास आहे. स्वामी समर्थ अन्नछत्र भक्तनिवासाजवळच महाप्रसादासाठी एकावेळी ५०० लोक जेवतील एवढा मोठा हॉल व सकाळी व संध्याकाळी मोफत प्रसाद वाटप केला जाते.

## १०. तुळजापूर :-

हे उस्मानाबाद जिल्ह्यातील एक प्रसिध्द धार्मिक स्थळ आहे. येथे तुळजाभवानी मातेचे मंदिर आहे. हे ठिकाण सोलापूरपासून ४५ कि.मी. अंतरावर तर उस्मानाबादपासून १९ कि.मी. अंतरावर आहे. साडेतीन शक्तीपिठापैकी एक मुळ शक्तीपीठ म्हणून याची संपूर्ण जगभरात ख्याती आहे. येथे नवरात्रात नऊ दिवस यात्रा भरते. संपूर्ण भारतातून येथे भाविक येतात. येथेही भक्तनिवासाची सोय आहे. हे मंदीर १० व्या शतकात बांधलेले आहे. नवरात्रात येथे मोठी गर्दी असते. संपूर्ण महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश येथून भाविक तुळजापूरला भेट देतात.

## ११. शिर्डी :-

श्रीसाईबाबांच्या समाधीमुळे शिर्डी संपूर्ण देशभर प्रसिध्द आहे. शिर्डी हे ठिकाण अहमदनगर

जिल्ह्यात आहे. अहमदनगरपासून ८३ कि.मी. तर कोपरगावपासून १५ कि.मी. अंतरावर शिर्डी हे देवस्थान आहे. हे सर्व धर्मीयांचे व पंथांचे दैवत आहे. गुरुपौर्णिमा, दसरा व रामनवमीला येथे मोठी यात्रा भरते. शिर्डी येथे भाविकांना राहण्यासाठी विश्रामधाम व देवस्थानच्या धर्मशाळांची उत्तम सोय आहे.

### १२. वणी :-

नाशिकपासून ६० कि.मी. अंतरावर वणी येथे सप्तश्रृंगी देवीचे स्थान आहे. हे देवीचे साडेतीन पीठांपैकी अर्धेपीठ म्हणून ओळखले जाते. येथे भाविकांसाठी देवस्थानने धर्मशाळा व विश्रांतीस्थाने बांधलेली आहेत. येथील सप्तश्रृंगीची मूर्ती भव्य असून मूर्तीला अठरा हात आहेत. येथे नवरात्र व चैत्र महिन्यात यात्रा भरते.

### १३. माहूर :-

हे नांदेड जिल्ह्यातील प्रसिध्द ठिकाण आहे. येथे रेणुका मातेचे मंदीर आहे. हे साडेतीन शक्तीपीठापैकी एक मूळ पीठ आहे. किनवट रेल्वेस्टेशनपासून सुमारे ४५ कि.मी. अंतरावर माहूर हे धार्मिक ठिकाण आहे. हे दत्तात्रय यांचे जन्मस्थान आहे. माहूर येथे तीन डोंगर आहेत. त्यापैकी एकावर रेणुका मातेचे मंदीर, एकदंताचे मंदीर तर एकावर माता अनुसयेचे मंदीर आहे. येथे मार्गशीर्ष महिन्यात यात्रा भरते. तसेच दत्तजयंतीचा उत्सवही मोठ्या पम्राणात साजरा केला जातो. संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक येथे भेट देतात.

वरील प्रमुख धार्मिक स्थळांशिवाय महाराष्ट्रात अनेक धार्मिक स्थळे आहेत. यामध्ये अष्टविनायक मंदीरे (मोरगाव, थेऊर, रांजणगाव, सिध्दटेक, ओझर, लेण्याद्री, पाली, महाड), भिमाशंकर (पुणे), परळी वैजनाथ (बीड), पैठण (औरंगाबाद), त्र्यंबकेश्वर (नाशिक), शेगांव (बुलढाणा) इ. प्रमुख धार्मिक स्थळे आहेत.

## ✻ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ✻

१. आळंदी येथे कोणत्या महाराजांची समाधी आहे?

*अ) एकनाथ  ब) ज्ञानेश्वर  क) तुकाराम  ड) निवृत्ती.*

२. देहू हे तीर्थक्षेत्र कोणत्या नदीकाठी आहे?

*अ) इंद्रायणी  ब) मुठा  क) भीमा  ड) मुळा.*

३. पंढरपूर येथे भिमा नदीला कोणत्या नावाने ओळखले जाते?

*अ) भागिरथी  ब) अलकनंदा  क) गंगा  ड) चंद्रभागा.*

४. तुळजापूर हे धार्मिक ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे?

*अ) उस्मानाबाद ब) लातूर क) सोलापूर ड) नांदेड.*

५. शिर्डी हे धार्मिक ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे?

*अ) औरंगाबाद ब) नाशिक क) पुणे ड) अहमदनगर.*

६. रेणुका मातेचे मंदिर कोणत्या ठिकाणी आहे?

*अ) कोल्हापूर ब) तुळजापूर क) माहूर ड) वणी.*

७. जेजुरी येथे कोणत्या देवाचे मंदीर आहे?

*अ) ज्योतिबा ब) म्हसोबा क) खंडोबा ड) नरसोबा.*

## ४.२.३ महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन केंद्रे

सांस्कृतिक पर्यटनामध्ये प्राचीन लेणी, शिल्पे, स्मारके, नृत्य, उत्सव इ. समावेश होतो. महाराष्ट्रात अनेक सांस्कृतिक पर्यटन केंद्रे प्रसिध्द आहेत. ते पुढीलप्रमाणे :-

### १. अजंठा लेणी :-

हे औरंगाबाद जिल्ह्यातील महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील महत्त्वाचे सांस्कृतिक पर्यटन केंद्र आहे. हे ठिकाण औरंगाबाद पासून १०४ कि.मी. अंतरावर तर जळगांवपासून ५९ कि.मी. अंतरावर आहे. इ. स. तिसऱ्या शतकातील ही लेणी शिल्प व स्थापत्य कलेचा उत्तम नमुना आहे. अनेक दशकांच्या परिश्रमातून ही कला निर्माण झालेली आहे. येथे २९ लेणी आहेत. टेकडीच्या माथ्यापासून ते पायथ्यापर्यंत ही लेणी खोदण्यात आलेली आहे. या लेण्यामधील कोरीव काम, रंगीत भित्ती चित्रे पाहण्यासारखी आहेत. या लेण्यातील शिल्पांना रंग दिलेला आहे. इतक्या दीर्घ काळांनतरही हे रंग आजही स्पष्टपणे जाणवतात.

बुध्दांच्या जीवनातील अनेक प्रसंग या लेण्यात कोरलेले आहेत. येथील १६ व १७ क्रमांकाच्या लेण्यात सर्वोत्कृष्ठ चित्रे आहेत. अजंठा लेण्याची देखभाल भारतीय पुरातत्त्व विभागाद्वारे केली जाते. जागतिक वारसा शिल्पस्थानांमध्ये अजंठाची नोंद झालेली आहे. येथे जाण्यासाठी एस.टी. सुविधा उपलब्ध आहेत. वनविभागाचे विश्रामधाम आहे. शिवाय हॉटेल आहेत. लेण्याची माहिती देण्यासाठी मार्गदर्शक (गाईड) उपलब्ध आहेत. देशभरातून अनेक पर्यटक येथे भेटी देतात.

### २. वेरूळ :-

हे औरंगाबादपासून ३० कि.मी. अंतरावर आहे. विळ्याच्या आकाराच्या असलेल्या टेकडीवर

ही लेणी खोदण्यात आलेली आहेत. ही लेणी इ.स. ३०० ते १३०० या काळात खोदण्यात आलेली आहेत. येथील शिल्परचनेवर हिंदू, बौध्द व जैन धर्मियांचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. वेरूळ येथे एकूण ३४ लेण्या आहेत. त्यापैकी १३ बौध्द, १६ हिंदू व ५ जैन धर्मीय आहेत. या लेण्यामध्ये कैलास लेणे सर्वांत मोठे आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे औरंगाबादहून वेरूळसाठी रोज सहली आयोजित केल्या जातात.

### ३. अंबरनाथ :-

मुंबई-पुणे रेल्वे मार्गावर कल्याणजवळ हे ठिकाण आहे. येथे सोमनाथांचे मंदिर आहे. हे मंदिर ११ व्या शतकात बांधलेले आहे. शिवरात्रीला येथे मोठी गर्दी असते. या मंदिरावरील कोरीव काम व नक्षीकाम आकर्षक आहे. अंबरनाथ हे ठाणे जिल्ह्यात येते.

### ४. पितळ खोरा लेणी :-

ही लेणी औरंगाबाद जिल्ह्यात असून भारतातील सर्वांत जुनी लेणी आहेत. पश्चिम घाटातील सातमाळा डोंगर रांगेत या लेणी आहेत. वेरूळपासून ४० कि.मी. अंतरावर या लेणी आढळतात. येथे एकूण १४ लेण्या आहेत. त्यापैकी ४ चैत्य व १० विहारच्या आहेत. येथील तिसऱ्या लेणीतील चैत्य सभामंडप आकर्षक आहे.

### ५. अगाशिव :-

सातारा जिल्ह्यातील कराडजवळ अगाशिव डोंगर आहे. कराडपासून ५ कि.मी. अंतरावर जखीनवाडी गावाजवळ या लेण्या आहेत. येथे ६६ बौध्द लेणी आहेत. ही लेणी इ.स. पूर्व २५७ ते इ.स. २०० या काळातील असावीत असा संशोधकांचा दावा आहे.

### ६. खिद्रापूर :-

कोल्हापूर जिल्ह्यातील हे प्रसिध्द ठिकाण असून येथील कपिलेश्वराचे मंदिर प्रसिध्द आहे. हे मंदिर इ.स. १२ व्या शतकात बांधण्यात आले. या मंदिरावरील नक्षीकाम आकर्षक आहे. या मंदिरातील स्वर्गमंडप पाहण्यासारखा आहे. अनेक पर्यटक येथे भेटी देतात.

याशिवाय महाराष्ट्रातील म्हैसमाळ (औरंगाबाद), खरोसा (लातूर), कार्ले-भाजे-बेडसा (पुणे), बोरिवली, घारापुरी, अकाई-टंकाई (नाशिक) या लेण्या प्रसिध्द आहेत.

## ✲ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ✲

१. अजंठा ही लेणी कोणत्या जिल्ह्यात आहे?

*अ) अहमदनगर  ब) औरंगाबाद  क) जालना  ड) जळगाव.*

२. अजंठा लेणीत एकूण किती लेण्या आहेत?

*अ) १९ ब) ४० क) २९ ड) ३५.*

३. वेरूळ येथे एकूण किती लेण्या आहेत?

*अ) १४ ब) १६ क) २४ ड) ३४.*

४. अंबरनाथ येथे कोणाचे मंदिर आहे?

*अ) सोमनाथ ब) एकनाथ क) नवनाथ ड) कपिलनाथ.*

५. अगाशिव लेणी कोणत्या जिल्ह्यात आहेत?

*अ) सांगली ब) कोल्हापूर क) सातारा ड) सोलापूर.*

६. खिद्रापूर हे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे?

*अ) कोल्हापूर ब) सांगली क) सातारा ड) सोलापूर.*

## ४.२.४ महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन केंद्रे

ऐतिहासिक पर्यटन केंद्रामध्ये किल्ले, स्मारके यांचा समावेश होतो. महाराष्ट्र हा वास्तविक दुर्ग किल्ल्यांचा प्रदेश आहे. शिवाजी महाराजांनी दुर्ग-डोंगरी किल्ल्यांबरोबरच कोकण किनारपट्टी सुरक्षित करण्यासाठी सिंधुदुर्ग व पद्मदुर्गसारखे जलदुर्ग बांधले. महाराष्ट्रात पठारावर जमिनीवरील किंवा भुईकोट किल्ले बांधलेले आहेत. महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा आपण थोडक्यात आढावा घेऊ.

### १. जंजिरा :-

रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचा जलदुर्ग म्हणजे जंजिरा होय. या किल्ल्याचे स्थानिक नाव मुरुड-जंजिरा असे आहे. या किल्ल्याची उभारणी बुऱ्हानखान यांनी १५६७ ते १५७१ या काळात केली. या किल्ल्याचे नाव त्यांने 'जंजिरे मेहरूब' असे ठेवले. झंझिरा म्हणजे बेट व मेहरूब म्हणजे चंद्रकोर होय.

या किल्ल्याचे आकर्षण म्हणजे या किल्ल्यावरील ३ तोफा होय. कलालबंगडी, चावरी व लंदा कसम अशी या तोफेंची नावे असून ती आपल्या तोफ माऱ्यासाठी प्रसिध्द आहेत. पर्यटकांना राजापुरी या गावातून बोटीने किल्ल्यापर्यंत जावे लागते. किल्ल्यावर एक विहीर असून आजही त्यात पाणी आहे, जरी चहूबाजूंनी समुद्र असला तरी या विहिरीचे पाणी गोड आहे. जंजिरा हा किल्ला अखेरपर्यंत अजिंक्य राहिला आहे.

## २. सिंधुदुर्ग :–

मालवण किनाऱ्याजवळ एक उत्तम जलदुर्ग म्हणून सिंधुदुर्ग किल्ला प्रसिध्द आहे. कोल्हापुरातून सुमारे १५० कि.मी. अंतरावर हा किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला बांधला. मुरुड जंजिरा किल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून हा किल्ला बांधला गेला. या किल्ल्याच्या सभोवताली १० मीटर उंचीची व ४ मीटर रुंदीची तटबंदी आहे. किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ महाराजांच्या पायाचे व तळहाताचे ठसे जतन करून ठेवलेले आहेत. किल्ल्यावर महादेव मंदिर, जुना वाडा, भगवती मंदिर आहे. सिंधुदुर्ग हा एकमेव किल्ला आहे जेथे शिवाजी महाराजांचे मंदीर आहे. या किल्ल्यात गोड्या पाण्याचे तीन विहिरी आहेत, त्यांची नांवे दुधबाव, दहीबाव व साखरबाव अशी आहेत.

## ३. शिवनेरी :–

शिवनेरी म्हणजे नाणे घाटाचा संरक्षक दुर्ग होय. शिवनेरी हे छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ आहे. गडाचा आकार बाणाच्या अग्रासारखा निमूळता व अग्रटोक उत्तरेकडे आहे. उत्तर कड्याच्या टोकास कडेलोट टोक असे म्हणतात. किल्ल्याच्या मध्यभागी पाण्याचे मोठे तळे आहे, त्याला बदामी तळे असे म्हणतात. किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थानाचा वाडा आहे. येथे बालशिवाजी व जिजामातांचा पुतळा आहे. किल्ल्यावरील दक्षिण बाजूस शिवाई मंदीर आहे.

## ४. सिंहगड :–

पुणे जिल्ह्यातील एक महत्त्वाचा किल्ला म्हणजे सिंहगड होय. या किल्ल्याचे पूर्वीचे नाव कोंढाणा होते. मात्र तानाजीने तो जिंकल्यानंतर महाराजांनी त्याचे नाव सिंहगड असे ठेवले. या किल्ल्यावर तानाजी कडा, कल्याण दरवाजा, पुणे दरवाजा व राजाराम महाराजांची समाधी आहे. पुणे येथून एस.टी. सुविधा उपलब्ध आहेत.

## ५. प्रतापगड :–

सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचा किल्ला म्हणजे प्रतापगड होय. महाबळेश्वरवरून पोलादपूरकडे जाताना जावळीच्या खोऱ्यात प्रतापगड आहे. या किल्ल्यावरील मुख्य आकर्षण म्हणजे भवानी मंदीर होय. या मंदीराची स्थापना १६६१ साली केली. या किल्ल्यावर समर्थाने स्थापन केलेले हनुमानाचे मंदीर आहे. किल्ल्यावर देवाची तळे, तलावाचा बुरुज, तसेच शिवरायांचा जेथे वाडा होता तेथे शिवाजी महाराजांचा पुतळा बसविलेला आहे. प्रतापगडावरून तोरणा, राजगड, मकरंदगड, रायगड हे किल्ले.दिसतात.

## ६. दौलताबाद/देवगिरी :–

औरंगाबाद जिल्ह्यातील हा एक प्रसिध्द भुईकोट किल्ला आहे. औरंगाबादहून वेरुळकडे जाणाऱ्या

हमरस्त्यावर हा किल्ला आहे. हा किल्ला १४व्या शतकात बांधलेला आहे. किल्ल्यातील चांद मिनार, पिनी महल आणि बारादारी हे विशेष आकर्षण आहे. चोरवाटा, भुयारे, खंदक, तासलेले कडे आणि भक्कम तटबंदी असे किल्ल्याचे वैशिष्ट्य आहे.

### ७. नळदुर्ग :-

उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात हा भुईकोट किल्ला आहे. येथील जलमंदीर प्रसिध्द आहे. किल्ल्याच्या एका बाजूस नऊ बुरुज आहे. किल्ल्यावर अनेक तोफा, वाडे तसेच हत्तीखाना आहे. पावसाळ्यात अनेक पर्यटक येथे भेटी देतात. किल्ल्यावरील नर व मादी धबधबे पर्यटकांना आकर्षित करतात.

### ८. बिबी का मकबरा :-

हे औरंगाबाद जिल्ह्यातील प्रसिध्द प्रेक्षणीय स्थळ आहे. इ.स. १६५१ ते १६६१ च्या दरम्यान आझम शहा यांनी आपली आई रुबिया-उल-दौराणी (औरंगजेबची पत्नी) यांच्या स्मरणार्थ हे समाधी स्थळ बांधले. बिबी का मकबरा चे ताजमहलशी साम्य असल्याने याला 'दख्खनचा ताज' असेही म्हटले जाते. हे बांधण्यासाठी जयपूर जवळील खाणीतून दगड आणण्यात आले. मकबरा हा भव्य ओट्यावर बांधला असून त्यात मधोमध बेगम रुबियाची कबर आहे. ही कबर १९५१ रोजी राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आली.

### ९. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस :-

हे भारतीय रेल्वेचे मुख्यालय म्हणून काम करणारे एक ऐतिहासिक रेल्वे स्टेशन आहे. युनेस्कोने (UNESCO) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसला २००४ साली जागतिक वारसा म्हणून घोषित केले आहे. ही इमारत बांधण्यास जवळपास १० वर्षे लागली. ही जुन्या काळात मुंबईतील सर्वोच्च इमारत होती. या स्टेशनला पूर्वी व्हिक्टोरिया असे नाव होते, १९९६ साली याचे छत्रपती शिवाजी टर्मिनस असे नाव दिले गेले. या इमारतीची रचना ही आकर्षक आहे.

वरील प्रमुख ऐतिहासिक स्थळांशिवाय महाराष्ट्रातील गेट वे ऑफ इंडिया, लिंगाणा, पन्हाळा, विशाळगड, तोरणा, पुरंदर, वासोटा, सज्जनगड, राजगड इ. ऐतिहासिक स्थळे प्रसिध्द आहेत.

## ❋ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-४ ❋

१. जंजिरा हा कोणत्या जिल्ह्यातील प्रमुख जलदुर्ग आहे?

*अ) रत्नागिरी* *ब) रायगड* *क) सिंधुदुर्ग* *ड) ठाणे.*

२. छ. शिवाजी महाराजांचे मंदिर कोणत्या किल्ल्यावर आहे?

*अ) सिंधुदुर्ग ब) तोरणा क) पुरंदर ड) सिंहगड.*

३. कोंढाणा हे कोणत्या किल्ल्याचे पूर्वीचे नाव होते?

*अ) प्रतापगड ब) सिंधुदुर्ग क) राजगड ड) सिंहगड.*

४. 'प्रतापगड' हा किल्ला कोणत्या जिल्ह्यात आहे?

*अ) रायगड ब) ठाणे क) सिंधुदुर्ग ड) सातारा.*

५. 'बिबी का मकबरा' यास राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून कोणत्या साली घोषित करण्यात आले?

*अ) १९४१ ब) १९५१ क) १९६१ ड) १९७१.*

## ४.३ सारांश

पर्यटन विकासामध्ये भौगोलिक, धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक घटकांना फार महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्र हा भौगोलिक, धार्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या समृध्द असा प्रदेश आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पर्यटनाचा विकास झालेला दिसून येतो.

भौगोलिक पर्यटनस्थळांमध्ये विविध प्रकारच्या स्थळांचा समावेश होतो. यामध्ये नैसर्गिक सौंदर्याची स्थळे, थंड हवेची ठिकाणे, समुद्रकिनारे, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने इ.चा समावेश होतो.

महाराष्ट्रातील महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान, चिखलदरा, आंबोली इ. थंड हवेची ठिकाणे प्रसिध्द आहेत. महाराष्ट्रातील ताडोबा, बोर, मेळघाट, कर्नाळा, नवेगाव, दाजीपूर पेंच ही प्रमुख राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये आहेत.

महाराष्ट्रातील धार्मिक वैशिष्ट्यांमुळे महाराष्ट्राला पर्यटनाच्यादृष्टीने विशेष महत्त्व आहे. पुण्याचा गणेशोत्सव, अष्टविनायक स्थळे, पंढरपूर, आळंदी, देहू, शिर्डी, कोल्हापूर, तुळजापूर इ. धार्मिक ठिकाणे पर्यटनाच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहेत.

सांस्कृतिक पर्यटनामध्ये लेणी, स्मारके, शिल्पे, उत्सव, नृत्य इ. समावेश होतो. महाराष्ट्रातील अजंठा, वेरूळ, खिद्रापूर, अगाशिव, पितळखोरा येथील लेणी प्रसिध्द आहेत.

पर्यटन विकासात ऐतिहासिक पर्यटन स्थळांना फार महत्त्वाचे स्थान आहे. ऐतिहासिक घटक, घटना याबद्दल लोकांना उत्सुकता असते. महाराष्ट्रातील गड, किल्ले, ऐतिहासिक राजधान्या महत्त्वाच्या आहेत. महाराष्ट्रातील जंजिरा, सिंधुदुर्ग, सिंहगड, प्रतापगड, शिवनेरी, रायगड यांना ऐतिहासिकदृष्ट्या विशेष महत्त्व आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **टेबल लँड** : सपाट प्रदेश.

२. **अवणी** : मालिका, रांगा.

३. **स्कूबा डायव्हिंग** : पाण्यातील खेळ.

४. **मेहरूब** : चंद्रकोर.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे :-**

१. *ब) सातारा.*

२. *अ) महाबळेश्वर.*

३. *क) रायगड.*

४. *क) आंबोली.*

५. *ड) रत्नागिरी.*

६. *क) वर्धा.*

७. *अ) वाघ.*

८. *ड) दाजीपूर.*

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे :-**

१. *ब) ज्ञानेश्वर.*

२. *अ) इंद्रायणी.*

३. *ड) चंद्रभागा.*

४. *अ) उस्मानाबाद.*

५. *ड) अहमदनगर.*

६. *क) माहूर.*

७. *क) खंडोबा.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे :-**
  १. *ब) औरंगाबाद.*
  २. *क) २१.*
  ३. *ड) ३४.*
  ४. *अ) सोमनाथ.*
  ५. *क) सातारा.*
  ६. *अ) कोल्हापूर.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ची उत्तरे :-**
  १. *ब) रायगड.*
  २. *अ) सिंधुदुर्ग.*
  ३. *ड) सिंहगड.*
  ४. *ड) सातारा.*
  ५. *ब) १९५१.*

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

१. महाराष्ट्रातील थंड हवेच्या ठिकाणांची (गिरीस्थाने) थोडक्यात माहिती द्या.

२. महाराष्ट्रातील राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये याविषयी थोडक्यात लिहा.

३. महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन केंद्राविषयी थोडक्यात लिहा.

४. महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक पर्यटन स्थळांची माहिती द्या.

५. महाराष्ट्रातील प्रमुख ऐतिहासिक पर्यटन केंद्राविषयी थोडक्यात लिहा.

## ४.७ क्षेत्रीय कार्य

☼ विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील विविध प्रकारच्या पर्यटन स्थळांना भेटी देऊन त्यांचा अहवाल तयार करावा.

## ४.८ संदर्भ ग्रंथ सूची/अधिक वाचनासाठी पुस्तके

१. **प्रा. ए. बी. सवदी** (१९९९) : *'द मेगा स्टेट महाराष्ट्र'*, निराली प्रकाशन, पुणे.

२. **डॉ. एस. बी. शिंदे** (२०१२) : *'पर्यटन भूगोल'*, फडके प्रकाशन, पुणे.

३. **अंकुशराव आहेर, मारकड** : *'पर्यटन भूगोल'*, पायल प्रकाशन, मिरत.

४. **के. ए. खतीब** : *'पर्यटन भूगोल'*, मेहता प्रकाशन, कोल्हापूर.

५. **डॉ. विठ्ठल घारपुरे** : *'पर्यटन भूगोल'*, पिंपरापुरे प्रकाशन, नागपूर.

❑❑❑